***ISSN 978***-81-947698-8-0

# *Sustainable Innovative Development in Economics, Environment, Agriculture, Health, Society*

*(अर्थशास्त्र, पर्यावरण, कृषी, आरोग्य, समाजातील शाश्वत नाविन्यपूर्ण विकास)*


















**Editor**
**Dr. S. M. Mulani**
***Head, Department of Geography,***
***Deshbhakta Sambhajirao Mahavidyalaya College, Mohol (Solapur), Maharashtra***

Jyotikiran Publication, Pune
International Publication

| | |
|---|---|
| **Title** | : Sustainable Innovative Development in Economics, Environment, Agriculture, Health, Society<br>*(अर्थशास्त्र, पर्यावरण, कृषी, आरोग्य, समाजातील शाश्वत नाविन्यपूर्ण विकास)* |
| **Editor’s Name** | **: Dr. S. M. Mulani** |
| **Publishing Agency** | **:** Jyotikiran Publication, Pune |
| **Publisher Address** | **:** Santosh Pandurang Mane<br>Sr. No. 204, Sahajeevan Society, Bhekrinagar, Hadpsar, Pune-8<br>Mob- 7058486065<br>Email- jyotikiranpublicationpune@gmail.com |
| **Printed By** | **:** Amitsons Digital Copier 106, Paras Chamber, 1st Floor, Above Bank Of India, Near Laxminarayan Theatre, Swargate, Pune- 411009**.** |
| **Edition Details** | **:** 2nd |
| **ISBN** | **:** 978-81-947698-8-0 |
| **Copyright** | **: © Dr. S. M. Mulani** |

*The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the book chapter. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their book chapter*

**© All rights reserved with the Editors** **Price: Rs- 600/-**

# EDITORIAL BOARD


- **Editor**

**Prof. Dr. S. M. Mulani, Head**, Department of Geography, Deshbhakta Sambhajirao Mahavidyalaya College, Mohol (Solapur), Maharashtra

- **Executive Editor**

**Prof. Dr. D. S. Tikate, Principal,** Deshbhakta Sambhajirao Mahavidyalaya College, Mohol (Solapur), Maharashtra

- **Co- Editor**

1) B. **Banate,** NAAC Co-ordinator, Deshbhakta Sambhajirao Garad Mahavidyalaya, Mohol (Solapur), Maharashtra
2) **Dr. V. R. Pawar**, IQAC, Co-ordinator, Deshbhakta Sambhajirao Garad Mahavidyalaya, Mohol (Solapur), Maharashtra.
3) **Dr. N. J. Patil**, Professor Department of Geography, Deshbhakta Sambhajirao Garad Mahavidyalaya Mohol (Solapur), Maharashtra
4) **Dr. D. G. Shinde**, Assistant Professor, Department of Geography, Deshbhakta Sambhajirao Garad Mahavidyalaya, Mohol (Solapur), Maharashtra

- **Panel of Experts**

1) **Dr. Praveen Saptarshi-** Visiting Faculty, Salisbury University, USA
2) **Neeshi Heeroo-Luximon:-** Lecturer in Marathi, Mahatma Gandhi Institute, Marathi Department, School of Indian Studies, Mauritius
3) **Dr. Muhammad Tahir Khan-** Assistant Professor, Department of Economics and Business Administration, Division of Arts and Social Sciences University of Education. Pakistan
4) **Dr. Dattatray S. Dhawale-** Scientist, Qatar Environment and Energy Research Institute, Hamad Bin Khalifa University, Qatar
5) **Dr. B. R. Pant-** Professer and Head, Department Of Geography, M. B. Government Post Graduate College Haldwani Nainital Uttarakhand (Affiliatedto The Kumaun University Nainital)
6) **Dr. H. B. Rathod**-Principal, Gramin Arts, Commerce & Science Mahavidyalaya, Vasant Nagar, (Kotgyal)Tq. Mukhed
7) **Prof. Dr. S. D. Shinde-**Chairman, Board of Studies in Geography and Geology & Head Department of Geography, Shivaji University, Kolhapur
8) **Dr. F. M. Nadaf-** Vice Principal & Professor of Geography DPM's Shree Mallikarjun & Shri. Chetan Manju Desai College, Canacona-Goa
9) **Dr. T. N. Lokhande-** Prof. Dept. of Geography, K. B. P. Mahavidyalaya, Pandharpur & BOS Chairman, PAHS University, Solapur.
10) **Dr. B. M. Bhanje** Principal, Santosh Bhimrao Patil Arts commerce & Science College, Mandrup & Former BCUD Director, Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
11) Dr. A. H. Nanaware, Professor, Shri Shivaji Mahavidyalaya, Barshi, Tal. Barshi, Dist. Solapur.
12) Dr.Shinde Namdeo Gorakh, Professor . Head, Department Of Geography And Meteorology, D.B.F.Dayanand College Of Arts And Science Solapur
13) **Dr. M. V. Suryawanshi-**Head Department of Geography, Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Aurangabad
14) **Dr. Jyotiram More -**Head, Department of Geography, B. J. S. College, Wagholi, Pune
15) **Dr. Parag Arun Khadke-**Associate Profesor, School of Earth Sciences, S.R.T.M.University, Nanded.
16) **Dr. S. C. Advitot-** Professor , Head, Dept. of Geography, C. B. Khedgi's Basaveshwar College, Akkalkot
17) **Dr. Carolline David,** Associate Professor & Head of Economics, DTSS College of Commerce, Malad East Mumbai
18) **Dr. P. T. Patil**, Assistant Professor, Department of Geography, Shivaji University, Kolhapur (Maharashtra:India)
19) **Dr. H. B. Tipe,** Head, Department of Geography Vasundhara College, Solapur
20) **Santosh P. Mane-** Head Department of Geography, Sameer Gandhi Kala (Commerce & Science) Mahavidyalaya Malshiras
21) **Dr.Subhash Chavare**, Assistant Professor, Geography Krantiagrani G. D. Bapu Lad Mahavidyalaya, Kundal

# CONTENTS


| Sr. No. | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| 1. | विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : अन्नदात्यांची कैफियत<br>*शरद बाबुराव सोनवणे* | 1-4 |
| 2 | परभणी जिल्ह्यातील ग्रामीण वस्त्यांतील सेवासुविधेचा चिकित्सक अभ्यास<br>**प्रा. डॉ. भगवान प्रभाकरराव शेंडगे** | 5-10 |
| 3 | विविध शासकीय उद्योजकता विकास योजनांद्वारे महिलांचा आर्थिक विकास व सबलीकरण<br>**डॉ. सय्यद तनवीर बदरुद्दीन** | 11-15 |
| 4 | स्वयं-साहाय्यता बचत गट व ग्रामीण विकास<br>**प्रा. डॉ. अमोल तुकाराम खाडे** | 16-17 |
| 5 | औसा तालुक्यातील आर्थिक विकासामध्ये साक्षरतेचे महत्व<br>**प्रा. जावळे व्ही. जी.** | 18-20 |
| 6 | उजनी पाणलोट क्षेत्राचा मोहोळ तालुक्यातील कृषी व्यवसायावर झालेला परिणाम- एक चिकित्सक अभ्यास<br>**श्री. हनुमंत शंकर हेळकर, प्रा. डॉ. डी. जी. शिंदे** | 21-25 |
| 7 | हिंदी यात्रा साहित्य में प्रकृति प्रकोप का चित्रण<br>**डॉ. विक्रम रामचंद्र पवार** | 26-27 |
| 8 | लिंगभाव समानता<br>**Dr. Ranjana Rajesh Sonawane** | 28-31 |
| 9 | बार्शी तालुक्यातील ग्रामीण भागातील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना येणाऱ्या आरोग्यविषयक समस्या व विविध उपक्रमांच्या परिणामकारकतेचा अभ्यास<br>**प्राचार्य डॉ. शशिकांत लक्ष्मण तांबे** | 32-35 |
| 10 | कचरा बीनने वालों के लिए आशा की नई किरण<br>**प्रा. डॉ. नीता तिवारी** | 36-38 |
| 11 | पर्यावरण: एक दृष्टिक्षेप<br>**प्रा. सुरेखा जोतिबा रेडेकर** | 39-41 |
| 12 | दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या काळातील इंग्रज वकीलाची राजकारणातील भूमिका<br>**प्रा. मते अनिल बापुराव** | 42-44 |
| 13 | वाहतूक: व्यापाराचे अनुषंगिक साधन<br>**प्रा.कर्डक सुनील भास्कर** | 45-50 |
| 14 | राज्यघटनेच्या सरनाम्याचे तत्वज्ञान<br>**प्रा.विलासराव लवटे** | 51-52 |
| 15 | पर्यावरण संवर्धनामध्ये उच्च शिक्षणाची भूमिका<br>**डॉ. एकनाथ दत्तात्रय वाजगे** | 53-56 |
| 16 | शाश्वत शेती<br>**प्रा. डॉ. नीता तिवारी** | 57-60 |
| 17 | *जलसंपत्तीचे महत्व, समस्या व उपाय*<br>***प्रा. माने आर.व्ही.*** | 61-62 |
| 18 | परळी तालुक्यातील कृषी घनता: एक भौगोलिक अभ्यास<br>**श्री. कैलास भास्कर लव्हाळे, डॉ.व्ही.एस.चिमनगुंडे** | 63-65 |
| 19 | दलित जीवनाचा भाष्यकार : शंकरराव खरात<br>**प्रा. डॉ. सोनवले राजकुमार रंगनाथ** | 66-69 |
| 20 | ग्रामीण कवितेतील शेतकरी जीवनाचे चित्रण<br>**प्रा.उघडे सुहास मुरलीधर** | 70-72 |
| 21 | जालना जिल्ह्यातील शेती व शेती पुरक व्यवसायाचा एक -भौगोलिक अभ्यास<br>**प्रा.डॉ. भाऊसाहेब सोनाजी देवकर** | 73-82 |
| 22 | सांगली जिल्ह्यातील महिला शेतमजुरांच्या समस्या<br>**राणी महादेव कांबळे** | 83-84 |
| 23 | रासायनिक खते व कीटकनाशकांचा शेतीवरील परिणाम – एक अभ्यास<br>**डॉ. बोबडे बबन बाबुराव** | 85-88 |

# विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : अन्नदात्यांची कैफियत

***शरद बाबुराव सोनवणे***

*सहाय्यक प्राध्यापक – राज्यशास्त्र विभाग, श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै. डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री जि.धुळे*

*ई – मेल-sharadpolsci@gmail.com*

**प्रस्तावना**

*भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळे बहुसंख्य जनतेच्या उदरनिर्वाहाचे साधन शेती व शेतीपूरक व्यवसाय के आहेत. स्वातंत्र्यानंतर पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून कृषी व कृषीउत्पन्न विकासासाठी नियोजनबद्ध योजना राबविल्यामुळे देशात हरित क्रांती घडून आली. याचे संपूर्ण श्रेय तत्कालीन नेतृत्वाच्या राजकीय इच्छाशक्तीला द्यावे लागेल. सन 1991 मध्ये भारताने उदारीकरणाचा स्वीकार केल्यानंतर सर्वच क्षेत्रात तीव्र स्पर्धा सुरू झाली व सरकारने एकाएका जबाबदारीतून अंग काढून घेण्यास सुरुवात केली. शेती क्षेत्र देखील यापासून अपवाद राहिले नाही. सरकारने खते, बी-बियाणे, यंत्रे व शेती अवजारे यामधील सरकारी सबसिडी काढून घेण्यास सुरुवात केली. अशातच जागतिक पातळीवर सर्वत्र निर्माण झालेल्या प्रदूषण, पर्यावरणीय ऱ्हास, तापमान वाढ अशा सर्व परस्पर संबंधित समस्यांमुळे नैसर्गिक ऋतुचक्रात देखील बदल होत आहे. त्यामुळे दुष्काळ, अवकाळी पाऊस, आमली पर्जन्य यांचे प्रमाण वाढत असून या सर्व समस्यांचा दुष्परिणाम शेती व्यवसायावर होताना दिसत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे जीवन उद्ध्वस्त होत चालले असून आत्महत्या हा केवळ एकमेव मार्ग शेतकऱ्यांना दिसत आहे. परिणामतः भारतात व विशेषता महाराष्ट्रातील विदर्भ मराठवाड्यात शेतकरी आत्महत्येचे प्रमाण वाढत असल्याचे चित्र दिसत आहे. याबाबतीत सर्वात दुर्दैवाची गोष्ट म्हणजे महाराष्ट्रातील सर्वच राजकीय पक्ष या समस्येवर उपाय शोधण्यासाठी एकत्र येऊन ठोस पावले उचलण्याऐवजी शेतकरी आत्महत्येचे राजकारण करताना दिसतात. या दोषापासून कोणताच राजकीय पक्ष दूर राहिलेला नसून शेतकऱ्यांचे प्रश्न मनापासून सोडविण्यासाठी एकत्र येण्याची भूमिका व राजकीय इच्छाशक्ती कोणत्याच राजकीय पक्षाकडे असल्याचे दिसत नाही. याउलट शेतकऱ्यांचे प्रश्न तसेच भिजत ठेवून त्याचे राजकारण करताना सर्वच पक्ष आघाडीवर दिसतात. प्रस्तुत शोधनिबंधात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे दाहक वास्तव मांडून त्यावर शासनाकडून अपेक्षित असलेल्या उपाययोजनांची चर्चा केली आहे.*

महाराष्ट्रातील विदर्भ व मराठवाडा भागातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या

महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून प्रत्येक वर्षी वाढणारी ही संख्या धक्कादाक व डोके सुन्न करणारी आहे. कधी दुष्काळ तरी कधी अत्यल्प पाऊस, कधी गारपीट, तर कधी अवकाळी पावसाच्या तडाख्यात राज्यातील शेतकऱ्यांना सातत्याने नुकसानीचा सामना करावा लागत असल्यामुळे हतबल झालेले शेतकरी आत्महत्यासारखा पर्याय निवडून स्वतःचं आयुष्य संपवतात. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आत्महत्या हा पर्याय नाही, पण शेतकऱ्यांना कोणी वालीच उरलेला नसल्यामुळे वैफल्यग्रस्त मानसिकतेमधून शेतकरी असे टोकाचे पाऊल उचलतांना दिसतात. म्हणून शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने आत्मसन्मान मिळवून देण्यासाठी शासकीय स्तरावर सकारात्मक पाऊले उचलणे अपेक्षित आहे. मात्र त्याबाबतीत केंद्र सरकारसह सर्वच राज्यातील सरकारे उदासीन असल्यामुळे बी-बियाणे, खते-औषधे खरेदीपासून ते शेतमाल विक्रीपर्यंत शेतकऱ्यांचे शोषण आणि कुचंबना होत असल्यामुळे शेतकऱ्यांसाठीच्या अनेक सरकारी योजना केवळ नावापुरत्या शेतकरी सन्मानाच्या राहतात. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सर्वच राजकीय पक्ष केवळ राजकारण करतांना दिसतात.

महाराष्ट्रात पहिली शेतकरी आत्महत्या विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यातील चिलगव्हाण गावात झाली. चिलगव्हाण येथील शेतकरी साहेबराव करपे यांनी त्यांच्या कुटुंबियांसह 19 मार्च 1986 रोजी आत्महत्या केली होती. त्यानंतर अद्यापही महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र सुरुच आहे. सततच्या दुष्काळामुळे पीक हाती येईना, याप्रकारे शेतातील उत्पन्नच घटल्याने शेतीसाठी घेतलेले कर्ज त्यांना फेडता येईना. त्यामुळे वैफल्यग्रस्त झालेल्या करपे यांनी स्वतःसह, पत्नी आणि चार मुलांच्या जेवणात विष कालवून कुटुंबासहित आत्महत्या केली, जी महाराष्ट्रातील पहिली शेतकरी आत्महत्या होती.

राज्यातील शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण सातत्याने वाढतच आहे. यामध्ये विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांची स्थिती तर फारचच गंभीर आहे. या भागात पर्जन्यमान कमी असल्यामुळे दरवर्षी पाण्याची प्रचंड टंचाई असते व विदर्भात त्यामुळे येथील शेतकरी कायम त्रस्त असतात. तसेच काबाडकष्ट करुन म्हणावा तसा पैसा न मिळाल्यामुळे

येथील शेतकऱ्यांवर कर्जाचे डोंगर दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे विदर्भात अनेक शेतकऱ्यांनी आर्थिक विवंचनेतून आत्महत्या केल्या आहे. मागील सहा महिन्यात पूर्व विदर्भातील 290 शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असून एकट्या जानेवारी महिन्यात तब्बल 22 शेतकऱ्यांनी गळफास घेतला. दुष्काळ, नापिकी, कर्जबाजारीपणा, सावकारी पाश, आर्थिक विवंचना अशी अनेक कारणे या शेतकऱ्यांच्या आत्महत्येमागे असल्याचे दिसते.

महाराष्ट्रात मराठवाडा व विदर्भात शेतकरी आत्महत्येचे प्रमाण मोठे असल्याचे दिसते. मराठवाड्यात मागील दोन महिन्यांची आकडेवारी पहिली असता जानेवारी व फेब्रुवारी 2021 या महिन्यात एकूण 127 शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असून जानेवारीत 57 तर फेब्रुवारी महिन्यात 70 शेतकऱ्यांनी आत्महत्या करून आपले आयुष्य संपवले आहे. एकीकडे कोरोनाचे संकट असताना, सुरुवातीला अतिवृष्टी आणि त्यानंतर अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडल्यामुळे जानेवारी-फेब्रुवारी २०२१ मध्ये औरंगाबाद जिल्ह्यात 26, जालन्यात 11, परभणी जिल्ह्यात 10 हिंगोली जिल्ह्यात 4 नांदेड जिल्हयात 17 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. बीड जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्येची आकडेवारी तर मनाला सुन्न करणारी असून बीडमध्ये जानेवारीत 14 तर फेब्रुवारी महिन्यात 16 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहे. त्याचप्रमाणे लातूर जिल्ह्यात 13 आणि उस्मानाबाद जिल्ह्यात 16 शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. शेतकरी आत्महत्येचे वरील आकडे हे केवळ जानेवारी व फेब्रुवारी 2021 या दोन महिन्यातील आहेत. 2020 मध्ये मराठवाड्यात झालेल्या एकूण आत्महत्यापैकी औरंगाबाद जिल्ह्यात 122, जालना 18, परभणी 64, हिंगोली 52, नांदेड 77, बीड 175, लातूर 68, उस्मानाबाद 127 अशा एकूण 773 शेतकऱ्यांनी दुष्काळ, नापिकी आणि कर्जबाजारीपणाला कंटाळून जीवन संपवले होते. 2020 या वर्षात मराठवाड्यात झालेल्या एकूण शेतकरी आत्महत्यांमध्ये सर्वाधिक 175 आत्महत्या बीड जिल्ह्यात झाल्या होत्या.

कर्जमाफीनंतर देखील शेतकरी आत्महत्येच्या प्रमाणात चिंताजनक वाढ

शेतकरी आत्महत्यामागे कर्जबाजारीपणा हे कारण असल्याचे कित्येकदा पाहायला मिळत असल्यामुळे अनेकदा सरकारकडून शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले जाते. तसेच शेतकरी आत्महत्या थांबवण्यासाठी कर्जमाफी किंवा इतर अनेक योजना राबवत असल्याचा दावाही सरकारकडून केला जातो. तरीही 'शेतकरी आत्महत्या' थांबत नसल्याचे दिसत आहे. 2014 मध्ये महाराष्ट्रात सत्तेत आलेल्या भाजपने 2017-18 मध्ये राज्यात 34,020 कोटींची कर्जमाफी जाहीर करून शेतकऱ्यांना दीड लाखांपर्यंत सरसकट कर्जमाफ करण्याची घोषणा तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. तरीही 2019 मधील राज्यातील आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची आकडेवारी धक्कादायक होती. एनसीबीआरने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार देशात 2019 मध्ये 10281 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे दिसते. विशेष म्हणजे यात महाराष्ट्राचा पहिला क्रमांक होता व एकट्या महाराष्ट्रात 3927 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे. एकंदरीत कर्जमाफी करूनही शेतकरी आत्महत्या थांबत नसल्याचे यातून दिसते.

शेतकऱ्यांसाठीच्या कागदोपत्री शासकीय योजना

शेतकरी आत्महत्या थांबवण्यासाठी सरकार विविध योजना जाहीर करत असतात. पण प्रत्यक्षात ह्या योजना कागदोपत्री ठरत असल्यामुळे त्या अपयशी ठरतात. उदा. फडणवीस सरकारच्या काळात सुरू केलेली 'बळीराजा चेतना योजना' होय. राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी फडणवीस सरकारने 2015-16 मध्ये बळीराजा चेतना योजने अंतर्गत व्यथित शेतकऱ्यांना शोधणे, शेतकऱ्यांच्या मुला-मुलींसाठी सामूहिक विवाह सोहळा आयोजित करणे, त्यांना उत्तम आरोग्य सेवा पुरवणे आणि कर्जाचे पुनर्गठन करणे या सुविधा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, ही योजना मराठवाडा व विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यात अपयशी ठरल्यामुळे 2019 मध्ये राज्यात सत्तेत आलेल्या महाविकास आघाडी सरकारने काही दिवसांपूर्वी ही योजना बंद करण्याचा निर्णय घेतला.

**निष्कर्ष व उपाययोजना**

भारतातील शेतकऱ्यांची दुर्दशा ही अधिकच गंभीर होत चाललेली असून शेती प्रश्नाकडे जेवढ्या गांभीर्याने लक्ष द्यायला पाहिजे तसे आज पर्यंत कोणत्याच शासनाने केल्याचे दिसत नाही. राजकीय पक्ष व त्यांचे अभिजन हे सत्तेवर असो की विरोधात त्यांचे हितसंबंध मात्र एक सारखेच असतात हे नक्की. अलीकडे तर नवीनच प्रवृत्ती जन्म घेऊ लागली आहे, ती म्हणजे शेतकरी नेते हे सुद्धा सरकारमध्ये सामील होऊन राजकीय अभिजनांमध्ये स्वतःला मिरवून घेऊ लागले आहेत. या प्रक्रियेमुळे व व्यवस्थेमुळे शेतकऱ्यांच्या शेतीसमस्येचे निदान होऊ शकलेले नाही. पर्यायाने हवालदिल झालेल्या शेतकर्यांसमोर संकटातून चिरमुक्ती मिळविण्यासाठी आत्महत्या करणे हा एकमेव पर्याय उरतो. निवडणुकीच्या राजकारणामध्ये शेतकऱ्यांची मते मिळविण्यासाठी सत्ताधारी व विरोधी अशा सर्वच राजकीय पक्षाकडून शेतकऱ्यांना वेगवेगळी स्वप्ने दाखविली जातात. विरोधात असणारे राजकीय पक्ष तर शेतकऱ्यांच्या प्रश्नाविषयी, समस्यांविषयी खूपच गंभीर (दुःखी) आहे, असे दाखविण्यासाठी विधीमंडळाच्या कामकाजावर बहिष्कार टाकून शेतकऱ्यांचे तारणहार असल्याचा बेगडी आव आणतात. परंतु प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या प्रश्नावर कायमची उपाययोजना करण्यासाठी विधिमंडळात व संसदेत गंभीर चर्चाही होत नाही आणि शेतकरी हिताचा कोणताच निर्णय घेतला जात नाही. निर्णय होतो तो फक्त शेतकऱ्यांचे व शेतीचे प्रश्न अभ्यासून त्यावर उपाययोजना शोधण्यासाठी वेगवेगळे आयोग व समित्या स्थापन करण्याचा. नंतर मात्र नेमलेले आयोग व समित्या यांच्या अहवालास वाटाण्याच्या अक्षता लावल्या जातात. ठोस उपाययोजना काहीच होत नाही. याप्रकारे नैसर्गिक दुष्टचक्र व राजकीय उदासीनता यामुळे हवालदिल व कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांसमोर जीवनयात्रा संपविली याशिवाय दुसरा पर्याय उरत नाही. आणखी कहर म्हणजे शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यावर त्याच्या कुटुंबाच्या मनावरील वेदना कोणाला दिसू नये, तसेच मायबाप सरकार किती कृपाळू व दयाळू आहे हे दाखवण्यासाठी तुटपुंज्या आर्थिक मदतीची राजकीय मलमपट्टी करण्याचा फार्स केला जातो. परंतु प्रत्यक्षात गरज आहे ती शेती प्रश्नासंदर्भात कठोर शस्त्रक्रिया करून शेतकऱ्यांना लागलेला दारिद्र्याचा समूळ व कायमचा नष्ट करण्याची. त्यासाठी शासनाने पुढील उपाययोजना करण्याची आवश्यकता असल्याचे दिसते.

1. शेतीचा उत्पादन खर्च सरकारच्या वेगवेगळया धोरणांमळे वाढत असतांना शेती मालाचे भाव बेसुमार आयातीच्या धोरणांमुळे सातत्याने पडत आहे. परिणामी शेती व्यवसाय अधिकाधिक तोट्यात जात दिसत आहे. त्यामुळे जोपर्यंत शेतकऱ्यांच्या शेती मालाला स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशीप्रमाणे किफायदशीर हमीभावाची हमी मिळत नाही. तोपर्यत शेतकऱ्यांच्या खेदजनक आत्महत्या थांबणार नाहीत.

2. शेतकरी विमा, पीक विमा अशा शेतकरी व शेतमालाला संरक्षण देणाऱ्या योजना प्रभावीपणे राबविल्या पाहिजे.

3. अनेक बाजार समित्यांमध्ये हमीभावाप्रमाणे माल खरेदी होत नाही. जो व्यापारी शेतकऱ्यांचा माल हमीभावापेक्षा कमी पैशात खरेदी करेल त्याला शिक्षा व्हावी. या संदर्भात सरकारने कायदेशीर तरतूद करायला हवी.

4. शेतकऱ्याला शुन्य टक्के व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देऊन शेतकऱ्यांच्या पिकाला हमी भावाबरोबरच शेती मालावर प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक प्रोसेसिंग यूनिट देखील शासनाने निर्माण करायला हवे. मराठवाडा व विदर्भात अशा प्रकारचे युनिट पाहायला मिळत नाही. म्हणून शेतकऱ्यांना कोणकोणते शेतीपूरक जोडव्यवसाय करता येतील, याचे नियमित प्रशिक्षण व त्यासाठी भांडवल उपलब्धता करून दिले पाहिजे.

5. शेतकऱ्यांना किफायतशीर भावात शेतीसाठी बी-बियाणे, खते, औषधे, यंत्रे व अवजारे यांचा माफक किमतीत व वेळेवर पुरवठा झाला पाहिजे.

6. शेतीच्या प्रभावी तंत्राचे मार्गदर्शन गावपातळीवर तज्ज्ञांद्वारे शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिले पाहिजे.

7. शेतीसाठी पाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रभावी पावले उचलणे गरजेचे आहे.

शेवटी सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफी नाही तर त्यांच्या कर्जमुक्तीसाठी प्रामाणिक प्रयत्न करायला पाहिजे, कारण कर्जमाफी हा काही शाश्वत उपाय नसुन तो शेतकऱ्यांना सलाईनवर जगवण्याचा प्रकार आहे. अन्यथा शेतकरी या दुष्ट चक्रव्युवहातून बाहेरच पडणार नाही. अशा व आणखी बरेच काही गोष्टी तज्ञांच्या शिफारशी व मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांसाठी राबविल्या तर शेतकऱ्यांना दुष्टचक्रातून बाहेर काढून त्यांना सक्षम करता येईल. यामुळे शेतकरी आत्महत्या चा रोग समूळ नष्ट होईल.

**संदर्भ**

1. बीबीसी न्यूज 19 जानेवारी 2019

2. महाराष्ट्र टाईम 20 जानेवारी 2020

3. Manoranjitham, S. D., et al. "Risk factors for suicide in rural south India." The British Journal of Psychiatry 196.1 (2010): 26-30.

4. Radhakrishnan, Rajiv, and Chittaranjan Andrade. "Suicide: an Indian perspective." Indian journal of psychiatry 54.4 (2012): 304.

5. Stallones, Lorann, and Cheryl Beseler. "Pesticide poisoning and depressive symptoms among farm residents." Annals of epidemiology 12.6 (2002): 389-394.

# परभणी जिल्ह्यातील ग्रामीण वस्त्यांतील सेवासुविधेचा चिकित्सक अभ्यास

***प्रा. डॉ. भगवान प्रभाकरराव शेंडगे***

*संशोधक मार्गदर्शक, भूगोल विभाग, बी. रघुनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय परभणी*

*Email: shendgebp@gmail.com*

**सारांश:**

*२०११ च्या जनगणनेनुसार परभणी जिल्ह्यातील ग्रामीण वस्तीतील प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या सेवा सुविधेचा अभ्यास तालुकानिहाय या लेखात करण्यात आला आहे. परभणी जिल्ह्यातील एकूण ग्रामीण वस्त्यांमध्ये प्राथमिक शाळांची संख्या ८२३ एवढी आहे. एका प्राथमिक शाळा वर १५३९ एवढी ग्रामीण लोकसंख्या अवलंबून आहे. सेलू, जिंतूर व सोनपेठ या तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांमध्ये प्राथमिक शिक्षणाची सुविधा आहे. परभणी आणि पाथरी या तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांमध्ये प्राथमिक शिक्षणाची सुविधा असमाधानकारक आहे. या तालुक्यांमध्ये प्रत्येकी २३ आणि १० प्राथमिक शाळा वाढविणे आवश्यक आहे. तसेच परभणी जिल्ह्यातील एकूण ग्रामीण वस्त्यांमध्ये माध्यमिक शाळांची संख्या १६७ एवढी आहे. एका माध्यमिक शाळा वर ७५८३ एवढी ग्रामीण लोकसंख्या अवलंबून आहे. गंगाखेड, पालम व सोनपेठ या तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांमधील माध्यमिक शिक्षणाची सुविधा उच्च आहे. सेलू व मानवत या तालुक्यांमध्ये माध्यमिक शिक्षणाची सुविधाअसमाधानकारक आहे. या दोन तालुक्यात प्रत्येकी ०५ माध्यमिक शाळांची संख्या वाढविणे आवश्यक आहे.*

**बीजसंज्ञा**: *प्राथमिक शिक्षण सेवा-सुविधा, माध्यमिक शिक्षण सेवा सुविधा.*

**प्रस्तावना:**

वस्ती ही मानवी संस्कृतीची वैशिष्ट्यपूर्ण प्रतीक आहे. वस्तीमध्ये वास्तव्य करणारे निवासी व तेथे निर्माण झालेल्या विविध सेवा सुविधांची अतूट नाते निर्माण होते. मानवाच्या विविध गरजाची पूर्तता वस्त्यांमध्ये केली जाते. वस्तीतील रहिवाशांसाठी व परिसरातील वस्तीसाठी सेवा सुविधा पुरविणे हे ग्रामीण सेवा केंद्रांचे कार्य आहे. आधुनिक काळात दूरदर्शन, आकाशवाणी, संगणक वापर, दूरध्वनी आणि विद्युत सेवा यासारख्या सुविधा ग्रामीण भागापर्यंत पोहचल्याने ग्रामीण वस्त्यांची कार्यात्मक व्यक्तिमत्व उत्तरोत्तर विकसित होत आहे.

ग्रामीण वस्त्यांच्या कार्यामध्ये वस्त्यातील रहिवाशांसाठी व परिसरातील इतर वस्त्यांसाठी पुरविण्यात येणाऱ्या सेवा सुविधांचा समावेश होतो. "ग्रामीण सेवा केंद्र, सामाजिक, आर्थिक आणि क्षेत्रीय दृष्टीने मर्यादित आकारांचे असल्याने यास बाजार केंद्र असे म्हणतात. या बाजार किंवा सेवा केंद्रांकडून प्रशासकीय सेवा, वर्तमानपत्र, व्यापारी (वस्तूच्या स्वरूपातील) सुविधा परिसरातील ग्रामीण वस्त्यांना पुरविल्या जातात ( सिंग, १९७५)."

भारतीय भूगोल तज्ञांनी ग्रामीण सेवा केंद्राचे विश्लेषण ग्रामीण वस्त्यांमध्ये असलेल्या विविध कार्यावरून केले आहे. गोपालकृष्ण आणि चंदना (१९७७) यांच्या मते, "जी ग्रामीण वस्ती एक किंवा अनेक सेवा सभोवतालच्या ग्रामीण वस्त्यांना उपलब्ध करून देते, अशा ग्रामीण वस्तीला ग्रामीण सेवा केंद्र असे म्हणतात." या भूगोल तज्ञांनी रेशन दुकान, शाळा, पोस्ट कार्यालय, डिस्पेंसरी आणि पशु वैद्यकीय सेवा कार्यांच्या आधारे ग्रामीण सेवा केंद्राचा अभ्यास केला आहे. "ग्रामीण सेवा केंद्र समाजाला सेवा आणि कार्याची सुविधा देते. ग्रामीण सेवा केंद्राकडून आर्थिक, सामाजिक, प्रशासकीय,सांस्कृतिक, पुनर्निर्मितीच्या सेवा आणि कार्य त्यांच्या प्रभाव क्षेत्रातील ग्रामीण वस्तीना उपलब्ध होतात (सुंदरम,१९७७)". ग्रामीण सेवा केंद्रांची कल्पना क्रिस्टॉलर (१९३३), ग्रीन (१९५०), डीकिन्सन (१९३७), बेरी आणि गॅरिसन (१९५८) इत्यादी भूगोल तज्ञांनी विकसित केली आहे. प्रस्तुत शोधनिबंधात परभणी जिल्ह्यातील ग्रामीण वस्त्यांतील सेवा सुविधांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**अभ्यासक्षेत्र:**


परभणी जिल्हा प्रस्तुत संशोधनासाठी अभ्यासक्षेत्र म्हणून निवडला आहे. परभणी जिल्हा गोदावरी,पूर्णा व करपरा या नद्यांनी व्यापलेला आहे. या जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार १८° ४५' उत्तर ते २०° ३' उत्तर अक्षवृत्त तर रेखावृत्तीय विस्तार ७६° १२' पूर्व ते ७७° २९' पूर्व रेखावृत्ता दरम्यान आहे. सदरील जिल्ह्याचे क्षेत्रफळ ६२५०.५८ चौरस किलोमीटर आहे. या जिल्ह्यातून अजिंठा व बालाघाट डोंगर रांगा जाते. २०११ च्या जनगणनेनुसार परभणी जिल्ह्यातील एकुण लोकसंख्या १८३६०८६ आणि लोकसंख्येची घनता दर चौरस किलोमीटरला २९४ एवढी आहे. या जिल्ह्यात परभणी, सेलू, जिंतूर, मानवत, पाथरी, सोनपेठ, गंगाखेड, पालम व पूर्णा या नऊ तालुक्यांचा समावेश होतो. अभ्यास क्षेत्रात एकूण ८३१ गावे आहेत. तालुकानिहाय अभ्यासक्षेत्रात सेलू ९३, जिंतूर १६६, परभणी १२८, मानवत ५४, सोनपेठ ५७, गंगाखेड १०५, पालम ८२ आणि पूर्णा ९० गावे आहेत.

**उद्दिष्टे:**

१. परभणी जिल्ह्यातील ग्रामीण वस्त्यांतील प्राथमिक शिक्षणाच्या सेवा सुविधांचा अभ्यास करणे.

२. परभणी जिल्ह्यातील ग्रामीण वस्त्यांतील माध्यमिक शिक्षणाच्या सेवा-सुविधाचा अभ्यास करणे.

**परभणी जिल्ह्याचे भौगोलिक स्थान**




**माहिती संकलन व अभ्यास पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम स्वरूपाची आकडेवारी वापरली आहे. परभणी जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन आणि जनगणना पुस्तकेतून (२०११) घेतली आहे. ग्रामीण सेवा सुविधांची उपलब्धता काढण्यासाठी खालील सूत्राचा वापर केला आहे.

$$Xie = \frac{Pi}{mp}\frac{Pi}{mp}$$

यामध्ये,

Xie= मंडळातील सेवा-सुविधांची अपेक्षित संख्या

Pi = मंडळातील एकूण ग्रामीण लोकसंख्या

mp = तालुक्यातील प्रती एक सुविधावर अवलंबून असलेली लोकसंख्या

$$mp = \frac{P}{Fi}\frac{P}{Fi}$$

P= तालुक्यातील एकूण लोकसंख्या

Fi= प्रत्येक सेवा-सुविधांची एकूण संख्या

Xio= क्षेत्रातील सेवासुविधांची प्रत्यक्षात असलेली निरीक्षणाने गणना केलेली उपलब्ध संख्या.

**ग्रामीण सेवा सुविधांची क्षमता:**

ग्रामीण सेवा सुविधांच्या क्षमतेचा अभ्यास करण्यासाठी जनगणना वर्ष २०११ च्या आकडेवारीच्या आधारे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण सुविधांच्या क्षमतेचा विचार केला आहे.

**विषय विवेचन:**

**१.प्राथमिक शिक्षणाची सुविधा:**

प्राथमिक शिक्षण ग्रामीण विकासाचा एक अनिवार्य घटक आहे. परभणी जिल्ह्यातील एकूण ग्रामीण वस्त्यांमध्ये एकूण प्राथमिक शाळांची संख्या ८२३ एवढी आहे. एका प्राथमिक शाळावर १५३९ एवढी ग्रामीण लोकसंख्या अवलंबून आहे. अभ्यास क्षेत्रातील तालुकानिहाय एकूण ग्रामीण वस्तीतील उपलब्ध असलेली प्राथमिक शाळांची संख्या आणि एकूण लोकसंख्या यांचा विचार करून अपेक्षित प्राथमिक शाळांची संख्या वरील सूत्राच्या साह्याने काढली आहे. त्या आधारित तालुकानिहाय ग्रामीण वस्तीचे विभाजन प्राथमिक शिक्षणाची उच्च सुविधा, मध्यम सुविधा, निम्न सुविधा व असमाधानकारक सुविधा अशा चार गटांमध्ये वर्गीकरण करून केले आहे. ते सारणी क्रमांक १ मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्रमांक-१,** परभणी जिल्हा: तालुकानिहाय ग्रामीण वस्त्यांतील प्राथमिक शिक्षणाची सुविधा

| अ.क्र. | तालुका | प्राथमिक शाळांची उपलब्ध संख्या | प्राथमिक शाळांची अपेक्षित संख्या |
|---|---|---|---|
| १ | सेलू | ९१ | ७९ |
| २ | जिंतूर | १६५ | १५५ |
| ३ | परभणी | १२७ | १५० |
| ४ | मानवत | ५३ | ५५ |
| ५ | पाथरी | ५६ | ६६ |
| ६ | सोनपेठ | ५७ | ४८ |
| ७ | गंगाखेड | १०४ | १०० |
| ८ | पालम | ८० | ७५ |
| ९ | पूर्णा | ९० | ९५ |
| एकुण जिल्हा | | ८२३ | ८२३ |

**स्त्रोत: संशोधकाने अधिकृत माहितीच्या आधारे संकलित केले आहे.**

सारणी क्रमांक-१ चे अवलोकन केल्यानंतर परभणी जिल्ह्यातील एकूण उपलब्ध प्राथमिक शाळांच्या संख्येपैकी सर्वात जास्त प्राथमिक शाळांची संख्या सेलू, जिंतूर व सोनपेठ तालुक्यातील एकूण ग्रामीण वस्त्यांमध्ये अनुक्रमे ९१,१६५ व ५७ एवढी आहेत. सेलू,जिंतूर व सोनपेठ या तालुक्यामध्ये अपेक्षित प्राथमिक शाळांची संख्या ग्रामीण

लोकसंख्येला अनुसरून अनुक्रमे ७९,१५५ व ४८ एवढी असणे आवश्यक आहे. उपलब्ध प्राथमिक शाळांची संख्या आणि अपेक्षित प्राथमिक शाळांच्या संख्येच्या निरीक्षणावरून या तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांमध्ये प्राथमिक शिक्षणाची सुविधा उच्च असल्याचे आढळते.

पालम व गंगाखेड तालुक्यातील एकूण ग्रामीण वस्त्यांमध्ये ग्रामीण लोकसंख्येला अनुसरून अपेक्षित प्राथमिक शाळांची संख्या अनुक्रमे ७५ व १०० एवढी असणे आवश्यक आहे. परंतु या तालुक्यामध्ये उपलब्ध प्राथमिक शाळांची संख्या ८० व १०४ एवढी आहे. उपलब्ध प्राथमिक शाळांची संख्या आणि अपेक्षित प्राथमिक शाळांच्या संख्येच्या निरीक्षणावरून या तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांमध्ये प्राथमिक शिक्षणाची सुविधा मध्यम असल्याचे आढळते.

पूर्णा आणि मानवत या तालुक्यांमध्ये अपेक्षित प्राथमिक शाळांची संख्या अनुक्रमे ९५ व ५५ एवढी असणे आवश्यक आहे. परंतु या तालुक्यामध्ये एकूण ग्रामीण वस्त्यांमध्ये उपलब्ध प्राथमिक शाळांची संख्या अनुक्रमे ९० व ५३ एवढी आहे. उपलब्ध प्राथमिक शाळांची संख्या आणि अपेक्षित प्राथमिक शाळांच्या संख्येच्या निरीक्षणावरून या तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांमध्ये प्राथमिक शिक्षणाची सुविधा निम्न स्वरूपाची आढळते. ग्रामीण लोकसंख्येनुसार उपलब्ध प्राथमिक शाळांच्या संख्यामध्ये पूर्णा तालुक्यामध्ये किमान ०५ आणि मानवत तालुक्यामध्ये किमान ०२ वाढविण्याची आवश्यकता आहे.

परभणी आणि पाथरी या तालुक्यांमध्ये अपेक्षित प्राथमिक शाळांची संख्या अनुक्रमे १५० आणि ६६ एवढी असणे आवश्यक आहे. परंतु या तालुक्यांमध्ये एकूण ग्रामीण वस्त्यांमध्ये उपलब्ध प्राथमिक शाळांची संख्या अनुक्रमे १२७ व ५६ एवढी आहे. यावरून असे स्पष्ट होते की, या तालुक्यामध्ये अपेक्षित प्राथमिक शाळांच्या संख्येपेक्षा उपलब्ध प्राथमिक शाळांची संख्या कमी असल्यामुळे प्राथमिक शिक्षणाची सुविधा असमाधानकारक स्वरूपाची आढळते. परभणी तालुक्यात किमान २३ आणि पाथरी तालुक्यात १० प्राथमिक शाळांची संख्या वाढविणे आवश्यक आहे.

**१.माध्यमिक शिक्षणाची सुविधा:**

परभणी जिल्ह्यातील एकूण ग्रामीण वस्त्यांमध्ये एकूण माध्यमिक शाळांची संख्या १६७ एवढी आहे. एका माध्यमिक शाळावर ७५८३ एवढी ग्रामीण लोकसंख्या अवलंबून आहे. त्या आधारित तालुकानिहाय ग्रामीण वस्तीचे विभाजन माध्यमिक शिक्षणाची उच्च सुविधा, मध्यम सुविधा, निम्न सुविधा व असमाधानकारक सुविधा अशा चार गटांमध्ये वर्गीकरण करून केले आहे. ते सारणी क्रमांक २ मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्रमांक-२,** परभणी जिल्हा: तालुका निहाय ग्रामीण वस्त्यांतील माध्यमिक शिक्षणाची सुविधा

| अ.क्र. | तालुका | माध्यमिक शाळांची उपलब्ध संख्या | माध्यमिक शाळांची अपेक्षित संख्या |
|---|---|---|---|
| १ | सेलू | ११ | १६ |
| २ | जिंतूर | २९ | ३१ |
| ३ | परभणी | २७ | ३१ |
| ४ | मानवत | ०६ | ११ |
| ५ | पाथरी | १३ | १४ |
| ६ | सोनपेठ | १३ | १० |
| ७ | गंगाखेड | ३० | २० |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | पालम | २० | १५ |
| ९ | पूर्णा | १८ | १९ |
| एकुण जिल्हा | | १६७ | १६७ |

**स्त्रोत: संशोधकाने अधिकृत माहितीच्या आधारे संकलित केले आहे.**

सारणी क्रमांक-२ चे अवलोकन केल्यानंतर परभणी जिल्ह्यातील एकूण उपलब्ध माध्यमिक शाळांच्या संख्येपैकी सर्वात जास्त माध्यमिक शाळांची संख्या गंगाखेड, पालम व सोनपेठ तालुक्यातील एकूण ग्रामीण वस्त्यांमध्ये अनुक्रमे ३०,२० व १३ एवढी आहेत. गंगाखेड, पालम व सोनपेठ या तालुक्यामध्ये अपेक्षित माध्यमिक शाळांची संख्या ग्रामीण लोकसंख्येला अनुसरून अनुक्रमे २०,१५ व १० एवढी असणे आवश्यक आहे. उपलब्ध माध्यमिक शाळांची संख्या आणि अपेक्षित माध्यमिक शाळांच्या संख्येच्या निरीक्षणावरून या तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांमध्ये माध्यमिक शिक्षणाची सुविधा उच्च असल्याचे आढळते.

पूर्णा व पाथरी तालुक्यातील एकूण ग्रामीण वस्त्यांमध्ये ग्रामीण लोकसंख्येला अनुसरून अपेक्षित माध्यमिक शाळांची संख्या अनुक्रमे १९ व १४ एवढी असणे आवश्यक आहे. परंतु या तालुक्यामध्ये उपलब्ध माध्यमिक शाळांची संख्या १८ व १३ एवढी आहे. उपलब्ध माध्यमिक शाळांची संख्या आणि अपेक्षित माध्यमिक शाळांच्या संख्येच्या निरीक्षणावरून या तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांमध्ये माध्यमिक शिक्षणाची सुविधा मध्यम असल्याचे आढळते.

पूर्णा व पाथरी तालुक्यातील एकूण ग्रामीण वस्त्यांमध्ये ग्रामीण लोकसंख्येला अनुसरून अपेक्षित माध्यमिक शाळांची संख्या अनुक्रमे १९ व १४ एवढी असणे आवश्यक आहे. परंतु या तालुक्यामध्ये उपलब्ध माध्यमिक शाळांची संख्या १८ व १३ एवढी आहे. उपलब्ध माध्यमिक शाळांची संख्या आणि अपेक्षित माध्यमिक शाळांच्या संख्येच्या निरीक्षणावरून या तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांमध्ये माध्यमिक शिक्षणाची सुविधा मध्यम असल्याचे आढळते.

जिंतूर आणि परभणी या तालुक्यांमध्ये अपेक्षित माध्यमिक शाळांची संख्या प्रत्येकी ३१ एवढी असणे आवश्यक आहे. परंतु या तालुक्यामध्ये एकुण ग्रामीण वस्त्यांमध्ये उपलब्ध माध्यमिक शाळांची संख्या अनुक्रमे २९ व २७ एवढी आहे. उपलब्ध माध्यमिक शाळांची संख्या आणि अपेक्षित माध्यमिक शाळांच्या संख्येच्या निरीक्षणावरून या तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांमध्ये माध्यमिक शिक्षणाची सुविधा निम्न स्वरूपाची आढळते. ग्रामीण लोकसंख्येनुसार उपलब्ध माध्यमिक शाळांच्या संख्यामध्ये जिंतूर तालुक्यामध्ये किमान ०२ आणि मानवत तालुक्यामध्ये किमान ०४ वाढविण्याची आवश्यकता आहे.

सेलू आणि मानवत या तालुक्यांमध्ये अपेक्षित माध्यमिक शाळांची संख्या अनुक्रमे १६ आणि ११ एवढी असणे आवश्यक आहे. परंतु या तालुक्यांमध्ये एकूण ग्रामीण वस्त्यांमध्ये उपलब्ध माध्यमिक शाळांची संख्या अनुक्रमे ११ व ०६ एवढी आहे. यावरून असे स्पष्ट होते की, या तालुक्यामध्ये अपेक्षित माध्यमिक शाळांच्या संख्येपेक्षा उपलब्ध माध्यमिक शाळांची संख्या कमी असल्यामुळे माध्यमिक शिक्षणाची सुविधा असमाधानकारक स्वरूपाची आढळते. सेलू आणि मानवत तालुक्यात प्रत्येकी ०५ माध्यमिक शाळांची संख्या वाढविणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष**:

१. सेलू,जिंतूर व सोनपेठ या तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांमध्ये प्राथमिक शिक्षणाची सुविधा उच्च असल्याचे आढळते.

२. पालम व गंगाखेड या तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांमध्ये प्राथमिक शिक्षणाची सुविधा मध्यम असल्याचे आढळते.

३. पूर्णा आणि मानवत या तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांमध्ये प्राथमिक शिक्षणाची सुविधा निम्न स्वरूपाची आढळते. पूर्णा तालुक्यामध्ये किमान ०५ आणि मानवत तालुक्यामध्ये किमान ०२ वाढविण्याची आवश्यकता आहे.

४. परभणी आणि पाथरी या तालुक्यांमध्ये प्राथमिक शिक्षणाची सुविधा असमाधानकारक स्वरूपाची आढळते. परभणी तालुक्यात किमान २३ आणि पाथरी तालुक्यात १० प्राथमिक शाळांची संख्या वाढविणे आवश्यक आहे.

*ISBN 978-81-947698-8-0 Peer Reviewed International Book Chapter, 28th February 2021*

५. गंगाखेड, पालम व सोनपेठ या तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांमध्ये माध्यमिक शिक्षणाची सुविधा उच्च असल्याचे आढळते.

६. पूर्णा व पाथरी या तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांमध्ये माध्यमिक शिक्षणाची सुविधा मध्यम असल्याचे आढळते.

७. जिंतूर आणि परभणी या तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांमध्ये माध्यमिक शिक्षणाची सुविधा निम्न स्वरूपाची आढळते. जिंतूर तालुक्यामध्ये किमान ०२ आणि मानवत तालुक्यामध्ये किमान ०४ वाढविण्याची आवश्यकता आहे.

८. सेलू आणि मानवत या तालुक्यांमध्ये माध्यमिक शिक्षणाची सुविधा असमाधानकारक स्वरूपाची आढळते. सेलू आणि मानवत तालुक्यात प्रत्येकी ०५ माध्यमिक शाळांची संख्या वाढविणे आवश्यक आहे.

**संदर्भग्रंथ:**


*१. अहिरराव वा. र. (१०७७): अधिवास भूविज्ञान, निराली प्रकाशन, पुणे.*

*२. कळसकर एस.एन (२०११): परभणी जिल्ह्यातील ग्रामीण वस्तीचा अभ्यास, अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.*

*३. भारतीय जनगणना अहवाल २००१ आणि २०११*

*४. परभणी जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन*

५. *Berry B.J.L. and W.L. Garreson (1958): The functional basis of the central place Hierarchy, Economic geography, p.145-154*

*6. Kankure K. B. (1986): Marathwada study in settlement geography, unpublished Ph.D. thesis P.114-126.*

*ISBN 978-81-947698-8-0 Peer Reviewed International Book Chapter, 28th February 2021*

# विविध शासकीय उद्योजकता विकास योजनांद्वारे महिलांचा आर्थिक विकास व सबलीकरण

**डॉ. सय्यद तनवीर बदरुद्दीन**

*सहायक प्राध्यापक, मिलिया आर्ट्स, सायन्स अँड मॅनेजमेंट सायन्स कॉलेज, बीड.*

*tanvir_syed123@rediffmail.com*

**गोषवारा :-**

*जगातील कोणत्याही देशाला 'जलद, चिरंतन व सर्वसमावेशक' विकास साधण्यासाठी पुरुषांप्रमाणेच स्त्रीयांचीही आवश्यकता आहे. कारण, आर्थिक व सामाजिक विकासाची फळे स्त्रीच्या योगदानाशिवाय कधीच पूर्णतः प्राप्त होऊ शकत नाही. हे शास्त्रीय सैद्धांतिक सत्य आहे आणि या सत्याची सत्यता 'स्वामी विवेकानंदच्या' "There is no change for the welfare of the world unless conditions of women are improved। It is not possible for a bird to fly only with one wing" या वाक्यातून होते. म्हणजेच याठिकाणी स्त्रीचे अर्थव्यवस्थेतील व समाजातील महत्व स्पष्ट होते. परंतु, भारतीय समाजव्यवस्थेत पुरुषांना असणारे महत्वाचे स्थान, पितृप्रधान समाजव्यवस्था, महिलांना समाजात दिलेला निकृष्ट दर्जा, यामुळे लोकसंख्येतील स्त्री हा एक मोठा घटक उपेक्षित राहिला आहे. "सर्वांगीण विकास प्रक्रियेपासून हा घटक दूर स्त्रीनेदेखील आर्थिक व सामाजिक क्षेत्रात भरघोस प्रगती केली आहे. एकीकडे समाजाच्या, धर्माच्या व कुटुंबाच्या बंधनांना जुगारून महिलांनी उद्योजकीय क्षेत्रात पाऊल ठेवले आहे व एक यशस्वी उद्योजिका म्हणून त्या देशासमोर उभया राहिल्या आहेत; मात्र, दुस-या बाजूने "उद्योजिका म्हणून त्यांना आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, व्यवस्थापकीय, प्रशासकीय आणि राजकीय समस्या भेडसावत आहेत". हे सत्य देखील नाकारता येत नाही. म्हणजेच एका बाजूला विकास होत असताना दुसरीकडील समस्यांची मालिका कमी होताना दिसत नाही असा हा विरोधाभास दिसून येतो.*

***कीवर्ड:*** *- उद्योजकता, महिला उद्योजक, सबलीकरण, आर्थिक विकास.*

**प्रस्तावना :-**

आर्थिक विकासाच्या सिद्धांतामध्ये युरोपातील औद्योगिक क्रांतीनंतरच्या काळात 'औद्योगिकीकरण म्हणजे विकास' अशा नव्या समीकरणाला मान्यता मिळाली. सिद्धांताच्या स्वरुपात 'प्रो. लेविस' यांनी १९५४ साली शेतीमधल्या अतिरिक्त श्रम शक्तीचा वापर उद्योगात करून रोजगार निर्मितीसह आर्थिक विकास कसा करता येईल याचे विवेचन पहिल्यांदा केले. आजही या सिद्धांताची मूळ कल्पना नाकारली गेली नाही. भारतात 'डा. टी. एस. पपोला' यांनी ही कल्पना उचलून धरत उद्योग क्षेत्राने अधिक वेगाने वाढून रोजगार निर्माण केले पाहिजे. कारण हेच एक क्षेत्र आहे की ज्यात आपल्याला विकास साधता येईल आणि या "विकासासाठी पुरुषांप्रमाणेच महिलांचीही आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले." थोडक्यात, उद्योगासाठी अर्थव्यवस्थेतील दोन्ही आधारस्तंभाची आवश्यकता आहे.

उद्योजकतेचे महत्व विकसित व विकसनशील देशात मान्य केले गेले आहे।उद्योजकता आर्थिक क्षेत्रात तर अत्यावश्यक आहे; पण, 'पीटर ट्रकर' यांच्यासारख्या व्यवस्थापकतज्ञ याही पुढे जाऊन असे म्हणतात की, "उद्योजकीय समाज निर्माण झाला पाहिजे." सहाजिकच या उद्योजकीय समाजात महिलांचे स्थान एक उद्योजिका म्हणून असायला हवेत कारण, 'प्रा. प्रभाकर देशमुख' यांच्या मते, भारतासारख्या विकसनशील देशामध्ये महिला उद्योजक निर्माण व्हावेत, त्यांनी संघटीत व्हावेत आणि आपले सामूहिक हितसंबंध सुरक्षित व संविर्धत करण्यासाठी सामाजिक उत्तरदायित्वाच्या भूमिकेतून कार्य करावे. कारण, कुटुंबातील एक स्त्री उद्योजक झाली तर उद्योजकतेचे संस्कार ती आपल्या कुटुंबावर करील. उद्योजकीय संस्कारातून भावी पिढी उद्योजकीय होईल. उद्योगात यशस्वी होण्यासाठी आवयश्क सारे गुण तिला निसर्गाने बहाल केले आहेत. समाजात ख-या अर्थाने उद्योजकीकरणाचे बीजारोपण ती

उत्कृष्टपणे करू शकते. थोडक्यात, 'महात्मा फुले' म्हणायचे एक आई शिकली की संपूर्ण कुटुंब शिकते तसेच एक महिला उद्योगाला लागली की, "तिचे संपूर्ण घर पर्यायाने तो परिसर, ते राज्य आणि संपूर्ण राष्ट्र उद्योगमय होईल."

भारतीय महिलांच्या उद्योजकतेचा प्रारंभ आता होऊ लागला आहे. आज अनेक महिलांनी उद्योग क्षेत्रात पदार्पण केले आहे आणि यशस्वीपणे त्यांचे उद्योग त्या चालवित आहेत. ज्या काही उद्योजिका यशस्वी झाल्या आहेत. अशा उद्योजिकांना त्यांच्या कुटुंबाने, विशेषतः आई, वडील पतीचा मोठा पाठींबा मिळाला आहे. त्यांच्या कर्तृत्वाला, प्रयत्नाला यशाची पदाक्रांत मिळाली आहे. काही मोठ्या उद्योग समूहांनी तर आपल्या पुढच्या पिढीची घडी बसविण्याकरिता आपल्या मुलांपेक्षा मुलीला जास्त प्राधान्य दिले आहे, पण असे उद्योग समूह विरळच आहेत. बहुसंख्य छोट्या उद्योजकांनी स्वकर्तुत्वाने स्वतःचे उद्योग उभारले असून या सर्व स्तरातील उद्योजिकांकडून प्रेरणा घेऊन गृहीणीमध्ये कर्तृत्व दाखविण्याची ऊर्मी निर्माण झाली आहे. भारतीय उद्योगात महिलांचे योगदान मध्यम व छोट्या उद्योगांमध्ये जास्त आहे. काही मोठ्या उद्योगांची आव्हाने पेलण्याची क्षमताही त्यांच्यात आहे. मात्र, महिलांच्या उद्योग करण्यामागील प्रेरणा भिन्न असतात. अर्थजन करणे, कुटुंबात स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण करणे, आपल्याकडे असलेल्या बुद्धीचा व कौशल्याच्या प्राप्त ज्ञानाचा वापर करणे. आज उद्योग व व्यवसाय या दोन्ही जबाबदा-यांची कुशलपणे सांगड घालण्यास त्या समर्थ आहे. परंतु, त्या सामाजिक आणि व्यवसायिक समस्यांनी ग्रस्त आहेत. त्यामुळेच महिला उद्योजकांच्या विकासाची गतीक्षमता मर्यादित झाली आहे.

**संशोधन कार्यप्रणाली:-**

अभ्यासासाठी आवश्यक असलेली माहिती दुय्यम स्रोतांकडून गोळा केली गेली आहे. उद्योजकांद्वारे महिलांना सक्षम बनविण्यासाठी विविध शासकीय धोरणांविषयी डेटा गोळा करण्यासाठी या संशोधिकाने विविध संशोधन लेख, संशोधन जर्नल्स आणि केस स्टडीचा आढावा घेण्याची पद्धत अवलंबली आहे.

**महिला उद्योजक (Women's Entrepreneur)**

महिला उद्योजक या संज्ञेची व्याख्या करणे तसे अवघडच आहे/ आपण असे म्हणू शकतो की, जेव्हा एखादी महत्वकांक्षी आणि अभिप्रेरीत महिला पुढाकार घेऊन उद्योजकांची भूमिका स्वीकारते आणि ही भूमिका पार पाडण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करते तेव्हा अशा महिलेला महिला उद्योजक असे म्हणता येईल वा सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की, "महिला उद्योजक म्हणजे अशी महिला जी एखाद्या उद्योगाची स्थापना करते, उद्योगाचे संचलन करते किंवा त्या उद्योगाला यशस्वी करण्यासाठी काही कार्याची जबाबदारी पार पाडते."

**महिला बचत गटाद्वारे महिलांचा आर्थिक विकास व सबलीकरण :-**

महिलांच्या सर्व समस्यांचे मूळ आर्थिक मागासलेपणात आहे म्हणून महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविणे आवश्यक आहे व हे कार्य बचत गटाच्या माध्यमातून चांगल्याप्रकारे होऊ शकते. महिला या स्वतंत्रपणे निर्णय घेऊ शकत नसल्या किंवा स्वतंत्रपणे उद्योग व्यवसाय सुरू करू शकत नसल्या तरी बचत गटाच्या माध्यमातून महिलांना शिक्षण, प्रशिक्षण, भांडवल, बाजारपेठ, यंत्रसामग्री, कच्चा माल, व्यवस्थापन कौशल्य व तांत्रिक कौशल्य मिळते. त्यामुळे त्यांची उपक्रम वृत्ती वाढून निर्णय क्षमता, कार्यक्षमता व रोजगार निर्मिती वाढते. या सर्व गोष्टीचा परिणाम म्हणून महिलांच्या उत्पन्नात वाढ होते. महिलांच्या उत्पन्नात वाढ झाली की, आपोआपच समाज त्यांची दखल घ्यायला लागतो व त्यांचा मान सन्मान वाढू लागतो. भारतात अनेक वर्षांपासून दारिद्र्य निर्मुलनासाठी विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी शासनाने व स्वयंसेवी संस्थांनी केली. परंतु, त्यांना अपेक्षित यश मिळाले नाही. अलीकडील मात्र, दोन दशकात बचत गट चळवळीमुळे सूक्ष्म वित्त पुरवठ्यात वाढ झाली. त्यामुळे महिला उद्योजकांमध्ये वाढ होऊन त्या स्वतःच्या पायावर उभया राहिल्या व त्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांचे आर्थिक व सामाजिकदृष्ट्या सक्षमीकरण झाल.

**महिला उद्योजकांच्या विकासात महिला आर्थिक विकास महामंडळाची भूमिका :-**

राज्यातील महिला विकासाच्या सर्व योजना राबविण्यासाठी महिला आर्थिक विकास महामंडळ ही शिखर संस्था म्हणून घोषीत करण्यात आली आहे. या महामंडळाची स्थापना दि. २४ फेब्रुवारी, १९७५ रोजी झाली. या महामंडळाच्या स्थापनेचा उद्देश महिलांच्या सुप्त गुणांना वाव देवून त्यांच्यामध्ये असणा-या क्षमता वाढविणे, महिलांमधील उद्योजकीय जाणिवा विकसित करणे, आद्ययावत प्रशिक्षण देणे, रोजगार संधी व बाजारपेठ यांची सांगड घालणे आणि महिलांना आत्मनिर्भरतेच्या दिशेने वाटचाल करण्यास प्रवृत्त करणे हा आहे.

**महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविलेले उपक्रम :-**

महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत महिला विकासासाठी अनेक उपक्रम राबविले जातात.

1) महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा कार्यक्रम :-

आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधीद्वारे जे अर्थसहाय्य मिळाले त्यांच्या सहाय्याने महाराष्ट्रातील १२ जिल्ह्यांमध्ये दारिद्र्य निर्मुलनासाठीचा ग्रामीण पतपुरवठा कार्यक्रम राबविण्यात येतो. दारिद्र्य रेषेखालील गरजू महिलांचे स्वयंसहाय्यता बचत गट तयार करणे त्यांना बचतीची सवय लावणे, तसेच बँकांकडून कर्जही उपलब्ध करून दिले जाते.

२) महिला स्वावलंबन निधी :-

महाराष्ट्र शासनाच्या भूकंप पुनर्वसन कक्षाच्या सहकार्याने महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत जागतिक बँकेच्या सहाय्याने लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील भूकंपग्रस्त भागातील महिला गटांना लघुपतपुरवठा करण्यात येतो.

३) महिलांसाठी जाणीव जागृती कार्यक्रम :-

महिला आर्थिक विकास महामंडळ हे महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालकल्याण विभागाच्या मदतीने महिलांसाठी जाणीव जागृती कार्यक्रम राबविते. या कार्यक्रमांतर्गत महिलांचे हक्क, अधिकार, कायदे व सामाजिक सबलीकरण, स्वयंसहाय्यता गट, पंचायत राज प्रशिक्षण, महिला विकास योजना, आरोग्य व स्वच्छता, आहार व आरोग्य या विषयावर व्हिडीओ सेट व मार्गदर्शिका तयार करण्यात आल्या आहेत. या विविध योजनांच्या संदर्भात प्रकल्प राबविणारी संस्था म्हणून महिला आर्थिक विकास महामंडळास नियुक्त करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या महिला विकास योजनांच्या संदर्भात सल्ला व मार्गदर्शन करणे, महिलांनी तयार केलेल्या वस्तूंची प्रदर्शने भरवून त्यांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे, नोकरी करणा-या महिलांसाठी वसतिगृहे चालविणे, स्वयंसहाय्यता बचत गटांना आवश्यक असे प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे, बचतगटांना वित्त सहाय्यता मिळवून देण्यासाठी प्रस्ताव छानणी करून राष्ट्रीय महिला कोषाकडे पाठविणे ही कामे या महामंडळाकडून केली जातात.

**महिला विकासाच्या योजना व उपक्रम :-**

**१) स्टेप (Support to Training and Employment Programme for Women's) :-**

महिलांमध्ये उद्योजकतेची वाढ व्हावी या हेतूने ही योजना सुरू असून या योजनेअंतर्गतशेती, लघुउद्योग, पशुसंवर्धन, दुग्धविकास, मत्स्यपालन, हातमाग, हस्तव्यवसाय, ग्रामोद्योग, रेशीम उद्योग अशा प्रकारच्या प्रकल्पांसाठी केंद्रशासन ९० टक्के अनुदाने देते.

**२) नोराडा (Norwedian Agency for International Development) :-**

ग्रामीण भागातील तसेच नागरी भागातील गलिच्छ व वस्त्यांमधील महिलांना प्रशिक्षण, रोजगार तसेच उत्पादन केंद्र चालू करण्यासाठी केंद्र शासन प्रकल्पनिहाय गुणवत्तेनुसार अनुदान मंजूर करण्यात येते. प्रति प्रशिक्षणार्थी किमान ८०० रूपयाच्या मर्यादेत सहाय्यक अनुदान देण्यात येते.

**३) राष्ट्रीय महिला कोष :-**

ग्रामीण भागातील ज्या महिलांचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ११००० रू. पेक्षा कमी व शहरी भागासाठी १८००० रू. पेक्षा कमी उत्पन्न असेल तर राष्ट्रीय महिला कोषामार्फत शासकीय संघटनांना किंवा स्वयंसेवा गटांना अशा महिलांना कर्ज वितरण करण्यासाठी ८ टक्के व्याजदाने कर्ज मिळते.

**४) महिला मंडळाच्या प्रशिक्षण केंद्रास अनुदान :-**

अनेक वेळेस महिलांना काही आपत्तीमुळे प्रपंच चालविण्यासाठी कामे करावी लागतात. अकुशलतेमुळे त्या अनैतिक व्यवसायाकडे वळू शकतात. अशा स्त्रियांना व्यवसाय प्रशिक्षण देणे, सामूहिक स्वयंपाक गृह चालविणे, सहकारी संस्था स्थापन करणे यासाठी शासन स्वयंसेवी संस्थांना अनावर्ती खर्चासाठी रू. २८,५०० व आवर्ती खर्च (सहा महिन्यांच्या एका सत्राकरिता) रू. २१५०० असे अनुदान दिले जाते. या योजनेअंतर्गत संस्था संगणक, रेडिओ/टी.व्ही. २० दुरूस्ती, टंकलेखन, विजेच्या उपकरणांची दुरूस्ती, भरतकाम, फलोत्पादन, रेशीम उद्योग, कृषी संबंधी व्यवसाय अशाप्रकारचे प्रशिक्षण वर्ग चालवू शकतात.

**५ ) व्यवसायिक प्रशिक्षणाथाना विद्यावेतन :-**

आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय कुटुंबातील मुलींना संगणक, नर्सिंग, टेलिफोन आपरेटिंग, आय.टी.आय. मधील प्रशिक्षण या प्रकारचे प्रशिक्षण घेणा-या मुलींना प्रशिक्षण कालावधीमध्ये दरमहा रू. १०० इतके विद्यावेतन काही अटी मिळते. मात्र, या मुलींना शासनमान्य प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घेणे आवश्यक मानले आहे.

**६) सावित्रीबाई फुले बहुउद्देशीय महिला केंद्राची स्थापना :-**

या योजनेअंतर्गत महिलांना कायदेविषयक सल्ला देणे, आपदग्रस्त महिलांना आश्रय, व्ावसाय अथवा नोकरी निवडीबाबत तसेच व्यवसाय प्रशिक्षणासाठी सल्ला, वाचनालय सुविधा, व्यवसाय प्रशिक्षण केंद्र चालविणे, पाळणा घर, प्रौढ साक्षरता वर्ग, शासनाच्या विविध योजनांची माहिती इत्यादी तसेच सन २००८-०९ मध्ये ७ लाख रूपयांचे सहा अनुदान मंजूर केले.

**७) कामधेनू योजना :-**

या योजनेअंतर्गत गरीब, गरजू महिलांना घरच्या घरी रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी सर्व शासकीय निमशासकीय क्षेत्रातील ५० टक्के काम (गणवेश, चादरी, उशांचे अभ्रे, रोग्यांचे कपडे, डस्टर, खडू इत्यादी) नोंदणीकृत महिला संस्थांना देण्यात येते व या संस्था ते काम संस्थेच्या गरजू महिलांना उपलब्ध करून देतात. योजनेच्या अंमलबजावणी व आवश्यक नियंत्रणाची जबाबदारी महिला आर्थिक विकास महामंडळाकडे सोपविण्यात आली आहे. तसेच या योजनेअंतर्गत सन २००८-०९ साली १ लाख रूपयांचे सहा अनुदान मंजूर करण्यात आले.

**८) महिला सक्षमीकरण योजना :-**

केवळ महिलांना आर्थिक मदत किंवा सुविधा देणे म्हणजे सक्षमीकरण नव्हे, तर सर्वच स्तरावरील लोकतंत्र पद्धतीतील निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढविणे होय. समाजातील आर्थिक, सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी स्वयंसहाय्यता बचत गटावर आधारित योजना तयार करून ती सामान्य जनतेपर्यंत पोहचविणे, या योजनांचे सुसूत्रीकरण महिला विकास महामंडळ करते.

**९) स्वयंसिद्ध योजना :-**

केंद्रशासनाच्या इंदिरा महिला योजना व महिला समृद्धी योजना एकत्रित करून २००० मध्ये स्वयंसिद्ध योजना जाहीर केली. या योजनेद्वारे स्वयंसहाय्यता बचतगट स्थापन केले जातात. या योजनेचा संपूर्ण खर्च केंद्र शासन करते.

**१०) स्वर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना :-**

ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील जनतेस स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध करून देवून त्यांचे राहणीमान उंचावण्याच्या हेतूने ही योजना राबविले जाते. केंद्राचा ७५ टक्के तर राज्य शासनाचा २५ टक्के निधी या योजनेस मिळतो. या योजनेद्वारे तळागाळातील लोकांना मदत करण्याचा प्रयत्न केला जातो. स्वयंरोजगारी पैकी ५० टक्के अनुसूचित जाती, जमातीचे, ४० टक्के महिला व ३ टक्के विकलांग असावेत असे शासनाचे निर्देश आहे. या योजनेचा मुख्य उद्देश स्थानिक स्तरावर ग्रामीण जनतेच्या क्षमतेचा वापर करून लहान उद्योगनिर्मितीचे साधन निर्माण करून पुरेसा रोजगार निर्माण करणे.

**११) स्वर्ण जयंती शहरी रोजगार योजना :-**

शहरी भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या विकासासाठी ही योजना १९९७ ला राबविण्यात आली. केंद्र शासनाची ही योजना महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रातील दारिद्र्य रेषेखालील लोकांसाठी राबविली जाते. या योजनेत प्रामुख्याने प्रशिक्षण, स्वयंरोजगार, महिला व बालके विकास गट, बचतगट व पतसंस्था गट, नागरी रोजगार, मूलभूत सोयीसुविधा व समाज विकास संस्था या घटकांचा समावेश होतो.

**१२) राष्ट्रीय समभाग निधी योजना :-**

या योजनेत नविन /विस्तारित उद्योगांच्या पुनर्वसनासाठी कर्जसहाय्य मिळते. कमाल मर्यादा रू. ५० लाख असून लाभार्थ्याला सिडबीकडून जास्तीत जास्त रू. १२.२० लाख किंवा २५ टक्के यापैकी कमी असेल तेवढे ५ टक्के सेवाशुल्क आकारून भांडवल मिळते. वाहतूक व्यवसायासाठी कर्ज मिळत नाही. बँकेचा सहभाग ६५ टक्के, लाभार्थी १० टक्के, तर रक्कमेचा परतावा हा १ महिन्यांपासून ते ६० महिन्यांपर्यंत करावयाचा असतो.

**संदर्भ ग्रंथः-**

*१) अहिरराव जितेंद्र (२००१), उद्योजकतेची मुलतत्वे, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद*
*२) अहिरराव जितेंद्र (२००८), उद्योजकता, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद*
*३) कोंडेवार उमाकांत (२००३), सूक्ष्म अर्थशास्त्र, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद*
*४) काचोळे दा. धों.(१९९९), भारतीय सामाजिक विचारवंत, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद*
*५) कोचोळे दा.धों. (२०१०), भारतातील धर्म आणि लोकसंख्या समस्या, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद*
*६) काचोळे दा.धों. (२०१४), ग्रामीण नागरी प्रश्न आणि समस्या, कैलाश पब्लिकेशन, औरगाबाद*
*७) काचोळे दा. धों. (२०१४),लोकसंख्या आणि विकास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद*
*८) कांबळे उत्तम (२००३), राजर्षी शाहू महाराज आणि महिला मुक्ती, सुगावा प्रकाशन, पुणे*
*९) काळदाते सुधा (२००५), औद्योगिक समाजशास्त्र, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद*
*१०) खडसे इंदिरा (२००४), गृहव्यवस्थापन आणि गृहकला, हिमालया पब्लिशिंग हाऊस, पुणे*
*११) खडसे संतोष/खडसे सुनिता(२०१०), ऐतिहासिक परिपेक्ष्यातील स्त्रीया, शुभम पब्लिकेशन्स, पुणे*
*१२) खैरनार दिलीप (२०१०) भारतीय ग्रामीण समाजशास्त्र, विद्या बुक्स पब्लिशर्स,औरंगाबाद*
*१३) गायकवाड बी. आर. (२०१२), महाराष्ट्रातील आर्थिक विकास : एक चिंतन, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद*

# स्वयं-साहाय्यता बचत गट व ग्रामीण विकास

***प्रा. डॉ. अमोल तुकाराम खाडे***

*अर्थशास्त्र विभाग , देशभक्त संभाजीराव गरड कॉलेज, मोहोळ, जि. सोलापूर*

*भारत हा कृषिप्रधान देश आहे. आजही भारतात जवळपास ५८% लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. या ग्रामीण भागातील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हा आहे. ग्रामीण भागातील लोकांसमोर अनेक समस्या आहेत. सरकारने ग्रामीण भागाच्या विकासासाठी प्रयत्न केले. परंतु आजही ग्रामीण भागाचा पूर्णतः विकास झाला नाही. या एकूण ग्रामीण लोकसंख्येत जवळपास अर्धे प्रमाण स्त्रियांचे आहे.ग्रामीण स्त्रियांमध्ये आर्थिक परावलंबित्व मोठ्या प्रमाणात दिसून येते. निरक्षरता, दारिद्र्य, बेकारी, अंधश्रद्धा यामध्ये स्त्रिया अडकलेल्या आहेत. या स्त्रियांच्या सबलीकरणासाठी शासन व संस्था पातळीवर सातत्याने प्रयत्न होत आहेत. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढला पाहिजे यादृष्टीने अलीकडील काळात व्यावहारिक तत्वज्ञान मांडले जाऊ लागले आहे. महिलांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीने स्वयं-साहाय्यता गट(S.H.Gs) महत्वपूर्ण भूमिका बजावत आहेत.*

अध्ययन उद्देश:

१] ग्रामीण विकासात महिला बचत गटाच्या योगदानाचा अभ्यास करणे.

२] व्यक्तिगत व सामाजिक प्रश्नाच्या सोडवणुकीतील महिला बचत गटाच्या योगदानाचा अभ्यास करणे.

३] दारिद्र्या निर्मुलन व रोजगार निर्मितीमध्ये महिला बचत गटाच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

संशोधन पद्धती:

सदर शोधनिबंध हा द्वितिय साधनसामुग्रीवर आधारित असून त्यासाठी विविध संदर्भग्रंथ, मासिके, नियतकालिके आदींचा वापर करण्यात आलेला आहे.

स्वयं-साहाय्यता बचत गट संकल्पना:

बांगलादेशातील अर्थशास्त्रज्ञ नोबेल पारितोषिक विजेते डॉ. महमद युनूस यांनी सर्वप्रथम स्वयं-साहाय्यता बचत गटाची संकल्पना मांडली.

व्याख्या: "प्रादेशिक समानता असलेल्या समविचारी, समान गरजा, समान अपेक्षा असलेल्या १० ते २० महिलांनी स्वल्पबचत करून बचतीचा विनियोग उपभोगासाठी करून, कर्ज घेऊन व्यवसाय करणाऱ्या व लोकशाही मार्गाने संघटन करणाऱ्या समूहास स्वयं-साहाय्यता बचत गट म्हणतात."

परस्परांवर विश्वास, बचतीची सवय व आर्थिक अडचणीसाठी साहाय्य, लहान उद्योगधंद्यासाठी अर्थपुरवठा ही बचतगटाची वैशिष्टे आहेत.

महिला बचत गटाचे उद्देश:

१] महिलांची संघटना बांधणे.

२] महिलांमधील उपक्रमशीलतेला वृद्धिंगत करणे.

३] रोजगार संधी निर्माण करणे व बाजारपेठ उपलब्ध करून देणे.

४] महिलांच्या आर्थिक स्थितीत सुधारण करणे.

५] महिलांना बचतीची सवय लावणे.

बचत गटाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील स्त्री सबलीकरणाला चालना मिळाली आहे. महिला बचत गटाच्या माध्यमातून सामान्य कुटुंबाच्या गरजा भागविल्या जातात. शिवाय आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांची समाजात आर्थिक पत निर्माण करण्यात महिला बचत गटाची भूमिका महत्वाची ठरत आहे. त्यातूनच भारतात व महाराष्ट्रातही ही चळवळ जोमाने वाढत आहे.

स्वयं रोजगार निर्मितीत महिला बचत गटाची भूमिका:

स्वयं रोजगार हे वैयक्तिक उत्पास्नाचे महत्वाचे साधन आहे. बचत गटाच्या माध्यमातून जमा झालेल्या बचतीतून महिला स्वतःचा रोजगार स्वतः निर्माण करून दारिद्र्यावर मत करू शकतात. महिला स्वयं साहायता बचत गट दोन प्रकारच्या रोजगारातून आपली भूमिका पार पाडू शकतात.

वैयक्तिक रोजगारात सामान्यतः शिवणयंत्र, पिठाची गिरणी, पापड, लोणची, मिरची पावडर, खडू तयार करणे, किरण, स्टेशनरी, सौन्दर्य प्रसाधने इ. व्यवसायांचा समावेश करता येईल.

सामुहिक रोजगारात प्रामुख्याने दुग्ध व्यवसाय, शेळी पालन , कुकुटपालन,रेशीम उद्योग, अळंबी व्यवसाय, टेलरिंग, वीटभट्टी, बेकारी, बिस्किटे, भाजीपाला विक्री इ. चा समावेश करता येईल.

बचत गटाचे परिणाम:

१] महिलांना नियमित बचातीची सवय लागते.
२] बँकिंग व्यवहाराच सवय लागते.
३] रोजगार संधीत वाढ होते.
४] महिलांच्या उत्पन्नात वाढ होते.
५] आर्थिक विकास प्रक्रियेत महिलांच्या सहभागात वाढ होते.

बचत गटाचे दोष:

१] स्वतःच्या स्वार्थासाठी बचत गटाच्या मालमत्तेचा वापर करण्यात येतो.
२] बचत गटांच्या व्यवहारात पुरुषांचा हस्तक्षेप वाढल्यामुळे महिला सभासदांमध्ये वाद निर्माण झाला.
३] सभासदांच्या हिशोबात पारदर्शकता नसणे.
४] महिलांच्या विचारात ऐक्याची भावना नसणे. इ.

समारोप:

ग्रामीण भागाच्या विकासामध्ये स्वयं साहाय्यता बचत गटाची चळवळ महत्वपूर्ण भूमिका बजावत आहे. महिलांच्या स्वहिताची चळवळ ग्रामीण विकासास पोषक ठरत आहे. महिला बचत गटामुळे रोजगार, स्वयं रोजगार संधीमध्ये वाढ, उत्पन्नात वाढ, स्वावलंबन, स्त्रियांमध्ये जागरुकता, आत्मविश्वास वाढून ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासामध्ये स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे.

संदर्भ:

१) योजना: नोव्हेबंर २००३
२) लोकराज्य: एप्रिल-मे २००४
३) लोकराज्य : जूलै २००५
४) अर्थसंवाद: जानेवारी-मार्च २००६

# औसा तालुक्यातील आर्थिक विकासामध्ये साक्षरतेचे महत्व

***प्रा. जावळे व्ही. जी.***

*आझाद महाविद्यालय, औसा*

**सारांश :**

*प्रस्तुत शोधनिबंधात औसा तालुक्यातील लोकसंख्येची सामाजिक व आर्थिक गतिमानता त्या लोकसख्येंच्या साक्षरता व शैक्षणीक पातळीशी निगडीत असते. सामाजिक संक्रमण आधुनिकरणात वाटचाल नवविचार प्रवाह यांचा साक्षरता व शिक्षणाशी मोठा संबंध असतो. 1991 च्या जनगणनेनूसार औसा तालुक्यातील एकूण साक्षरतेचे प्रमाण 40.73% होते 2001 च्या जनगणनेनूसार 56.80% एवढे आहे. तर 2011 च्या जनगणनेनूसार एकूण साक्षरता 74.40% ऐवढी झाली आहे. 1991 ते 2011 ची तुलना केली असता एकूण साक्षरतेच्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते. उदरनिर्वाहिक शेती व्यवसाय करणाऱ्या मंडळात साक्षरतेचे प्रमाण कमी, ज्या मंडळात दरडोई वार्षीक उत्पन्न जास्त आहे, त्या मंडळात साक्षरतेचे प्रमाण जास्त दिसून येते.*

**बिज संज्ञा :** *साक्षरतेचे महत्व*

**प्रस्तावना :**

साक्षरतेची व्याख्या करणे कठीण आहे. कारण जगातील वेगवेगळया देशात साक्षरता दर्शविण्यासाठी वेगवेगळे निकष वापरले जातात. यामुळे जागतीक पातळीवर साक्षरतेची तुलना करणे कठीण जाते. भारतात 1951 च्या जनगणनेनूसार अशा व्यक्तीला साक्षर म्हणून ओळखले जाते की, त्याचे वय 4 वर्षापेक्षा जास्त असून त्याला कमीत कमी साधारण पत्र वाचता आले पाहिजे. भारतात सध्यस्थितीत भारतीय भाषांपैकी कोणत्याही एका भाषेत सवांद समजतो, वाचणे आणि लिहिणे ज्याला जमते त्याला साक्षर म्हटले जाते . ज्यांच्या जवळ फक्त लिहिण्याची आणि वाचण्याची योग्यता आहे त्याला अर्धसाक्षर असे म्हणतात. संयुक्त राष्ट्रसंघानुसार जो व्यक्ती आपल्या दैनंदिन जवीनात सर्वसाधारण कथन समजून घेवू शकतो, त्याच बरोबर लिहिण्याची आणि वाचण्याची पात्रता असते त्यास साक्षर म्हटले जाते.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

औसा हे महाराष्ट्र राज्यातील एक ठिकाण आहे. लातूर जिल्हयातील एक महत्वाचे ऐतिहासिक व सांस्कृतिक केंद्र आहे. या ठिकाणी एक किल्ला आहे. चालुक्य, राष्ट्रकुट, कल्याणीचे चालुक्य, यादव व बाहमनी, अहमदनगरची निजामशाही, बिरची बिदरशाही, विजापूरची आदिलशाही, मोगल, मराठे व हैद्राबादचा निजाम या सर्वांचे औशावर राज्य होते.

**भौगोलिक पार्श्वभूमी, अभ्यास क्षेत्राचे स्थान, सिमा आणि क्षेत्रफळ :**

औसा तालुक्याचा अक्षवृत्तीचा विस्तार 18⁰0' उत्तर ते 19⁰25' उत्तर अक्षवृत्ता दरम्यान तर रेखावृत्तीय विस्तार 76⁰15' पूर्व ते 76⁰45' पूर्व रेखावृत्त असा आहे. औसा तालुक्याचा सर्वसाधारण आकार ट्रपीझ स्वरुपाचा असून उत्तर आणि दक्षिण कडील भाग एकमेकाला समांतर स्वरुपाचा आहे. अभ्यासक्षेत्राचा 2011 च्या अहवालानुसार 1263 चौ.कि.मी. असून लातूर जिल्हयाची तुलना करता 17.64% एवढे क्षेत्र औसा तालुक्याने व्यापले आहे. औसा तालुक्यात 7 मंडळे असून अभ्यास क्षेत्रात 130 एवढी गावे आहेत. 2011 च्या जनगणनेनुसार औसा तालुक्यात एकूण लोकसंख्या 2,80,240 इतकी आहे. औसा तालुक्याच्या पूर्वेस निलंगा तालुका, पश्चिमेस उस्मानाबाद तालुका, दक्षिणेस लोहारा तालुका आहे आणि उत्तरेला लातूर तालुका आहे. औसा तालुक्याच्या उत्तरेला तावरजा नदी व दक्षिणेला तेरणा नदी आहे. अभ्यास क्षेत्रात एकूण 7 मंडळे असून ती औसा, किनीथोट, किल्लारी, भादा, मातोळा, बेलकुंड आणि लामजना ही आहेत.

**उद्दिष्टे :**

1. अभ्यास क्षेत्रातील साक्षरतेचा बदल अभ्यासणे.
2. अर्थिक विकासात साक्षरतेचे महत्व अभ्यासणे.
3. मंडळनिहाय साक्षरतेचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंध हा द्वितीय माहिती स्त्रोतावर आधारित आहे. माहिती संकलीत करण्यासाठी द्वितीय माहिती स्त्रोताचा उपयोग केला आहे. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन लातूर, जिल्हयातील विविध मासिके व वर्तमान पत्रे, संदर्भ ग्रंथ आणि लोकसंख्याचे पुस्तके, इंटरनेट याचा आधार घेतला आहे. साक्षरता काढण्यासाठी सुत्राचा वापर केला तसेच आकडेवारी सादर करण्यासाठी तक्त्याचा वापर केला आहे.

**विषय विवेचन :**

संयुक्त राष्ट्र संघाने लिहिता व वाचता येण्याची क्षमता म्हणजेच साक्षरता होय असे म्हटले आहे. साक्षरता काढण्यासाठी खालील सुत्राचा अवलंब करतात.

$$\text{साक्षरता} = \frac{\text{साक्षर व्यक्तीची संख्या}}{\text{एकूण लोकसंख्या}} \times 100$$

अभ्यास क्षेत्रात 1991 च्या जनगणनेनूसार एकूण साक्षरता 40.73% ऐवढी आहे. 2001 च्या जनगणनेनूसार 56.80% एवढी आहे, तर 2011 च्या जनगणनेनूसार एकूण साक्षरता 74.40% ऐवढी आहे. अभ्यास क्षेत्रातील अभ्यास केल्यानंतर साक्षरतेचे प्रमाण वाढत आहे असे लक्षात येते.

**औसा तालुक्यातील 1991-2011 साक्षरतेचे प्रमाण**

| मंडळ | 1991 | 2001 | 2011 |
|---|---|---|---|
| औसा | 43.54% | 53.04% | 67.10% |
| किनीथोट | 39.92% | 56.61% | 66.22% |
| किल्लारी | 44.32% | 56.37% | 69.05% |
| भादा | 37.22% | 54.76% | 64.59% |
| मातोळा | 41.63% | 59.26% | 67.34% |
| बेलकुंड | 40.82% | 56.55% | 68.08% |
| लामजना | 38.99% | 59.51% | 66.24% |

**स्त्रोत :- संशोधन अधिकृत माहितीच्या आधारे संकलीत केले आहे.**

मंडळानिहाय साक्षरतेचा अभ्यास केल्यानंतर 1991 च्या जनगणनेनूसार सर्वात जास्त साक्षरता (44.32%)किल्लारी मंडळात दिसून येते याचे कारण म्हणजे या मंडळातील अर्थिक स्थिती, शैक्षणिक सोयी उपलब्ध असल्यामुळे तर सर्वात कमी लामजना मंडळात 38.99% आहे. पुढच्या दशकात म्हणजे 1991 ते 2001 सर्वात जास्त 59.26% मातोळा मंडळात तर सर्वात कमी 53.04% औसा मंडळात आहे. 2001 ते 2011 या दशकातील सर्वात जास्त साक्षरतेचे प्रमाण किल्लारी मंडळात आहे. याशिवाय 1991 ते 2001 या तीन दशकातील साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे, त्याचे कारण म्हणजे दरडोई उत्पन्न वाढ, शैक्षणिक सुखसोई, वाहतूक दळणवळण साधणे आणि जनजागृती इत्यादमुळे साक्षरतेत वाढ झाली आहे. साक्षरता वाढल्यामुळे जनन, मृत्यता, स्तलांतर, विवाह, सामाजिक

आर्थिक गतीमानता, सामाजिक संक्रमण, आधुनिकरणाची वाटचाल, नवविचार प्रवाह यात मोठया प्रमाणात वाढ झाली आहे.

**निष्कर्ष :**

**औसा तालुक्यात मंडळानिहाय साक्षरता असमान स्वरुपाची असून ज्या मंडळात दरडोई वार्षिक उत्पन्न जास्त आहे, शैक्षणिक वाहतूक, दळणवळण सुविधा उपलब्ध आहेत त्याच मंडळात साक्षरता जास्त आहे. साक्षरता वाढविण्यासाठी रोजगारमुख शिक्षण, व्यवसायमुख शिक्षण, पौढ शिक्षण व प्रोत्साहन्पर स्कॉलरशिप, शिक्षणाचा प्रचार व प्रसार इत्यादी केले तर साक्षरतेचे प्रमाण वाढून अर्थिक सामाजिक विकास होईल.**

**संदर्भ सूची :**

1) *Ministry of Human Resource Development India.*
2) *Census of India 1991, 2001, 2011*
3) *District census hand book Latur 1991, 2001, 2011.*
4) *जिल्हा गॅझेटिअर महाराष्ट्र शासन मुंबई.*
5) *लोकसंख्या भूगोल - डॉ. अहिराव, डॉ. अलिझाड, डॉ. धापटे सर.*
6) *लोकसंख्या भूगोल - डॉ. शेटे, डॉ. फुले, डॉ. शाहपूरकर सर.*
7) *लोकसंख्या भूगोल - डॉ. कुंभार सर.*
8) *लोकसंख्या स्वरुप - सौ कानेटकर, सौ. कुलकर्णी.*
9) *www.mhrd.gov.in*

# उजनी पाणलोट क्षेत्राचा मोहोळ तालुक्यातील कृषी व्यवसायावर झालेला परिणाम- एक चिकित्सक अभ्यास

*श्री. हनुमंत शंकर हेळकर[1] प्रा. डॉ. डी. जी. शिंदे[2]*
*एम.ए. भाग-२, देशभक्त संभाजीराव गरड, महाविद्यालय, मोहोळ*
*भूगोल विभाग, देशभक्त संभाजीराव गरड, महाविद्यालय, मोहोळ*

**सारांश :-**

*मानवी संस्कृतीचा इतिहास पाहिल्यास असे दिसून येते की, प्राचीन काळी मानवी वसाहती नदीकाठावर विकसित झालेल्या दिसून येतात; म्हणून मानवी जीवनात पाण्याला अत्यंत महत्त्व आहे. याचबरोबर निसर्गाने मानवाला हवा, जल, जमीन, वनस्पती इत्यादी मूलभूत गोष्टी सहजासहजी उपलब्ध करून दिलेल्या आहेत. मानवाने स्वतःची विचारशक्ती व विज्ञान तंत्रज्ञानाच्या जोरावर या नैसर्गिक घटकांमध्ये बदल घडवून आणला. पुणे व सोलापूर या जिल्ह्यांस वरदायिनी ठरलेले भीमा नदीवरील उजनी धरण हे सोलापूर जिल्ह्याच्या विकासाला एक महत्त्वाचा दुवा ठरलेला आहे. सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुका हा कमी पर्जन्यछायेचा आहे. या तालुक्यातील उजनी धरणाचे पाणलोट क्षेत्र मोठ्या प्रमाणावर निर्माण झाल्यामुळे तालुक्यातील शेतीवर, नैसर्गिक साधनसंपत्तीवर, पशू-पक्षी, मानवी व्यवसाय इत्यादी घटकांवर मोठा परिणाम झालेला दिसून येतो. उजनी पाणलोट क्षेत्रामुळे या कक्षेत येणाऱ्या जमिनीमध्ये, पिक रचनेमध्ये आमूलाग्र बदल झालेला दिसून येतो. उजनी धरण हे १९८० साली पूर्णत्वास आले, तेव्हापासून या लाभक्षेत्रातील प्रदेशांमध्ये आमुलाग्र असा बदल झालेला दिसून येतो.*

**बीजसंज्ञा :-** *कृषी व्यवसाय, मानवाचे राहणीमान व पिक प्रारूप रचना यामध्ये झालेला बदल.*

**प्रस्तावना :-**

सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुका हा प्रामुख्याने दुष्काळग्रस्त भागात येतो. हा भाग कमी पर्जन्यछायेचा प्रदेश असल्यामुळे पर्जन्यमान ही कमी पडते. त्यामुळे या दुष्काळग्रस्त भागास उजनी पाणलोट क्षेत्राचा लाभ झाला आहे. उजनी पाणलोट क्षेत्राची निर्मिती होण्या अगोदर शेतीचा विकास थोड्याफार प्रमाणात झाला होता, पण ज्यावेळी उजनी पाणलोट क्षेत्राची निर्मिती झाली आणि मोहोळ तालुक्यातील कृषी क्षेत्रावर अनुकूल परिणाम झाला. कृषी मध्ये पीक विविधता निर्माण झाली, ज्या जमिनी नापीक आणि शेती करण्यायोग्य नव्हत्या, त्या जमिनी किंवा ते भाग उजनी पाणलोट क्षेत्रामुळे ओलिताखाली आली. उजनी पाणलोट क्षेत्राच्या उजव्या व डाव्या कालव्यामार्फत तालुक्यातील काही भागाला सिंचनाद्वारे पाण्याचा पुरवठा झाल्याने कृषीचा विकास होण्यास मदत झाली.

मोहोळ तालुका हा दुष्काळग्रस्त किंवा कमी पर्जन्य छायेचा असला तरी तालुक्याच्या दक्षिण-पश्चिम दिशेवर भीमा ही मुख्य नदी वाहते. या नदीवर उजनी पाणलोट क्षेत्राची निर्मिती केलेली आहे, त्याचा फायदा सोलापूर जिल्ह्यातील अनेक तालुक्यांना झाला आहे. त्यापैकीच मोहोळ तालुका हा एक आहे. उजनी पाणलोट क्षेत्राच्या निर्मिती पूर्वी सोलापूर जिल्ह्यात फक्त आठ साखर कारखाने स्थापन झाले होते; परंतु आज शेतीवर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांची निर्मिती झाली तसेच साखर कारखाने, सहकारी संस्थाचा विकास मोठ्या प्रमाणात झाला आहे. हे फक्त उजनी पाणलोट क्षेत्राच्या निर्मितीने शक्य झाले आहे. त्याचप्रमाणे आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक विकासाचा स्तर उंचावलेला दिसून येतो.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये :-**

१) मोहोळ तालुक्यात उजनी पाणलोट क्षेत्र विस्तारल्यामुळे कृषी व्यवसायावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

२) मोहोळ तालुक्यात उजनी पाणलोट क्षेत्राची निर्मिती झाल्यापासून ते आजतागायत पर्यंत कृषीमध्ये काळानुरूप झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.

३) मोहोळ तालुक्यात काही भागांमध्ये भूगर्भ पाणी पातळी वाढली आहे, तर काही भागात भूगर्भ पाणीपातळी कमी झाली आहे, याची कारणमिमांसा करणे.

४)प्राथमिक व द्वितीयक व्यवसायातील वाढ व आर्थिक विकासाचा स्तर कसा उंचावला याचा अभ्यास करणे.

५) कृषी व्यवसायांमध्ये व पीक प्रारूपामध्ये बदल करण्याच्या मानसिकतेत काळानुसार झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.

**अभ्यासाची गृहीतके :-**

१) ज्या भागात भूगर्भ पाणीपातळी वाढली आहे, त्या भागात कृषी उत्पादकतेत वाढ झालेली दिसून येईल.

२) मोहोळ तालुक्यात उजनी पाणलोट क्षेत्र विस्तारामुळे पीक प्रारूप पद्धतीत विविधता दिसून येईल.

३) मोहोळ तालुक्यात उजनी पाणलोट क्षेत्र निर्मिती पूर्वी आणि नंतर कृषी उत्पादनात किंवा कृषी व्यवसायात झालेला बदल दिसून येईल.

४) प्राथमिक व द्वितीयक व्यवसायात वाढ होऊन लोकांचा आर्थिक स्तर उंचावलेला दिसून येईल.

५) कृषी व्यवसायाच्या माध्यमातून स्थानिक लोकांना रोजगार निर्माण झालेला दिसून येईल.

**माहिती स्त्रोत :-**

**१) प्राथमिक माहिती :-**

मोहोळ तालुक्यातील उजनी पाणलोट क्षेत्रातील निवडक गावातील शेतकरी, शेतमजूर व व्यवसायिकांशी प्रत्यक्ष संवाद साधून, मुलाखती घेऊन माहिती मिळवणे.

**२) द्वितीयक माहिती :-**

उजनी पाणलोट क्षेत्राचा मोहोळ तालुक्यातील कृषी व्यवसायावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करण्यासाठी पंचायत समिती मोहोळ, लघु पाटबंधारे कार्यालय मोहोळ, गॅझेटियर, जिल्हा आर्थिक समालोचन व माहिती तंत्रज्ञान याद्वारे माहिती मिळविणे.

**उजनी पाणलोट क्षेत्राचे स्थान :-**


पश्चिम महाराष्ट्राच्या सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील भीमानगर या गावाजवळ उजनी पाणीलोट क्षेत्राची निर्मिती करण्यात आलेली असून त्याचा अंशात्मक विस्तार १८°०४'२६" उत्तर अक्षवृत्त, तर रेखांशात्मक विस्तार ७५°०७'१२" पूर्व रेखावृत्त असा आहे. हे उजनी पाणलोट क्षेत्र सोलापूर जिल्ह्यातील एकमेव मोठा प्रकल्प आहे. या पाणलोट क्षेत्राचा लाभ माढा, मंगळवेढा, पंढरपूर, माळशिरस, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर व मोहोळ या तालुक्यांना होतो.

सोलापूर जिल्ह्याची जीवनदायिनी असलेल्या उजनी पाणलोट क्षेत्राचे भूमिपूजन महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या शुभहस्ते दिनांक ०७/०३/१९६६ रोजी झाले.या पाणलोट क्षेत्राच्या बांधकामाची सुरुवात १९६९ साली झाली आणि हे बांधकाम पूर्ण १९८० साली पूर्ण झाले. यासाठी तब्बल १६ ते १७ वर्षांचा इतका मोठा कालावधी उजनी पाणलोट क्षेत्राची निर्मिती म्हणजेच बांधकामासाठी लागला. यासाठी जवळपास ९६.७७ कोटी इतका खर्च आला.

उजनी पाणलोट क्षेत्र हे महाराष्ट्रातील मोठ्या धरणांपैकी किंवा जलाशयापैकी एक असून या पाणलोट क्षेत्रात पुण्यातील मुळा-मुठासह इतर नद्यांमधून पाणी येते. या पाणलोट क्षेत्राची समुद्रसपाटीपासूनची उंची ५६.४ मीटर (१८५ फूट) इतकी आहे, तर त्याची लांबी २५३४ मीटर (८३१४ फूट) इतकी आहे. या पाणलोट क्षेत्रातून इतरत्र ठिकाणी पाण्याचे वितरण करण्यासाठी एकूण ४१ दरवाजे आहेत. आणि त्या दरवाजांचा आकार १२ मीटर (३९ फूट) × ६.५ मीटर (२१ फूट) इतका आहे

उजनी पाणीलोट क्षेत्राचा सोलापूर व पुणे जिल्ह्यातील एकूण १२९४४० हेक्टर इतक्या क्षेत्राला लाभ झालेला आहे. तर उचल पाण्यामार्फत साधारण ८५०० ते ९५०० पर्यंत हेक्टर क्षेत्राला या पाणलोट क्षेत्राचा उपयोग झालेला दिसून येतो. माढा व करमाळा या तालुक्यातील काही क्षेत्राला साठविलेल्या पाण्याचा फायदा झालेला आहे. उजनी पाणलोट क्षेत्रातील पाण्याच्या उंचीची पातळी ही ४२.८५ मीटर इतकी आहे. या पाणलोट क्षेत्रावर एकूण १६ लघु प्रकल्पांची निर्मिती केली आहे.

**उजनी पाणलोट क्षेत्राचे भौगोलिक स्थान**




**मोहोळ तालुक्यातील उजनी पाणलोट क्षेत्राचे जलस्त्रोत :-**

उजनी पाणलोट क्षेत्र हे भीमा नदीवर निर्माण केले असून ही नदी पश्चिम घाटातील भीमाशंकर येथे उगम पावते. तिची लांबी ८६१ कि.मी. असून पुणे व सोलापूर जिल्ह्यांतून मार्गक्रमण करत कर्नाटकातील रायचूरच्या उत्तरेस २५ कि. मी. अंतरावर कुरुगड्डी येथे कृष्णा नदीला जाऊन मिळते. भीमा नदी प्रवाहाला पुणे जिल्ह्याच्या पश्चिम भागातील भीमाशंकर, लोणावळा, खंडाळा यासारख्या पर्वतीय प्रदेशात भरपूर प्रमाणात पडणाऱ्या अतिवृष्टीमुळे हे नदी बारमाही वाहते. या नदी खोऱ्यात अनेक लहान-मोठ्या नद्या व नाले निर्माण झाले आहेत. भीमा नदीवर सोलापूर व पुणे जिल्ह्यांच्या सीमेवर उजनी पाणलोट क्षेत्राची निर्मिती केली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा, दक्षिण व उत्तर सोलापूर, अक्कलकोट, मोहोळ या दुष्काळग्रस्त भागाला लाभ होण्यासाठी उजनी पाणलोट क्षेत्रातील बारमाही पाण्याचा उपयोग करण्याच्या दृष्टिकोनातून सरकारने पुणे (दौंड, भिगवण व इंदापूर) आणि सोलापूर (माढा व करमाळा) या दोन जिल्ह्यांच्या सीमेवर उजनी पाणलोट क्षेत्राची निर्मिती करण्यात आली. यालाच 'यशवंत सागर' असेही म्हटले जाते.

**मोहोळ तालुक्यातील कृषी व्यवसायावर झालेला परिणाम :-**

सोलापूर जिल्ह्यामध्ये भीमा नदी प्रमुख असून तिचा उगम सह्याद्री पर्वतात पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात भीमाशंकर येथे होतो. त्यानंतर पुणे व अहमदनगर या जिल्ह्यातून तिचा प्रवाह वाहत येऊन सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करतो. सोलापूर जिल्ह्यातील तिची लांबी २८९ किलोमीटर आहे. याच नदीवर माढा तालुक्यातील भिमानगर या गावाजवळ उजनी पाणलोट क्षेत्राची निर्मिती केलेली आहे. उजनी पाणलोट क्षेत्राची व्याप्ती खूप मोठी असून त्याचा सोलापूर जिल्ह्यातील ५०० किलोमीटर (१९० चौ. मैल) कृषी क्षेत्राला फायदा झालेला आहे. या पाणलोट क्षेत्राची पाणी साठविण्याची क्षमता १५१७ गिगालिटर्स एवढी प्रचंड आहे. ११७ टीएमसी म्हणजेच १११ टक्के इतके एकूण पाण्याची साठवण करता येते. त्यामुळे या उजनी पाणलोट क्षेत्राचा फायदा पुणे, अहमदनगर व सोलापूर जिल्ह्यातील कृषी क्षेत्राला मोठ्या प्रमाणात होत असलेला दिसून येतो.

त्याचप्रमाणे सोलापूर जिल्ह्यातील प्रामुख्याने माढा, मंगळवेढा, पंढरपूर, मोहोळ, माळशिरस, दक्षिण व उत्तर सोलापूर या तालुक्यांना प्रामुख्याने उजनी पाणलोट क्षेत्राचा फायदा झालेला दिसून येतो. सोलापूर जिल्ह्यात वरील तालुक्यांना पाण्याचे वितरण किंवा पुरवठा करण्यासाठी उजनी डाव्या कालव्याची निर्मिती करण्यात आली

असून त्याची एकूण लांबी १२६ कि.मी. आहे. आणि त्याचा लाभ २९,८३० हेक्टर इतक्या मोठ्या कृषिक्षेत्राला झाला असलेला दिसून येतो. साधारणपणे या डाव्या कालव्याची निर्मिती १९९५-९६ सालापर्यंत पूर्ण झाली आहे. पंढरपूर हे उजनी डाव्या कालव्याचे कार्यक्षेत्र म्हणून निश्चित करण्यात आलेले आहे. आणि या कार्यक्षेतत्रामार्फत माढा, पंढरपूर, मोहोळ, दक्षिण व उत्तर सोलापूर यासारख्या शहरांना पाणी वाटपाचे नियोजन केले जाते.

मोहोळ तालुक्याला कृषी क्षेत्राला पाणी वाटपाचे नियोजन करण्यासाठी बेगमपूर शाखा, कुरुल शाखा व मोहोळ-कारंबा शाखा या तीन क्षेत्रीय कार्यालयाची निर्मिती केलेली असून त्याद्वारे पाण्याचे वितरण केले जाते. त्यामुळे मोहोळ तालुक्यातील कृषी क्षेत्राला मोठ्या प्रमाणात फायदा झाला असून मोहोळ तालुक्यातील लोकांचा आर्थिक व सामाजिक विकास होण्यास मदत झालेली दिसून येते. स्थानिक लोकांना आपल्या कृषीतून मिळणाऱ्या उत्पादनातून किंवा व्यवसायातून रोजगाराची निर्मिती झाली आहे. उदरनिर्वाह करण्यासाठी मोठ्या शहरांकडे होणारे स्थलांतर कमी होण्यास मदत होत आहे. उजनी जलाशयामुळे पाण्याची उपलब्धता झाल्याने वरीलप्रमाणे सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत.

उजनी पाणलोट क्षेत्राची निर्मिती होण्यापूर्वी सोलापूर जिल्ह्यात फक्त आठ साखर कारखाने स्थापन झाले होते; पण आजतागायत उजनी जलाशयाची निर्मिती झाल्यापासून त्यामध्ये मोठ्या संख्येने वाढ झालेली दिसून येते. त्याचबरोबर सहपदार्थ निर्मिती, लहान-मोठे उद्योगांची निर्मिती झालेली दिसते. सोलापूर जिल्ह्यातील ३८ लाख लोकसंख्येचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला आहे. या उजनी जलाशयाचा अनेक कारखान्यांना, १३२० मे. नॅशनल थर्मल पॉवर स्टेशनला पाणी पुरवठा केला जातो. त्याचबरोबर कृषी क्षेत्राला आवश्यक असणाऱ्या १२ मे. क्षमतेच्या रिव्हर्सीबल टर्बाईनद्वारे वीज निर्मिती करण्यात येते. आणि त्याचा फायदा कृषी क्षेत्राला झालेला दिसून येतो.

खालील तक्त्यावरून आपणांस उजनी पाणलोट क्षेत्राचा मोहोळ तालुक्यातील कृषी क्षेत्राला होणारे लाभ दिसून येईल.

**मोहोळ तालुक्यातील उजनी पाणलोट क्षेत्र**

| क्र | कालव्याचे नाव | कालव्याची लांबी (कि.मी.) | बारमाही प्रवाह लाभक्षेत्र (हेक्टर मध्ये) | हंगामी प्रवाह (कि.मी.) | हंगामी प्रवाह लाभक्षेत्र (हेक्टर मध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | उजनी उजवा कालवा | ११२ | ४४१०० | १३२ | ५१८०० |
| २ | उजनी डावा कालवा | १२६ | २९८३० | १२६ | २९८३० |
| ३ | बेगमपूर शाखा | ३४ | १०१३५ | ५५ | १७६९५ |
| ४ | कुरुल शाखा | ३८ | ८१९० | ६५ | १४८९० |
| ५ | मोहोळ-कारंबा शाखा | ८५ | २०६८५ | १७० | ३३५८५ |

संदर्भ:-भीमा जलसिंचन कार्यक्षेत्र पंढरपूर, जिल्हा सोलापूर याचे कार्यालय.

वरील तक्त्याचे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, उजनी पाणलोट क्षेत्राचे उजनी उजवा कालवा आणि उजनी डावा कालवा हे दोन मुख्य प्रवाह निर्माण केलेले आहेत. या दोन उचल प्रवाहातून पाण्याचे वितरण केले जाते. उजनी डाव्या कालव्याचा विचार करता सोलापूर जिल्ह्यातील प्रामुख्याने पंढरपूर, मोहोळ, उत्तर सोलापूर व माढा या तालुक्यांना पाणीपुरवठ्याचा लाभ होत असलेला दिसून येतो. सोलापूर जिल्ह्यातील उजनी डाव्या

कालव्याच्या प्रवाहाची लांबी ही उजनी उजव्या कालव्यापेक्षा अधिक असलेली दिसून येते परंतु उजनी डाव्या कालव्याचे लाभक्षेत्र उजनी उजव्या कालवापेक्षा कमी असलेले दिसून येते.

उजनी पाणी पाणलोट क्षेत्रातून मोहोळ तालुक्याला पाण्याचे वितरण करण्यासाठी बेगमपूर, कुरुल आणि मोहोळ-कारंबा अशा तीन क्षेत्रीय कार्यालयाची निर्मिती केलेली आहे. या तीन शाखेद्वारे मोहोळ तालुक्यातील लोकांची पिण्याच्या पाण्याची तहान भागवण्यासाठी, कृषिक्षेत्राला तसेच लहान-मोठ्या उद्योगधद्यांना पाणी पुरवठा केला जातो. हा पाणी पुरवठा बारमाही आणि हंगामी अशा दोन्ही स्वरूपात केला जातो. मोहोळ तालुक्यात उजनी डावा कालवा प्रवाहाची लांबी १२६ कि.मी. इतकी असून या प्रवाहापासून तालुक्यातील एकूण २९८३० हेक्टर इतक्या क्षेत्राला लाभ झालेला दिसून येतो, बेगमपूर या शाखेच्या प्रवाहाची लांबी ३४ कि.मी. इतकी असून त्यापासून १०१३५ हेक्टर इतक्या भागाला पाण्याचा लाभ होतो. कुरुल शाखेच्या प्रवाहाची लांबी ३८ कि.मी. असून ८१९० हेक्टर एवढ्या क्षेत्राला लाभ झालेला दिसून येतो. त्याचबरोबर मोहोळ-कारंबा या शाखेच्या प्रवाहाची लांबी ८५ कि.मी. २०६८५ हेक्टर भागाला फायदा झालेला दिसून येतो.

अशा तऱ्हेने वरील तीन क्षेत्रीय कार्यालयामार्फत मोहोळ तालुक्यातील कृषी क्षेत्र व कृषी व्यवसायावर प्रक्रिया करणारे लहान-मोठे उद्योग, खाजगी स्वरूपातील कारखाने, सहकारी कारखान्याना पाण्याची उपलब्धता झाल्याने मोहोळ शहराचा विकास होत असलेला दिसून येतो. अशा तऱ्हेने उजनी पाणलोट क्षेत्र हे वरदानच ठरले आहे.

**निष्कर्ष :-**

१) उजनी पाणलोट क्षेत्र मोहोळ तालुक्यात विस्तारित झाल्यामुळे ज्या भागातून पाणलोट क्षेत्र प्रवाहित आहे. त्या भागातील शेतकऱ्यांनी आपल्या शेतीमध्ये आमूलाग्र बदल केलेला दिसून आला.

२) मोहोळ तालुक्यात शेती उत्पादनाबरोबरच जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसाय, शेळीपालन, कुक्कुटपालन अशा व्यवसायाची प्रगती तालुक्यात झालेली दिसून आली.

३) मोहोळ तालुक्यात लहान-लहान लघु उद्योगाची निर्मिती झालेली दिसून आली.

४) शेतकऱ्यांच्या बद्दलत्या पीक प्रारुप रचनेमुळे त्याची आर्थिक, सामाजिक, व सांस्कृतिक जीवनात बदल झालेला दिसून येतो.

**संदर्भ सूची :-**

*१) श्वेतपत्रिका, जलसंपदा विभाग मंत्रालय, मुंबई. नोव्हें-२०१२.*

*२) Govt. Of Maharashtra (1981-2011): 'Socio-Economic Abstract' of Solapur District, Solapur.*

*३) Govt. Of Maharashtra (1991): District Gazetteers of Solapur District.*

# हिंदी यात्रा साहित्य में प्रकृति प्रकोप का चित्रण

***डॉ .विक्रम रामचंद्र पवार***

*सहायक प्राध्यापक, देशभक्त संभाजीराव गरड, महाविद्यालय -मोहोळ.*

**प्रस्तावना: -**

*प्रकृति एक तरफ मानव जीवन को निर्मित, संवर्धित एवं विकसित करती है। विश्व को सौंदर्य से भर देती है। वहीं दूसरी ओर रौद्र-भीषण रूप धारण कर समस्त जीवसृष्टि का एवं अपने विभिन्न उपादानों का भी विनाश कर देती है। प्रकृति प्रकोप से मानव जीवन प्रभावित होता है भूकंप, भू-स्खलन, बाढ़, त्सुनामी आदि प्रकृति प्रकोप के अंग हैं। उत्तरशती के यात्रा-साहित्य में प्रकृति-सौंदर्य के साथ ही प्रकृति प्रकोप की विभिन्न स्थितियों का भी मार्मिक अंकन किया गया है। यह चित्रण किसी देश या शहर के वर्णन के मध्य पृष्ठभूमि के रूप में उभरता है। साथ ही यात्रामार्ग में भू-स्खलन जैसी घटनाओं के कारण उत्पन्न आपात स्थिति का यथार्थ चित्रण भी मिलता है।*

पहाड़ीइलाकों में भू-स्खलन की घटनाएँ निरंतर घटित होती हैं। पहाड़ी का एक टुकड़ा या कोई हिमखंड आदि टूटकर खाई में गिर जाता है। बीच में अगर कोई घर, वाहन, रास्ता आता है, तो उसका विनाश करते हुए मलबा नीचे लुढ़कता जाता है। असम केकालिपोंग ' इलाके में हुए भू-स्खलन की घटना का उल्लेख करते हुए श्री मक्खनलाल शर्मा जी लिखते हैं-"हिलकार्ट बाजार पर सड़क पुल द्वारा तीस्ता पार करके, उसके बाएँ किनारे पर चलने लगती है। अभी कुछ ही दूर आए होंगे कि यकायक हमारी बस रुक गई। बहुत लंबी कतार है, वाहनों की और सभी दम साधे चुपचाप खड़े हैं। लोग बता रहे हैं आगे पहाड़ टूट पड़ा है और रास्ता रुका है। आधा घंटे सामने से सवारियाँ आती रहीं। अब हमारे काफले को आगे बढ़ने का सिग्नल मिला है। धीरे-धीरे चलते हुए उस स्थान पर पहुँचे, जहाँ संकट उपस्थित हुआ था। सैकड़ों फीट ऊपर से कूदता पहाड़ सड़क को अपने साथ घसीटता हुआ तीस्ता की बगल में जाकर लेट गया है। कुछ शिलाएँ तीस्ता की धारा तक भी पहुँची हैं, लेकिन, तीस्ता ऐसे समर्पण की आदि हो चुकी है। अत :वह अपनी मस्ती में हुँकारती चली जा रही है। मानो कुछ हुआ ही न हो।"[1]

इसीप्रकार अरुणाचल प्रदेश के कार्मेंग इलाके के भूस्खलन का चित्रण करते हुए गोविंद मिश्र जी लिखते हैं- "इन पहाड़ों पर मिट्टी ज्यादा है, इसलिए लैंडस्लाइड खूब होते हैं, जो इधर-उधर अनाप-शनाप पेड़ों के काटे जाने से और भी बढ़ गए हैं। आज भी आगे के रास्ते में लैंडस्लाइड हुआ था। जहाँ लैंडस्लाइड हुआ था, वहाँ दोनों तरफ के आनेवाले लोगों की छोटी-मोटी भीड़ थी। पहाड़ का एक कटा हिस्सा सड़क पर गीली मिट्टी के ढेर-सा पड़ा हुआ था। सड़क के नीचे नदी की तरफ दो-तीन बड़े पेड़ कल्थे पड़े थे, मलबा भी था। कुछ गाड़ियाँ दूसरी तरफ रुकी पड़ी थी। और लोग इधर से उधर जाते हुए रास्ते का मुआयना कर रहे थे। हल्के वाहनों को पार कराने के लिए मलबे से किसी तरह समतल बनाने का क्रम जारी था। लगता ही नहीं था कि मलबे के नीचे कहीं सड़क होगी।"[2] मानव द्वारा अपरिमित वृक्ष विनाश भी भूस्खलन का एक कारण माना जा सकता है।

-भूस्खलन की वजह से कई बार जीवित हानी भी होती है-"पिछले साल चौदह नवंबर को जोजीला दर्रे में भयंकर दुर्घटना हुई। ऊपर द्रास से ट्रकों और कुछ अन्य वाहनों का काफिला नीचे श्रीनगर जाने के लिए चला आ रहा था कि घुमरी चैकपोस्ट पार करते ही जोजीला में वह बर्फ की बहुत बड़ी चट्टान की चपेट सें आ गया। और तमाम ट्रक, बसें, ड्राइवर, कंडक्टर, मुसाफिर, मजदूर आदि मौत के शिकार हो गए।"[3]

प्रकृतिप्रकोपों में सबसे विनाशकारी होता है भूकंप। भूकंप की वजह से कई संस्‍द्धतियाँ तक विनष्ट हुई हैं। कच्छ की धरती पर भूकंप के प्रभाव का उल्लेख करते हुए गोविंद मिश्र जी लिखते हैं-"जून 1919 में भयंकर भूचाल आया...जिसने लखपत क्या समूचे कच्छ को उजाड़कर रख दिया। हजारों लोग मरे और कच्छ की करीब-करीब हर इमारत को नुकसान पहुँचा। पर सबसे बड़ा नुकसान यह हुआ कि सूखी जमीन का खासा बड़ा हिस्सा नमकीन पानी से भरे रहने को अभिशप्त हो गया, एक बहुत बड़ा बाँध-सा उग आया जिसने सिंधु नदी के बहाव को कच्छ से दूर.......पाकिस्तान की तरफ कर दिया। लखपत जहाँ इतना पानी था कि चावल) आधे लाल, आधे सफेद रंग का (की खेती होती थी, चावल से ही लाख का कर आता था...वह आज पीने के पानी को मोहताज है, जमीन के नीचे पानी दूर-दूर तक नहीं मिलता। सिंधु नदी तो कच्छ से गई, साथ कई नदियों को ले गई। एक पुराने नक्शे में लूनी नदी का

रास्ता लखपत तक दिखाया गया है। यह उन तीन नदियों में से है जो माउंट आबू के पास निकलती है, पहले समुद्र तक जाती थी, अब रन में खो जाती है। छोटी रन में खो जानेवाली ऐसी ही एक नदी बनास है।"[4] यहाँ पर भूकंप की भीषणता एवं उसके दीर्घ प्रभावों का मार्मिक अंकन हुआ है।

विश्व के कुछ देश एवं नगर निरंतर भूकंप, बाढ़ आदि प्रकोपों की चपेट में आते रहते हैं। परंतु नव निर्माण कर वे प्रकृति के साथ संघर्ष एवं सामंजस्य बिठाने में व्यस्त रहते हैं। अमेरिका का सॅनफ्रांसिस्को शहर ऐसा ही एक नगर है-"इस शहर पर सात बार कहर बरसा, भूकंप तथा तूफानों के द्वारा सात बार नष्ट हो-हो कर यह शहर दुबारा-दुबारा बनाया गया। इसके निवासियों के धैर्य और इस स्थान के लिए प्रेम का ही यह परिणाम है, जिसने इसके निवासियों को इतना पराक्रमी और भूतकाल के लिए इतना स्नेहिल बना दिया, कि इन्होंने इस नगर को बार-बार गढ़ा। बार-बार बनने के कारण ही यह शहर नया प्रतीत होता है। इस शहर की संस्कृति की बराबर रक्षा की जाती रही है। शहर के प्रति इसके नागरिकों का प्रेम और दृढ़ निश्चय ही है। दो वर्ष के भीतर इस शहर को छह धक्के लगे, 1906 में सातवाँ धक्का इसे भूकंप के द्वारा लगा, जिसने शहर के पाँच में से चार हिस्से नष्ट कर दिए। फलत :इसकी जल-विद्युत व्यवस्था भी ठप्प हो गई। लोगों ने इसे फिर से जिलाया। अब भी कब कोई दूसरा भूकंप इसे हिला दे नहीं कहा जा सकता।"[5]

इसी प्रकार रशिया के ताशकंद शहर में 1966 ई .में "ऐसा भयानक भूचाल आया कि ताशकंद के करीब दस लाख घर जमीन पर लोट गए। त्राहि-त्राहि मच गई। अखबारों में वहाँ की तबाही पढ़ी : तसवीरों में देखी और प्रकृति की विनाशलीला पर आह भरकर रह गए। आज के ताशकंद की सारी कहानी उसी भूचाल की विनाशलीला के बाद की कहानी है यानी नए निर्माण की कहानी। कहते हैं कि समूची सोवियत धरती से ताशकंद की सहायता के लिए लोग आए-इंजीनियर, वास्तुकार, डॉक्टर। देखते-देखते नया ताशकंद खड़ा होने लगा और आज जो ताशकंद है, वह पुरानी धरती पर उसी नए निर्माण की कहानी है।"[6] यह मानव के जीवट की कहानी है। यहाँ प्रकृति के विरुद्ध मानव नहीं है, बल्कि प्रकृति के बिगड़ते स्वरूप पर मानव की क्रियाशील प्रतिक्रिया है। मानव की जीजिविषा का मार्मिक उदाहरण है।

इस प्रकार उत्तरशती के यात्राकारों ने देश विदेश की प्रकृति के विविध पहलुओं का इतनी सूक्ष्मता के साथ वर्णन किया है कि लगता है मानो कोई डॉक्युमेंटरी फिल्म दिखाई जा रही हो।

**संदर्भ-**

1) *दो कदम मेरे साथ भी, मक्खनलाल शर्मा, पृष्ठ-62*
2) *परतों के बीच, गोविंद मिश्र, पृष्ठ-69*
3) *महादेश की दुनिया, प्रदीप पंत, पृष्ठ-84*
4) *परतों के बीच, गोविंद मिश्र, पृष्ठ-56*
5) *सागर पार का संसार, शशिप्रभा शास्त्री, पृष्ठ-150*
6) *धरती लाल गुलाबी चेहरे, कन्हैयालाल नंदन, पृष्ठ-2*

# लिंगभाव समानता

***Dr. Ranjana Rajesh Sonawane***
*Associate Professor, K.C.E.S.'s Collgege of Educacatio and physical Education, Jalgaon.*
*Email- sonawaneranju96@gmail.com*

**गोषवारा :-**

*आजही भारतीय समाजात व विशेषत: मध्यमवर्गीय कुटूंबात मुलगी म्हटली म्हणजे एक मोठी अर्थिक जबाबदारी व बोजा किंवा ओझे समजले जात असते व तशीच सर्वसामान्यांची मानसिकता असल्याचे दिसून येते, तथापि, अशा प्रकारे मुलगी म्हणजे जोखीम किंवा लायबिलीटी असा निर्देश करणे हे औचित्याला धरून नाही. वस्तुत: मुलगी हे ओझे आहे, अबला आहे, असा दृष्टिकोन बाळगणे गैर असून समाजाच्या स्त्री विषयीचा हा दृष्टिकोन बदलणे गरजेचे आहे. या देशातील केवळ गोरगरीब, अडाणी, निरक्षर, अशिक्षित अशा व्यकतीचेच नव्हे तर सधन, श्रीमंत, उच्चपदस्थ् व अधिकारदस्थ् स्त्री पुरूषांचेच प्रबोधन होण्याची खरी आवश्यकत आहे. आपण ज्या समाजात राहतो, त्या समाजातील महिलांच्या हक्कांबद्दल जागृती येणे ही त्या समाजाची जबाबदारी आहे. निरोगी आणि शिक्षित महिला ही देशाची संपत्ती आहे. ती समाजाच्या संपन्नतेत वाढ करते. दुसरीकडे अशिक्षित स्त्री ही कुपोषित, अशक्त आणि दुर्लक्षित बालकांना जन्माला घालून समाजाची जबाबदारी वाढवण्याचे* काम करते. त्यामुळे हा प्रश्न महिलांपुरताच मर्यादित राहत नाही. यात संपूर्ण समाज आणि देशाचाही समावेश होतो.

**प्रस्तावना :-**

लिंगजात ही जैविक विशेषता आहे ज्यात स्त्री व पुरूष यांची वेगवेगळी गुणसुत्रे, हार्मोन्स, पुनरूत्पादन अवयव आणि अन्य शारीरिक विशेषता असतात. उदा. स्त्री ही बालकाला जन्म देवू शकते, पुरूषांची हाडे स्त्रियांच्या हाडांपेक्षा बळकट असतात. लिंगजाती नैसर्गिक असल्याने त्यात काळानुसार बदल होत नाही. त्या नैसर्गिक समानता असते. याउलट लिंगभाव मानवनिर्मित असतात, त्यात काळानुसार बदल होतो असल्याचे दिसते. लिंगजात ही जन्मजात बाब असते, तर लिंगभाव हा व्यक्तिजीवनात घडवला जातो. म्हणून लिंगजातीभेदावर आधारित स्वीकारल्या जाणाऱ्या स्त्री-पुरूषांच्या वेगवेगळया भूमिका, अस्मिता आणि नातेसंबंध यांस लिंगभाव म्हटले जाते. याचा अर्थ स्त्रीत्व पुरूषत्व मानवी संस्कृतीत घडवले जाते. 'तुम्हाला मुलगा झालाय, मुलगी झालीय, या वाक्यातून लिंगजातीचा थेट बोध होतो. एवढेच नव्हे, तर व्यक्तिच्या मृत्यूनंतरही लिंगओळख होईल अशीच विधाने वापरून व्यक्तिचा अंत्यविधी केला जातो, ही वस्तु सिथतीही नाकारता येत नाही. थोडक्यात, लिंगजाणीव ही व्यक्तीच्या दृषटिकोनातून जेवढी महत्त्वाची असते तेवढीच सामाजिक दृषिटकोनातून ही महत्त्वाची असते. यामुळेच व्यक्ती एकवेळेस स्वत:ची जात-पात, धर्म-पंथ, सामाजिक- अर्थिक दर्जा, संस्कृती, देशाचे सदस्यत्व विसरू शकते, मात्रा ती, मी पुरष आहे की स्त्री आहे हे कदापि विसरू शकत नाही. यावरून लिंगभाव व लिंगभूमिका महत्त्वाचा घटक आहे, हे आपल्या लक्षात येते. लिंगजात हा गुणविशेष निसर्गदत्त् आहे. म्हणून जैविकीय दृष्टीने स्त्री व पुरूष समान आहेत असे म्हटले जाते, परंतु वास्तवात स्त्रियांबाबत भेदभाव केले जातात, संधी, हक्क याबाबत स्त्री-पुरूषांमध्ये अद्यापदेखील असमानता आढळून येते. कारण लिंगभाव मानवनिर्मित आहे. सामान्यत: लिंग या संज्ञेसाठी gender व sex हे इंग्रजी शब्द पर्यायी शब्द म्हणून वापरले जातात. सामाजिक मानसशास्त्रज्ञांनी या दोन्ही शब्दांमध्ये भेद केलेला आहे. या प्रकरणात gender व sex साठी लिंगजाती या संज्ञेचा वापर केलेला आहे.

**लिंगभाव :-** 14 व्या शताकापासून व्याकर णिकदृष्टया स्त्रीवाचक अथवा पुरूषवाचक, किंवा नपुंसकवाचक नामे दर्शवण्यासाठी लिंगभाव शब्दाचा वापर केला गेला. लिंगभाव आणि लिंगजाती हे दोन्ही शब्द पुरूषवाचक वा स्त्रीवाचक शब्द ओळखण्याच्या दृष्टीने उपयोगात आणले गेले यात थोडा फरक होता. लिंगजाती sex हा शब्द जै विक भेद दर्शवण्यासाठी तर लिंगभाव सांस्कृतिक, सामाजिक भेदांच्या संदर्भात वापरला गेला. मध्ययुगीन इंग्रजीत प्राचीन

फ्रेंच Gender जो लॅटिन Genus शब्दापासून तयार झालेला होता. त्याचा अर्थ जन्म, कुटूंब, राष्ट्र असा होता. आताच त्याचा अर्थ प्रकार, वर्गीकरण,लिंग आणि नामाचे वर्गीकरण असा घेतला जातो.

**अमेरिकन सायकॉलॉजिकल असोसिएशननुसार :-**

लिंगभाव म्हणजे व्यक्तिच्या जैविक लिंग जातीनुसार त्याच्या असलेल्या सांस्कृतिक वातावरणातील अभिवृत्ती, भावना आणि सांस्कृतिक अपेक्षेप्रमाणे असणारे वर्तन हे लिंगभावाचे नमुन्याशी संबंधित असते. लिंगभाव म्हणजे एखाद्या व्यकतीच्या लिंगजातीसंबंधी असणाऱ्या अशा सर्व बाबी (भूमिका, वर्तनशैली, आवडीनिवडी, दर्जा, अभिवृत्ती, इतर व्यक्तिमत्व गुण इत्यादी) ज्या एखाद्या संस्कृतीमधील पुरूष अथवा स्त्री असणाऱ्या बाबीला परिभाषित करतात. स्त्रिया आणि पुरूषांचे सामाजिक संबंध/ भूमिका आणि जबाबदाऱ्या अभिक्षमता आणि अध्ययनाद्वारे निर्माण झालेल्या पुरूषी किंवा बायकी वर्तनाच्या अपेक्षा ज्या काळानुसार बदलत्या व संस्कृतीनुसार भिन्न असतात त्यांना लिंगभाव म्हणतात. स्त्री आणि पुरूषांनी आपली ओळख समजून घेणे, मूल्यमापन आणि अपेक्षाकृत वर्तन करणे या सांस्कृतिक कल्पनांशी लिंगभाव संबंधित आहे.

**स्कांट वॉन्स :-** लिंगभेदावरून जाणून घेतलेल्या फरकावर आधारित सामाजिक संबंधाचा बनवलेला घटक म्हणजे लिंगभाव आहे आणि लिंगभाव हा सामर्थ्याचा महत्त्वपूर्ण संबंध दर्शवणारा प्राथमिक मार्ग आहे.

**ज्यु डिथ लॉर्बर** (1994) संस्कृतीच्या मार्गाने सामाजिक जीवनाचे संघटन करण्यासाठी मानवाने निर्माण केलेली संस्था म्हणजे लिंगभाव होय.

स्त्रिया आणि पुरूषांनी आत्मसात केलेले, वेळेनुसार बदल होणारे आणि संस्कृतीनुसार विस्तृत भिन्नता असणारे सामाजिक वेगळेपणाशी लिंगभावाची संकल्पना संबंधित आहे.

**लिंगभाव संकल्पना**

लिंगभाव ← गुणसुत्रे ← गर्भाच्या वैशिष्टयांचे वहन

↓

जैविकतेकडून सामाजिकतेकडे स्थित्यंतर
जीवन आणि संस्कृती मूल्यांनुसार संयोजन
दृष्टीकोन, मानसिकता आणि कार्यात बदल.

**समाजातील विविध संस्थांमधील लिंगभाव भूमिका :-**

**कुटूंब :-** आधुनिकीकरणाबरोबरच स्त्रियांच्या कौटुंबिक शोषणाच्या नव्या-नव्या पध्दती असतित्वात येत आहेत. लिंग निदानामुळे स्त्रीचा गर्भ सहजपणे काढता येतो. त्यामुळे स्त्रीभ्रूणहत्येचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. यातूनच स्त्रियांचा सामाजिक दर्जा आजही किती दुय्यम आहे हे स्पष्ट होते. ग्रामीण तसेच शहरी क्षेत्रात अधिकतम स्त्रिया 1) पतीद्वारे शारीरिक यातना/ पतीने मारणे/दारूपिऊन /आई-बहिणीच्या शिव्या देणे मिळालेल्या शस्त्रांनी मारणे आणि हे होत असतांना शेजाऱ्यांनी/कुटूंबातील इतर सदस्यांनी/ मित्रांनी पती-पत्नीची ती खाजगी बाब मानून दुर्लक्ष करणे यामुळे हिंसा घडतात. या दशकात प्रतिदिनी 26 स्त्रिया अशा प्रकारच्या पती अत्याचाराला बळी पडल्याचे निदर्शनास आले. तर एका सर्वेक्षणात 186 प्रकरणांमध्ये 60 स्त्रिया बळी पडल्यात त्या सर्व स्त्रिया पदव्युत्तर शिक्षा प्राप्त् असणाऱ्या असून, पतीला प्रत्युत्तर देणे व त्याला कायद्याची जाणीव करून देण्यामुळे त्या हिंसेत बळी पडल्या. उदा. शिकलेली आणि त्यात नोकरी करणारी बायको याबद्दल आर्थिक बाब बाजूला ठेवली तर अनेक पुरूषांची स्थिती व मान सिकता अनाकलनीय स्वरूपाची असल्याचे आजही अनेक उदाहरणावरून दिसून येते. आजही कुटूंबांमधून स्त्रियांना निर्णय प्रकियेमध्ये समावेश न करण्यातून स्त्रियांचा सहभाग नाकारला जातो. कुटूंबातील दैनंदिन व्यवहार स्त्रियाच पाहतात व त्याचे नियोजन व निर्णय त्याच घेतात परंतु मोठे निर्णय, स्वता:च्या आयुष्यातले देखील निर्णय पुरुषच घेतात व स्त्रियांना तिथे काहीही बोलायचा अधिकार नसतो. या साचेबंद प्रतिमा अशा रीतीने कुटूंबातच जन्माला येतात. जोपासल्या जातात म्हणून त्यात काही बदल व्हावे असे वाटत असेल तर कुटूंबपध्दतीतच सुधारणा

व्हायला पाहिजे. स्त्रियांनी वैयक्तिक पातळीवर व सामुहिक पातळीवर यासाठी केलेला संघर्ष हा स्त्री-पुरूष समानतेच्या लढयातील व पुरूषी मानसिकतेत बदल करण्यातील पहिले पाऊल आहे. परिणामी आज कुटूंबातील स्त्रियांना स्व्अस्तित्वाची जाणीव होऊ लागलेली आहे. त्यांच्यातील आत्मविश्वास वाढून कुटूंब, तसेच समाजातील विविध क्षेत्रात त्यांच्या कर्तृत्वाची दखल घेतली जाऊ लागली आहे आणि अनेक कुटूंबातील तिचा दर्जा उंचावला आहे. ही योग्य बदलाची नांदीच म्हण्वी लागेल. स्त्री व पुरूषांना समान हक्क असतील अशा त-हेने कुटूंब या सामाजिक संस्थेची पुनर्रचना करण्याची गरज आहे. तसेच सामाजिक  प्राणी म्हणून तिला कायद्याचे ज्ञान  तिला मा हित नसेलही पण प्रसार माध्यमातून तिला कळत –नकळत  तिच्या स्वत्वाची, अस्मितेची, स्वाभिमानाची,  तिच्यावरील अन्यायाची जाणीव प्रज्वलित होत राहते.

**ब) जाती :-** जातीसंस्था व्यक्तीसाठी जन्मापासनू ते मृत्यूपर्यंत  विशिष्ट प्रकारचे सामाजिक वातावरण तयार करते. या वातावरणात  व्यक्ती लहानाची मोठी होते, व्यवसाय शिक्षण घेते, कुटुंबातच कुटुंबाच्या व्यवससायाला हातभार लावू लागते, वडीलांच्या मृत्यूपर्यंत त्यांच्याच छत्राखाली कुटुंबातील व्यवसाय करीत राहाते. वडीलांच्या मृत्यूनंतर जर जबाबदारी आलीच तर स्वता:च्या अधिकारात कुटुंबाचे व्यवहार सांभाळते,विवाह कोणाशी करावा हे आई-वडील व इतर नातेवाईक ठरवतील. त्याचबरोबर जातीमधीलच वर-वधुशी लग्न लावूनदिले जाते. आणि कौटुंबिक आयुष्याची सुरूवात होते. जात ही व्यक्तीला अशा तऱ्हेचे स्थान मिळवून देते की जेथून तिला संपत्ती, वा दारिद्रय, यश व नाश यापैकी काहीच, हलवू शकणार नाही. जातींनी व्यक्तींच्या जीवनातील विविध बाबींची निवड मर्यादित केली, विवाह, व्यवसाय,  मित्रमंडळी, सांस्कृ तिक व सामाजिक  जीवन या बाबतीत कोणाशी सामावून घ्यावे, कोणत्या संघात जावे, कोणते कपडे घालावे, कोणाशी सामावून घ्यावे, कोणत्या संघात जावे, कोणते कपडे घालावे, कोणाशी हंसावे, कोणाला तुचृछ लेखावे हे जातींनीच ठरवून दिल्यामुळे व्यक्तींच्या निवडीला वाव राहिला नाही. त्याने कोणत्या प्रकारचे औषधपाणी घ्यावे, शरीरसौख्य स्त्रियांवर लादली गेली. भारतात लोकशाही असून देखील आजही जात पंचायतीचा फतवा कायद्यापेक्षा महत्त्वाचा ठरतो, त्यातूनच ऑनर किलींगसारख्या घटना घडतात.

**क) धर्म :-** भारतात जी विविध धर्मव्यवस्था अस्तित्वात आहे त्या सगळयाच धर्मप्रवर्तकांनी स्त्रियांना कमी लेखले आहे. स्त्री ही पुरूषांना मोहिनी घालणारी त्यांच्या अंगीकृत कार्यापासून दूर नेणारी, अशी स्त्री प्रतिमा धर्मप्रवर्तकांनी मांडली आहे. आणि त्याचा पगडा भारतातील बहुसंख्य लोकांवर आजही आहे. मध्ययुगीन काळात जे विविध संप्रदाय भारतात निर्माण झाले त्यातील काही समतावादी धर्मप्रवर्तकांनी स्त्री-पुरूष समानतेचा पुरस्कार केला.  बसवेश्वर – कबीर – वारकरी संप्रदाय – महानुभव संप्रदाय यांनी ही समता अध्यात्माच्या क्षेत्रात स्वीकारली पण तरीही काही प्रमाणात स्त्रियांकडे बघण्याचा या संप्रदायिकांचा दृष्टीकोन पारंपा रिकच होता. त्यांनी अस्तित्वात आणलेली समता सामा जिक क्षेत्रात रूजू शकली नाही.  समाजातील स्त्रियांच्या स्थानाबद्दल  विचार केल्यास असे आढळते की, स्त्रियांबद्दल भेदभाव हा सर्वच धर्मातील व जातीतील स्त्रियांच्या अनुभवास येतो. सर्वच धर्म असे मानतात की पुरूष स्त्री पेक्षा श्रेष्ठा आहेत त्यामुळे सर्वच धर्माच्या चालीरीती व नियमांमध्ये स्त्रीला दुय्यम स्थान दिलेले आहे. पितृवंशी किंवा पितृसत्ताक हयाच कुटूंब पध्दतींना सर्वच धर्माची मान्यता दिलेली आहे.

**ड) संस्कृती :-** सर्वसाधारणपणे जगातील सर्व संस्कृतींमध्ये स्त्रियांचे काम मुलांना जन्म देणे व त्यांचा सांभाळ करणे, पुरूषांना अधिक  अधिकार आणि मुलींपेक्षा मुलांना जास्त महत्त्व आहे असे दिसते. स्त्री ही पुरुष केंद्री संस्कृतीने वेढली गेली आहे. पुरूषसत्ताक संस्कृतीत स्त्रीला स्वतंत्र अस्तित नाही. तिचे तिचे अस्तित् गृहापुरतेच मर्यादित आहे. पुरूषाने जशी स्त्री प्रतिमा बनवली. ही अनंत अख्यायिकाच आहे. त्याच वेळी तिला स्वत:चे अस्तित्व् नाही. ही गोष्ट रूढ केली जाते.

**संदर्भ सूची**

1) *Academic dictionary of Education, (2007), ISHA Books, New Delhi.*
2) *J.S.Walia, (1997), paul publishers, modern Indian Education and its problems.*
3) *Sharma Sanjay Prakash, Women Education and women's Rights in India, Vista International Publishing House, Delhi.*
4) *Shrivastava Sudharani, (1999), Women in India, Commonwealth Publishers, New Delhi.*
5) *Subhash C. Kundu, (2003), Workforce diversity status, industrial management, Vol. 103/55*
6) *Walikhanna Charu, A Report of expert committee on Gender and Education, National Commission for women, New Delhi.*
7) *काचोळे. दा.धो., (2013), समाजशास्त्र: व्यक्ती आणि समाज, कैलाश पब्लिकेशन्स औरंगाबाद.*
8) *कुलकर्णी पी.के., (2015), मानवी हक्क आणि सामाजिक न्याय, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.*
9) *म.बा.कुंडले, (1977), शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र म.विद्यार्थी प्र ति मंडळ श्री. विद्या प्रकाशन पुणे.*
10) *लोटे रा. ज., चौहान ए. डी. (2014) भारतीय सामा जिक संरचना आणि सामाजिक समस्या, पिंपळापुरे एण्ड कं. पब्लिकेशन्स नागपूर.*
11) *भंगाळे शैलेजा डोंगर., सोनवणे रंजना राजेश, (2016), लिंगभाव : शाळा आणि समाज, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव.*

# बार्शी तालुक्यातील ग्रामीण भागातील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना येणाऱ्या आरोग्यविषयक समस्या व विविध उपक्रमांच्या परिणामकारकतेचा अभ्यास

***प्राचार्य डॉ. शशिकांत लक्ष्मण तांबे***

***जय** जगदंबा कॉलेज ऑफ एज्युकेशन, वैराग, बार्शी जि. सोलापूर*

## सारांश (Abstract)

*भारत 21 व्या शतकाकडे वाटचाल करीत आहेत. भारतास स्वातंत्र्य मिळून 70 वर्ष पूर्ण होत असून देखील आपणास स्वच्छ भारत, सुंदर भारत, स्वच्छता अभियान राबवावे लागत आहे. यावरुन आपण किती आरोग्य व स्वच्छतेच्या बाबतीत मागास आहोत याची कल्पना येते. ग्रामीण भागातील माध्यमिक स्तरावरील मुलांना जर स्वच्छता व आरोग्य याचे महत्त्व पटवून दिले. स्वच्छतेबाबत संस्कार, आरोग्य विषयक सवयी याबाबत शाळा, शिक्षक, समाज यांनी घडवून आणणे गरजेचे आहे. शाळेमध्ये विविध उपक्रम राबवून माध्यमिक स्तरावर आरोग्य विषयक समस्या व उपायोजना केल्या जातात. या उपाययोजना व उपक्रम कशा प्रकारे केले जातात. यातून आरोग्य विषयक समस्या चे निराकरण होते का? आरोग्य विषयक समस्या कोणकोणत्या आहेत, आणखी कोणकोणते उपक्रम राबविता येतील. मानवी जीवन अधिक समृद्धतेने जगण्यासाठी मानवाला चांगल्या आरोग्याची गरज असते तरच मानवाचे अस्तित्व दीर्घकाळ टिकु शकते. या संशोधनामध्ये विद्यार्थ्यांचे आरोग्य चांगले असावे, आरोग्य म्हणजे काय? आरोग्य बिघडण्याची कारणे कोणती? विद्यार्थ्यांना ही आरोग्याची माहिती मिळावी त्यांच्यामध्ये आरोग्य विषयक चांगल्या सवयी रुजाव्यात व त्यांचे आरोग्य सुधारावे यासाठी ही समस्या निश्चित केली आहे. तसेच या संशोधनाचे विद्यार्थी, पालक, शिक्षक व समाज यांच्या दृष्टिने कशाप्रकारे महत्व आहे हे देखील लक्षात येते. त्याचप्रमाणे ही समस्या निवडण्याचे महत्वाचे कारण म्हणजे विद्यार्थी आपली वैयक्तिक स्वच्छता राखत नाहीत विविध उपक्रमाद्वारे आपण त्यांना आरोग्याचे महत्व पटवून देऊ शकतो व त्यांचे आरोग्य निरोगी व सदृढ बनवू शकतो. विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक कोणकोणत्या समस्या आहेत. शाळेमध्ये कोणकोणते उपक्रम राबविले जातात, या उपक्रमाची परिणामकारकता तपासणे तसेच स्वच्छता व आरोग्य याचे महत्त्व पटवून देऊन विद्यार्थ्यांच्या अंगी स्वच्छता व आरोग्य याचे संस्काराची रुजवणूक करण्यासाठी कोणत्या अडचणी येतात, उपाययोजना कोणकोणती केली जाते याची माहिती सदर संशोधनातून घेण्यात आली आहे.*

***मुख्य शब्द :-** ग्रामीण् भागातील, आरोग्य विषयक समस्या, विविध उपक्रम*

## प्रस्तावना

आरोग्य हीच धनसंपदा आहे. शरीर उत्तम व चांगले असेल तरच विद्यार्थी आनंदाने शाळेमध्ये अध्ययन-अध्यापनाच्या क्रियेमध्ये चांगल्या प्रकारे सहभागी होऊ शकतो. निरोगी मनामध्येच चांगल्या विचारांची रुजवणूक होते. ग्रामीण भागामध्ये आजही आरोग्य विषयक समस्या असल्याचे दिसून येते. ग्रामीण भागातील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना आरोग्याच्या समस्या दिसून येतात. महाराष्ट्र शासनाने संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान सर्व ग्रामीण भागामध्ये राबविले परंतू ग्रामीण भागामध्ये याचा वापर पालकांनी अदयापही केलेला दिसून येत नाही. गावोगावी स्वच्छता अभियान, आरोग्य केंद्र आहेत परंतू त्याचा उपयोग केला जात नाही. घरातील वातावरण, पालक ते ग्रामीण भागातील समाज यांना ज्या आरोग्य विषयक सवयी असतात त्याचे अनुकरण विद्यार्थी करत असतात. त्याचा परिणाम विद्यार्थ्यांवर होतो. ग्रामीण भागात आजही अंधश्रध्दा असलेली दिसून येते. अंधश्रध्देतून नको त्या गोष्टी घडलेल्या दिून येतात. यासाठी विद्यार्थी, पालक, समाज यांच्यामध्ये आरोग्य विषयक माहिती देणे. शाळेमध्ये आरोग्यविषयक उपक्रम राबविणे महत्त्वाचे आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे

1) ग्रामीण भागातील माध्यमिक स्तरावरील आरोग्यविषयक सोयीसुविधांचा शोध घेणे.

2) आरोग्यविषयक शासकीय योजनांचा अभ्यास करणे.
3) विद्यार्थ्यांसाठी आरोग्य विषयक उपक्रम राबविणे.
4) माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी राबविलेल्या आरोग्यविषयक उपक्रमांची परिणामकारकता अभ्यासणे.

**गृहितके**

1) माध्यमिक स्तरावरील शाळेत आरोग्यविषयी राबवत असलेल्या उपक्रमामुळे आरोग्य उत्तम होत आहे.
2) पूर्वीच्या काळापेक्षा आताच्या काळात आरोग्यविषयीचे उपक्रम जास्त प्रमाणात राबवले जात असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यास फायदा होतो आहे.
3) आरोग्य विषयक उपक्रम राबविल्यामुळे विद्यार्थी, पालक, समाज यांच्यामध्ये आरोग्यविषयक माहिती मिळाल्यामुळे सर्वांगीण विकासास फायदा होईल.

**संशोधन पध्दती**

प्रस्तूत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दती मधील शालेय सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांच्या आरोग्य विषयक उपक्रमाची परिणामकारकता तपासण्यासाठी प्रायोगिक पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

**न्यादर्श निवड**

**प्रस्तुत** संशोधनात बार्शी तालुक्यातील ग्रामीण भागातील माध्यमिक स्तरावर अध्यापनाचे कार्य करणाऱ्या 10 शिक्षिकांची सुगम यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने नमुना म्हणून निवड करण्यात आली.

**संशोधन साधने**

प्रस्तूत संशोधनासाठी संशोधक निर्मित प्रश्नावलीचा वापर करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी उपक्रम राबविले जातात त्यातील उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर कोणता परिणाम होतो हे पाहण्यासाठी निरीक्षणसूची व पडताळासूची याचा वापर केला आहे.

**संशोधन कार्यवाही**

प्रस्तुत संशोधनात बार्शी तालुक्यातील ग्रामीण भागातील माध्यमिक स्तरावर अध्यापनाचे कार्य करणाऱ्या 10 शिक्षकांची निवड करण्यात आली. विद्यार्थ्यांना कोणकोणत्या आरोग्य विषयक समस्या येतात, शाळेत आरोग्यविषयक कोणकोणते उपक्रम राबविले जातात या विषयी माहिती शिक्षकांकडून प्रश्नावलीच्या माध्यमातून घेतली आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयक सवयी यासाठी निरीक्षण सूची व पडताळासूची यांच्या माध्यमातून आरोग्य विषयक उपक्रमाची परिणामकारकता तपासण्यात आली.

**माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**

प्रश्नावलीच्या आधारे संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थ निर्वचन करण्यासाठी शेकडेवारी व आलेख तसेच निरीक्षण सूची व पडताळासूची उपयोग करण्यात आला आहे.

**संशोधनाचे प्रमुख निष्कर्ष**

1. पालक पाल्य आजारी असल्यास त्याच्याकडे लक्ष देतात असे सर्वच पालकांनी सांगितले आहे. परंतु काही वेळेस आर्थिक अडचणीमुळे थोडेसे दुर्लक्ष होते. गावातील सरकारी दवाखान्यात उपचार केले जातात.
2. सरकारी दखाखान्यात उपचाराच्या सुविधा कमी आहेत असे पालकांचे मत आहे.
3. सर्वात जास्त 63% पालकांच्या मते घराजवळील परिसर स्वच्छ असतो तर 38% पालक परिसर स्वच्छ नाही असे सांगतात.
4. सकस व पौष्टिक आहार म्हणून पालेभाज्या व फळे पाल्यास देण्याचा प्रयत्न केल्यास पाल्य काही भाज्या आवडत नाहीत म्हणून खात नाही. पाल्यांना कुरकुरे, वेफर्स, चॉकलेट अशा वस्तु जास्त आवडतात. फळे आवडीने खात नाहीत.
5. माध्यमिक स्तरावरील 90% शाळेस क्रीडांगण आहे.

6. शाळेत विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी विविध आजारावरील लसीकरण मोहिम राबविली जाते
7. 21 जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन साजना केला जातो.
8. 100% शाळेत 15 ऑक्टोबरहा दिवस हात धुवा दिवस म्हणून पाळता जातो.
9. विद्यार्थ्यांना स्वच्छता व आरोग्य या विषयी सकाळी लवकर उठावे, स्वच्छ दात घासावेत, साबण लावून अंघोळ करावी, शौचालयाचा नियमित वापर करावे, शौचालयावरुन आल्यावर हात साबणाने स्वच्छ धुवावेत, दात दोन वेळेस घासावेत, नखे केस नियमित कापावेत या स्वच्छता संदेश शाळेत लावले
10. विद्यार्थ्यांना आरोग्य चांगले रहावे म्हणून विद्यार्थ्यांच्या अंगी चांगल्या सवयी रुजविण्यासाठी दररोज स्वच्छ कपडे घालण्यास शाळेतून सांगितले जाते
11. केस स्वच्छ व निटनिटके ठेवण्यास सांगणे सर्वांत जास्त 75% होय असा प्रतिसाद मिळाला आहे
12. मुख व दात स्वच्छता यास 75% होय असा प्रतिसाद मिळाला आहे
13. हात रुमाल वापरास सांगणे यास होय 80% प्रतिसाद आहे
14. 100%विद्यार्थी कुवतीनुसार स्वच्छ राहू लागले.
15. सर्वांची आर्थिक पातळी सारखी नसते. तरी काही विद्यार्थी जास्त प्रयत्न करुन समायोजन करुन स्वच्छ राहू लागले.
16. अंतिम टप्प्यात विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व लक्षात आल्याने आपली इतर कारणे, समस्या सोडून ती स्वच्छतेकडे जास्त लक्ष देऊ लागले.
17. संशोधकाने संशोधन करत असताना स्वत:करुन आर्थिक मदत केली. चर्चासत्रे, मातापालक सभेमध्ये व शालेय व्यवस्थापन समितीमार्फत या समस्या सोडविल्या.
18. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना खाजगी शिकवणी व नंतर शाळेचा अभ्यास व इतर घरगुती कामे यामुळे पाल्यांस खेळण्यासाठी वेळ मिळत नाही अशी माहिती 75% सर्वांत जास्त पालकांनी दिली आहे.
19. पाल्यास दररोज दात घासावयास सांगितले जाते परंतु पाल्य टाळाटाळ करतात. तसेच दात घासले म्हणून खोटे बोलण्याचा प्रयत्न करतात, पाल्या दररोज अंघोळ करतात शौचास जाऊन आल्यास हात धुतात परंतु अतिशय गडबडीने हात धुतात.
20. शिक्षकांनी मार्गदर्शन करावे अशी पालकांनी 63% सर्वात जास्त पालकांनी इच्छा व्यक्त केली आहे.
21. सर्वच पालक आपल्या पाल्यांचे कपडे करुन देतात.
22. सर्व प्रकारचे लसीकरण पाल्यास केले नाही. लसीकरणाची भीती वाटते, पाल्यास काही झाले नाही त्यामुळे का? लसीकरण करावे असा गैरसमज पालकांमध्ये दिसून येतो.
23. पालकांना लसीकरण व त्याचे फायदे याविषयी जनजागृती करणे आवश्यक आहे.

**शिफारशी**

**पालकांसाठी शिफारशी**

1) पालकांनी आपल्या घरासमोरील परिसर स्वच्छ ठेवावा.
2) पालकांनी पाल्याचा गणवेश व दैनंदिन कपडे स्वच्छ ठेवावेत.
3) पालकांनी पाल्याच्या आरोग्य विषयक सवयी व स्वच्छतेकडे लक्ष दयावे.
4) पाल्यास सर्व प्रकारचे लसीकरण करावे.
5) पालकांनी पाल्यास दररोज आघोंळ करणे,नखे कापणे,केसांची स्वच्छता राखणे या बाबींकडे पालकांनी लक्ष दयावे.

**शिक्षकांसाठी शिफारशी**

1) स्वच्छतेचे महत्त्व प्रात्यक्षिकातून दयावे.
2) मुलांच्या दैनंदिन कृतीतून स्वच्छता स्पष्ट करावी.
3) स्वच्छतेच्या सवयी शक्तीमान बनवी. उपक्रमाचा पाठपुरावा करावा.
4) पालकांच्या भेटी घ्याव्यात.

**मुख्याध्यापकांसाठी शिफारशी**

1) मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासणी शिबीरे आयोजित करावीत.
2) शाळेत लसीकरण मोहीम राबविण्यात यावी.
3) शाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडे सतत लक्ष दयावे.
4) शालेय पोषण आहाराकडे स्वत: लक्ष देऊन वेळेत देण्यात यावा.
5) विद्यार्थ्यांस आरोग्यविषयक अडचणी असल्यास पालकांना तात्काळ कळवावे.

**संदर्भसूची**

*1) करंदीकर, मंगरुळकर,(2006) आरोग्य शिक्षण, फडके प्रकाशन पहिली आवृत्ती*
*2) कुंभाजेकर ग.वि.,(1989), संशोधन पध्दती व संख्याशास्त्र, कोल्हापूर, फडके प्रकाशन.*
*3) गाडगीळ स्वाती, (2007), आरोग्य शिक्षण , सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे पहिली आवृत्ती*
*4) शारीरिक आणि मानसिक आरोग्य, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठ, संपादक - आनंद यादव, प्रथम प्रकाशन 2000 नाशिक*

# कचरा बीनने वालों के लिए आशा की नई किरण

*प्रा. डॉ. नीता तिवारी*

*अर्थशास्त्र विभाग प्रमुख, श्रीधाबेकर कला महाविद्यालय, खडकी,अकोला,महाराष्ट्र*

**सारांश**

*आपका कचरा, उन लोगोंका कारोबार एक पर्यावरण कार्यकर्ता के प्रयासों से बन सकता है। कई एनजीओ भारत में कचरा बीनने वालों, कबाड़ी वालों और रद्दी के काम से जुड़े लोगों की छवि बदलने में लगी हैं। उनका यह संदेश सिर्फ घरेलू लोगों के लिए ही नहीं है जो प्रतिदिन इन कचरा बीनने वालों के काम से सीधे या परोक्ष रूप से फायदा पाते हैं, बल्कि यह हाशिए पर पहुंचे ऐसे समुदायों के लिए ही है। ये लोग कोई निचली जाति या अल्पसंख्यक लोग नहीं हैं, बल्कि पर्यावरण के प्रतिनिधि है। अपने प्रयत्नों से एक शहर को बदल रहे हैं और इनको इसका श्रेय पाने का हक है। कचरा बीनने वाले और इससे जुड़े अनौपचारिक कारोबारी क्षेत्र के लोग एक तरह से "हरित कामकाज" कर रहे हैं और उन्हें ऐसे प्रयासों में जुटे लोगों की अग्रणी पंक्ति में रखा जाना चाहिए। ये लोग कचरे की छंटाई करते हैं, जितना कुछ रीसाइक्लिंग का काम संभव हो पाता है,वह करते हैं। और तो और आपके घर से सीधे कचरा ले जाकर परिवहन के दौरान ईंधन से पर्यावरण को होने वाले नुकसान को बचाते हैं।*

**प्रस्तावना**

हमारे देश में ऐसे कई बच्चे हैं जिनका भविष्य कचरे के ढेर में ही खोकर रह गया है। एक बड़ी फौज ऐसे बच्चों की इस देश में है, जो कि अपनी पारिवारिक दयनीय स्थिति के चलते कचरे से पन्नियां, लोहा, प्लास्टिक बीनकर दो जून की रोटी का जुगाड़ करने में लगे हुए है और इसी कचरे के बीच इनका बचपन कहीं खो जाता है। दो जून की रोटी की जुगाड़ के चलते ये पढ़ाई से वंचित होकर समाज की मुख्य धारा से ही बाहर रह जाते हैं।

**पुलिसवाले के सार्थक प्रयत्न**

राजस्थान के चुरू पुलिस में कार्यरत सिपाही धर्मवीर के पास पुलिस लाइन में 2 बच्चे भीख मांगने पहुंचे। जो स्वयं को बिना मांबाप का बता रहे थे। हकीकत जा-नने के लिए वे उनकी झुग्गी में गए। गरीब बच्चों के लिए कुछ करने की सोचा। जिसके बाद उन्होंने भीख मांगने वाले इन बच्चों को पढ़ाना शुरू कर दिया। 1 जनवरी 2016 को महिला थाने मे आसमान के निचे अस्थाई स्कूल शुरू कर दी गई तथा झुग्गीझौंपडियों में रहने वाले घुमंतू और होटल ढाबों पर - काम करने वाले बच्चों को पढ़ाना शुरू कर दिया। पुलिस की ड्यूटी के अलावा इस काम में जुटे सिपाही धर्मवीर बच्चों को नियमित योगाभ्यास भी करवाते हैं। इन प्रयासों की बदौलत सप्ताह में एकदो बार नहाने वाले बच्चे आज नियमित - लिखकर समाज की मुख्य धारा में शामिल हो रहे हैं। सुबह-रूप से न केवल नहाते हैं। बल्कि पढ़10 से दोपहर तीन बजे तक संचालित इस पाठशाला में आखर ज्ञान करवाने की जिम्मेदारी कांस्टेबल धर्मवीर तीन महिला कांस्टेबल और तीन अन्य समाजिक कार्यकर्ता निभा रहे हैं। बिना किसी संसाधनों के शुरू की गई इस पाठशाला में बच्चों के रुझान को देखते दानदाताओं और स्वयंसेवी संस्थाओं द्वारा धीरे धीरे सारी सुविधाएं उपलब्ध करवाई जाने लगी है। अब वह बच्चों को साबुन, तेल, मिर्चमसाला-, चप्पल, कपड़े आदि सामान दे रहे हैं। बच्चों को स्कूल लाने ले जाने के लिए एक वैन की व्यवस्था की गई है जो उन्हें झुग्गियों से लाने ओर लौटाने के लिए काम मे ली जा रही है। इसके अलावा, पोशाक, भोजन, जूते और अन्य सभी अध्ययन सामग्री भी मुफ्त प्रदान की जाती हैं। धरमवीर कहते हैं कि शुरुआत में बच्चों और परिजनो को पढने लिखने के लिए सहमत करना बडा मुश्किल था। लेकिन जब उन्हें कारण पता चला कि उन्हें भीख मांगने के लिए प्रेरित किया गया था, तो यह स्पष्ट था कि अगर बुनियादी जरूरतें पूरी हो जाती हैं तो वे अध्ययन के लिए आते रहेंगे।

आज पाठशाला 4 बडे कमरों में संचालित हो रही है जिसमें सभी व्यवस्था की गई है बच्चों के बैठने के लिए कुर्सियां, मीठे पानी की व्यवस्था, मनोरंजन के लिए एलईडी, खेलकूद के साधन, सुबह और दोपहर मे खाने की व्यवस्था, पुस्तके, ड्रेस, बैग जुते, लाने छोडने की वैन उपलब्ध है। बच्चों की संख्या 470 है। जिसमें लगभग 250 बच्चे 5वीं कक्षा से आगे की पढाई के लिए अन्य स्कूल मे चले गए हैं। धर्मवीर गरीब, कूड़ा कचरा बीनने वाले और भीख मांगने वाले बच्चों का भविष्य संवार रहे हैं।

**गंदगी के ढेर में आशा की नई किरण**

लेकिन नीमच में जिला प्रशासन ने ऐसे बच्चों के लिए कुछ अलग ही करने की ठानी है। पन्नी व कचरा बीनने वाले ऐसे बच्चे अब यहां आम बच्चों के साथ रहकर पढ़ाई करते हुए अपना सुनहरा भविष्य तराशने में जुटे दिखाई पड़ रहे हैं। सरकारी सर्वे के मुताबिक शहर में कचरा बीनने वाले बच्चों की तादाद करीब 150 है। कचरा बीनने वाले बच्चे अपने परिवार के लिए आर्थिक रूप से मददगार बन जाते हैं। धीरेधीरे यही उनका रोजगार भी बन जाता है। लेकिन इस - बार सर्वे में30 ऐसे बच्चों को चिन्हित किया गया है, जो कचरा तो बीनते ही थे साथ ही पढ़ाई में भी रुचि रखते थे। इसके लिए जिला कलेक्टर अजय गंगवार के मार्गदर्शन में जिला पंचायत सीईओ भव्या मित्तल ने इन बच्चों के लिए अनूठी योजना तैयार करते हुए जिला मुख्यालय पर ही एक 100 सीटर हॉस्टल बनाया है। इसमें आम गरीब परिवार के बच्चों के साथ ही कचरा बीनने वाले बच्चों को भी जोड़ा गया और करीब 25 बच्चों का दाखिला हॉस्टल में करवाया गया, जहां पर उन्हें सुबह उठकर ब्रश करने से लगाकर रात को सोने के लिए गद्देदार बिस्तर तक मिलता है। इसी परिसर में चल रहे प्राथमिक विद्यालय में बच्चों का एडमिशन भी करवाया गया है, जहां वे पढ़ते भी हैं। अब बच्चों को स्कूल में पढ़ना काफी अच्छा लग रहा है। यहां तक कि बच्चे अब यहां अपना भविष्य भी तलाशते हुए कोई पुलिस में जाने की चाह रखता है, तो कोई शिक्षक बनना चाहता है। यही नहीं, प्रशासनिक अधिकारी जिले में और भी ऐसे बच्चे, जो कि पढ़ाई से दूर होकर पन्नी कचरा बीनने के साथ ही कोई और कामकाज कर रहे हैं, उन्हें या उनके मातापिता - को प्रोत्साहित करते हुए हॉस्टल में लाने के प्रयास में लगे हैं।

कलेक्टर अजय गंगवार ने कहा कि हमने ऐसे बच्चे चिन्हित किए हैं, जो कि पढ़ाई से दूर होकर कूड़ाकरकट बीनने के - हॉस्टल में रखा जा रहा है साथ ही अन्य कोई लेबर वर्क कर रहे थे। इन्हें शासन की योजना के तहत हमारे एक, जहां उन्हें हर सुविधा के साथ ही पढ़ाया भी जा रहा है। यही नहीं, मेरे द्वारा और भी ऐसे बच्चों को चिन्हित कर उनके मां-बाप को समझाइश देते हुए हॉस्टल में लाने के लिए निर्देशित किया हुआ है और इसमें हमारे अधिकारी और उनकी टीम लगी हुई है।

**'ज्ञानम' जला रही शिक्षा की ज्योत**

पढ़ाई तो क्या, उन्हें तो यह भी पता नहीं कि बचपन होता क्या है, पढ़ाई होती क्या है? इन बच्चों की दिनचर्या किसी अंधेरी जिंदगी से कम नहीं। ऐसे ही बच्चों में "ज्ञानम' संस्था(राजस्थान)अजमेर , शिक्षा की अलख जला रही है । शहर के पहले एक क्षेत्र से शुरू हुआ संस्था का सफर अब चार क्षेत्रों में पहुंच चुका है, कुल 175 बच्चों को प्राइमरी एजुकेशन तक की शिक्षा दी जा रही है। ज्ञानम संस्था के सकारात्मक प्रयास से अब इन बच्चों की दिनचर्या भी बदल गई है।

**कई दिनों तक नहाते नहीं थे, अब बदल गई दिनचर्या**

झुग्गीसफाई के प्रत-झोपड़ियों में रहने वाले बच्चों व उनके परिवारों को पहले साफ-ि जागरूक किया गया। बच्चे शुरुआत में क्लास में नहाकर नहीं आते थे, वे कचरा बीनकर वापस लौटते ही सीधे क्लास में आते थे। बच्चों को समझाया गया कि रोजाना नहाकर कक्षा में पहुंचें। फिर जो बच्चे नहाकर आते, उन्हें छोटेछोटे उपहार देकर उत्साहित - धीरे सभ-किया जाता। धीरेी बच्चों ने नहाना शुरू कर दिया। अब इन बच्चों की दिनचर्या में रोजाना नहाना और पढ़ना शामिल है।

**शहर में 4 हजार कचरा बीनने वालों में 50 फीसदी बच्चे**

रोशन अभी (बदला हुआ नाम)7 साल का ही है, घर पर मां और दो छोटी बहनें है। घर का चूल्हा तब जलता है, जब रोशन दिनभर कचरा बीनकर उसे बेचकर 40-50 रुपए कमाकर घर लाता है। ऐसा सिर्फ रोशन के साथ ही नहीं, बल्कि जिले में सैकड़ों उदाहरण हैं। कचरा बीनने वालों में बच्चों की बड़ी संख्या है, अकेले शहर में ही करीब चार हजार लोग कचरा बीनते हैं इनमें पचास फीसदी से ज्यादा 7 से 15 वर्ष आयुवर्ग के बच्चे हैं।

**शहर में 4 केंद्रों पर रोजाना 2-2 घंटे पढ़ाई कर रहे हैं 175 बच्चे**

ज्ञानम एजुकेशन एंड सोशल वेल्फेयर सोसायटी की अध्यक्ष अलका जैन ने बताया कि ऐसे बच्चे जिनके परिवार में किसी ने आज तक स्कूल में अध्ययन नहीं किया, ऐसे बच्चों को ब्रिज कोर्स कराया जा रहा है। शहर में पंचशील में देवनगर, रातीडांग, फॉयसागर और कोटड़ा में अलग अलग केंद्रों पर कुल-175 बच्चों को शिक्षा दी जा रही है। इन

बच्चों में ज्यादातर वे बच्चे शामिल हैं जो कचरा बीनते हैं। रोजाना दोदो घंटे इन केंद्रों पर ब-च्चों को पढ़ाया जाता है। कई बच्चों की कैचिंग पॉवर अच्छी है, एक बार समझाने पर ही वे याद कर लेते हैं। इन बच्चों को अब अल्फाबेट, नंबर और हिंदी के अक्षर लिखने का ज्ञान हो गया है। रोजाना अभ्यास कर इसमें पारंगत हो रहे हैं।

**निष्कर्ष**

बचपन यानी जीवन का वह क्षण, जब बच्चों को संस्कार और जीवन में कुछ कर दिखाने की शिक्षा दी जाती है, ताकि आगे चलकर वह परिवार के साथ समाज का भी नाम रोशन कर सकें। लेकिन, जब इसी छोटी सी उम्र में बच्चे पर परिवार की जवाबदेही आ जाए तो उन्हें अपने बचपन का पता ही नहीं चलता। आपको जानकर हैरत होगी कि शहर में सैकड़ों बच्चे ऐसे हैं, जो कचरा बीनकर अपने परिवार का गुजारा करने पर मजबूर हैं। सरकार ने कोशिश करना चाहिए कि इस वर्ग से जुड़े लोग बेहतर कमाई करें, उन्हें बुनियादी सुविधाएं मिलें और उनके काम को मान्यता और सम्मान मिले। शहर में रोजाना कई टन कूड़ाकचरा घ-रों, दुकानों और प्रतिष्ठानों से बाहर निकलता है। इस कचरे को ठिकाने लगाने के लिए नगरपरिषद के सफाईकर्मी लगे हुए हैं और लाखों रुपए इस कार्य पर खर्च हो रहे हैं लेकिन शहर में एक ऐसा भी वर्ग है, जो रोजाना दुकानों और घरों से निकलने वाले कचरे को बीनकर उसे ठिकाने लगाता है। इसकी एवज में नगरपरिषद की ओर से उनको कोई पैसा नहीं मिलता है लेकिन सफाई व्यवस्था में उनका योगदान बहुत बड़ा है।

**संदर्भ—**

*1.m.hindi.indiawaterportal.org कचरा बीनने वालों के जीवन में उम्मीद Submitted on 6/29/2010 Author:एरिका ली नेल्सन Source:स्पैन मार्च अप्रैल/2010*

*2.www.aajtak.in गरीब, कचरा बीनने वाले बच्चों के लिए पुलिसवाले ने खोला स्कूल :1 नवंबर 2019*

*3.m.hindi.webdunia.com कचरे के ढेर में गुम थी मासूमों की 'जिंदगी', मिली उम्मीद की नई रोशनी :मुस्तफा हुसैन, 30 नवंबर 2019*

*4.www.bhaskar.com पढ़ाई से कोसों दूर कचरा बीनने वाले बच्चों में 'ज्ञानम' जला रही शिक्षा की अलख, 5 वर्ष पहले*

# पर्यावरण: एक दृष्टिक्षेप

***प्रा सुरेखा जोतिबा रेडेकर .***
*इतिहास विभाग, समीर गांधी कला (वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालय माळशिरस*
*तासोलापूर .माळशिरस जि .*

**प्रस्तावना**

*औद्योगिकीकरणामुळे प्रदूषण वाढले भविष्यात त्या .याचे परिणाम सगळ्या जगाला भोगावे लागत आहेत. चे स्वरूप आणखीनच हिंसक,नाशकार होणार आहेत. म्हणूनच पर्यावरणाबाबत जागृती सर्वच स्तरावर होण्याची वेळ आली आहे. ही जागृती लहान मुलांपासून समाजातील सगळ्याच पातळीवर सातत्यपूर्ण व्हायलाचयला हवीतंत्रज्ञान विषयक .ची नितांत गरज आहेशाळे पासून महाविद्यालयीन शिक्षणात पर्यावरणाविषयी माहिती देण्या. संस्था, अशासकीय संस्था, औद्योगिक संस्था या कामासाठी निश्चितपणे साहयभूत होऊ शकतील. लोकसंख्येत वाढ, शहरीकरण, तंत्रज्ञानाची वाढ,कारखान्यांची वाढ यामुळेच प्रदूषण वाढले. या कारणाबरोबरच मूळ कारण म्हणजे माणसाचे निसर्गाशी वेगाने तुटत चाललेले नाते. माणसाच्या आत्मकेंद्रित वृत्तीमुळे त्या ला कशाचीच किंमत वाटत नाहीस्वतःच्याच भौतिक सुखासाठी सगळ्या सृष्टीचा नाश करताना., त्या सृष्टीची आपले नाते आहे हेच तो विसरला आहे. पृथ्वी ही एकमेव आहेआपलाही नाश अटळ आहे तिच्यावरिल जीव सृष्टीचा नाश म्हणजेच.,कारण सगळे जीवनच परस्परावलंबी आहे याची जाणीव, हे भानच तो विसरला आहे. पूर्वापार असलेले मानव व निसर्ग यांचे प्रेमाचे नाते तुटलेले आहे. माणूस आपल्या भौतिक सुखासाठीच धावत असूनत्याला आपल्या खऱ्या आंतरिक समाधानाची,मन.सारे प्रश्न उपस्थित होण्याचे मुख्य कारण आहे शांतीची जाणीव नाही हेच: हे नाते पुन्हा जुळवणे हेच महत्वाचे कार्य मानून त्या प्रमाणे वागले पाहिजे .आणि यालाच पर्यावरण नीती म्हणता येईल. नीतीतआचार,विचार या दोन्हीचा मुलभूत दृष्टिकोन सामावलेला असतो.*

**उद्दिष्टे:-**

- पर्यावरण व सबंधित समस्यांविषयी व्यक्ती व समाजामध्ये जागृती करणे.
- पर्यावरण संवर्धनासाठी जबाबदारीची भुमिका पार पाडणे.
- पर्यावरण रक्षण व सुधारणा साठी व्यक्ति व समाजाला प्रेरित करणे.

नीती मुल्यांचे आचरण केल्यास पर्यावरणाचा नाश थांबवता येईल .ल प्रमाणे आहेतकाही नीती मुल्य पुढी .

1. माझे घर ,प्रांत, माझा देश एव्हढेच मर्यादीत न ठेवता किंवा स्वतकडे न पाहता वैश्विक पातळीवरून विचार : .करणे आवश्यक आहे
2. प्रत्येक विचार हा मानवकेंद्रीत न ठेवता निसर्गकेंद्री असायला हवा.
3. निसर्गाला धोका माणसापासून अधिक आहे याची जाणीव हवी.
4. माणूस जसा निसर्गाचा एक घटक आहे त्याचा जसा हक्क आहे तसाच निसर्गातील प्रत्येक सजीवाला जगण्याचा हक्क आहे.याचे भान असले पाहिजे.
5. निसर्गाच्या सानिध्यात राहून त्याचे नियम मर्यादा पाळल्या पाहिजेत.
6. निसर्गातील प्रत्येक सजीव आणि निर्जीव घटकाची माणसाला गरज आहे याचे भान ठेवून निसर्गाचा उपभोग घेतला पाहिजे.
7. पर्यावरण नीती म्हणजे स्वत.च घालून घेतलेले बंधन होय:वर स्वत:
8. पर्यावरणाच्या समस्या सोडविण्यासाठी टिकाऊ विकासास सद्य परिस्थितीत आवश्यक उपाय योजना करणे गरजेचे आहे.
9. माणसाने निसर्गाच्या सानिध्यात राहून निसर्गचक्राशी मिळते जुळते घेतले पाहिजे.
10. निसर्गात कोणतीही ढवळाढवळ न करता आपली प्रगती साधायला हवीनिसर्ग म्हणजे माणसाची गरज . .भागवणारी वस्तू आहे असा दृष्टिकोन मुळातच नष्ट होण्याची आवश्यकता आहे
11. सारी पृथ्वी एक कुटुंब आहे ही जाणीव मनात रुजली पाहीजेतरच पर्यावरण संरक्षणविषयक खऱ्या अर्थाने . .प्रश्न सुटण्यास मदत होईल

पर्यावरण तज्ञ डॉ गाडगीळ यांनी पर्यावरणविषयक खोल चिंतन करून पर्यावरण संवर्धन कसे राखावे . ,शासनाचे धोरण काय असावे,स्वयंसेवी संस्था आणि व्यक्ती यांनी काय करावे याबद्दलचे विचार प्रत्यक्ष अनुकरणीय आहेत.

ते पुढील प्रमाणे आहेत .

1. औद्योगिक प्रदूषणावर पूर्ण नियंत्रण ठेवण्यासाठी कडक कायदे करून अंमलबजावणी करणे.
2. जलविद्युत निर्मितीसाठी लहान प्रकल्प हाती घेणे.
3. शेतीत विविध पिकांच्या जाती टिकवून ठेवणे
4. मुला मुलीवर निसर्ग संस्कार करणे .आरोग्य शिक्षणात प्राधान्य देणे .संशोधनास प्रेरीत करणे.
5. स्वयंपाकासाठी गोबर गॅस वापरणे .
6. खाण बंद केल्यावर वनीकरण
7. करण्यात येण्यास खाण मालकास भाग पाडणे.
8. डोंगरउतारावरील शेती बंद करून त्याऐवजी खूप वर्ष जगणारी झाडे व चाऱ्याची पिके लावणे.
9. चराऊरानांचे, वनांचे गावकऱ्यांच्या सहभागाने संरक्षण करुन जळण व चाऱ्याची व्यवस्था करणे.
10. विरळ भागात वनीकरण करणे.
11. बेकायदेशीर तोड, उत्पादनांच्या चोऱ्या ,शिकार थांबवण्यासाठी गावांना अनुदान देऊन संरक्षणाच्या कामासाठी प्रोत्साहन देणे.
12. वनांवरिल कच्च्या मालावर सबसिडी न देता उद्योगांकडून त्या मालाची पूर्ण किंमत वसूल करणे.
13. गावकऱ्यांना कच्च्या मालाचे उत्पादन करण्यासाठी सोयी सवलती देऊन प्रोत्साहित करणे.
14. निरनिराळया वनउदयोगांना दिलेल्या सवलती बंद करणे.
15. जंगलाचे व्यवस्थापन ठेकेदारांना न देता जंगल कामगार सहकारी संस्थांना देणे.
16. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम विशेषत्वाने राबवून त्यात दीर्घायुषी झाडे आणि चाऱ्याची पिके लावणे.
17. निरनिराळया प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्यांना डोंगर उतारावरील जमीन न देणे.
18. काजू रबर यांची लागवड करताना आधीची झाडे टिकवणे.
19. जनावरांना गोठ्यातच चारा घालने त्यासाठी चारा उत्पादन वाढवणे.
20. बुरुड यासारख्या कारागिरांना कच्चामाल देण्यासाठी प्राधान्य देणे बांबू या सारखी पिके त्यांनी स्वतः लावण्यास प्रोत्साहन देणे.
21. वैविध्यपूर्ण दुर्मिळ वनस्पती पक्षी प्राणी व स्थानिक माणसे त्यांच्या परंपरा जीवनपद्धती टिकवण्यासाठी कार्यक्रम आखणे व त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे.
22. शेती फलोत्पादनात रासायनिक पदार्थांचा वापर कमी करून सेंद्रिय खतांचा वापर करण्यासाठी प्रोत्साहन देणे शेतीत विविध पिकांच्या जाती टिकून त्यांचे संवर्धन करणे.

पर्यावरण क्षेत्रातील भारत सरकार पर्यावरण विभाग ही शिखर संस्था आहे परंतु ही संस्था एकत्र अशा प्रशासकीय विभागाच्या रुपाने काम करीत असते की जी चे स्वरूप फक्त परामर्श घेणाऱ्या संस्थे सारखेच आहे ती एखाद्या दोषी माणसाला किंवा व्यक्तीला दंडही करू शकत नाही की आपली तत्त्वे नीती पॉलिसी कायद्याच्या रुपाने शिक्षाही अमलात आणू शकत नाहीया व .िभागाचे यशापयश फक्त प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कामावर अवलंबून आहेहे मंडळ दोषी व्यक्तीला दोषी ठरू शकते पण त्या कायद्याचे स्वरूप इतके लवचिक आहे ., की दोषी व्यक्तीला शिक्षा होतच नाही आणि कदाचित एखाद्या प्रकरणाला तडी लावायची ठरविले तरी त्याच्या सुनावणीला इतका. विलंब लागतो की त्या प्रकरणातील गांभीर्य कमी होत जाते दोषी व्यक्ती किंवा दोषी कारखाने मालक यावर कोणताही दबाव न राहाता उलट ते आणखी शिरजोर होत जातातराष्ट्रीय पर्यावरण नीती त्याच्यामध्ये भारतीय . आज ना ऊद्या बदल करावे लागणार आहे त्यामध्ये नव्या विषयांचा समावेश म्हणजे, ध्वनि प्रदूषण, वाहन प्रदूषण, कीटकनाशकांचा दुरुपयोग, अपत्ती कारक धोकादायक वस्तू, ऊर्जेचा दुरुपयोग ,घरगुती आणि औद्योगिक सांड पाण्याचा दुरुपयोग ,वन्यजीवांचा बेकायदेशीर व्यापार व क्लोरोफ्ल्युओरोकार्बनचा उपयोग इ.

**सारांश**

ही नीती प्रदीर्घकालीन योजनांना अनुरूप अशी हवी सांस्कृतिक परंपरा सद्यस्थिती आणि भविष्यकालीन शक्यता लक्षात घेऊनच ही नीती ठरवणे आवश्यक आहे व्यवहारिक ही लोकांना राष्ट्रहित कार्यासाठी उद्योग करेल आणि. तरच तिची अंमलबजावणी होऊ शकेल पर्यावरणाचा अर्थ केवळ प्रदूषण नियंत्रण असा नाही त .असायला हवीर पर्यावरण संरक्षण सुधारणा आणि संवर्धन या गोष्टींचा ही त्यात समावेश आहेही नीती लवचिक असायला हवी . देशाचे वैभव टिकविण्यासाठी .ऊ नयेआवश्यकतेनुसार त्या धोरणात बदल करण्यासाठी कोणतीच अडचण ये पर्यावरण धोरण असायला हवे नितीचे पालन करताना देशवासीयांना अभिमान वाटायला हवा.

**संदर्भ ग्रंथ:-**

1. *सुप्रसिद्ध पर्यावरण तज्ञ डॉक्टर माधव गाडगीळ:*
2. *सामान्य ज्ञान व सामाजिक जाणीव अधिष्ठान*
3. *विज्ञान आणि तंत्रज्ञान*

*"Sustainable Innovative Development in Economics, Environment, Agriculture, Health, Society"*
*ISBN 978-81-947698-8-0 Peer Reviewed International Book Chapter, 28th February 2021*

# दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या काळातील इंग्रज वकीलाची राजकारणातील भूमिका

**प्रा. *मते अनिल बापुराव***

*इतिहास विभाग, कला, विज्ञान व वाणिज्य महविद्यालय, राहाता, ता राहाता. जि. अहमदनगर, महाराष्ट्र*

**प्रस्तावना -**

*मराठेशाहीच्या अखेरच्या पर्वामध्ये दुसरे बाजीराव पेशवे यांच्या कालावधीमध्ये इंग्रज वकीलांनी साम्राज्य विसृतार करण्यासाठी मराठयांच्या राजकारणात प्रवेश करुन इंग्रज वकीलांनी आपलया चातुर्याने १९७५ ते १८१८ या कालावधीमध्ये मराठा सरदार, पेशवे, टिपू सुलतान, फ्रेंच, पोर्तुगीज, डच या सर्वाबरोबर इंग्रजांनी राजकीय ध्येय धोरणे अवलंबुन इंग्रज वकीलांनी हिंदुस्थानात साम्राज्य विस्तार करण्यासाठी वेगवेगळया प्रकारे युध्द, वह, दोसृतीचे करार करुन इंग्रजांनी एक एक साम्राज्य संपूष्टात आणुन तृयांनी फार मोठया प्रमाणात इंग्रजांची राजवट भारतात प्रसृथापित केली. इंग्रज वकीलांनी अतिशय हुशारीने मराठा सरदारामध्ये कशा पध्दतीने फुट पाडली व कशा पध्दती तृयांच्या बरोबर मैत्रीचे ही संबंध निर्माण करुन दुसऱ्या बाजीराव पेशव्यापुढे मृहणजे मराठी साम्राजृयापुढे कशा पध्दतीने आव्हाने टाकली होती. तृया आव्हानातुन मराठा सरदारांनी बरेच दिवस इंग्रज राजवटीला आव्हान देवुन मराठा साम्राजृयाचा बचाव केला होता. परंतु इंग्रज वकीलाचे हेतु हे लवकर लक्षात न आलृयामूळे खऱ्या अर्थाने मराठा साम्राज्य इंग्रजांनी गिळंकृत केले. मराठा साम्राजृयातील जे अंतसृत हेवेदावे होते तृयाचा फायदा इंग्रजांनी करुन घेतला. तृयामुळे इंग्रज वकीलांना पेशवे दरबारात फार मानाचे सृथान मिळाले होते. तयाच बरोबर इंग्रज वकीलांनी भारतीय समाजाशी एकरुप होवुन तृयांची संसृकृती आचार विचार समजावून घेतले. तृयामुळे काही मराठा सरदारांनी इंग्रजावरती विश्वास टाकला. राजकीय दृषृटीकाणातून मराठा पेशवा दुसरा बाजीराव हे सुध्दा धरसोड वृतृतीने वागलृयामूळे तृयांच्या सृवभावाचाही फायदा इंग्रज वकीलांनी घेतला. मराठा दरबारामध्ये होणाऱ्या दररोजच्या हालचाली ते आपलृया इंग्रज वरिषृठ अधिकाऱ्यांना कळवत असे. मृहणजेच इंग्रज वकीलांनी दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या काहात महतृवपूर्ण भुमिका बजावली आहे हे निश्चितच आहे.*

**ध्येय व उद्दीषृटे -**

1. दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या काळा इंग्रज वकीलांनी जे राजकीय दृषृटीकानातून जृया घडामोडी केलृया तृया सृपषृट करणे.
2. दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या काळात मराठा साम्राजृयात विविध सरदारां बरोबर जे डावपेच खेळके ते सृपषृट करणे.
3. दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या काळात मराठ्यांचे राजृय कसे हसृतगत केले ते सृपषृट करणे.
4. दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या दरबारात राहून इंग्रज राजवटीला वकीलांनी कशा पध्दतीने सहकार्य केले ते सृपषृट करणे.

**गहितके -**

१) दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या काळात इंग्रज वकीलांनी राजकीय दृषृटीकोणातून कार्य केले.

२) दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या काळात मराठा साम्राजृयात विविध सरदारां बरोबर डावपेच खेळले.

३) दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या काळात मराठ्यांचे राजृय हसृतगत केले.

४) दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या दरबारात राहून इंग्रज वकीलांनी इंग्रज राजवटीला सहकार्य केले.

**विश्लेषन -**

**अ) सर चार्लस मॅलेट -**

मराठ्यांच्या साम्राजृयात मृहणजे अखेरच्या पर्वात दुसऱ्या बाजीराव पेशव्यांकडे पेशवे पद आलृयानंतर मराठ्यांमध्ये अनेक प्रकारची कट कारसृथाने सुरु झाली होती. या कट कारसृथानात पेशवे पद कोणाकडे द्यावे हा एक महतृवपुर्ण

प्रश्न मराठी साम्राज्यापुढे राहीला होता. या प्रश्नातूनच मराठा सरदारामध्ये दुहीचे राजकारण सुरु झाले. या अस्थिर परिस्थितीचा फायदा खऱ्या अर्थाने इंग्रज राजवटीने घेतल्याचे दिसुन येते. मराठा साम्राज्यामध्ये सन १९७५ पासुन म्हणजे दुसऱ्या बाजीराव पेशव्यांना पेशवे पद मिळाल्यानंतर इंग्रज साम्राज्याचा मराठा साम्राज्यात हस्तक्षेप सुरु झाला. तो सर चार्लस मॅलेट या इंग्रज वकीलाने मराठा साम्राज्यात नाना फडणीसांमुळे जो प्रवेश केला होता. तो म्हणजे महाड कारस्थानापासुन इंग्रजाबरोबर मैत्रीचे संबंध ठेवण्यासाठी नाना फडणीस यांनी सर चार्लस मॅलेट यांना हाताशी धरुन इंग्रजांकडील माहिती नाना फडणीसांना समजत होती. तसेच सर चार्लस मॅलेट मराठ्यांच्या राजकारणातील सर्व हालचाली मुंबईकर इंग्रजांना कळवत होते. नाना फडणीस महाड येथे असतांना पूण्यातील सर्व माहीती त्यांच्या सहकार्याकडुन नाना फडणीसांना कळत होती. ज्या वेळेस नाना फडणीस महाड येथे होते त्यावेळेस दौलतराव शिंदे यांनी निजामाच्या विरोधात मोहीम काढली होती. त्या वेळेस निजामाचा कारभारी आजारी असल्यामुळे त्यांचा कारभार दिवाण पाहत होता. म्हणून निजामाने इंग्रजांची मदत घेतली होती, परंतु दरम्यानच्या काळात दौलतराव शिंदे यांनी निजामाचा परिडा किल्ला काबीज करण्यासाठी लवकर पाठविले होते परंतु इंग्रज व निजाम यांचे संयुक्त लष्कर निघाले आहे हे कळल्यामूळे दौलतराव शिंदे यांनी आपले लष्कर पाठीमागे बोलवले होते. कारण इंग्रजांचे रेमंडच्या हाताखाली बरीच फौज असल्यामूळे दौलतराव शिंदे यांनी निर्णय बदलला होता, परंतु या सर्व गोष्टींची माहिती नाना फडणीसांना सर चार्लस मॅलेट यांच्या मार्फत कळत होत्या. परंतु झालेल्या घटनेचा राग दौलतराव शिंदे यांनी नाना फडणीसांवर काढला होता. अशा सर्व घटनेचा फायदा इंग्रज घेत होते. कारण दौलतराव शिंदे यांचा रुसवा काढण्यासाठी नाना फडणीसांनी सर चार्लस मॅलेट यांना पाठविले होते. म्हणजे मराठ्यांच्या राजकारणात इंग्रज वकीलांची भुमिका ही महत्वपूर्ण ठरली होती.

ज्या वेळेस निजाम आजारी होता त्या वेळेस निजामाची आर्थिक परिस्थिती पूर्णपणे ढासाळली होती म्हणून सर चार्लस मॅलेट यांनी मराठ्या बरोबर युध्द करु नये असा उत्तम सल्ला दिला होता. परंतु हैद्राबादचा इंग्रज वकील कर्क पॅट्रीक यांनी सर चार्लस मॅलेट यांच्या जवळ निजामाला मदतीचा आग्रह धरला होता. म्हणजे सर चार्लस मॅलेट यांचा मराठ्यांच्या म्हणजे नाना फडणीसांचा बाजुने चांगले मत होते. त्याचे कारण भावी आयुष्या मध्ये सर चार्लस मॅलेट यांना इसऱ्या बाजीराव पेशव्यांना जे कर्ज घेतले होते ते कर्ज नाना फडणीस ज्या वेळेस मराठ्यांचा कारभारी म्हणुन कार्य करतील त्या वेळेस ती रक्कम इंग्रजांना दिली जाईल असे आश्वासन नाना फडणीसांनी सर चार्लस मॅलेट यांना दिले होते. म्हणजे सर चार्लस मॅलेट हे किती धुर्त होते या घडामोडी वरुन दिसुन येते. सर चार्लस मॅलेट यांनी मराठ्यांचा राजकारणात हस्तक्षेप करुन इंग्रज साम्राज्यात फार मोठे सहकार्य केले होते. त्यानंतर ते १७९८ मध्ये इंग्लंडला गेले होते. तेव्हा दुसऱ्या बाजीराव पेश्व्यांनी सर चार्लस मॅलेट यांच्याकडे इंग्लंडच्या राजाला एक पत्र व भेटवस्तु पेशव्यांनी दिल्या होत्या. म्हणजे दुसऱ्या बाजीराव पेशव्यांचे ही संबंध सर चार्लस मॅलेट यांच्या बरोबर चांगले होत असे दिसुन येते.

**ब) कर्नला पामर**

दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या काळात सर चार्लस मॅलेट नंतर कर्नल पामर या इंग्रज वकीलचाही संबंध मराठयांच्या राजकारणात आलेला आहे. कर्नल पामर यांचा जन्म स.न. १७४० मध्ये झाला. त्यांनी वयाच्या २२ व्या वर्षी ते आर्मीत भरती झाले होते. इ.स. १७६६ पर्यंत त्यांनी आर्मित नोकरी केली यानंतर तेथे ते ईस्ट इंडिया कंपनी मध्ये पायदाळातील कनिष्ठ अधिकारी म्हणून कर्नल पामर रूजु झाले होते. या नंतर कर्नल पामर काही काळ गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिग्ज यांच्या बरोबर बनारस येथे एक वर्ष होते. त्यावेळी त्यांनी वॉरन हेस्टिग्जंचे गुप्त सेक्रेटरी म्हणुन कामकाज पाहीले होते. ऑगस्ट १७८४ मध्ये कर्नल पामर वॉरन हेसिटग्जचे प्रतिनिधी व औंदचा नवाब वजीर यांचे दुत बनविण्यात आले होते. त्यानंतर सन १७८७ मध्ये कर्नल पामरची नियुक्ती पुणे दरबरात रेसिडंट म्हणुन करण्यात आली होती. सन १७९८ मध्ये कर्नल पामरचे ऑफिस पुण्यामध्ये आले. त्यानंतर मराठे व इंग्रज म्हणजे कर्नल पामर यांच्यात कधी ही संघर्ष झाले नाही. कारण दुसरे बाजीराव पेशवे व कर्नल पामर यांचे संबंध चांगले होते.

त्यामुळे त्यांनी दुसऱ्या बाजीराव पेशव्या बरोबर बोलणी करुन करार करणे, वाटाघाटी करणे या सर्व गोष्टीशी चांगल्या संबंधातूनच त्यांनी दुसऱ्या बाजीराव पेशव्यांबरोबर संबंध निर्माण केले होते, त्यामुळे कर्नल पामर यांनी कधी ही इस्ट इंडिया कंपनीला दुसऱ्या बाजीराव पेशव्यांची खाजगी बाब कंपनीला कधीही कळविली नव्हती. तसेच त्यांच्या हाताखालच्या अधिकाऱ्यांनी ही कधीही तक्रार केली नव्हती. त्यांची झालेले पत्र व्यव्हार हे खऱ्या अर्थाने मराठा इंग्रज संबंधाच्या दृष्टीकोणतून महत्वाची आहे. त्या मुळेच मराठ्याच्या राजकारणात कर्नल पामर यांनी यऱ्या अर्थाने यश मिळविले होते.

शिंदे घराण्यातील महिलांचा वाद उद्भवला होता त्या वेळेस कर्नल पामर यांन नाना फडणीसांना मदतीची तयारी दाखवली होती. परंतु या काळात नाना फडणीस अधिकार पदावरती नव्हते. परंतु झालेला हा वाद मिटविण्यासाठी दुसऱ्या बाजीराव पेशव्यांना म्हणजे मराठ्यांच्या मदतीसाठी इंग्रज म्हणजे कर्नल पामर यांनी मदतीचा हात पुढे केला होते. यावरुन कार्नल पामर व पेशव्यांचे संबंध चांगले होते असे दिसुन येते.

**क) सर कर्नल बॅरी क्लोज -**

सर कर्नल बॅरी क्लोज हे पुणे प्रांताचे तिसरे रेसिडेंट होते सन १७७१ मध्ये ते मद्रास आर्मीत रुजू झाले होते. त्यानंतर १७९० ते १७९२ पर्यंत सहाय्यक जनरल म्हणुन कामकाज पाहीले होते. त्यांनी श्रीरंग पट्टणच्या वेढयाच्या वेळी चांगली भुमिका पार पाडले होती. लॉर्ड हॅरीसच्या सैन्याला उत्तम दर्जाचे मार्गदर्शन कर्नल बॅरी क्लोज यांनी केले होते. म्हणुनच त्यांची निवड म्हैसुरच्या रेसिडेंट म्हणुन केली होती. या नंतर पुढे दुसरे बाजीराव पेशवे पदावर रुढ झाले तेव्हा रेसिडेंट म्हणून कर्नल पामर होते. त्यानंतर सन १८०१ मध्ये पुणे दरबारचे रेसिडेंट म्हणुन सर कर्नल बॅरी क्लोज यांची नियुक्ती झाली होती. विठोजी होळकर प्रकरणाच्या वेळेसच दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या राजकारणात सहज प्रवेश केला. भावाच्या हत्येचा बदला घेण्यासाठी यशवंतराव होळकरांनी पुण्यावरती हल्ला करुन पेशव्यांचा हडपसरच्या लढाईत पराभव केला होता. त्यावेळेस दुसरे बाजीराव पेशवे भयभित होवुन दि. २५/१०/१८०२ रोजी सुवर्णदुर्ग येथे पोहोचले त्यानंतर पेशवे महाड येथे बऱ्याच दिवस राहीले. त्यावेळेस कर्नल बॅरी क्लोज यांनी दुसऱ्या बाजीराव पेशव्यांना मदतीचा हात पुढे केला होता. यानंतरही यशवंतराव होळकरांनी पुण्यात पेशव्यांना परत आणण्यासाठी फार प्रयत्न केले. परंतु भितीमुळे दुसरे बाजीराव पेशवे पुण्यात परत न येता ते इंग्रजांच्या आश्रयाला गेले. यानंतर त्यांनी इंग्रजांची म्हणजे जोनाथन डंकन यांना संरक्षण करण्याची विनंती केली त्यावेळेस महाड येथे सर बॅरी क्लोज यांनी उत्तम कामगिरी पार पाडली.

यानंतर सर बॅरी क्लोज यांनी अतिशय यशस्वी पाऊल उचलून दुसऱ्या बाजीराव पेशव्यांना वसईच्या तहावरती ३१ डिसेंबर १८०२ रोजी सही करुन घेण्यासाठी महत्वाची भुमिका बजावली होती. सर बॅरी क्लोज यांच्या कार्यामुळे इंग्रजांच्या साम्राज्य करण्यासाठी खऱ्या अर्थाने मार्ग मोकळा झाला. अशा प्रकारे या निवडक रेसिडेंटानी मराठ्याच्या म्हणजे दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या काळात महत्वाची भुमिका बजावली.

**संदर्भ साधने -**

1. *सरदेसाई गो.स. - मराठी रियासत भाग ८, मुंबई २०१२.*
2. *सरदेसाई गो.स. - ब्रिटीश रियासत भाग - २, मुंबई २०१२.*
3. *चोकसी आर.डी. - अ हिस्टरी ऑफ ब्रिटीश डिपलॉमेकी अ‍ॅक्ट द कोर्ट ऑफ पेशवा - भाग-२, पुणे १९५१.*
4. *श्रीराम साठे - पेशवे, पुणे २०१४.*
5. *वैद्य सुमन - अखेरचा पेशवा नागपुर १९९४.*
6. *ओक प्रमोद - पेशवे घराण्याचा इतिहास भाग-१, पुणे - २०१४.*

# वाहतूक: व्यापाराचे अनुषंगिक साधन

***प्रा.कर्डक सुनील भास्कर***

*सहायक प्राध्यापक, वाणिज्य विभाग, गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, सिन्नर*

सारांश :

*अलीकडील काळात वस्तू  उत्पादन हे बाजारपेठेपासून दूर अंतरावर होते. शहरातील जमिनीच्या प्रचंड किमती ,वाहतूक कोंडी दात लोकवस्ती या सत्वाचा परिणाम टाळण्यासाठी उत्पादन बाजारपेठेपासून दूर केले जाते. अशावेळी वस्तू बाजारपेठेत पोहोचविण्यासाठी वाहतूक कार्य आवश्यक बनते. यासाठी वाहतूक हे व्यापाराचे अनुषंगिक साधन महत्त्वाचे ठरते. वाहतुकीच्या पद्धतींमध्ये हवा, जमीन (रेल्वे आणि रस्ता), पाणी, केबल, पाइपलाइन यांचा समावेश आहे. वाहतूक लोकांमधील व्यापार सक्षम करते, जी संस्कृतीच्या विकासासाठी आवश्यक आहे. वाहतुकीच्या पायाभूत सुविधांमध्ये रस्ते, रेल्वे, हवाईमार्ग, जलमार्ग, कालवे, पाइपलाइन आणि टर्मिनल जसे की विमानतळ, रेल्वे स्टेशन, बस स्थानके, गोदाम, ट्रकिंग टर्मिनल्स, इंधन भरणारे डेपो आणि बंदरे यासह निश्चित आस्थापनांचा समावेश आहे. प्रवास करणाऱ्या वाहनांमध्ये ऑटोमोबाईल्स, दुचाकी, बस, गाड्या, ट्रक, हेलिकॉप्टर, वॉटरक्राफ्ट, अवकाशयान आणि विमान यांचा समावेश होतो.*

**वाहतुकीचा इतिहास:  प्रस्तावना:**

मानवाच्या वाहतुकीच्या पहिल्या  साधनामध्ये चालणे, धावणे आणि पोहणे यांचा समावेश आहे. अधिक शक्तिशाली प्राण्यांवर वाहतुकीचा बोजा ठेवण्यासाठी एक नवीन मार्ग पाळीव प्राण्यांमुळे आला, ज्यामुळे अवजड भार कमी होण्यास मदत मिळाली.प्राण्यांवर स्वर होऊन जास्त कालावधीसाठी त्यांचा वापर होऊ लागला. चाकाच्या शोधांनी वाहनांच्या परिचयातून प्राण्यांची वाहतूक अधिक कार्यक्षम बनविण्यात मदत केली. तर, जलवाहतूक प्राचीन काळापासूनची आहे आणि औद्योगिक क्रांतीपूर्वी मोठ्या प्रमाणात आणि मोठ्या अंतरापर्यंत वाहतूक करण्याचा एकमेव कार्यक्षम मार्ग जलवाहतूक हा होता. रस्ते वाहतुकीच्या पहिल्या प्रकारात घोडे, पाळीव प्राणी उदा. बैल यांचा वापर वाहतुकीसाठी केला गेला. मेसोपोटेमिया आणि सिंधू खोऱ्यातील  अनेक प्रारंभीच्या संस्कृतींनी पक्के रस्ते तयार केले होते. शास्त्रीय पुरातन काळात, पर्शियन आणि रोमन साम्राज्यांनी सैन्याला द्रुतगतीने प्रवास करण्यास दगडी रस्ते तयार केले. खाली कोरडलेल्या दगडांच्या खोल रोडबेड्सने असे रस्ते कोरडे ठेवले. मध्ययुगीन खलीफाने नंतर डांबरी-रस्ते तयार केले. प्रथम वॉटरक्राफ्ट म्हणजे झाडाच्या खोड्यांमधून तोडलेल्या नावा किंवा जहाजांद्वारे जलवाहतूक पूर्ण केली गेली, यात वेगासाठी वारा वापरला गेला. त्यामुळे अनेक शहरे हि नदी काठी किंवा समुद्र किनाऱ्यावर स्थित असल्याची दिसतात. औद्योगिक क्रांती होईपर्यंत, वाहतूक मंद आणि महाग होती. कॉम्प्रेस्ड एअरचा व गुरुत्वाकर्षणाचा वापर करून मालाची वाहतूक केली गेली. द्रव किंवा वायू पदार्थांची वाहतूक पाइपलाइनद्वारे केली जाऊ लागली. सांडपाणी, गाळ, पाणी यासाठी लांब पल्ल्याची पाईपलाईन वापरली जाते. केबल ट्रान्सपोर्ट, अंतर्गत उर्जा स्त्रोताऐवजी केबल्सद्वारे वाहने खेचली जातात. उदा. खडी ग्रेडियंट, एरियल ट्रामवे, लिफ्ट ई. स्पेसफ्लाइट, म्हणजे अंतराळ यानाद्वारे पृथ्वीच्या वातावरणापासून बाहेरील अंतराळात केलेली वाहतूक.

**वाहतूक:**

" व्यक्ति किंवा माल एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहचविण्याची क्रिया म्हणजे वाहतूक होय." तर उद्योग व्यवसायात वाहतूक म्हणजे, "माल उत्पादकाकडून व्यापाऱ्यातर्फे ग्राहकास पोहोचविण्याची क्रिया". सामान्यत: वाहतूक म्हणजे "मानवाकडून, जनावरे आणि वस्तूंचे स्थान एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे". दुसऱ्या शब्दांत, वाहतुकीची कृती म्हणजे  "एखाद्या जीव किंवा वस्तूची विशिष्ट हालचाल म्हणजे वाहतूक".

**वाहतुकीचे प्रकार:**

**जमीनिवारील वाहतूक :**

**अ. मानव-चलित वाहतूक:**

मानवचलीत वाहतुकीचे प्रकार म्हणजे चालणे, धावणे आणि पोहण्याच्या स्वरूपात मानवी स्नायू-शक्ती वापरणे. उदा. लोक किंवा वस्तूंची वाहतूक.पहाडी, अविकसित किंवा दुर्गम प्रदेशात आजही मानवी वाहतुकीसाठी किंवा समान वाहतुकीसाठी मानवांचा वापर करून वाहतूक केली जाते. उदा. केदारनाथ, वैष्णो देवी,मांगी तुंगी यासारख्या ठिकाणी मानवी वाहतुकीचा वापर केला जातो.

**ब. प्राणी-शक्तीने वाहतुक:**

प्राणी-चालित वाहतूक म्हणजे लोक आणि वस्तूंच्या हालचालीसाठी कार्यरत प्राण्यांचा वापर करणे. माणसे काही प्राण्यांवर थेट चढाई करू शकतात, सामान ठेवण्यासाठी जनावरांचा वापर करू शकतात किंवा चाके असलेली वाहने वाहने खेचण्यासाठी एकट्याने किंवा संघात त्यांचा वापर करतात. उदा. बैल गाडी, घोडा गाडी ई.

लँड ट्रान्सपोर्टमध्ये सर्व जमीन-आधारित परिवहन प्रणालींचा समावेश आहे. समुदायांना एकमेकांशी जोडण्यात भूमि वाहतूक महत्वाची भूमिका बजावते. शहरी नियोजनात जमीन वाहतूक ही मुख्य बाब आहे. यात रेल्वे आणि रस्ता असे दोन प्रकार असतात.

**क. रस्ते वाहतूक :**

जमिनीवरील वाहतूक म्हणजे रस्ते वाहतूक. एकूण वाहतूक व्यवस्थ्येत रस्ते वाहतुकीसखूप महत्त्व आहे.रस्ते हे देशाच्या आर्थिक प्रगतीत अत्यंत महत्वाची भूमिका बजावतात. जन्वारांच्या साह्याने ओढल्या जाणार्या गाड्या, हमाल,अन्य वाहने यांचा वापर करून रस्ते वाहतूक केली जाते.

रस्ते वाहतुकीचे फायदे:

१. कमी भांडवलाचा खर्च

रस्ते वाहतुकीत तुलनेने खूपच कमी भांडवल गुंतवणूकीची आवश्यकता असते, रेल्वे आणि हवाई वाहतूक यासारख्या वाहतुकीच्या इतर पध्दतींच्या तुलनेत खूपच कमी भांडवल गुंतवणूकीची आवश्यकता असते. रस्ते तयार करणे, कामकाज करणे आणि देखभाल करणे ही रेल्वे किंवा हवाई वाहतूकीपेक्षा स्वस्त आहे. रस्ते बांधकाम हे सार्वजनिक क्षेत्र आहे. म्हणूनच, रस्ते वापरण्यासाठी अत्यल्प कर रक्कम आकारली जाते.

२. डोअर टू डोअर सर्व्हिस:

रस्ता वाहतुकीचा सर्वात मोठा फायदा, म्हणजे डोअर टू डोअर सर्व्हिस.

३. ग्रामीण भागात सेवा:

रस्ते वाहतूक सर्वात सोयीस्कर आहे. रेल्वे, पाणी किंवा हवाई वाहतूक सेवा नसलेल्या ग्रामीण भागामध्ये माल वाहून नेण्यासाठी रस्ता वाहतूक सर्वात उपयुक्त आहे.

४. लवचिक सेवा:

रस्ते वाहतुकीमध्ये, वैयक्तिक आवश्यकता भागविण्यासाठी मार्ग आणि वेळ सहजतेने बदलता येतात.

५. लहान अंतरासाठी योग्य:

रस्ता वाहतूक ही एकमेव अशी वाहतूक आहे जी व्यवहार्य, आर्थिक आणि कमी अंतरासाठी आहे. रस्त्यावरुन कमी अंतरावर असलेल्या वस्तू आणि लोकांसाठी कमी खर्चिक आहे.

६. नुकसानीचा कमी धोका:

लोडिंग आणि माल हाताळण्यामुळे वस्तूंचे नुकसान होण्याचा धोका बराच कमी होते. काचे सारख्या नाजूक वस्तूंच्या वाहतुकीसाठी रस्ता वाहतूक सर्वात योग्य आहे.

७. बांधणी खर्चामध्ये बचत:

रस्ता वाहतुकीत पॅकिंगची प्रक्रिया कमी गुंतागुंतीची आहे.

८. वेगवान:

जलदगतीने वितरण करण्यासाठी रस्ता वाहतूक सर्वात योग्य आहे. जलवाहतूक अतिशय संथ गतीने आहे. हवाई आणि रेल्वे वाहतुकीसाठी बऱ्याच कागदपत्रे आणि औपचारिकता आवश्यक आहे. त्या तुलनेत रस्ते वाहतूक अधिक लवचिक आहे.

९. कमी किंमत

इतर वाहतुकीच्या पद्धतींच्या तुलनेत रस्ते वाहतूक अत्यंत  कमी खर्चिक असते. यासाठी आरंभिक भांडवल गुंतवणूकीची खूप कमी गरज आहे. देखभाल खर्च देखील तुलनेने कमी आहे.

रस्ते वाहतुकीचे तोटे:

१. हंगाम आणि हवामान परिणामांना असुरक्षितः

रस्ते वाहतुकीची पायाभूत सुविधा आणि प्रवास हवामानातील बदल यासाठी असुरक्षित आहे. उदाहरणार्थ, पाऊस किंवा पूर दरम्यान रस्ते वापरण्यास अयोग्य आणि असुरक्षित बनतात.

२. अपघात आणि ब्रेकडाउन:

रस्ते वाहतुकीच्या बाबतीत अपघात आणि ब्रेकडाऊन होण्याचे उच्च प्रमाण नक्कीच आहे. यामुळे रेल्वे वाहतुकीच्या तुलनेत मोटार वाहतूक सुरक्षित पर्याय नाही.

३. जास्त अंतर आणि अवजड वाहतुकीसाठी उपुक्त नाही:

कमी किंमतीत आणि अवजड मालवाहू वाहतुकीसाठी रस्ता वाहतूक उपयुक्त नाही, कारण ती महाग असल्याचे सिद्ध होते.

४. हळू वेग:

रस्ते वाहतूक हवाई किंवा रेल्वे वाहतुकी इतकी वेगवान नसते.

ड. रेल्वे वाहतूक:

मोठ्या प्रमाणावरील मालाच्या वाहतुकीसाठी रेल्वे वाहतूक अतिशय उपुक्त आहे. ट्रेन दोन समांतर स्टील रोलच्या संचासह चालते, ज्याला लोह मार्ग किंवा रेलमार्ग असे म्हणतात. रेलचे लाकूड, काँक्रीट किंवा स्टीलच्या स्लीपर वर ठेवलेले असते.यावरून रेल्वे धावते. रेल्वे वाहतूक ही देशाच्या वाहतूक व्यवस्थेसाठी एक जीवनरेखा आहे. कारण बहुतेक लोक तसेच कंपन्या वस्तू हस्तांतरित करण्यासाठी,वस्तू एका जागेपासून दुसऱ्या ठिकाणी वाहून नेण्यासाठी रेल्वे नेटवर्कचा वापर करतात. कारण इतर वाहतुकीच्या साधनांच्या तुलनेत रेल्वे वाहतूक स्वस्त आणि सुरक्षित असते.

**रेल्वे वाहतुकीची वैशिष्ट्ये:**

१.सरकार पुरस्कृत:

रेल्वेचे पहिले आणि मुख्य वैशिष्ट्य हे आहे की सरकारने जमीन खरेदी करणे, त्या जागेवर रेल्वे ट्रॅक बनविणे, इंजिनची खरेदी करणे, नोकरदार कर्मचारी इत्यादी सर्व खर्च सरकारच्या पैशातून केले जातात. सोप्या शब्दांत सांगायचे तर, रेल्वेमध्ये सर्वात मोठे भागधारक असलेले सरकार आहे आणि खासगी कंपन्यांचा सहभाग कमी आहे.

२. एकाधिकार:

रेल्वेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे रेल्वे चालवण्यामध्ये सरकारची मक्तेदारी आहे आणि कोणतीही खासगी कंपनी सरकारच्या परवानगीशिवाय रेल्वे क्षेत्रात प्रवेश करू शकत नाही. या क्षेत्रात कोणतीही स्पर्धा नाही. म्हणूनच रेल्वेच्या बाबतीत सरकारला मक्तेदारी अधिकार आहे.

३. आरामदायक आणि सुरक्षित प्रवास:

रेल्वे वाहतुकीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे रस्ते वाहतुकीच्या तुलनेत आरामदायक तसेच सुरक्षित प्रवास. रेल्वेच्या अपघातांच्या घटना रस्ते अपघाताच्या  तुलनेत कमी आहे.

४.उच्च गुंतवणूक:

रेल्वेला मोठ्या गुंतवणूकीची आवश्यकता आहे; कारण रेल्वेला अवघड भागावरील रेल्वे ट्रॅक, लोकोमोटिव्ह कोच आणि इतर काही सेटअप्ससारख्या पूर्ण पायाभूत सुविधांची आवश्यकता असते.

५.कमी लवचिकता:

प्रवाश्यांच्या वेळेनुसार प्रवास करता येणे श्याक्या नाही. रेल्वेमार्गाच्या निश्चित वेळेबरोबरच प्रवास करणे आवश्यक आहे. रस्ते वाहतुकीच्या तुलनेत ते कमी लवचिक आहे.

**रेल्वे वाहतुकीचे फायदे:**

१. वातावरणाचा कमी परिनाम:

रेल्वे वाहतुकीचा सर्वात मोठा फायदा म्हणजे तो वाहतुकीचा सर्वात विश्वासार्ह मार्ग आहे. कारण वाहतुकीच्या इतर पद्धतींच्या तुलनेत पाऊस, धुके इत्यादी वातावरणाचा यावर सर्वात कमी परिणाम होतो.

२. व्यवस्थित आयोजनः

इतर कोणत्याही प्रकारच्या वाहतुकीपेक्षा रेल्वे वाहतूक अधिक व्यवस्थित आहे. यात निश्चित मार्ग आणि वेळापत्रक आहे. इतर सेवांच्या तुलनेत त्याची सेवा अधिक विशिष्ट, एकसमान आणि नियमित आहे.

*ISBN 978-81-947698-8-0 Peer Reviewed International Book Chapter, 28th February 2021*

३. जास्त वेग:
लांब पल्ल्याची त्याची गती वायुमार्ग वगळता इतर कोणत्याही वाहतुकीच्या पद्धतीपेक्षा अधिक आहे. अशा प्रकारे, लांब पल्ल्याच्या वाहतुकीसाठी ही सर्वोत्तम निवड आहे.
४.अवजड आणि अवजड वस्तूंसाठी उपयुक्तः
लांब पल्ल्यापासून अवजड आणि अवजड वस्तू वाहून नेण्यासाठी रेल्वे वाहतूक आर्थिकदृष्ट्या जलद आणि उपयुक्त आहे.
५. स्वस्त वाहतूक:
इतर वाहतुकीच्या पद्धतींच्या तुलनेत हे एक स्वस्त साधन आहे.
६. सुरक्षा:
रेल्वे वाहतुकीचा सर्वात सुरक्षित प्रकार आहे. इतर वाहतुकीच्या पद्धतींच्या तुलनेत रेल्वेचे अपघात होण्याची शक्यता कमी आहे. शिवाय, सूर्य, पाऊस, बर्फ इत्यादी पासून रहदारीचे संरक्षण केले जाऊ शकते.
७. मोठी क्षमता:
रेल्वेची वहन क्षमता अत्यंत मोठी आहे. शिवाय, त्याची क्षमता लवचिक आहे. जी अधिक वॅगन जोडून सहजपणे वाढविली जाऊ शकते.
८. लोककल्याण:
रेल्वे हा देशातील सर्वात मोठा सार्वजनिक उपक्रम आहे. रेल्वे अनेक सार्वजनिक उपयोगिता सेवा प्रदान करते. त्यांचे शुल्क अत्यंत कमी आहे. जे गरिबांना मदत करते.
९. शासकीय सुविधा:
रेल्वे शासनास प्रशासकीय सुविधा पुरविते. रेल्वे ही शासकीय सुविधा आहे.
१०. रोजगाराच्या संधी:
रेल्वे कुशल व अकुशल कामगारांना रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध करुन देते. 16 लाखाहून अधिक लोक रोजीरोटीसाठी रेल्वेवर अवलंबून आहेत.

**रेल्वे वाहतुकीचे तोटे:**

१. प्रचंड भांडवलाचा खर्च:
भांडवलाची मोठी गुंतवणूक रेल्वेला आवश्यक असते. इतर वाहतुकीच्या पद्धतींच्या तुलनेत बांधकाम, देखभाल आणि ओव्हरहेड खर्चाची किंमत खूप जास्त आहे. शिवाय, गुंतवणूक विशिष्ट आणि स्थिर आहेत. जर रहदारी पुरेसे नसेल तर गुंतवणूकीच्या विशाल स्त्रोतांचा अपव्यय होऊ शकतो.
२. लवचिकतेचा अभाव:
रेल्वे वाहतुकीचा आणखी एक गैरसोय म्हणजे त्याची अपूर्णता. त्याचे मार्ग आणि वेळ वैयक्तिक आवश्यकतानुसार समायोजित करता येत नाहीत.
३. डोअर टू डोअर सेवेचा अभाव:
रेल्वे विशिष्ट ट्रॅकला जोडलेली असल्याने रेल्वे वाहतूक डोअर टू डोर सर्व्हिस देऊ शकत नाही. दरम्यानचे लोडिंग किंवा अनलोडिंगमध्ये वेळेचा अपव्यय होतो.
४.एकाधिकारशाही:
रेल्वेला मोठ्या भांडवलाचा खर्च आवश्यक असल्याने ते मक्तेदारी वाढवू शकतात आणि मोठ्या प्रमाणात लोकहिताविरूद्ध काम करू शकतात. जरी सरकारद्वारे नियंत्रित आणि व्यवस्थापित केले गेले, तरीही स्पर्धेअभावी अकार्यक्षमता वाढू शकते.
५. लहान अंतर आणि लहान भारांसाठी अनुपयुक्त:
रेल्वे वाहतूक कमी अंतरासाठी आणि मालाच्या छोट्या वाहतुकीसाठी अयोग्य आहे.
६. बुकिंग:
यात मोटार वाहतुकीच्या तुलनेत रेल्वेमार्फत वस्तूंचे बुकिंग करण्यात व वितरण करण्यात बराच वेळ व श्रम आहेत.
७. ग्रामीण सेवा नाही:

भांडवलाची प्रचंड गरज आणि वाहतुकीमुळे ग्रामीण भागात रेल्वे आर्थिकदृष्ट्या चालविली जाऊ शकत नाही. अशा प्रकारे, आजही मोठ्या ग्रामीण भागात रेल्वे सेवा नाही. यामुळे ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांची मोठी गैरसोय होते.

**इ. हवाई वाहतूक:**

विमानाचा वापर करून केल्या जाणाऱ्या वाहतुकीस हवाई वाहतूक असे म्हणतात.या वाहतुकीचे दोन प्रकार पडतात.एक म्हणजे अंतर्गत हवाई वाहतूक "देशातल्या देशात विमानाद्वारे होणार्या वाहतुकीस अंतर्गत हवाई वाहतूक म्हणतात". तर दुसरा प्रकार म्हणजे आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक. "दोन देशामध्ये होणार्या हवाई वाहतुकीस आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक म्हणतात". हवाई वाहतूक महाग असली तरी ती वेगवान वाहतूक असून तिचा वापर दिवसेंदिवस वाढत आहे. रॉकेटनंतर विमान ही वाहतुकीची दुसरी वेगवान पद्धत आहे. वाणिज्यिक विमान ताशी 955 किलोमीटर (593 मैल प्रति तास), एकल-इंजिन विमान 555 किलोमीटर प्रति तास (345 मैल) पर्यंत पोहोचू शकते. विमान वाहतूक , लोक आणि मालवाहतूक लांब अंतरापर्यंत मर्यादित प्रमाणात द्रुतपणे पार पाडण्यास सक्षम आहे, परंतु यासाठी जास्त खर्च आणि जास्त उर्जा वापरासाठी लागतो. कमी अंतरासाठी किंवा दुर्गम ठिकाणी, हेलिकॉप्टर वापर केला जातो.

हवाई वाहतुकीचे फायदेः

१. उच्च गती:

हे वाहतुकीचे वेगवान साधन आहे. प्रवाशी आणि वस्तू एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सहजपणे आणल्या नेल्या जाऊ शकतात.

२. किमान किंमत:

रेल्वे आणि रस्ते वाहतुकीप्रमाणे कोणताही ट्रॅक किंवा रस्ता तयार करण्यासाठी पैसे खर्च करण्याची गरज नाही, फक्त विमानतळच तयार करावे लागते.

३. सामरिक महत्त्व:

वायुमार्गाला मोठे सामरिक महत्त्व आहे. याचा उपयोग अंतर्गत आणि बाह्य सुरक्षिततेसाठी केला जाऊ शकतो.

४. महागड्या व हलकी वस्तूंची सोय वाहतूक:

हवाई वाहतुकीद्वारे महागड्या, हलक्या आणि नाशवंत वस्तू पाठविणे सोयीचे आहे.

५. भौतिक अडथळयांपासून मुक्तः

नदी, पर्वत आणि खोरे इत्यादी भौतिक अडथळयांपासून हवाई वाहतूक मुक्त आहे.

६. शेतीसाठी उपयुक्त:

ज्या किटकांमुळे पिकांचे नुकसान होते. अशा कीटक आणि कीटकांवर हवाई फवारणीसाठी हवाई वाहतूक उपयुक्त आहे.

७. नैसर्गिक आपत्तींमध्ये उपयुक्त:

भूकंप, पूर, अपघात आणि दुष्काळ हवाई वाहतूक बचाव कार्यासाठी वापरली जाते.

हवाई वाहतुकीचे तोटे:

१ . उच्च खर्चः

हवाई वाहतूक महाग सेवा आहे. त्याचा परिचालन खर्च खूप जास्त आहे. मध्यमवर्गीय आणि गरीब लोकांना ती परवडणारी नाही.

२. अधिक जोखीम:

हवाई वाहतूक अपघाताची शक्यता असते. एक छोटी चूक प्रवाश्यांसाठी फारच धोकादायक ठरू शकते. विमानांचे अपहरण सहज शक्य आहे.

३. प्रचंड गुंतवणूक:

विमानसेवा सुविधा निर्माण करण्यासाठी प्रचंड गुंतवणूक आवश्यक आहे. विमानाची किंमत, एरोड्रोमचे बांधकाम, देखभाल आणि नियंत्रण यंत्रणेसाठी भांडवली खर्चाची आवश्यकता असते.

ई.जल वाहतूक:

पाण्यामधून केली जाणारी वाहतूक म्हणजे जल वाहतूक होय.रेल्वे वाह्तुकीपुर्वी जल वाहतूक मोठ्या प्रमाणावर केली जात होती. नदी, कालवे, समुद्र मार्गे हि वाहतूक केली जाते. तिचे अंतर्गत वाहतूक,आणि आंतरराष्ट्रीय वाहतूक असे प्रकार पडतात. इतर वाहतुकीच्या तुलनेत गती कमी असली तरी, आधुनिक समुद्री वाहतूक ही मोठ्या प्रमाणात मालाची वाहतूक करण्याची अत्यंत कार्यक्षम पद्धत आहे.

जल वाहतुकीचे फायदे:

१. शांततामय आणि आरामदायक:

जल वाहतूक हि इतर वाहतूक प्रकारापेक्षा शांत आणि आरामदायक आहे.

२. हे मजेदार, साहसी आह:

जल वाहतूक अधिक मनोरंजक आणि साहसी वाटू शकते.

३. हे सुरक्षित आहे:

रस्ते प्रवासाशी तुलना करता जेव्हा आपण बोटीने प्रवास करता तेव्हा नुकसान पोहोचण्याची शक्यता कमी असते.

४. हे पर्यावरणासाठी चांगले आहे: ध्वनी प्रदूषण होत नाही.

जल वाहतुकीचे दोष:

१. हे स्लो आहे:

२. हे महाग असू शकते:

३. हवामान / वादळे त्रास देऊ शकतात:

४. ते अव्यवहार्य ठरू शकते:

इतर मार्ग:

पाइपलाइन:

पाईपलाईन वाहतूक पाईपद्वारे वस्तू पाठवते; यातून बहुतेक द्रव आणि वायू पाठविल्या जातात. सांडपाणी, गाळ, पाणी इ. वहातुकीसाठी पाईपलाईन वापरली जाते.

केबल ट्रान्सपोर्ट:

अंतर्गत उर्जा स्त्रोताऐवजी केबल्सद्वारे वाहने खेचली जातात. याचा वापर बहुधा खडी ग्रेडियंटमध्ये केला जातो.

स्पेसफ्लाइट:

म्हणजे अंतराळ यानाद्वारे पृथ्वीच्या वातावरणापासून बाहेरील अंतराळात वाहतूक होते.

प्याराशुट:

विमानातून विशिष्ट माल वाहतुकीसाठी प्याराशुट चा वापर केला जातो.

बर्फावरील घसरगाड्या:

बर्फाळ प्रदेशात माल वाहतुकीसाठी या घसर गाड्यांचा वापर केला जातो.

समारोप:

उत्तम वाहतूक व्यवस्था मालाच्या स्थळ उपयुक्तता मूल्यात वृद्धी घडवून आणते. वेगवान आणि परिणामकारक वाहतूक साधनामुळे बाजारपेठेचा विस्तार होतो. पुरवठा नियमित होतो. किंमत कमी होते. आणि ग्राहकांना उत्तम सेवा मिळते. या सर्वांचा फायदा व्यवसायाला होतो. व्यापार वृद्धी व उत्पादन वृद्धी होते. वस्तूंचे एकत्रीकरण आणि प्रसारण हे वाहतुकीमुळेच शक्य होते. तसेच कोणत्याही उत्पादन संस्थ्येचे स्थान निवडताना वाहतूक हा घटक लक्षात घ्यावा लागतो. अर्थव्यावस्था प्रगतीत वाहतूक साधनास अतिशय महत्त्व आहे.थोडक्यात वाहतूक व्यवस्था हे व्यापाराचे अतिशय उपयुक्त अनुषंगिक साधन आहे.

संदर्भ:

१.आर.सी.अग्रवाल,लेख,रेल्वे वाहतूक फायदे तोटे.

२.नवता रोड ट्रान्सपोर्ट डिजिटल टीम,रस्ते वाहतूक फायदे तोटे.

३.पूजा मेहता,हवाई वाहतूक फायदे तोटे.

४.डॉ.सुनील जोशी, व्यवसाय प्रशासन, निराली प्रकाशन, जून २०१४.

५.डॉ.निर्मल भालेराव,भारतीय अर्थव्यवस्था,जून २०१०.

# राज्यघटनेच्या सरनाम्याचे तत्वज्ञान

*प्रा.विलासराव लवटे*
*सहा.प्रा.राज्यशास्त्र विभाग,देशभक्त संभाजीराव गरड, महाविद्यालय, मोहोळ*
*Email- vilasraolawate2020@gmail.com*

**प्रास्ताविक :-**

भारतातील राजकीय नेत्यांनी भारताला स्वातंत्र्य मिळावे म्हणून अतुलनीय झुंज देवून स्वातंत्र्यप्राप्ती करुन घेतली. परंतू फक्त स्वातंत्र्य मिळवणे हेच एकमेव ध्येय न मानता तत्कालीन नेत्यांनी भारतासाठी स्वतंत्र स्वयंनिर्मित संविधानाचा आग्रह धरला व त्यास इंग्रजांनी मान्यता दिल्यानंतर संविधान निर्मितीची प्रक्रिया सुरु झाली. 09 डिसेंबर 1946 रोजी डॉ. सचिदानंद सिंन्हा यांची हंगामी अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली. त्यानंतर दोनच दिवसांनी म्हणजे 11डिसेंबर 1946 ला घटनासमितीने डॉ. राजेंद्रप्रसाद यांची घटनासमितीचे अध्यक्ष म्हणून कायम स्वरूपीची नियुक्ती केली. भारतीय नागरिकांना घटनेच्या सरनाम्याने न्याय स्वातंत्र्य, समता व बंधूता या मूल्यांची शाश्वती देण्यात आली. पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी संविधानाची उद्दीष्टे ठरवून दिली व त्यांचेच प्रतिबिंब हे सरनाम्यात दिसून येते. 1976 च्या 42 वी घटनादुरुस्तीने प्रास्ताविकेत समाजवादी, धर्मनिरपेक्ष हे शब्द समाविष्ट करण्यात आले. राज्यघटनेच्या सुरुवातीला प्रस्तावना म्हणजेच सारांश स्वरुपात घटनेची मांडणी केली आहे. यालाच उद्देशपत्रिका किंवा सरनामा असे आपण म्हणतो. मात्र हा सरनामा कायद्याच्या नियंत्रणाखाली येत नाही.

**सरनाम्याचे महत्व :-**

घटनेचा हा सरनामा अतिशय महत्तवपूर्ण आहे. अत्यंत मोजक्या शब्दात राज्यघटनेचा सार यामध्ये घटनानिर्मात्यांनी विषद केला आहे. म्हणजेच सरनामा हा थोडक्यात वर्णन केलेली घटनाच मानली जाते.

अ) सर्वोच्च न्यायालय :-

"घटनेचा सरनामा म्हणजे संविधान निर्मात्यांचा संविधान निर्मितीचा आशय स्पष्ट करणारी चावी आहे.

ब) डॉ.एम.व्ही. पायली :-

"अतिशय कमी शब्दात सुंदर विचार व श्रेष्ठ दर्जाचे आदर्श लिहलेली ही अपवादात्मकच राज्यघटना आहे."

क) अनेस्ट बार्कर :-

"शासनव्यवस्थेचे उत्तम स्वरुप, शासन निर्मितीचा आधार, स्पष्ट करणारा तसेच शासनकर्त्याची जबाबदारी स्पष्ट करणारा व राज्यघटनेच्या अंमलबजावणीमध्ये मार्गदर्शकाची भूमिका पार पाडणारा असा हा घटनेचा भाग नसलेला परंतू घटनात्मक तरतुदींचा अर्थ लावण्यासाठी न्यायाधीशांना उपयुक्त ठरणारा हा मौलिक भाग म्हणजे घटनेचा सरनामा होय."

**सरनाम्याचे तत्वज्ञान :-**

1) लोक हेच घटनेचे आधार :-

मूळात सरनाम्याची सुरुवातच आम्ही भारताचे लोक अशी असून अंतिम सत्ता ही जनतेच्याच हातात सोपवली आहे. म्हणजेच जनता हीच घटनेचा आधार असून यात समाविष्ट कायदे व सत्ता हे सर्व जनता निर्मित आहे.

2) सार्वभौमत्व :-

सरनाम्यात भारत सार्वभौम राष्ट्र असल्याचे नमूद करुन भारताच्या अंतर्गत गोष्टींमध्ये हस्तक्षेप करण्याचा अधीकार हा जगातील कोणत्याही शक्तीला नसेल. भारताचे परराष्ट्रधोरण हे स्वतंत्र व सार्वभौम असेल.

3) समाजवादी व धर्मनिरपेक्षता :-

मूळच्या सरनाम्यात समाजवादी व धर्मनिरपेक्षता शब्द नव्हते. 1976 च्या 42 व्या घटनादुरुस्तीने हे शब्द समाविष्ट केलेले आहेत. भारताचे आर्थीक व सामाजिकीकरण हे रशीयाच्या धोरणातून आले असून उत्पादनाची साधने व बडया उद्योगाची सामाजिक मालकी काही प्रमाणात शासनाची असेल. हे तत्व निर्धारीत केले. त्याचप्रमाणे भारताचा कोणताही अधीकृत धर्म नसेल व राज्य कोणत्याही एका विशीष्ट धर्मास प्रोत्साहन देणार नाही. तर सर्व धर्मांना समान दर्जा असेल. प्रत्येकजन आपआपल्या मर्जीप्रमाणे स्व:धर्माचा प्रचार-प्रसार करेल परंतू इतर कोणत्याही धर्मास त्याची कोणत्याही परिस्थीतीत बाधा निर्माण होणार नाही.

4) प्रजासत्ताक व गणराज्य :-

प्रजासत्ताक राज्यात राज्याची अंतिम सत्ता ही जनतेच्या हातात असते. शासननिर्मितीमध्ये जनता ही प्रत्यक्ष तसेच अप्रत्यक्षरित्या सहभागी असते. त्यामुळे देशाचा कारभार हा जनतेच्या इच्छेनूसारच चालत असतो. कारण भारतात अप्रत्यक्षरित्या म्हणजे जनतेने निवडून दिलेले प्रतिनिधी देशाचा कारभार पाहतात. त्यांना पदावर बसवण्याचा तसेच पदावरुन दूर करण्याचा म्हणजे बदलण्याचा अधीकार ही जनतेलाच आहे.

गणराज्यामध्ये राज्याचा राज्यप्रमुख हा लोकांनी निवडून दिलेला असतो. तो इंग्लंडच्या राजप्रमुख वंशपरंपरेच्या तत्वाने पदावर विराजमान होत नाही. भारताचा सर्वोच्च शासन राष्ट्रपती असून राष्ट्रपती हे वंशपरंपरागत पध्दतीने नव्हे तर ते लोकशाहीच्या मार्गाने पदावर विराजमान होतात.

5) शासनाची ध्येयधोरणे व उद्दीष्टे :-

भारताने कशा पध्दतीने कारभार करावा व कशा पध्दतीची ध्येयधोरणे असावीत याचे मार्गदर्शन घटनेचा सरनामा करत असतो. तसेच याचे पालन करणे व पूर्ण करणे हे शासनाचे कर्तव्य आहे. सरनाम्यानुसार आपल्या शासनाची ध्येये स्वातंत्र, समता, बंधूता व न्याय ही असायला हवीत. तसेच त्यांच्या पूर्ततेसाठी शासनाने प्रयत्न करणे आवश्यक असते.

6) न्याय :-

लोकशाहीच्या अस्तीत्वासाठी न्याय या तत्वास प्रचंड महत्व आहे. न्यायाचा उद्देशच मूळात समाजाचे कल्याण करणे हा असतो. सामाजिक व आर्थीक न्यायाला आपल्या देशात प्रचंड महत्व आहे. राज्यघटनेत याच न्यायतत्वावर भर देण्यात आला आहे.

7) स्वातंत्र्य :-

व्यक्तीचा सर्वांगीण विकास होण्यासाठी पोषक परिस्थीती निर्माण होती ती मूळात स्वातंत्र्य या तत्वाने. व्यक्ती आपले विचार, भाषा, लिखाण, धर्मसंस्था इत्यादींचा उपभोग या त्त्वाने घेते. मात्र स्वातंत्र्याचा अर्थ स्वैराचार असा होत नसतो, तर गैरवर्तनावर बंधन घालणे हा स्वातंत्र्याचाच भाग असतो. त्यामुळे सर्व तत्वांना सुरक्षीतता प्रदान करण्यासाठी व इतर मूल्यांच्या समृध्दीसाठी, लोकशाहीच्या अस्तीत्वासाठी स्वातंत्र्य आवश्यक असते. म्हणून याचा सरनाम्यात समावेश केलेला दिसतो.

8) समता :-

समता म्हणजे मानवनिर्मित भेदभाव नष्ट करुन प्रत्येक नागरिकाला स्वत:च्या व्यक्तीमहत्व विकासासाठी समान संधी देणे होय. कोणत्याही स्थीतीत जाती, वंश, धर्म, संपत्ती यांच्या आधारावर भेदभाव होवू नये. आपल्या कर्तृत्वानूसार काम करण्यास वाव मिळाला पाहिजे. समान कामासाठी समान वेतन असावे. महत्वाचे म्हणजे सर्व नागरिक कायद्यापुढे समान असावेत, हे व्यापक तत्व सरनाम्यात समाविष्ट केले आहे.

10) राष्ट्रीय एकात्मता :-

भारतासारख्या बहुविविध बाबतीत  भीन्नता असणाऱ्या देशात ऐक्य राहण्यासाठी राष्ट्रीय ऐक्याची भावना जनतेत निर्माण व्हावी, हे ध्येय ठेवून घटनेच्या सरनाम्यात हा शब्द नमूद केला आहे. मूळ घटनेत हा शब्द नव्हता. 1976 च्या 42 व्या घटनादुरुस्तीने हा शब्द समाविष्ट करण्यात आला आहे.

सारांशाने भारताच्या सरनाम्याचे मुख्य उद्दीष्ट हे राज्यव्यवस्थेचे ध्येय निश्चीत करणे हे आहे. मूळात सरनामा हा घटनेचा भाग नाही. न्यायालयातही कायदा म्हणून वापरता येत नाही. तरीही सरनाम्याचे महत्व कमी होत नाही. अनेक राजकीय विचारवंतांनी सरनाम्याचे कौतुक केले आहे. पं. ठाकूरदास भार्गव सरनाम्यास घटनेचा आत्मा मानतात. सरनाम्यातील प्रत्येक शब्द विचारपूर्वक व अर्थपूर्णरित्या समाविष्ट केला आहे व याच आधारावर राज्यघटनेची भव्य इमारत अभी आहे.

संदर्भ ग्रंथ -

1) इंडियन पॉलिटी - एम. लक्ष्मीकांत

2) भारतीय राज्यघटना - ग्रॅनाव्हील ऑस्टीन (अनुवाद - भारती केळकर)

3) Constitution Of India - Justice Shri. V.N. Khare

4) भारतीय राज्यघटना व विधी - डॉ. आनंद पाटील

5) विकीपिडिया

# पर्यावरण संवर्धनामध्ये उच्च शिक्षणाची भूमिका

***डॉ. एकनाथ दत्तात्रय वाजगे***
*सहायक प्राध्यापक, श्री शिव छत्रपती महाविद्यालय,जुन्नर (पुणे)*
***Email- eknathwajage@gmail.com***

***सारांश***

*भारतामध्ये पर्यावरण संवर्धनासाठी विसाव्या शतकात व एकविसाव्या शतकात अनेक उपाय योजना केल्या आहेत. १९८६ मध्ये निर्माण झालेला पर्यावरण संरक्षण कायदा हा त्यातील एक प्रमुख भाग आहे .जागतिक पातळीवरही अनेक देशांनी पर्यावरणाच्या रक्षणार्थ कायदे व नियम संमत केले आहेत. संयुक्त राष्ट्र परिषदेतही जागतिक पर्यावरणाच्या रक्षणावर भर दिलेला दिसून येतो. मात्र पर्यावरणाच्या सद्यस्थितीचा विचार करता पर्यावरणाची दिवसेंदिवस होत चाललेली हानी आणि त्यातील परिवर्तन चिंता करायला लावणारे आहे . भारतामध्ये हवा प्रदूषण, मृदेची होत असलेली धूप , पाण्याचे दिवसेंदिवस जाणवत असलेले दुर्भिक्ष्य ,पर्जन्यात होत असलेले परिवर्तन , ओझोन स्तराची पातळी यांचा विचार केला तर पर्यावरणाची समस्या किती गंभीर आहे याची कल्पना येते. कायदे नियम , दंड या बाबी पर्यावरण संवर्धनामध्ये कुचकामी ठरलेल्या आहेत. पर्यावरणाच्या रक्षनामध्ये महत्वाची भूमिका असलेल्या जाणीव जागृती मोहिमे बाबतही शासन कमी पडताना दिसत आहे . शिक्षणाच्या विविध स्तरावर समाविष्ठ केलेल्या अभ्यासक्रमाची फलनिशपत्ती ही समाधानकारक नाही. शैक्षणिक धोरणाच्या बदलत्या काळात उच्च शिक्षण पर्यावरणीय मूल्य विकसित करण्यात महत्वाची भूमिका पार पडणार आहे.*

**शोध संज्ञा –** *पर्यावरण संवर्धन व शिक्षण*

**प्रस्तावना**

एकविसाव्या शतकामध्ये जगासमोर ज्या अनेक समस्या थकलेल्या आहेत त्यापैकी प्रमुख समस्या ही पर्यावरणाची आहे . पर्यावरण रक्षणाचे प्रयत्न जागतिक पातळीवर केवळ अलीकडच्या कालखंडात सुरु झाले असे नाही टर विसाव्या शतकामध्येच या दिशेने वाटचाल झालेली आहे. १९८७ मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेने जागतिक पर्यावरण आणि विकास आयोगाची स्थापना केली जगातील विविध देशांनी त्यांच्या पातळीवर पर्यावरण विषयक कायदे पास केले आहेत .भारताने पर्यावरण संरक्षणाचा कायदा १९८६ मध्ये संमत केला आहे. मात्र दिवसेंदिवस पर्यावरणाची स्थिती अधिक गंभीर होत चाललेली दिसून येते . भारतामध्ये हवा प्रदूषण, मृदेची होत असलेली धूप , पाण्याचे दिवसेंदिवस जाणवत असलेले दुर्भिक्ष्य ,पर्जन्यात होत असलेले परिवर्तन , ओझोन स्तराची पातळी यांचा विचार केला तर पर्यावरणाची समस्या किती गंभीर आहे याची कल्पना येते. कायदे नियम , दंड या बाबी पर्यावरण संवर्धानामध्ये कुचकामी ठरलेल्या आहेत. म्हणूनच पर्यावरणाचा विकास आणि संवर्धन हे शाश्वत स्वरूपाचे असावे, त्यासाठी जनजागृतीचे व्यापक अभियान राबविणे गरजेचे आहे. त्यासाठी शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या मनावर या बाबी बिंबवणे गरजेचे आहे . पर्यावरण शिक्षणाचा घटक शालेय अभ्यासक्रमात यापूर्वीच समाविष्ट केलेला आहे .शालेय शिक्षणामध्ये पर्यावरणाचा अभ्यासक्रमातील समावेशाबरोबरच सहशालेय उपक्रमाबरोबरच अनौपचारिक शिक्षणाचा वाटा महत्वाचा असणार आहे. महाविद्यालयीन स्तरावर उच्च शिक्षणातून विविध उपाय योजनांच्या माध्यमातून पर्यावरणाचा शाश्वत विकास करणे शक्य आहे .

पर्यावरणाची सद्यस्थिती

मानव आणि त्याच्या सभोवताली असलेले पर्यावरण यांचा अगदी घनिष्ठ संबंध आहे. एकविसाव्या शतकात मानवाने विविध क्षेत्रात केलेल्या क्रांतीमुळे तसेच विज्ञानाच्या विकासामुळे मानवी जीवनात झपाटयाने बदल होत गेलेले दिसून येतात. मात्र विकासाच्या याच संक्रमन काळात पर्यावरणाकडे अक्षम्य असे दुर्लक्ष संपूर्ण जगाच्या पातळीवरच झालेले आपल्याला दिसून येते. अलिकडील कालखंडात पर्यावरणामध्ये प्रदूषणाच्या समस्येमध्ये मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. लोकसंख्येची भरमसाठ वाढ, वाढते औदयोगिकरण, जंगलाचा ऱ्हास, मृदेची अतिरेकी झीज , पशुपालनाचा अतिरेक , नैसर्गिक साधनसंपत्तीचा प्रमाणापेक्षा अधिक वापर ,समाजामधील अनिष्ठ चालीरीतीतून पर्यावरणाच्या बाबतीतील समाजाची धारणा, एकविसाव्या शतकात नागरीकरणाचा वेग वाढत असल्याकारणाने वाढत्या शहरीकरणामुळे घनकचरा, उर्जेचा अतिरेकी वापर ,दळणवळण साधनामध्ये भरमसाठ वाढ , रासायनिक खते आणि औषधांचा अतिरेकी वापर ,मानवाचे अनिर्बंध ध्वनी प्रदुषण यासारख्या अनेक बाबी पर्यावरणास घातक ठरलेल्या आहेत. त्यातून ओझोनच्या थरामध्ये बदल होउन जागतिक तापमान वाढीची समस्या निर्माण झालेली

दिसून येते. जगाचे सरासरी तापमान २.५ ते ३.७६ अंश सेल्सिअसने वाढलेले आहे. या सर्व कारणांचा विचार करता यास मानवी हस्तक्षेपच मोठया प्रमाणात कारणीभूत असल्याचे दिसून येते. म्हणजेच पर्यावरणाची उपेक्षा जेव्हा मानवाकडून होवू लागते तेव्हा पर्यावरण प्रदुषित होते.

पर्यावरणाच्या संरक्षणाची चळवळ जागतिक पातळीवर निर्माण होत असताना जागतिक पातळीवर विविध उपक्रम राबविले गेले. स्टाकहोम येथे ५ जून १९७२ मध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेल्या पहिल्या जागतिक परीषदेमध्ये औद्योगिक व त्याचबरोबर रासायनिक प्रदुषण, ओझोन वायूचा क्षय रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय,सागरी परिसंस्थांचा समतोल राखण्यासाठी उपाययोजना या बाबीवर विचार विनिमय करून सजीव सृष्टीच्या अबाधित्वासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर एकत्रित कार्य करण्याची गरज व्यक्त केली गेली . या परीषदेनंतर पर्यावरण संरक्षणासाठी जागतिक स्तरावर अनेक परिषदा घेतल्या गेल्या . यामध्ये माट्रेल येथील १९८७ मधील परीषद, ब्राझील येथील १९९२ ची परीषद ,२००७ मधील बाली येथील परीषद, २०१५ मधील पॅरीस परिषद, या सर्व बाबींचा समावेश होतो. जागतिक स्तरावरील प्रयत्नाबरोबरच भारतातील पर्यावरण विषयक प्रयत्नांचाही वाटा महत्वाचा आहे. भारतामध्ये पर्यावरणीय दृष्टीकोनाचे महत्व पर्यावरणाच्या बाबीस राज्यघटनेत दिलेल्या स्थानातून अधोरेखीत होते. राज्यघटनेच्या अनुच्छेद ४८ नुसार शासनाने पर्यावरणाच्या रक्षणासाठी ठोस उपाय योजावेत या उपायांमध्ये पर्यावरणाचे प्रदुषण टाळणे, पर्यावरणाच्या संतुलनासाठी आवश्यक त्या बाबी करणे, यांचा समावेश होतो. भारतामध्ये पर्यावरणाच्या संरक्षणासाठी विविध कायदे संमत केले आहे. यामध्ये १९७२ मध्ये पारीत झालेल्या वन्यजीव संरक्षण कायदयामध्ये जंगलातील वन्य जीवांच्या संरक्षणासाठीचे उपाय, प्राण्यांच्या शिकारी बाबतचे आणि त्यांच्या व्यापार आणि तस्करीबाबतचे प्रतिबंध याबाबींचा उल्लेख आलेला आहे. १९७४ मध्ये जल प्रदूषण प्रतिबंध कायदा संमत केला गेला. याद्वारे नद्या आणि पाणीसाठे यातील प्रदुषण कमी करण्यासाठी आणि त्याबाबतच्या उपाययोजना करण्यासाठी केंद्रीय प्रदूषण मंडळ व राज्यस्तरावर राज्य प्रदूषन नियामक मंडळ यांची स्थापना केली गेली. पाण्याचे विविध मानवी कारणामुळे होणाÚया प्रदूषणास त्यामुळे काही प्रमाणात आळा घालण्याचे काम या मंडळानी केलेले आहे. जल प्रदूषण नियामक मंडळाबरोबरच वनसंवर्धन कायदा १९८० मध्ये अंमलात आला. या कायद्याने जंगलतोड, जंगलातील विविध वनस्पतींची तस्करी याबाबतच्या उपाययोजना केल्या गेल्या . या सर्व कायदेशीर उपायांमध्ये १९८६ च्या पर्यावरण संरक्षण अधिनियमाचे स्थान महत्वपूर्ण आहे. यामध्ये पर्यावरण संरक्षणाच्या उपायांमध्ये विविध दंडात्मक कारवाई करण्यात आली. पर्यावरणाचे रक्षण करण्यामध्ये या कायद्याचे महत्व अनन्य साधारण आहे.

**पर्यावरण शिक्षणाची सद्यस्थिती:-**

पर्यावरण शिक्षणाची संकल्पनेचा उदय हा प्राचीन काळात झालेला दिसून येतो. वराहपुराण . स्कंदपुराण , पद्म पुराण या पौराणिक ग्रंथामध्ये देवदेवतांना प्रिय असलेल्या वनस्पतींची माहिती दिलेली आहे. ऋग्वेदामध्ये विविध ऋचांमधून पर्यावरणाचे आणि सृष्टीचे महत्व विषद केले आहे. जानटर्क यांच्या मते , "पर्यावरण शिक्षण म्हणजे पृथ्वीवरील पर्यावरणाचे आकलन व मानवी जीवनाची पर्यावरणावर असणारा प्रभाव यांचा अभ्यास" डॉ . आर. सी. शर्मा यांच्यामते "विद्यार्थ्यांना पर्यावरणाविषयी ज्ञान देवून त्यांच्या अंगी पर्यावरण संवर्धनाविषयी सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करण्यसाची प्रक्रीया म्हणजे पर्यावरण शिक्षण होय." थोडक्यात, पर्यावरण शिक्षण म्हणजे निरनिराळया विचारांना स्पष्ट करणारी प्रक्रीया असून त्यामुळे मानव आपल्या गरजा ओळखून, समजून घेउन, त्यासाठी आवश्यक कौशल्य, अभिवृत्ती, विकसित करण्याचा प्रयत्न करेल. म्हणजेच पर्यावरण शिक्षण म्हणजे विद्यार्थामध्ये विविध घटकांबाबत जागृती घडवून आणणारा , त्यांना पर्यावरणाबाबत सकारात्मक आणि नकारात्मक कार्य करणाऱ्या घटकांची जाणीव करून देणारा, पर्यावरणाची गुणवत्ता टिकविण्यासाठी मिळविलेल्या ज्ञानाचे उपयोजन करण्याची क्षमता निर्माण करणारा शैक्षणिक उपक्रम म्हणजे पर्यावरण शिक्षण होय. पर्यावरण शिक्षणामुळे पर्यावरणातील विविध घटकाबाबत विद्यार्थ्यांच्या मनामध्ये संवेदनशीलता निर्माण होते. पर्यावरणाच्या हानीबाबत आणि त्यामुळे मानवी जीवनावर होणाÚया त्याच्या संभाव्य परिणामाबाबत विद्यार्थी संवेदनशील राहतो. त्यातून तो स्वता आणि त्यांच्या कौटुंबिक व सामाजिक परिसरामध्ये यामूल्यांचे संक्रमन करतो हे पर्यावरण शिक्षणाचे महत्व होय. त्याचबरोबर पर्यावरणाबाबतची साक्षरता जी भारतामध्ये कमी प्रमाणामध्ये दिसून येते ही साक्षरता प्यावरण शिक्षणातून येते. यामुळे पर्यावरणाबाबतचे संविधानिक बंधन समजून नैसर्गिक साधनसंपत्तीचा काटकसरीने वापर

करण्याची प्रवृत्ती विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होते. महाविद्यालयीन स्तरावर पर्यावरण आणि पर्यावरणीय अभ्यासातून विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती निर्माण होउन विविध पर्यावरणीय समस्यांची कारणमिमांसा आणि उपाययोजनात्मक बाबी यामध्ये संशोधन केले जाते. शैक्षणिक स्तरावर पर्यावरण शिक्षणाचा समावेश करताना प्रामुख्याने स्वतंत्र पर्यावरणाच्या अभ्यासापेक्षा विद्याथ्र्यांमध्ये विविध विषयांच्या सहायाने पर्यावरणाचा आंतरविद्याशाखीय दृष्टीकोण समोर ठेवून अभ्यासक्रमाची रचना केली गेली . यामध्ये मानव्यशास्त्र , जीवशास्त्र, भूगोल, प्राणिशास्त्र, वनस्पती शास्त्र, इतिहास , अर्थशास्त्र, कार्यानुभव, सामाजिक शास्त्र, भाषा या सारख्या विविध शाखा आणि विषयामधून पर्यावरणाचे शिक्षण दिले जाते. महाराष्ट्रामध्ये विविध विषयाच्या माध्यमातून पर्यावरणाचे शिक्षण दिले जाते. शैक्षणिक वर्ष २००६-२००७ पासून इयत्ता ११ वी आणि शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून इयत्ता १२ वी साठी पर्यावरण शिक्षण देण्यात यावे याबाबींचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.

**पर्यावरण संवर्धनामध्ये उच्च शिक्षणाची भूमिका:-**

पर्यावरणाच्या शाश्वत विकासासाठी अनेक उपाययोजना ,कायदे,नियम जागतिक स्तरावर आणि देशपातळीवर केले गेले आहेत. पर्यावरणविषयक जाणीव जागृती आणि पर्यावरण संरक्षणाचे मूल्य रूजण्यासाठी शालेय स्तरावर अभ्यासक्रम आणि अभ्यासक्रम पूरक उपक्रमाच्या माध्यमातून पर्यावरणाचे शिक्षण दिले जात आहे. देशाचे भविष्य घडविणारे तरूण आणि तरूणी जे महाविद्यालयीन शिक्षण घेत आहेत त्यांच्या माध्यमातून पर्यावरणाचा शाश्वत विकास साध्य करता येणे शक्य आहे.

१. महाराष्ट्रामध्ये विविध विद्यापीठांमध्ये पदवी स्तरावर पर्यावरण शिक्षण हा विषय सक्तीचा केला आहे. यातून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना प्रकल्पनिर्मितीच्या माध्यमातून पर्यावरणीय समस्या आणि त्यांचे स्वरूप समजेल. २.महाविद्यालय स्तरावर विविध ज्ञानशाखांमधील विविध विषयांमध्ये पर्यावरणीय दृष्टीकोण आणि मूल्य यांची सांगड घालून आंतरविद्याशाखीय दृष्टीकोण विद्यार्थ्यांमध्ये विकसित करण्याचा प्रयत्न केला आहे. नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार आंतरविद्याशाखीय दृष्टीकोनास महत्वाचे स्थान दिले आहे. ३. उच्च शिक्षणामध्ये अध्ययन अध्यापना बरोबरच संशोधन कार्यास महत्वाचे स्थान आहे. विविध ज्ञानशाखांमध्ये संशोधनामध्ये पदव्युत्तर पदवी , एम. फिल, पीएच. डी यासारख्या अभ्यासक्रमांच्या माध्यमातून पर्यावरणातील विविध समस्यांबाबत संशोधने होत आहेत. यातून स्थानिक पर्यावरणातील समस्या बदल आणि त्यावरील उपाय यांच्या बाबत ज्ञानाची रचना होते. ४.संशोधनाबरोबरच उच्च शिक्षणातून विस्तार कार्य देखील उच्च शिक्षणामध्ये महत्वाचे आहे. मिळविलेल्या ज्ञानाचे उपयोजन समाजामध्ये करणे उच्च शिक्षणामध्ये अभिप्रेत आहे. समाजामध्ये पर्यावरणीय समस्यांबाबत महाविद्यालयांना विस्तार कार्य करता येणे शक्य आहे. ५.महाविद्यालयीन स्तरावर राष्ट्रीय सेवा योजनेतून समाजापर्यंत पर्यावरण विषयी जाणीव जागृती निर्माण करणे शक्य आहे. ग्रामिण भागात वाडया वस्त्यांमध्ये जावून सौर उर्जेचे महत्व,सौर दिव्यांबाबतची जनजागृती, डोंगरी भागामध्ये अजूनही जंगलामध्ये गवत जाळण्यासाठी आणि नवीन गवत उगवण्याच्या गैरसमजूतीतून वनवे लावले जातात या बाबत एन. एस. एस. सारख्या उपक्रमातून जनजागृती करता येईल. पाण्याचा अतिरेकी वापराबाबत तसेच सांडपाण्याच्या व्यवस्थेबाबत जनजागृती करता येणे शक्य आहे. वृक्षारोपनासारखे उपक्रम त्याचबरोबर डोगर दऱ्यांमध्ये सीड बॉल सारखे नाविन्यपूर्ण उपक्रम या बाबींचाही अवलंब करता येणे शक्य आहे. ६. महाविद्यालयात चर्चासत्र ,कार्यशाळा, यासारख्या माध्यमातून राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावरील पर्यावरणातील तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना देवून पर्यावरण विषयी जागृकता निर्माण करता येईल. ७. समाजामध्ये पर्यावरण रक्षणार्थ कार्य करणाया व्यक्ती तसेच स्वयंसेवी संस्था यांची महाविद्यालयामध्ये व्याख्याने/ व्याख्यानमाला आयोजित करून विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याची प्रेरणा देता येईल.

८. भारतामध्ये अनेक उच्च शिक्षण संस्था या स्वायत्त आहेत. यामध्ये अल्पकालीन पर्यावरण विषयक कोर्स विद्यार्थ्यासाठी तयार करून त्याची अंमलबजावणी करता येईल. ९ .पर्यावरणामध्ये परिसरातील स्थानिक प्यावरणीय स्थितीचा त्यातील समस्यांचा आढावा घेउन पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांना कृती संशोधनाच्या माध्यमातून त्यावर उपाय करणे शक्य आहे. १० .महाविद्यालयातील विविध सहशालेय उपक्रम, ,वादविवाद स्पर्धा, निबंध स्पर्धा , यासारख्या उपक्रमांचे आयोजन करून पर्यावरणातील विविध विषयांवर विचारमंथन करता येईल

थोडक्यात, उच्च शिक्षणाच्या माध्यमातून अभ्यासक्रमाबरोबरच इतर अनेक नाविन्यपूर्ण उपक्रमांतून पर्यावरणाचे संवर्धनाचे मूल्य विद्यार्थ्यांमध्ये रूजविता येईल . महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या क्रीयाशक्तीचा योग्य वापर करून पर्यावरणाचा शाश्वत विकास साधता येईल.

**संदर्भ :-**

१. *कुलकर्णी, शि.(२००८). पर्यावरण आणि समाज, पुणे: डायमंड प्रकाशन.*

२. *कुलकर्णी, डी. आर. (२००७) . पर्यावरण शिक्षण, पुणे : विद्या प्रकाशन.*

३. *ढमढेरे एस.व्ही.(२००९). महाराष्ट्रातील जलसंपदा, पुणे: डायमंड प्रकाशन.*

४. *भांडाकर, के. एम.(२०१०) .पर्यावरण शिक्षण ,पुणे: नित्यनूतन प्रकाशन.*

५. *संपादक(मे २०११ ) लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन*

६. *संपादक (ऑ.२०११ ) शेतकरी, महाराष्ट्र राज्य कृषी विभाग.*

७. *http://marathiworld.com/water-need*

# शाश्वत शेती

***प्रा. डॉ. नीता तिवारी***

*अर्थशास्त्र विभाग प्रमुख, श्रीधाबेकर कला महाविद्यालय, खडकी,अकोला,महाराष्ट्र*

**सारांश**

*अधिकाधिक उत्पादन, त्यासाठी महागड्या रसायनांचा व बियाण्यांचा वापर व त्यासोबतीने येणारे धोके ही आधुनिक शेतीची वैशिष्ट्ये म्हटली जातात. मात्र अधिकाधिक उत्पादनासाठी होणारा अत्याधिक खर्च व त्या तुलनेत मिळणारा हमीभाव यामुळे कोलमडणारे गणित शेतकऱ्यांना कर्जबाजारी करते. उत्पादन होते, पण उत्पन्न मिळत नाही, हे वर्षानुवर्षे चालत राहिल्यानेच कर्जातील शेतकरी तग धरत नाही. बाजारधर्मी आधुनिक रासायनिक शेतीने पर्यावरणावर, जीवसृष्टीवर आणि मानवी पोषणावरही विपरीत परिणाम केला. नव्वदीच्या दशकापासून सुरू झालेले आत्महत्येचे सत्र आजही सुरूच आहे, असा निष्कर्ष पर्यावरणप्रेमी व वसुंधरेच्या आरोग्यपोषणाचा वसा घेतलेल्या 'धरामित्र' या संस्थेने विविध अभ्यासातून काढला.*

**प्रस्तावना**

शेती हा व्यवसाय आनंदाचा असु शकतो का? ९९ टक्के शेतकरी याचे उत्तर नकारार्थीच देतात. मी ग्रामिण भागातील शेतकऱ्यांशी संवाद साधतो, त्यांची प्रयोगात्मक शेती पाहतो आणि त्यामध्ये शाश्वततेचा शोध घेतो तेव्हा एक टक्क्यामधील एक जण तरी भेटला तरी याचे समाधान वाटते. प्रत्येक गावात, खेडयात असे शेतकरी आहेत पण आमचा आदर्श तिथपर्यंत जातच नाही. भुतान एक आनंदी शेतीप्रधान देश आहे. शेतीमधील खरा आनंद तेथील शेतकऱ्यांना सापडला. आमचा शोध मात्र अजुनही चालुच आहे. मला सारखे वाटते, प्रत्येक गावात आढळणाऱ्या या एक टक्का आनंदी, समाधानी शेतकऱ्यांचे बाकीच्या शेतकऱ्यांनी अनुकरण करावे यामुळे तरी ही टक्केवारी सहज वाढु शकते.

**विदर्भातील पारंपरिक शेती**

यावर उपाय काय, या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचे प्रयत्न 'धरामित्र' संस्थेचे प्रवर्तक व जैववैज्ञानिक डॉ. तारक काटे व त्यांच्या चमूने सुरू केले. पुस्तकी व पाश्चात्त्य ज्ञानानुभव पुरेसा नाही हे ठरवीत विदर्भातील पारंपरिक शेतीतूनच त्यांनी शेतीच्या अर्थकारणाचा नवा विचार मांडला. आणि शाश्वत (सस्टेनेबल) शेती पुरस्कृत करण्यात आली. कमीत कमी बाह्य़ साधनांचा वापर, अधिकाधिक नव्हे तर पर्याप्त उत्पादन व किमान धोके हा शाश्वत किंवा रसायनविरहित शेतीचा आधार आहे. रासायनिक जैविक संसाधनांचा जास्तीत जास्त वापर, शेतीवरील खर्च कमी करणे व उत्पादनाची स्थायी पातळी गाठणे हे हेतू ठरले. जमिनीचा कस खूपच कमी झाल्याने महागडी बियाणे वापरूनही उत्पादनात फोर वाढ होत नाही. खर्च मात्र वाढतो. शेतजमिनीची सुपीकता जैविक कर्ब ठरावीक प्रमाणात असल्यासच अवलंबून असते. त्याची किमान पातळी एक टक्का हवी. परंतु आपल्या देशात ती ०.४ टक्के एवढी घसरली आहे. कमी पर्जन्य व अधिक तापमान असणाऱ्या महाराष्ट्र, आंध्र प्रदेशसारख्या प्रदेशात तर जैविक कर्बाचे प्रमाण ०.३ टक्क्यापेक्षाही खाली आले आहे. जमिनीचे आरोग्यच हरवले आहे. हे आरोग्य राखण्यासाठी व स्वास्थ्यदायी जमीन करण्यासाठी रसायनांचा वापर करणे बंद करणे आवश्यक ठरले. धरामित्रने केंद्रीय कपार्ट संस्थेच्या माध्यमातून शाश्वत शेतीचा पुरस्कार करणे सुरू केले. यवतमाळ, वर्धा व वाशिम जिल्ह्य़ातील बाराशे एकर शेतीवर प्रयोग झाले. प्रत्येक शेतकऱ्याने त्याच्याकडील जमिनीपैकी एक एकर तुकड्यावर शाश्वत शेती करावी व इतर तुकड्यावरील रासायनिक शेतीशी त्याची तुलना करावी. रासायनिक शेतीवरील खर्च व अरासायनिक शेतीवरील खर्च याची तुलना झाली. पहिल्या शेतीत खर्च अधिक व उत्पादनही अधिक, तर दुसऱ्या शेतीत खर्च नाहीच, पण पुरेसे उत्पादन आले.

शेतीमालाला भाव मिळत नाही म्हणून खर्चात बचत करीत मिळालेल्या उत्पादनात नफा साधण्याचे हे सूत्र सर्वानाच पटले. पण नवी पिढी महागडय़ा बियाण्यांच्या जाहिरातीला फसून रासायनिक शेतीकडे फिरल्याने शाश्वत शेतीपुढे आव्हान उभे झाले होते. मात्र २०१० नंतर भ्रमनिरास झालेला शेतकरी परत कर्जाच्या विळख्यात सापडला. धरामित्रने आर्वी, देवळी व वर्धा तालुक्यांतील अकरा गावांतील चारशे शेतकऱ्यांना शाश्वत शेतीसाठी प्रोत्साहित केले. आज चार वर्षांनंतर यापैकी एकही शेतकऱ्यास शेतीसाठी कर्ज घ्यावे लागले नाही. उलट गाडीसाठी घेतलेले कर्ज शेतीच्या उत्पन्नातून काही फेडू शकले. ३०८ शेतकऱ्यांनी त्यांच्याकडील १ हजार ८३४ एकर शेतीपैकी ५३२

एकरवर शाश्वत शेती केली. त्यांच्यावर कर्ज नसल्याची आकडेवारी धरामित्र निदर्शनास आणते. शाश्वत शेतीत जमिनीचे स्वास्थ्य सुधारण्यावर प्रारंभिक भर दिला जातो. शेतातील बायोमास म्हणजे तुराटय़ा, पाने, फांद्या असा कचरा जाळून टाकण्याऐवजी तो शेतातच कुजवावा. कचरा जाळणे म्हणजे भविष्य जाळणे, असे शेतकऱ्यांना पटवून दिले जाते. तुराटय़ांचा ढीग शेतातच पसरावा. एक पाऊस त्यावरून गेला की त्या नरमतात. त्याच शेतात टाका. निंदण केल्यावर जमा गवताचे पुंजके धुऱ्यावर न टाकता ते जागीच कुजू द्यायचे. हा कचरा उन्हात ठेवल्यास त्यातील नत्र उडून जाते, म्हणून ते सावलीत ठेवायचे. बियाण्यांसाठी सरळवाणाने शेती करायची. आपलेच बियाणे जपून ठेवावे. त्याला गोमूत्र, शेण व वारुळाची माती याच्या मिश्रणाने चोळायचे. बियाणे एकाच वेळी अंकुरतात व किडीचा प्रादुर्भाव कमी होतो. सेंद्रिय कचरा जमिनीतच पुरल्यास जिवाणूंची वाढ होते. पोत सुधारतो. जमिनीत हवा खेळती राहते. जलधारण क्षमता वाढते. धरामित्रने शेतीचे आरोग्य सुधारण्याचा हा मंत्र संशोधनाअंती शेतकऱ्यांना दिला. हायब्रिडऐवजी सरळवाणाचा उपयोग केल्याने बियाण्यांचा घरीच साठा तयार होतो. बाजारावर अवलंबून राहायचे कारण नसते.

दुसरी बाब शेतीत असणाऱ्या उतारावर आडवी शेती साधायची. त्या ठिकाणी चरे खोदून पाणी अडवायचे. तिसरी बाब पिकांची बहुविधता साधण्याची ठरली. केवळ सोयाबिन, कापूस व तूर घेण्याऐवजी अन्य पिकांची मिश्र लागवड केल्यास अधिक फायदा मिळतो. ज्वारी, मूग, उडीद यांची पेरणी केल्यावर उत्पन्नात वाढ झाल्याचे दाखले मिळाले. आदिवासी शेतकऱ्यांमध्ये ही वैविध्यपूर्ण लागवड प्रामुख्याने मिळून येते. या शेतीत किडीचा प्रादुर्भाव कमी होतो. धुऱ्यावर करंजी, कन्हेर, चाफो, कॅक्टस अशा दूध निघणाऱ्या वनस्पतींची लागवड करण्याचे शेतकऱ्यांना सुचविण्यात आले. त्याचा अर्क काढून त्याची फवारणी पिकांवर करायची. तसेच पेरणीत अधातमधात तुळस, एरंजी, झेडूंची लागवड करायची. त्यामुळे किडीचा प्रादुर्भाव होत नाही. ज्वारी, हरभऱ्याचे पीक पाहून बगळयांचे थवे येतात. ते किडे खातात. कीटनाशकाचा खर्च असा वाचविता येतो, हे धरामित्रने दाखवून दिले.

शाश्वत शेतीतून प्रगती साधणारे, एकबुर्जी गावातील उत्तम सलाखे यांची दोन्ही मुले शहरात नोकरी करतात. शाश्वत शेतीतून प्रगती साधणाऱ्या उत्तमराव यांना, त्यांच्या शेतीचे पुढे काय, असा प्रश्न केला. ते म्हणतात, माझ्यानंतर माझी मुलेच परत शेती पाहणार. वर्षाकाठी चार लाखांचे उत्पन्न त्यांना नोकरीतून कुठे मिळते, असा हसत सवाल करणाऱ्या सलामे यांनी धरामित्रचे सेवाग्रामचे शिबीर सात वर्षांपूर्वी अनुभवले. त्यानंतर त्यांनी शाश्वत शेती सुरू केली. कापसाचा हेका सोडला. सोबतच तूर, मूग, उडीद, ज्वारी, हळद, मिरची व बहुवार्षिक आंबा-आवळा लागवड केली. गुरेढोरे पाळली. शेणमूत्र जपले. नवरा-बायकोने पूर्णवेळ देत लक्ष दिले. पहिल्याच वर्षी दोन लाखांचा नफा साधला. विजय गोपाल येथील जीवन बाकल मोठय़ा प्रमाणात फु लझाडे व हळदीची लागवड करतात. वार्षिक चार लाखाचा नफा कमावतात. त्यांच्या मालाची प्रत पाहून ग्राहक स्वत: त्यांच्याकडे धाव घेतात. पाचोडचे राजाभाऊ देशमुख, अनिल वासनिक, रामपूरचे चंद्रभान कंगाली, घाटंजीचे केशवराव डेहनकर, राजाभाऊ कश्यप, सुरेश लांडगे पूर्णपणे शाश्वत शेती करीत समर्थ झालेत.

शाश्वत शेतीचा पुरस्कार करणारे गोविंदस्वामी नमलवार

शाश्वत शेतीचा पुरस्कार करणारे गोविंदस्वामी नमलवार हे एक अफलातून कृषिवैज्ञानिक होते. आयुष्यभर निरनिराळे प्रयोग करून त्यांनी शाश्वत शेतीची संकल्पना रुजवली.

शेतकरी आणि शेतीवर मनापासून प्रेम करणारा संशोधक म्हणजे डॉ. गोविंदस्वामी नमलवार. त्यांचा जन्म तंजावर जिल्ह्यातील इलनडू गावात १० मे १९३८ रोजी झाला. त्यांचे वडील शेतकरी. बालपणापासून नमलवार यांना शेतीची आवड होती. गावात शालेय शिक्षण आणि माध्यमिक शिक्षण पूर्ण झाले. वडील पारंपरिक शेती करत. ते नमलवार पाहात. पुढे त्यांनी अण्णा मलाई विद्यापीठात कृषिशास्त्रातील बी.एस्सी.ला प्रवेश घेतला. १९६३ मध्ये ते कोविलपट्टी विभागीय कृषिसंशोधन केंद्रात रूजू झाले. शेतीचे नवे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम सुरू केले. कापूस आणि बाजरीवर संशोधन केले. रासायनिक खते आणि कीटकनाशकांच्या वापरामुळे खर्चात मोठी वाढ झाली. काही वर्षे उत्पादनही वाढले. मात्र, नंतर उत्पादनात घट झाली. औषधांचा परिणाम होईना आणि शेतकऱ्याचे निव्वळ उत्पन्न घटले. शेतकऱ्यांमध्ये नैराश्य आले. ते आत्महत्या करू लागले.

नमलवार यांनी पारंपरिक शेती तंत्र वापराच्या काही योजना मांडल्या. मात्र वरिष्ठांचा प्रतिसाद मिळाला नाही. भारतीय शेती वाचवायची तर सेंद्रिय शेतीकडे वळले पाहिजे, असे त्यांचे मत झाले. त्यांनी नोकरी सोडली आणि डोमनिक पिअर यांच्या आयलँड ऑफ पिस या स्वयंसेवी संस्थेत कृषिशास्त्रज्ञ म्हणून काम सुरू केले. तमिळनाडूतील तिरूनलवेल्ला जिल्ह्यातील कालकड तालुक्यात प्रयोग सुरू झाले. पिकांचे वाया जाणारे घटक सर्व शेतातील मातीमध्ये मिसळले. हे प्रयोग नवे वळण देणार ठरले. शेतीत आमूलाग्र बदल झाले. कमी खर्च आणि जास्त उत्पादन मिळू लागले. शेतकरी प्रथम स्वयंनिर्भर झाला पाहिजे. स्वावलंबनासाठी शेतकऱ्याला अन्नाबाबत स्वावलंबी बनवले पाहिजे. त्याला स्वत:चे निर्णय घेता आले पाहिजेत. त्यासाठी प्रशिक्षण केले पाहिजे. यासाठी नमलवार यांनी १९७९ मध्ये कुदुंभम ही संस्था स्थापन केली. शेतकऱ्यांना अनुभवातून शिक्षण देण्यास सुरुवात केली. त्यांनी शाश्वत शेतीसाठी रासायनिक खते व कीटकनाशकांचा वापर बंद केला. संकरितऐवजी स्थानिक वाणांना प्राधान्य दिले. हळूहळू सकारात्मक प्रतिसाद मिळू लागला. कीटकनाशकांमुळे पिकांवरील कीड नष्ट होत असे, तसेच किडीवर उपजीविका करणारे जीवही नष्ट होत. पुढे कीड कीटकनाशकांना दाद देत नसे. नैसर्गिक साखळीतील किडीवर जगणारे जीव नष्ट झाल्याने कीड रोखण्यासाठी आणखी महागडी, तीव्र कीटकनाशके लागत. त्यांचा वापर म्हणजे विष. हे विष अन्नघटकांतून प्राण्यांच्या आणि आईच्या उदरात जाते आणि मुलांना विषयुक्त अन्न मिळते. याचे दुष्परिणाम मुलांना आयुष्यभर भोगावे लागतात. ही विचारसरणी राबवणारी लिसा (LEISA) म्हणजेच कमीत कमी बाह्यघटक देऊन शाश्वत शेती (Low External Input and Sustainable Agriculture) ही संस्था स्थापन केली. या संस्थेने पर्यावरणपूरक शाश्वत शेतीचे प्रयोग आणि प्रशिक्षण सुरू केले. त्याचवर्षी त्यांनी पडूकोट्टाई जिल्ह्यात पावसावरील शेतीत प्रयोग करण्यासाठी केंद्र स्थापले. मूळ वाण जतन आणि संवर्धन करणे शाश्वत शेतीसाठी आवश्यक असल्याचे नमलवार सांगत. शेतकऱ्यांनी स्वत: प्रकल्प उभारले आणि नमलवार यांच्या प्रयत्नांना चळवळीचे स्वरूप आले. स्वत: स्थापलेल्या संस्था अन्य लोकांच्या हाती सोपविल्या. तमिळनाडू सरकारने अराईज योजनेच्या समन्वयकपदी त्यांना नियुक्त केले. या निमित्ताने ते देशभर फिरले. विविध प्रयोगांत त्यांनी मार्गदर्शन केले. तमिळमध्ये शाश्वत शेती आणि सेंद्रिय शेतीवर १५ पुस्तके लिहिली. तीन मासिके सुरू केली. विविध संस्थांचे ते सल्लागार होते. त्यांनी सेंद्रिय खते आणि कीटकनाशके तयार केली. हळद आणि कडुनिंबाच्या आंतरराष्ट्रीय लढ्यात भारताची बाजू मांडणाऱ्या गटात ते होते. बौद्धिक संपदेबाबत भारत जागरूक नसल्याची त्यांना खंत होती. गांधी ग्राम, रूरल युनिव्हर्सिटी, दिंडिगलने त्यांना डी.एस्सी. ही पदवी प्रदान केली. ३० डिसेंबर २०१३ रोजी पर्यावरण रक्षणासंदर्भात पुडुकोटी येथे सुरू असलेल्या आंदोलनासाठी जात असताना त्यांचे दुर्दैवी निधन झाले. असा कृषिवैज्ञानिक विरळा..

**मराठवाडयाच्या ग्रामिण भागात शाश्वत शेती करणारा एक शेतकरी**

मराठवाडयाच्या ग्रामिण भागात मी एक शाश्वत शेती करणारा शेतकरी पाहिला,जमिन अदांजे ४० एकर, तसे माळरान, पडीकच मात्र सर्व सलग. शेतातुन एक ओढा जात होता, तोही पावसाळयातच वहात असे. प्रथम त्याने तीन लाख रुपये खर्च करून ओढयाचे रूंदीकरण आणि खोलीकरण केले. तळाला पाषाण होता. ओढा पुढे शेताच्या टोकाला भर टाकुन अडवला. पाउस भरपुर पडला आणि तो नैसर्गिक ओढा तुडुंब भरला. पाषाणाचा फायदा झाला. त्याने या शाश्वत पाण्यावर १२ एकर जमिन 'स्प्रिंकलरने'भिजवली. अजुनही ओढयाचे पाणी पाउस जास्त झाला की भरीवरुन वाहून जातच होते. ऐके दिवशी त्याच्या शेताच्या बाजूने एक 'पोकलेन' जात होते, त्याला थांबवुन, सहज बोलत त्याने मातीची भर दगडाची करुन त्या ओढयाला काटकोनात बांध्याला लागून लहानसा तलाव करण्याची कल्पना त्याला सांगितली. तीन चार तासाचे ते काम 'पोकलेन' ने दोन हजारात करुन दिले आणि ओढयाचे जे पाणी मातीच्या भरीवरुन पलीकडे जात होते ते डावीकडे वळले, खालच्या पाषाणाचा पुन्हा फायदा झाला आणि तलावाच्या रुपाने पाण्याचा दुसरा शाश्वत स्तोत्र तयार झाला, अजुन १० एकर जमिन पाण्याखाली आली. 'स्प्रिंकलर' पध्दती एका ठिकाणावरून दुसरीकडे सहज नेता येते आणि त्याचे शेत सलग असल्याने जवळपास सर्वच जमिन पाण्याखाली आली. पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा सन्मान झाला.

शेती शाश्वत करावयाची असेल तर एक पीक आणि बहुपीक या दोन्हीही पध्दती न वपरता खरिप आणि रब्बी मिळुन चार किंवा पाचच पिके घेण्याची ठरविले. खरिपाचे पीक घेताना रब्बीचे रान मोकळे ठेवायाचे आणि रब्बीचे पीक घेताना खरिपाच्या रानास आराम दयावयाचा. प्रतिवर्षी यामध्ये सुध्दा आदलबदल करावयाची. पीक निवड पध्दतीमध्ये त्याने मका, ज्वारी, हरभरा, तुर आणि सोयाबिनला प्राध्यान्य दिले. रासायनिक खते आणि

किडनाशकांचा अतिशय मर्यादित वापर, शेतामध्ये एकही विहिर अथवा बोर नाही. सालाने गडी नाहीत. सर्व शेती घरीच तो आणि त्याचा मेव्हणा. ट्रॅक्टर स्वत:चे, कर्ज काढुन घेतले आणि कर्ज मुक्तही झाला. मजुरांची मदत फक्त पीक काढण्यापुरतीच. शेतात बांधलेला गोठा, १५-१६ म्हशी, दररोज ४५ लिटर दुध, या शुध्द दुधाची विक्री घरोघर, महिन्याचे गिऱ्हाईक बांधलेले. या पध्दतीने पहाटे ५ ते सकाळ ८ पर्यंत स्वत: दुध पोहचवतो, दररोजचे उत्पन्न अंदाजे अडिच हजार रुपये. दुभत्या जनावरांना पेंडीचा खर्च २०० रू, बाकीचा स्वच्छ नफा, प्रतिदिन एक लिटर दुध घेणारे महिन्यास एक किलो शुध्द तुप काढतात. मी त्याला विचारले "तुप निर्मितीचा विचार आहे का?" उत्तर नकारार्थी होते, दुध विक्री मध्येच मी समाधानी आहे. घरोघरी शुध्द ताजे दुध घालणे यास मी आर्थिक नियोजना बरोबर समाजसेवेची जोड देतो. प्रत्येक वर्षी शेतात ज्वारी असते ती जनावरांना खाद्य म्हणुनच, सोबत हरभरा,सोयाबिन यांचे काड, मका आहेच, तेव्हा वर्षभर चाऱ्यावर खर्च नाही. याशिवाय गोठयातुन त्याला प्रतिवर्षी १५/१६ ट्रॅक्टर भरुन उत्कृष्ट दर्जाचे शेण खत मिळते आणि याचा वापर सर्व पिकांना सम प्रमाणात होतो. काळया आईस रासायनिक खते आणि किड नाशकांचा गंधहिन फुलांचे हार घालुन शेतीचे निर्माल्य करण्यापेक्षा सेंन्द्रिय खताची थोडी सुगंधी फुले जरी वाहीली तरी ती प्रसन्न राहते. सहा बैल आणि तीन गडी होते पण शेतीच गणित चुकू लागले म्हणुन ट्रॅक्टरचा पर्याय यशस्वी झाला. स्वत:च्या शेताबरोबर गरजु शेतकऱ्यांनाही ट्रॅक्टरची मदत होउन दोन पैसे मिळु लागले. लावलेली मका जनावरास चारा आणि दाणे कुक्कुटपालन करणारे घेउन जाउ लागल्यामुळे जागेवरच जास्त पैसे आले. सोयाबिनचे उत्पन्न भरपुर झाले, भाव होता २३०० रू. त्याने सर्व सोयाबिन घरीच ठेवले, आज भाव ३४००रु.आहे. "हरभरा, तुर याची विक्री ऑनलाईन पध्दतीने करणार. नाव नोदंणी केली आहे." जोडधंदा असल्यामुळे हरभरा, तुर सोयाबिनची चिंता नाही. पाण्याची व्यवस्था असल्यामुळे वर्षभर घरचाच भाजीपाला. 'वेळ अमावस्येस' शेतावर सर्वांना जेवणसुध्दा. हे सर्व सांगताना मी शेतकरी आहे याचा अभिमान त्याच्या प्रसन्न चेहऱ्यावर दिसत होता आणि हास्य त्याचे साक्षिदार होते. भविष्यातील योजनाबद्दल त्याच्याकडे आत्मविश्वास होता. पाण्याचा शाश्वत स्तोत्र उपलब्ध असल्याने त्याने आता सोयाबिनच्या जागी उस लागवड करण्याचे ठरविले आहे.

**निष्कर्ष—**

1. शाश्वत उत्पन्न देणाऱ्या शेतीसाठी वहिवाटी खालिल क्षेत्र नेहमी सलग हवे.
2. प्रतिवर्षी खरिप आणि रब्बीचे क्षेत्र वेगळे असावे व त्यात नत्राचा फायदा घेण्यासाठी आलटापालट हवी.
3. शेतात पाण्याचा बाराही महिने शाश्वत स्तोत्र उपलब्ध असावा. ते पावसाचेअडविलेले पाणी असेल तर उत्तम.
4. चार ते पाच पिकांपेक्षा कमी अथवा जास्तीचा हव्यास नको.
5. पिकवलेला माल लगेच बाजारात नेण्याऐवजी दोन तीन महिनेतरी साठवुन ठेवण्याची क्षमता हवी.
6. रासायनिक खते आणि किटकनाशकांचा मर्यादित वापर हवा.
7. शेतीस जोडुन वर्षभर चालणारा जोडधंदा असावा.
8. वर्षभर मजुरावर अवलंबुन राहु नये.
9. मर्यादित शेतजमिन असेल तर आधुनिक तंत्रज्ञानास पारंपारिक शेतीची जोड असावी.
10. शेतामध्ये शाश्वत शेणखताचा सर्व पिकास नियमीत वापर हवा
11. मर्यादित अपेक्षा ठेवल्यावर शाश्वत शेती भरपुर उत्पन्न देते, आपली झोळी मात्र मजबुत हवी. फक्त पाउसावर, कर्जावर,सालकरी आणि मजुरांच्या भरोशावर आणि अनुदानावर अवलंबुन असलेली शेती जोडधंदा नसेल तर शाश्वत होण्याची शक्यता अतिशय धुसर असते.

**संदर्भ—**

*1.www.loksatta.com शाश्वत शेती:नव्वदीच्या दशकापासून सुरू झालेले आत्महत्येचे सत्र आजही सुरूच आहे: प्रशांत देशमुख, वर्धा ,2एप्रिल 2017*

*2.www. navdrushti.org अशीही एक शाश्वत शेती: डॉ. नागेश टेकाळे,6जुलै2018*

*3.www.maharashtratimes.com शाश्वत शेतीचा वाटाड्या: डॉ. व्ही. एन. शिंदे,04 ऑगस्ट 2018*

# जलसंपत्तीचे महत्व, समस्या व उपाय

**प्रा. माने आर.व्ही.**
*अर्थशास्त्र विभाग, देशभक्त संभाजीराव गरड, महाविद्यालय, मोहोळ.*

**प्रस्तावना :-**

*मानवाला उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधन संपत्तीमध्ये पाणी ही एक प्रमुख साधन संपत्ती आहे. मानवी जीवनात पाण्याचे महत्व अनन्यसाधारण आहे. पृथ्वीचा जपळपास 3/4 भाग पाण्याने व्यापला आहे. हवेप्रमाणे पाणी हे मानवास जगण्यासाठी आवश्यक आहे. पाणी हे मानवासाठीच नव्हे तर प्राणी, पशु, पक्षी यांच्या वाढीसाठी व देशाच्या आर्थीक, विकासासाठी आवश्यक आहे. जसजशी लोकसंख्या वाढत गेली, तसतसा पाण्याचा वापर वाढत गेला. परंतू दुसऱ्या बाजूला पाण्याची टंचाई गंभीर होत आहे.*

**उद्दीष्टे :-**

1. भारतातील पाणी टंचाई समस्येचा अभ्यास करणे.
2. पाणी टंचाई समस्येवर उपायाचा अभ्यास करणे.
3. लोकांमध्ये पाण्याविषयी जगजागृती निमार्ण करणे.
4. जलव्यवस्थापन निती आढावा घेणे.

**माहिती संकल्प व संशोधन पध्दती :-**

प्रस्तूत शोधनिबंधासाठी दुय्यम साधा सामुग्रीचा वापर करण्यात आला आहे. तसेच विविध सदर्भग्रंथ, इंटरनेट, वर्तमानपत्र इ. साहाय्याने माहितीचे संकलन केले आहे.

**व्याख्या :-**

पाण्याचे प्रमाण त्याची उपयोगिता व उपभोग यांचा शासकीयदृष्टया अभ्यास करुन ते योग्य प्रमाणात उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने केलेले नियोजन म्हणजे जलव्यवस्थापन होय.

जलसंपत्ती महत्व :-

पाण्याला जीवन असे म्हणतात. वनस्पती, प्राणी व मानव यांच्या जीवनाचा आधार पाणी आहे.

**पाण्याचे उपयोग :-**

1.शेतीसाठी एकूण पाण्याच्या वापरापैकी 70% पाणी शेतीसाठी वापरतात.
जलसिंचनामुळे शेतीचा विकास झालेला आहे.

2.जलवाहतूक हे वाहतूकीचे सर्वात स्वस्तातले साधन आहे. नद्या, समुद्र, सागरी मार्ग इ. वापर जलवाहतूकीसाठी केला जातो.

3.घरगुती वापर घरात पिण्यासाठी, कपडे धुण्यासाठी, भांडी-धुणी धुण्यासाठी, शौचाच्यासाठी पाण्याचा वापर केला जातो.

4.मासेमारी व पर्यटन क्षेत्र, तळे, नदी, समुद्र इ. जलाशयात मासेमारी व्यवसाय केला जातो. समुद्रकिनारी बिच विकसीत झाले आहेत.

5.कारखाने, उद्योगधंदे चालविण्यासाठी पाण्याचा वापर केला जातो.

महाराष्ट्र शासनाचे जलधोरण :-

1960 मध्ये बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली सिंचन आयोगाची स्थापना करण्यात आली. या समितीने 1960 मध्ये आपला अहवाल सादर केला. 1995 मध्ये माधव चितळे यांच्या अध्यक्षतेखाली दुसऱ्या जलसिंचन आयोगाची स्थापना करण्यात आली.

**पाणी टंचाई कारणे :-**

भारतात सध्या वाढती लोकसंख्या, शेतीच्या प्रमाणात वाढ, कारखानदारी जलप्रदुषण, बदलते हवामान अशा अनेक कारणामुळे पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. ती कारणे खालील प्रमाणे आहेत.

**कारणे :-**

1. पाण्याची वाढती मागणी
2. पाण्याचा उपसा
3. राजकीय संघर्ष
4. पाणी प्रदुषण
5. बदलते हवामान
6. वाढती लोकसंख्या
7. वृक्षतोड
8. रासायनिक खताचा अतिरेकी वापर यामुळे जमिनीत पाणी मुरणे कमी होत आहे.
9. शासनाची सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यातील उपासिनता.

**जलसंपत्ती संवर्धनासाठी उपाययोजना :-**

1.नव्या जलस्त्रोतांचा शोध घेणे.
2.पाणी वाया जाऊ न देणे.
3.वनीकरण करणे व त्यामुळे बाष्पीभवन कमी होण्यास मदत होईल.
4.प्रदुषण कमी करणे.
5.भू-जलाचा जादा उपसा न करणे.
6.शाश्वत पाणी साठे निर्माण करणे.
7.जलयुक्त शीवार मोहिम राबवणे.
8.पाण्याचे जमिनीतील पूर्नभरण किंवा पूर्नवापर प्रमाणे वाढवणे.
9.पाणी अडवा पाणी जिरवा मोहिम राबवणे.
10. नद्या जोड प्रकल्प राबवणे.

**सारांश :-**

जलव्यवस्थापन ही काळाची गरज आहे. भारत हा देश विकासाची स्वप्ने पाहत असताना देखील मोठया प्रमाणात जलव्यवस्थापन करणे गरजेचे आहे. या मध्ये प्रत्येक नागरिकांचा समावेश असणे गरजेचे आहे. लोकांच्या प्रयत्नातून जलव्यवस्थापन प्रभावी पध्दतीने करता येते.

**संदर्भ:-**

*1. World Bank (1991) "Irrigation Sector Review," World Bank-Government of India, India Water Resources Management Sector Review, Volume I- Main Report, New Delhi.*
*2. Agarwal, A. and Sunita Narain (eds.) (1997) Dying Wisdom: Rise, Fall and Potential of Traditional Water Harvesting Systems in India, 4th Citizen's Report. New Delhi: Centre for Science and Environment*
*3. Ballabh, V. and Katar Singh (1997) "Competing Demands of Water in Sabarmati Basin: Potential and Future Conflicts," Paper presented at the ICIPD conference on water, Amsterdam, Netherlands, October 11-17.*
*4. Mane Santosh P., and Amol S. Shinde. "A Study Changing Pattern of Rain Water Harvesting Management An Ancient To Modern Age In India-Geographical Analysis." Review of Research 3.10 (2014).*

# परळी तालुक्यातील कृषी घनता: एक भौगोलिक अभ्यास

**श्री. कैलास भास्कर लव्हाळे[1] डॉ.व्ही.एस.चिमनगुंडे[2]**

*[1]संशोधक, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय,लातूर*

*[2]मार्गदर्शक, श्री संत जनाबाई कला वाणिज्य, व विज्ञान ,महाविद्यालय,गंगाखेड,जि.परभणी*

**सारांश:**

*देशाच्या विकासात कृषी क्षेत्र महत्वाचे कार्य बजावत आहे. भारतात मोठ्या प्रमाणात कृषीवर आधारित व्यवसाय केले जातात. त्यामुळे देशातील ६७% लोकसंख्या कृषीवर आधारलेली आहे. आधुनिक काळात शेती करण्याच्या पद्धती बदललेल्या आहेत. त्यामुळे कृषी क्षेत्र अधिकाधिक विकसित झालेले दिसून येते. सुरुवातीच्या काळात स्थलांतरीत शेती केली जात होती. नंतर उदरनिर्वाह शेती करण्यात येत होती. पण आजच्या आधुनिक काळात शेतीकडे एक व्यवसाय म्हणून पाहिले जाते. म्हणूनच शोधनिबंधात कृषी घनता या घटकाचा अभ्यास केला आहे.*

***बीजसंज्ञा** : कृषी, मंडळ निहाय कृषी घनता.*

**प्रस्तावना:**

कृषी हा मानवाच्या आर्थिक प्रक्रियेतील सर्वात प्राचीन व्यवसाय आहे. कृषी व्यवसाययामुळे मानवाचा अन्नाची प्राथमिक गरज भागविली जाते. अनेक उद्योगधंद्यांना कृषी क्षेत्रातून कच्चामालाचा पुरवठा केला जातो. त्यापासून तयार होणारा पक्का माल जागतिक बाजारपेठेत पाठविला जातो. म्हणूनच कृषी व्यवसायास मानवी जीवनाचा पाया असे म्हणतात.

कृषी यालाच इंग्रजीत Agriculture असे म्हणतात. Agriculture ही संज्ञा लॅटिन भाषेतील Agricultura या शब्दापासून तयार झाली आहे. यातील Ager म्हणजे Area (क्षेत्र) व cultura म्हणजे to cultivate (करणे) असा होतो. यापासून Agriculture हा शब्द तयार झाला.

**अभ्यास क्षेत्र:**

परळी तालुका मध्यपूर्व महाराष्ट्रात आणि बीड जिल्ह्याच्या पूर्वेस आहे-.परळी तालुका १८ ४१'33" उत्तर अक्षांश ते १९ ७'४६" उत्तर अक्षांश आणि ७६ १४'२७" पूर्व रेखांश ते ७६ ४१'४४" पूर्व रेखावृत्त दरम्यान विस्तारलेला आहे.

परळी तालुक्याच्या दक्षिणपूर्व गंगाखेड तालुका तसेच पूर्वेस सोनपेठ व पाथरी तालुक्याच्या सीमा आहेत. तर परळी तालुक्याच्या दक्षिण पश्चिमेस अंबाजोगाई तर उत्तर दिशेस माजलगाव आणि पश्चिमेला धारुर तालुक्याचा सीमा आहेत. परळी तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ ७३७.९९ चौ.की.मी.आहे. त्यामध्ये १०५ ग्रामीण वस्ती १ नागरी केंद्र व ५ मंडळाचा समावेश आहे.

**उद्दिष्टे :**

१} परळी तालुक्यातील एकूण कृषी घनता अभ्यासणे.

२} परळी तालुक्यातीलक कृषी घनता मंडळ निहाय अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती व आधार सामग्री संकलन:**

परळी तालुक्यातील कृषी घनतेचा अभ्यास करण्यासाठी दुय्यम स्वरूपाच्या आधार सामग्रीचा वापर केला आहे.दुय्यम स्वरूपाच्या आकडेवारीसाठी बीड जिल्ह्याचा कृषी अहवाल व बीड जिल्हा आर्थिक सामाजिक समालोचन सन २००१ व २०११ यातून माहिती संकलित केली आहे.


**विषय विवेचन:**

कृषी घनता काढण्यासाठी त्या प्रदेशातील शेती व्यवसायात गुंतलेल्या लोकांची संख्या व त्याच प्रदेशातील एकूण शेती खालील क्षेत्र माहिती असणे आवश्यक असते. कृषी व्यवसायात गुंतलेल्या लोकांची संख्या व कृषी खालील एकूण क्षेत्र यांचे गुणोत्तर म्हणजे कृषी घनता होय.

**अभ्यास क्षेत्रातील मंडळनिहाय कृषी घनता:**

| | | २००१ | | | २०११ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र** | **महसूल मंडळ** | **कृषी व्यवसायात गुंतलेली लोकसंख्या** | **कृषी खालील क्षेत्र चौ.कि.मी** | **कृषी घनता** | **कृषी व्यवसायात गुंतलेली लोकसंख्या** | **कृषी खालील क्षेत्र चौ.कि.मी** | **कृषी घनता** |
| १ | सिरसाळा | २३२२७ | १५२ | १५३ | २८९५२ | १५२ | १९० |
| २ | पिंपळगाव | २४८४७ | १२३ | २०२ | ३१९९६ | १२३ | २५३ |
| ३ | नागापूर | २१७३७ | १२८ | १६९ | २९४३७ | १२८ | २२९ |
| ४ | परळी | ६७९०६ | ४२ | १६१६ | ८४८०९ | ४२ | २०१९ |
| ५ | धर्मापूर | १९६०९ | १०२ | १९२ | २६८१४ | १०२ | २६२ |
| एकूण तालुके | | १५७३२६ | ५४७ | २८७ | २११२०८ | ५४७ | ३६७ |

साधनसामग्री :बीड जिल्हा आर्थिक सामाजिक समालोचन अहवाल सन २००१-२०११




अभ्यास क्षेत्रातील कृषी घनतेचा अभ्यास केला असता २००१ च्या जनगणनेनुसार परळी तालुक्याची एकूण कृषी घनता २८७ व्यक्ती प्रति चौ.कि.मी होती. तर २०११ च्या जनगणनेनुसार परळी तालुक्याची कृषी घनता ३६७ व्यक्ती प्रति चौ.कि.मी एवढी आढळून येते.

२००१ च्या जनगणनेनुसार परळी मंडळात सर्वात जास्त १६१६ व्यक्ती प्रति चौ.कि.मी एवढी कृषी घनता होती. कारण त्या ठिकाणी कृषी खालील जमिनीचे प्रमाण कमी व लोकसंख्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे कृषी घनता अधिक आढळून येते. यामध्ये वाढ होवून २०११ साली कृषी घनता २०१९ व्यक्ती प्रति चौ.कि.मी वाढलेली दिसून येते. २००१ च्या जनगणनेनुसार सर्वात कमी कृषी घनता सिरसाळा मंडळात १५२ व्यक्ती प्रति चौ.कि.मी दिसून येते. तर २०११ साली देखील १९० व्यक्ती प्रति चौ.कि.मी एवढी कृषी घनता पाहावयास मिळते.

**निष्कर्ष:**

१) अभ्यास क्षेत्रात कृषी वर आधारित लोकसंख्या अधिक आहे.

२) परळी मंडळात कृषी खालील क्षेत्र कमी प्रमाणात आहे.

३) अभ्यास क्षेत्रातील कृषीवर सांस्कृतिक घटकांचा प्रभाव आहे.

४) सिरसाळा मंडळात मोठ्या प्रमाणात डोंगराळ प्रदेश असल्या कारणाने कृषी खालील क्षेत्र कमी आहे.

**उपाययोजना:**

*ISBN 978-81-947698-8-0 Peer Reviewed International Book Chapter, 28th February 2021*

१) अभ्यास क्षेत्रात आधुनिक कृषीचा विकास होणे गरजेचे आहे.

२) सिरसाळा मंडळात जलसिंचन सुविधा उपलब्ध करणे.

३) अभ्यास क्षेत्रात कृत्रिम जलसाठे निर्माण करणे.

४) अभ्यास कृषी विकासासाठी कृषी महाविद्यालय निर्माण करणे.

**संदर्भ:**

*१) डॉ. विजया साळुंखे, २००३ कृषी भूगोल, शेठ पब्लिकेशन, मुंबई*

*२) जसबीर सिंग, १९९४ कृषी भूगोल, दिल्ली*

*३) कृषी अहवाल, कृषी कार्यालय परळी*

*४) सामाजिक व आर्थिक समालोचन बीड जिल्हा*

*५) बीड जिल्हा गॅझेटीयर*

*६) बीड जिल्हा जनगणना अहवाल २००१ व २०११*

# दलित जीवनाचा भाष्यकार : शंकरराव खरात

***प्रा. डॉ. सोनवले राजकुमार रंगनाथ***
*देशभक्त संभाजीराव गरड, महाविद्यालय, मोहोळ.*
*Email- rajkumars.rs२८@gmail.com*

*शंकरराव रामचंद्र खरातांचा जन्म ११ जुलै १९२१ रोजी आटपाडी येथे झाला. हे मराठी लेखक, कादंबरीकार व इतिहासकार होते. ते आंबेडकरी चळवळीतील एक सिध्दहस्त लेखक. त्यांचे 'तराळ-अंतराळ' हे आत्मकथन प्रसिध्द आहे. 'मी स्वत: महात्मा फुले, शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविचारांचा शिष्य आहे' असे ते नेहमी म्हणत असत. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलकगुरु होते. इ.स. १९५८ ते १९६१ या काळात 'प्रबुध्द भारत' या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरु केलेल्या नियतकालिकांचे त्यांनी संपादनही केले. इ.स. १९८४ साली जळगाव येथे संपन्न झालेल्या 'मराठी साहित्य संमेलनाचे' ते संमेलनाध्यक्ष ही होते. माडगूळकर व खरात हे आटपाडीचेच त्यामुळे त्या दोघांचे जिव्हाळयाचे संबंध होते.*

*'शंकराण्णा तुम्ही असाच साहित्य लेखनात जोर केला पाहिजे. आपण पुढं एकदा माडगुळलाच साहित्य संमेलन घेऊ' असे सांगून माडगूळकरांनी खरातांना प्रोत्साहीत केले आहे. त्यांच्या प्रमाणे प्र.के.अत्रे, शिरीष पै, प्रा. गंगाधर गाडगीळ, शंकर पाटील, अरविंद गोखले, द.मा. मिरासदार इत्यांदीनी लेखनासाठी उत्तेजन दिले. पुढे इ.स. १९५७ मध्ये वयाच्या पस्तीसाव्या वर्षी त्यांची नवयुग दिवाळी अंकात 'सन्तूची पडीक जमीन' ही पहिली कथा प्रसिध्द झाली. त्यानंतर रामा महार, बंडा मांग, अशा बलुतेदारांच्या बारा कथा नवयुग दिवाळी अंकात प्रसिध्द झाल्या. खरातांनी घटनाप्रधान, व्यक्तीप्रधान मनोविश्लेषणात्मक, समुहदर्शी अशा सर्व प्रकारचे लेखन केले आहे. त्यांच्या कादंबरी लेखनापेक्षाही कथा लेखन मौलिक विविधतापूर्ण व सर्वश्रेष्ठ असे आहे.*

*१९५९ साली प्रसिध्द झालेल्या 'बारा बलुतेदार' या कथासंग्रहाने त्यांना 'सम्यक दलित जीवनाचा चित्रणकर्ता कथाकार' म्हणून प्रसिध्दी मिळवून दिली. त्यांच्या कथेने विविध अपेक्षीत मुक्यास्तरांना बोलके करुन त्यांच्या सामाजिक दु:खाचे पहिल्यांदा दर्शन घडविले, म्हणून त्यांची कथा वास्तव, समाजसन्मुख म्हणून अधिक प्रत्ययकारी वाटते.*

त्यांचे कथा साहित्य :-

कथासंग्रह :- १) बारा बलुतेदार (१९५९), २) तडीपार (१९६१), ३) सांगावा (१९६२), ४) टिटवीचा फेरा (१९६३), ५) सुटका (१९६४), ६) दौंडी (१९६५), ७) गावशिव (१९७०), ८) आडगावचे पाणी (१९७०), ९) लिलाव, १०) मुलाखत, ११) माझं नाव इत्यादी.

शंकरराव खरातांचा 'बारा बलुतेदार' हा त्यांचा पहिलाच कथासंग्रह आणि श्री. म.माटे यांच्या 'उपेक्षीतांचे अंतरंग' या दोन्हीमध्ये गावगाडयातील बलुतेदारांचेच दर्शन घडते. दोन्ही कथासंग्रहातील कथांचे स्वरुप व्यक्तीचित्रणात्मक आहे. गावगाडयातील बलुतेदारांचे दुःख, दैन्य, दारिद्रय, उपासमार, अन्याय, अत्याचार, जुलूम, बलात्कार, खून इत्यादींचे चित्रण दोन्ही ठिकाणी येते. तरी ही खरांतांची पात्रे परंपरेने चालत आलेल्या बलुत्यांना आव्हान देतात. नव्या व्यवसाय धुंडाळण्यात ते व्यस्त आहे, धडपडत आहे. हा एक प्रकारे पारंपारिक समाजव्यवस्थेविरुध्द बंडाचा, विद्रोहाच हुंकार आहे.

"बारा बलुतेदार" म्हणजे जुन्या ग्रामव्यवस्थेचे आधार असलेल्या महार, मांग, रोमोशी, कुंभार, चांभार, कोळी, परीट, सोनार, लोहार, सुतार, गुरव यांच्या जीवनाभोवती कथा होत. 'रामा महार' या कथेतील त्यांचे दुःख म्हणजे तो ज्या स्तरातून आला आहे, त्या स्तराचे दुःख आहे. 'गावात मला जगायचं आहे, म्हणून मला गावकीचं काम टाळता येत नाही' असे म्हणणाऱ्या रामा महारला तापानं तडफडणाऱ्या पोराला तसेच टाकून टपाल देण्यासाठी तालुक्यास जावे लागते. पोटापाण्यासाठी मूल गमावून बसलेला रामा महार या बलुतेदारांचा प्रतिनिधीच वाटतो.

त्याच्या मनातील प्रक्षोभ त्याला गप्प बसू देत नाही. तो पाटलाला म्हणतो, 'का एवढा सरकारी गाडा माझ्याच्यानं आडलाय, माणसाला काय दु:ख हाय का न्हायं? मागं सारखं काम काम काम' असे म्हणून रामा आपल्या स्तरावरील जीवनाचे दु:ख अधीक बोलके करतो. तसेच पांडू लोहार, नाना न्हावी, दामू परीट इत्यादी व्यक्तीचित्रणे प्रभावी चितारलेली आहेत. 'मरुस्तवर काम करुन ही नाचारपण हटीना देवा कधी हे नाचारपण हाटेल का?' हे दामूच्या आईचे उद्गार मनाला वेदना देऊन जातात. अशी ही माणसं गावकीच्या कामाल विटलेली आहेत, पण या व्यवस्थेविरुध्द आवाज न करणारी. त्यांच्या हतबल जीवनाचे नेमके दु:ख चित्रण खरातांनी केले आहे.

'आबा रामोशी' या कथेत खोटी नाटे रिपोर्ट करुन फौजदार दलितांना जेरीला आणून आपला कार्यभाग साधतो. त्याचे येथे चित्रण येते. जया तरणी आणि ती मनात भरली म्हणून फौजदार आबा रामोशी भोवती फास टाकतो आणि जयावर तो बलात्कार करु पाहतो. यावर खरात एवढेच लिहीतात की, 'रामोशाच्या पोटी जन्माला येणे हा गुन्हा झाला होता' हा त्यांचा अभिप्राय केवढा प्रभावी, गंभीर आहे! पण रामोशालाही अब्रु आहे आणि त्याच्या अब्रुला कुणी हात घातला तर त्याचाही चेंदामेंदा रामोशाला करता येतो, असे खरात सांगतात, अशी ही कथा विद्रोही आवाज देवून जाते. आपल्या उघडया धडंग पोराबाळींची अंगे झाकण्यासाठी 'बाभळीचे काटे' मधील जामा व 'हड्डी' मधील हेडयाची बायको चोरी करताना पकडली जाते पण ते चोरीचे समर्थन न करता शिक्षा भोगतात. भूक व अगतिकता ही लेखकांनी आपल्या कथेतून परिणामकारकपणे व्यक्त केली आहे. अशाच सुटका, पंचनामा, तहान, पाणी, इत्यादी कथा परिणामकारक आहेत. 'भामटा' कथेतील धन्या म्हणतो, 'काम दया, म्हणून दारोदार हिंडतो जातीचे नाव ऐकल्या-ऐकल्या माणूस माझ्याकडं खालीवर बघतं अन् 'पुढच्या दारी जा' म्हणतं, मग आता पुढं कुठं जावं' यातून लेखक समाजव्यवस्थेकडे निर्देश करतात. अस्पृश्यतेचे निर्मुलन झाले पाहिजे, अशा घोषणा झाल्या. पण गावगाडयात दलितांना 'माणूस' म्हणून जागा नाही. पुन्हा तीच मारझोर, स्त्रीयांच्या अब्रुची लूट, वेठबिगारी, उपाशी पोटं आणि तोच तो पराभव!

'तडीपार' हा १९६१ साली प्रसिध्द झालेला कथासंग्रह त्यात वेगवेगळया भटक्या, गुन्हेगार जमाती, धंदेवाले या जमातींचे जग साकारले आहे. उचल्या, कोकरु उचलून आणतो आणि निवांत कोकराचे कडाण खातो. तडीपारीचे जीवन जगणाऱ्या या माणसांना नैतिकतेची कोणतीच बंधने नसतात. त्यांना जगायचं आहे एवढं माहित असते. पशुपातळीवर जीवन जगणाऱ्या या माणसांना भावना असतात पण दुसरा कोणताच उपाय नसतो, म्हणून ते गुन्हा करतात व शिक्षाही बिनतक्रार भोगताना दिसतात. त्यामध्ये बेलदार, कैकाडी, फासेपारधी, वडार, भामटे, वैदू, कोल्हाटी, नंदीवाले, मांग-गारुडी, माकडवाले इत्यादी सगळे येतात. या सर्वांना कुठे मोकळा श्वास घेवून जगता येते? कारण ते दैववादी आहेत. जे भोग वाटयाला आले आहेत, त्याबद्दल ते एवढेच बोलतील की 'आपुला जन्मच असा' अन मगं माळरानासारखे गप्पगार पडतील.

'वडार' या कथेत स्वत:चे घर उभे करणार हनमा वडार एक सुरुंगाच्या स्फोटात निधन पावतो. देवीचा बोल ऐकण्यासाठी अंगात देवा आलेल्या माणसाच्या भोवती माणसाचा घोळका जमतो. अंगात देवी आलेला भक्त जमिनीवर हात आपटून म्हणतो ' तू नवं घरं बांधलंस, पण माझी जत्रा केली नायं, माझ्या दारात रक्त का शींपडल नाय? बोल बोल' हे चित्र लेखक रंगविताना त्यातून दलित, मागास माणसाचा अडाणीपणा व त्यांची अंधश्रध्दा अभीव्यक्त होते. 'भंडारा' कथेत वर्षाचा गाव भंडारा. त्यात अख्खे गाव जेवते. देवाच्या दारात पंगती पडतात आणि सगळा गाव खिरीचा पोटभर प्रसाद घेवून तृप्त होतो पण सर्व पंगती जेवून उठल्यावर महार-मांग-व्हरलाची पंगत बसते. दामा महार कंटाळलेल्या आपल्या पोरांना सांगतो की, आपण त्येंचा अगेदर न्हाय जेवायचं, आईच्या मनात येत असते की, आता कवा आमच्या पंगती बसायच्या अन कवा हेला खीर मिळायची. अखेर पंगतीला खीरीऐवजी वाटयाला येते ते गुळवण्याचे गोड पाणी. कारभारी नानाला 'सगळं पॉट ढॅम भरलं पाण्यानं?' असे दामा महार उत्तर देतो तेव्हा मन अस्वस्थ होतं. अशाच 'दौंडी, देवीचा कोप, वडार, कथा परिणामकता घडवून आणतात ती काळजाला भीडणाऱ्या घटनांच्या चित्रणामुळेपण खरातांच्या लेखणीत असे बळ नाही की, त्यांची कथा अतिरसोत्कट व्हावी.

त्यांचा मूळ स्वभावच कोमट, सौम्य आहे. बागुलाप्रमाणे त्यांच्या ह्या कथा जळजळीत, विद्रोहाचा लोळ घेवून अंगावर येत नाहीत.

खरातांच्या कथामध्ये स्वातंत्र्यानंतर बदललेल्या खेडयाचेचित्रण येते. नव्यानेच सत्ता हाती आलेले पंच, सरपंच, सभापती, झेडपीवाले मंत्री त्यांच्या कृतीउक्तीतील अर्थशून्यतेसह कथापटावर मांडतात. 'आडगावचं पाणी' १९७० साली प्रसिध्द झालेल्या या संग्रहातील बऱ्याच कथा या बदलत चाललेल्या खेडेगावच्या आहेत. साळा मास्तरीन, गरामसेविका, सरपंचाच्या घरी का म्हणून राहणार असा सवाल करणाऱ्या पंचांनी एक तडजोड म्हणून म्हटलं की ही गरामसेविका आपल्या प्रत्येक पंचाच्या घरी एक-एक महिना राहिल अन सरपंचाच्या घरी दोन महिने. पण घडले मात्र असे की, वयानं निम्मी झालेली, काळी कुळकळीत दात पुढे आलेली, गरामसेविका पारांचे लटांबर घेवून आली. तेव्हा सरपंच म्हणतो, ' सेक्रेट्री, म्होरच्या बैठकीच्या अनजिंडयावर आमाला ही गरामसेविका नको, असा पहिला ठराव घ्या' आडगावचा विकास कसा घडला त्याचे रहस्य सरपंच सांगतो ते असे सुधारणा घडल्या हे कोंबडीच्या जीवावर त्यामुळंच तर कामाच्या रकमा भराभर मंजूर झाल्या आणि कामाल वेग आला. (साहेब, बाकी आपला शेरा तेवढा राहिलाय)

'गावशिव' कथासंग्रहात आपल्या अंगभूत पारंपारिक कलाज्ञानावर कशीबशी गुजराण करणाऱ्या माणसांच्या कथा आहेत. पोमराज, जोगतीन, आरादी, मुरळी, चित्रकथी, जोशी, वासुदेश, शेलार, गोंधळी, बहुरुपी, इ. सर्व अंगाच्या कलागुणांवर जगणारी माणसे पण कोणत्याच गावी स्थिर न राहणारी वारा पाठीवर घेवून पोट जिकडे घेवून जाईल तिकडे जाणारी, भटकी माणसे!

दामा पोतराजाने आपल्या भक्तीच्या जोरावर देवीला  शीगेवर पोह्चविले म्हणून आक्रित करणारा सारा गाव आहे. परंतू देवीचा गाडा शीवेवर आनंदानेच नेवून सोडला होता, हे गाला माहित नव्हते. 'मी मैनाची लेक आहे. जोगतिणीची नाही' असे म्हणणारी जोगतिणीची लेक शीला आहे. देवीचा आरादी म्हणतो, 'माणूस हा डोंगी अन सोंगी प्राणी हाय. तो तऱ्हेतऱ्हेची सोंग आणून आपलं पोट भरतो' तर आपली जवानी भंडाऱ्यासारखी उधळणारी मुरळी 'माणूस दगड सगळेच दगड' असे ओरडत मी देवावर दगड फेकत राहते.' खरातांनी रंगविलेला चित्रकथी म्हणतो, 'मी एकटाच मिळवता घरी चार-पाच खाणारी पोरं, त्यात कसं भागायचं? यादिसात पारं तरी अर्धा कोर भाकरी खाऊन जगू दया. आम्ही आपलं नवरा-बायको काढतो उपासतापास, ढकलतो येळ पुढं' गोसाव्याचे निपुत्रिक कुटुंब वाटेवर पडलेल्या मुलाला सांभाळते व पोलीस मात्र तू मूल पळवून आणलसं की नाही, असे दरडावीत या अश्राप कुटुंबाला मारझोर करतात. गावारीवेवरच्या माणसांची दु:ख खरात अतिशय परिणामकारक रीतीने व्यक्त करतात. लेखकांनी वस्तुनिष्ठ दृष्टीकोन ठेवून दलित जीवनाचे विदारक दु:ख चित्रीत केलेने स्वाभाविक वाटते. लेखक एखादी पोज घेवून त्यातून स्वत:ची मने वा भाष्य मांडीत नाही. म्हणून त्यांच्या कथा हृदयस्पर्शी वाटतात. पग त्यांच्या कथेत विद्रोह दिसत नाही. बंडाची भाषा व समाज परिवर्तनाची वा क्रांतीची चेतनाही क्वचितच येते नंतरच्या 'बहिष्कार', 'वाटसरु', ह्या त्यांच्या नाही म्हणायला विद्रोही स्वरुपाच्या आहेत. धर्मांतरामुळे नवा तरुण 'जोहार' म्हणण्याऐवजी आता 'जय भीम' म्हणतो. 'बहिष्कार' मचीळ सा स्वाभीमानी नाना आपल्या बापाला म्हणतो 'आपण माणूस आहोत. आपण मढयाची लाकडं का आणायची. आपण मेलेली ढोरं का ओढायची? मी ही मेलेल्या आईचं दुध प्यालो नाही, दहा जणाचा मुडदा पाडीनं तेव्हाच जीव सोडीन!' पण हा आवाज खरापण स्वाभाविक वाटत नाही. खरातांचे कथाविश्व बहिष्कृतांच्या व्यथा वेदनाच वास्तव जीवनाला मुखर करणारे आहे. जीवनाचे दर्शन घडविणे हाच त्याचा हेतू आहे. त्यामूळे मूठी वळविणे हा प्रकार त्यांच्या कथेत नाही. म्हणून गंगाधर पाननावणेंचे मत विचारात धेणे आवश्यक वाटते. ते म्हणतात की, 'खरात हे कथाकार की कादंबरीकार असे कुणी विचारले तर मी कथाकारांच्या रांगेत त्यांचे स्थान निश्चित करीन' (विद्रोहाचे पाणी पेटले आहे पृ.९५) दलित जीवनाचा प्रामाणिक आविष्कार घडविणाऱ्या खरातांच्या बहुविध कथांनी मराठी कथेचे दालन अधिकच समृद्ध केले आहे. हे नाकारता येत नाही.

*ISBN 978-81-947698-8-0 Peer Reviewed International Book Chapter, 28th February 2021*

**संदर्भ ग्रंथ**

१) फडके भालचंद्र - दलित साहित्य वेदना आणि विद्रोह, श्रीविद्या प्रकाशन पुणे, आ.डिसेंबर १९७७

२) लिंबाळे शरणकुमार - दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र, दिलीप राज प्रकाशन पुणे व्दि.आ. २००४

३) बागूल बाबुराव - दलित साहित्य आजचे क्रांती विज्ञान, दिशा प्रकाशन, नाशीक व्दि.आ. २००४

४) डॉ. पाननावणे गंगाधर - विद्रोहाचे पाणी पेटले आहे

५) डॉ. योगेंद्र मेश्राम सेवा - दलित साहित्य उदगम आणि विकास, श्रीमंगेश प्रकाशन, नागपूर १९९८

# ग्रामीण कवितेतील शेतकरी जीवनाचे चित्रण

***प्रा.उघडे सुहास मुरलीधर***
सहयोगी प्राध्यापक, वसुंधरा कला महाविद्यालय, जुळे सोलापूर

प्रास्ताविक ;-

जागतिकीकरणानंतर भारतीय समाजाला मोठे धक्के सहन करावे लागले आहेत. सर्व समाजजीवन ढवळून निघाले आहे. भौतिक सुविधांचा सुळसुळाट झाला. जीवनशैली बदलली नीतिमूल्यांचा ऱ्हास होत गेला. शहर आणि ग्रामीण परिसराच्या सीमा पुसट होत गेल्या, मोठ्या प्रमाणात चंगळवाद फोफावला आहे. या जागतिकीकरणाचे परिणाम आता स्पष्टपणे दिसू लागले आहेत. शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. कामगार बेरोजगार झाला आहे. शिक्षणाचे बाजारीकरण झाले आहे. छोटे छोटे उधोगधंदे बंद पडले आहेत. एकंदरीत हे जागतिकीकरण केवळ भांडवलदाराचे उखळ पांढरे करणारे आहे. हे सगळयांना कळून चुकले आहे. जगाचा पोशिंदा शेतकरी आत्महत्या करू लागला. भांडवलदार धार्जिणे शासनकर्ते आणि संवेद्नहीन काही प्रशासकीय अधिकारी यांची आत्महत्याग्रस्त शेतकर्यांच्या बद्दलची सहानुभूती संपली आहे काय ? यामुळे कवी नारायण सुमंत उपरोधात्मकपणे लिहितात,

अध्यक्ष महोदय | हा तारांकित प्रश्न भरपूर विनोद
आणि मनोरंजन करणारा वाटतो | अध्यक्ष महोदय
कृषिप्रधान राष्ट्रात | शेतकऱ्यांनी आत्महत्या करायची नाही
तर मग कुणी ?

संवेद्नहीन राजकीय नेते खूप मग्रूर झाले आहेत. ऐकमेकांवर कुरघोडी करण्यासाठी मुल्यांची टर उडवीत आहेत. या पार्श्वभूमीवर देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय मोहोळ यांनी परीसंवादाचे आयोजन केले आहे. ही बाब कौतुकास्पद आहे.

**शेतकऱ्यांचे दु:ख**

शेतीप्रधान देश अशी भारताची ओळख आहे. कर्तेसुधारक क्रांतीज्योती महात्मा फुले हे ग्रामीण साहित्याचे प्रेरणास्थान आहेत. शेतकऱ्यांचे दु:ख, दारिद्र्य, दास्य, याला अज्ञान कारणीभूत आहे. असे ठणकावून सांगणारे महात्मा फुले केवळ शेतकऱ्यांचे दु:खाचे वर्णन अथवा चित्रण करीत नाहीत, तर उपाय सुचवितात. सर्वच स्तरावर शेतकऱ्यांचे शोषण होत आहे. शेतकऱ्यांच्या या स्थितीला निसर्ग जितका जबाबदार आहे, तितकाच स्वतः शेतकरी देखील जबाबदार आहे. अशा शेतकऱ्यांचे दु:ख, अठरा विश्व दारिद्र्याचे वर्णन करताना कवी प्रकाश होळकर लिहतात

पाठीपोटाला बांधून आली दु:खाची वरात
किती पदराला गाठी सारा अंधार घरात

शेतकऱ्यांना कोणत्या अवस्थेत जगावे लागते. त्यांचे दु:खाचा अंत होणार आहे की नाही असा प्रश्नच व्यवस्थे समोर मांडला आहे. मुलभूत गरजा भागविताना त्यांची होणारी तगमग कवीने प्रगट केली आहे. भारतातील शेतकरी कर्जात जन्माला येतो आणि कर्जातच मरतो हे भयाण वास्तव कोणी नाकारूच शकत नाही. कर्जबाजारीपण हे त्यांच्या आयुष्याला गोचीडाप्रमाणे चिकटले आहे. या प्रसंगाचे वर्णन करताना कवी प्रकाश होळकर लिहतात

दीन दुबळा बनला त्यांचा ताठा खानदानी
युगायुगाचा हा दाता जाला येड्यापिशावानी

शेती निसर्गावर अवलंबून आहे. त्यामुळे शेतकऱ्याला निसर्गाचा लहरीपणा सहन करण्याशिवाय पर्यायच नाही. त्यामुळे शेतकऱ्याला आर्थिक संकटाचा सामना करावा लागतो. फाटक्या संसाराला सांधण्यासाठी तो काही पशु-पक्षीपालन करीतो.

शेतकरी आणि प्राणी जीवन

शेतकऱ्यांच्या उपेक्षित जीवनामध्ये त्याचा एकनिष्ठ जोडीदार बैल आहे. बैल हा शेतकऱ्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे शेतकरी मोठ्या आनंदाने बैल पोळा हा सण साजरा करतो. बैलपोळा हा दिवस शेतकऱ्याच्या जीवनातील आनंदाचा क्षण आहे. तो बैलांचे प्रती आपले प्रेम व्यक्त करतो. शेतकर्याची कारभारीण बैलांची पूजा करते आणि शेतकरी गावातून बैलांची वाजवत मिरवणूक काढतो. कवी कल्याण कदम ' पोळा ' कवितेत लिहितात

नवसाचे ग माझे नंदी वाही कुनबीकीचा भार

येता संकट जिव्हारी देती धन्याला आधार
न्या हो जपून पवळयाला नंद्या अवखळ भार

शेतकरी त्याने पाळलेल्या प्राण्यांवर जीवापाड प्रेम करतो. दुभती जनावरे, कोंबड्या,निष्ठावान कुत्री हे सारे त्याची संपत्ती आहे. हे सर्व पशु-पक्षी त्याला आर्थिक हातभार लावतात आणि शेतीच्या मशागतीसाठी मेहनत करतात.

शेतकऱ्याचा आधारस्तंभ त्याची पत्नी

शेतकऱ्याचे जीवनात त्याचे बरोबरीने काबाड कष्ट करणारी . अखंड मेहनत करणारी, स्वतःचे दु:ख,वेदना बाजूला सारून प्रत्येक प्रसंगात साथ देणारी, धीरदेणारी,त्याची पत्नी त्याचा शेतातील जोडीदार आहे. तिच्या त्यागा बद्दल कौतुक करताना तो म्हणतो

कवतिकी माझी माया तिला दंडाच लुगड
उन्ह पावसात न्हान साऱ्या आयुष्याची झंड

प्रचंड कष्ट करणारी आणि कधीही आपल्या सुखाचा विचार न करणारी ,पदोपदी संकटाचा सामना करणारी ही कारभारीण सोशिक आहे. तिचे आयुष्य म्हणजे फक्त फरफटच आहे. आपल्या यातना व्यक्त करताना ती म्हणते

कुठ दगड मिळणा, माझ नशीब घासणा

प्रयत्नवाद संपल्यानंतर दैववादाकडे ती वळली आहे. आपल्या या स्थिती बद्दल ती कोणासही दोष देत नाही. जागतिकीकरणाच्या नंतर खूप शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. कर्जबाजारी धन्याने आत्महत्या केल्यानंतरचे दु:ख कवी प्रकाश होळकर यांनी चित्रित केले आहे.

घर गेले दर गेले नुसता नुसता वारा
कोण वेढी वेचित बसली आयुष्याच्या टीचल्या गारा

प्रकाश होळकर यांनी भयंकर स्वरूपाचे वास्तव शब्दबद्ध केले आहे. अशा दारुण परिस्थितीत शेतकऱ्याची कारभारीण मोठ्या हिम्मतीने कुटुंबाचा आधार बनते आहे.

शिक्षणाची ज्ञानगंगा शेतकऱ्याचे गावोगावी पोहचली यामुळे खूप मोठ्या प्रमाणात उच्चशिक्षण घेतलेल्या काही तरुणांनी गावची नाळ तोडली आहे. शहरी वातावरणामुळे ते आई-वडिलां पासून दुरावले याबद्दलची खंत व्यक्त करताना कवी फ.ह.शाहाजिंदे लिहतात

हामिबी जरा येडझवेच हाव
पोरगा शिकला रे शिकला की
नोकरीला लावायचं बगताव
नवकरीत जाऊन ते कडूबी खुर्चीवर बसला
की त्येनबी बामनासारका व्हतय

हे जळजळीत सत्य कवीने मांडले आहे. मुलगा साक्षर झाल्याचा आनद आहे, परंतु तो कुटुंबाच्या आणि समाजाच्या किती उपयोगाचा असा प्रश्न कवीने उपस्थित केला आहे. थोडक्यात शेतकऱ्याला अनंत यातना सहन कराव्या लागतात. त्यामुळे उपरोधात्मक शैलीत नारायण सुमंत लिहितात

डोन्ट वरी | अजूनही फास घेण्यापुरते का होईना
एखादे तरी झुडूप | शिल्लक आहे प्रत्येक बांधावर
हेही विहंगम दृश्य| उगवतीच्या सोनेरी किरणात
पहायला मिळेल तुलाही सहस्त्रका !

आजही शेतकऱ्याची अवाजवी मागणी नाही. ते म्हणतात आम्ही पिकविलेल्या शेत मालाला किमान हमी भाव मिळालाच पाहिजे.

**निष्कर्ष**

१] शेतकरी आशावादी आहे.
२] शेतकरी सोशिक आहे.
३] निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकरी अडचणीत येतो .
४] शेतकरी आपल्या दु:खाचे प्रदर्शन करीत नाही.
५] कर्जबाजारी शेतकरी शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे आत्महत्या करीत आहे.
६] जागतिकीकरणामुळे देशातील शेतकरी उध्वस्त झाला आहे.

*ISBN 978-81-947698-8-0 Peer Reviewed International Book Chapter, 28th February 2021*

७] शेतकरी आणि त्याची कारभारीण पाळीव प्राण्यांवर अपत्यवत प्रेम करतात
८] ग्रामीण कवितेतील शेतकर्यांचे जीवन दु:खाने भरलेले आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१] डॉ. महेंद्र कदम ' कवितेची शैली ' – भूमी प्रकाशन,पुणे

२] डॉ. हेमलता गायकवाड 'आधुनिक मराठी ग्रामीण कविता एक अभ्यास' फडकेप्रकाशन ,कोल्हापूर

३] संदीप काळे , ' सुरुवातीच्या कविता ' – नीहारा प्रकाशन, अहमदनगर

४] शिवाजी मिरगळ, ' काळीमाय ' – पारख प्रकाशन , बेळगाव

५] योगीराज माने, ' रानशीळ ' – भूमी प्रकाशन ,लातूर

६] उत्तम बावस्कर, ' हिरवी पहाट ' – प्रमोद प्रकाशन , वैजापूर

# जालना जिल्ह्यातील शेती व शेती पुरक व्यवसायाचा एक -भौगोलिक अभ्यास

***प्रा.डॉ. भाऊसाहेब सोनाजी देवकर***

*संत रामदास महविद्यालय (भूगोल विभाग),घनसावंगी,ता.घनसावंगी जि.जालना.*

सारांश (Abstract) :

*जालना जिल्ह्यातील शेती व शेती पुरक व्यवसायाचा अभ्यास करत असताना असे निदर्शनास येते की, जालना जिल्ह्यात बहुतांशी खरीप प्रकारच्या पिकांची जास्तीत जास्त प्रमाणात उत्पादन क्षेत्रात विभागणी केल्याचे दिसते. याबरोबर शेळया, गाई,म्हैशी इत्यादि साठी उत्तम चारा व बियाणे मिळेल या हेतूने शेती व्यवसायाबरोबरच बंदिस्त शेळीपालन व्यवसाय अतिशय महत्त्वाचा मानला जातो. जमिनीची नैसर्गिक उत्पादकता आणि मानवी प्रयत्नातून वाढवण्यात आलेली उत्पादकता यात फरक आहे. जालना जिल्ह्याचा आर्थिक विकास आणि कृषी अर्थव्यवस्था याविषयी चिंतन करताना एकीकडे जमिनीची उत्पादकता वाढविणे आणि दुसरीकडे उद्योगाची विविधता विचारात घेऊन त्यांची संख्या वाढविणे व त्यात वाढत्या लोकसंख्येला रोजगार मिळवून देणे ही जालना जिल्ह्यात आर्थिक विकासा करिता प्रमुख गरज आहे.*

*जमिनीची उत्पादकता वाढत असेल व त्यात सातत्याने वाढ होत असेल तर आर्थिक विकास झाला आहे. होत आहे असा निष्कर्ष काढता येतो. मानवी प्रयत्नातून आर्थिक विकास होतो हे स्पष्ट झाल्यानंतर या आर्थिक विकासाचे मोजमाप कशे केले जाते. याचा विचार करणे गरजेचे आहे. उद्योगांची वाढती संख्या महत्वाची नाही तर त्यांच्यातील विविधता, अत्याधुनिक साधनसामग्रीचा वापर, रोजगार क्षमता या सर्वांचा विचार करून आर्थिक विकासाचे मोजमाप करता येते. जालना शहरा सारख्या ठिकाणी संरचनात्मक उद्योगात वाढ झालेली आहे. जसे की लोह, पोलाद, सिमेंट, खाद्य उत्पादन,कापड उद्योग ,साखर उद्योग ,सूतगिरणी याबरोबर कृषीपूरक उद्योग फार मोठ्या प्रमाणात वाढत आहेत.*

*जालना जिल्ह्यातील हवामान परिस्थितीनुसार काही भागांमध्ये उत्तम प्रकारे बागायती शेती केली जाते तर काही भागांमध्ये जिरायती शेती करण्यास ही अडचण निर्माण झालेली दिसून येते.मराठवाड्यातील बाजारपेठेच्या दृष्टीने महत्त्वाचा असणारा हा जिल्हा शेती क्षेत्रात ही अग्रगण्य असायला हवा परंतु वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळे जालना जिल्ह्यातील शेतकरी व पशुधन अनेक प्रकारच्या समस्येने ग्रासलेले दिसून येते.*

**बीजसंज्ञा** (Keywords): *शेती पूरक व्यवसाय ,दूध उत्पन्न, साखर उद्योगाची प्रगती,उपक्रमशीलता,कृषी प्रक्रिया उद्योग व उद्योगांचे प्रकार,ग्रामीण विकासातील स्थान.*

## प्रस्तावना (Introduction) :

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये जालना जिल्ह्यातील शेती व शेती पुरक व्यवसायाचा तसेच उद्योगधंद्यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये उपयुक्त माहिती सादर करत असताना दुय्यम माहिती स्त्रोताचा उपयोग करण्यात आलेला आहे. जालना जिल्ह्यातील शेती क्षेत्राचा विचार पाहता मराठवाड्यातील जालना जिल्ह्यामध्ये लोप पावत चाललेली ग्राम संस्कृती जपण्याचा प्रयत्न कृषी पर्यटन व्यवसायाच्या माध्यमातून केला जात आहे. जालना जिल्ह्यातील कृषी क्षेत्राचा अभ्यास करत असताना असेच निदर्शनास येते की, जालना जिल्ह्यात बहुतांशी खरीप प्रकारच्या पिकांची जास्तीत जास्त प्रमाणात उत्पादन क्षेत्रात विभागणी केल्याचे दिसते. याबरोबरच जालना जिल्ह्यातील बागायती क्षेत्रामुळे केवळ आर्थिक वृद्धी होत नाही. तर आर्थिक विकास हा प्रति व्यक्ती उत्पन्नातील वाढ होणे हा असावा. हा आर्थिक विकासाचा एक मापदंड आहे. ज्या देशाचा प्रति व्यक्ती उत्पन्नातील हिस्सा जास्त असतो तो देश विकसित देश म्हणून ओळखला जातो. परंतु आपल्या मर्यादित उत्पन्नातून त्या देशातील जनता आपल्या विविध गरजा कशा प्रकारे भागवते याची आकडेवारी गोळा केल्यास प्रतिव्यक्ती उपभोगाचा अंदाज घेता येतो.

आज जालना जिल्ह्यातील उद्योजक कोणत्या प्रकारच्या उद्योगाची निवड करीत आहेत यावरून त्यांची उपक्रमशीलता कशी आहे याचा बोध होतो.

## अभ्यास क्षेत्र (Study Area) :

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासा करिता अभ्यास क्षेत्र म्हणून संपूर्ण जालना जिल्ह्यातील शेती व शेती पुरक व्यवसायाचा विचार करण्यात आलेला आहे. 2011 च्या जनगणने नुसार जालना जिल्ह्याचे क्षेत्रफळ 7687.39 चौरस किलोमीटर आहे.जालना जिल्ह्यातील एकूण तालुके आठ आसून यामध्ये

*ISBN 978-81-947698-8-0 Peer Reviewed International Book Chapter, 28th February 2021*

भोकरदन,जाफ्राबाद,जालना,बदनापूर,अंबड,घनसावंगी,परतूर व मंठा हे आहेत. जालना जिल्हा मराठवाडा विभागातील, महाराष्ट्र राज्याच्या मध्य भागात आहे. हे 190-15' ते 200-32' उत्तर अक्षांश आणि 750-36' ते 760-45' पूर्व रेखांश दरम्यान स्थित आहे. महाराष्ट्र राज्याच्या 02.50% क्षेत्रफळ जालना जिल्ह्याचे आहे.

जालना जिल्ह्यात शहरी भागाने 1.38% म्हणजे 106.16 चौरस किलोमीटर क्षेत्रफळ व्यापले आहे. व ग्रामीण भागाने 98.65% म्हणजेच 7581.23 चौरस किलोमीटर क्षेत्रफळ ग्रामीण भागाने व्यापले आहे. जालना जिल्ह्यातील 967 गावांपैकी 958 गावे वस्ती असलेली व 9 गावे ओसाड आहेत. जिल्ह्याच्या उत्तर भागात सातमाळा डोंगराच्या उपरांगा असून या उपरांगा जिल्ह्यात पूर्व पश्चिम पसरलेल्या आहेत. यांची उंची अतिशय कमी आहे. तसेच जालना,अंबड तालुक्यातील लहान-लहान डोंगर टेकड्या दिसून येतात. जालना जिल्ह्याची लांबी व रुंदी उत्तर-दक्षिण 150 कि.मी. व पूर्व पश्चिम 110 कि.मी. आहे जिल्ह्याची समुद्रसपाटी पासूनची सरासरी उंची 534 मीटर आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे (Objectives) :**

1.वर्तमान परिस्थितीमध्ये दूध ,दुधाचे पदार्थ यांचे उत्पादन वाढून शेतकऱ्यास चांगला पैसाही मिळेल व शेती व्यवसाय आर्थिकदृष्ट्या समृद्ध होण्यास मदत होईल.तसेच अवेळी होणारी अतिवृष्टी तर कधी अति दुष्काळ या प्रचंड समस्येवर उपाय शोधण्यासाठी प्रस्तुत शोधनिबंधामध्ये अभ्यास करण्यात आलेला आहे.

2.जालना जिल्ह्यातील पशुधन व शेती व्यवसायाचा बाजारपेठेच्या दृष्टीने महत्त्वाचा असणारे कृषी प्रक्रिया उद्योग व शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योगांचे प्रकार सांगून त्यांचे ग्रामीण विकासातील स्थान अभ्यासणे.

3.जालना जिल्ह्यामध्ये साखर उद्योगाची प्रगती वेगाने झाली असून यावरून शेतकऱ्यांचे भविष्य खरोखरच उज्वल आहे व त्यासाठी लागणारा कच्चामाल कारखान्याच्या परिसरात मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. याचाही अभ्यास करणे.

4.कृषी उद्योग ग्रामीण भागातील कृषी व्यवस्थेला प्रेरणा देणारे असल्यामुळे अर्थव्यवस्थेतील सर्व विभागाची प्रगती व कृषी उद्योग यांच्यामधील समन्वयाचा अभ्यास करणे.

**गृहितके (Hypothesis) :**

1.कृषी प्रक्रिया उद्योग ग्रामीण भागाचा विकासात, ग्रामीण भागातील बेकारी व दारिद्र्य दूर करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात.

2.शेतमालावर प्रक्रिया करणारे अनेक उद्योग जालना जिल्ह्यात आहेत व त्यांचे ग्रामीण विकासामध्ये आर्थिक योगदान आहे हे स्पष्ट करणे.

3.भविष्यात यांच्यामुळे रोजगारांची समस्या कमी होईल जलयुक्त शिवार, शेततळे, शेती विषयक शासकीय योजना यामुळे जलसिंचन सुविधा प्राप्त झाल्याने फळबागायती क्षेत्रातील शेती उत्पन्न वाढत आहे.

4.शेतीमालावर प्रक्रिया करणारे उद्योग निर्माण झाल्यास ग्रामीण भागातील लोकांना
रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होतील.तसेच भाजीपाला, फळे, दूध यासारख्या
नाशवंत वस्तूवर प्रक्रिया करणारे उद्योगा मुळे शेतकऱ्यांचा आर्थिक फायदा होईल.

**माहिती स्त्रोत व संशोधन पद्धती (Research Methodology) :**

प्रस्तुत जालना जिल्ह्यातील शेती व शेती पुरक व्यवसाय या शोधनिबंधाच्या अभ्यासा करिता प्राथमिक व दुय्यम साधन सामग्रीवर आधारित माहिती संकलित केलेली आहे. दुय्यम साधन सामग्री, प्रकाशित जनगणना अहवाल, संदर्भ पुस्तके, विविध लेख, नियतकालिके व दर्जेदार मासिकात प्रसिद्ध झालेले लेख.वार्षिक शासकीय अहवाल, वेब जाळे (संकेत स्थल) इत्यादींचा संदर्भ साहित्य म्हणून वापर केलेला आहे. प्रस्तुत शोध निबंधाच्या अभ्यासात जालना जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन सांख्यिकीय माहितीच्या आधारे विविध प्रकारची माहिती संपादन करून, संग्रहित केलेली माहिती विश्लेषणासाठी उपयोगात आणली आहे. शासकीय अहवाल व मासिके वृत्तपत्रे आधारावर विश्लेषण निदर्शनास आले. इत्यादींचा संदर्भ साहित्य म्हणून वापर केलेला आहे.द्वितीयक सामुग्रीच्या आधारावर प्रस्तुत संशोधन निबंधात विश्लेषण करण्यात आलेले आहे.संशोधनातील निष्कर्ष हे उद्दिष्टावर आधारित असून विश्लेषण व निष्कर्ष यावरच काढलेले आहेत व त्यानुसार शिफारशी दिलेल्या आहेत.

**विषय विवेचन (Subject Analysis) :**

जालना जिल्ह्यातील शेती व शेती पुरक व्यवसायाचा प्रस्तुत शोध निबंधात अभ्यास विश्लेषण करत असताना असे निर्दर्शनास आले कि, जालना जिल्ह्यातील जमिनीच्या बहुतांश भागातील मृदा अग्निजन्य खडकापासून तयार झालेली असून ती काळी, चुनखडीयुक्त व कमी-जास्त खोलीची तसेच निरनिराळया पोताची आहे. यामध्ये जालना जिल्ह्यातील भोकरदन,जाफराबाद, जालना, बदनापुर तालुक्यांमधील काही ठिकाणी जमिनी हलक्या प्रतीच्या व मुरमाड आहेत. यामध्ये प्रामुख्याने खरीपाची पिके घेतली जातात तसेच जालना जिल्ह्यातील जिल्ह्याच्या दक्षिण व दक्षिण पूर्व भागातील गोदावरी नदीच्या पट्ट्यामध्ये अंबड, घनसावंगी, परतूर व मंठा या तहसील मधील गोदावरी नदी परिसरातील जमीन वजनदार काळी व सुपीक आहे. ही जमीन उत्पादना करिता व इतर बागायती पिका बरोबरच कापूस,ऊस, केळी ,सोयाबीन , बटाटे, अद्रक, मोसंबी, डाळिंब, द्राक्षे पिके घेतली जातात. ही जमीन वनस्पतीस पोषक अन्न पदार्थ भरपूर प्रमाणात पुरवते.

जालना जिल्ह्यातील जमिनीचे हलके, मध्यम,भारी असे वर्गीकरण केले जाऊ शकते. जालना जिल्ह्यामध्ये नदी खोऱ्याच्या किनाऱ्यावरती लगतची जमीन खोल, काळी व सुपीक आढळते. जिल्ह्याच्या उत्तर भागात विहिरी खोदल्या जाऊ शकत असल्या तरी जमिनीतील पाण्याची पातळी खोल असून भूगर्भातील पाणी अल्प प्रमाणात असल्याने या ठिकाणी बारमाही पिके घेतली जाऊ शकत नाहीत.म्हणून हंगामी घेतली जातात.जालना जिल्ह्यामध्ये सरासरी वार्षिक 501.30 मिलिमीटर पाऊस पडतो.

दूध व दूध उत्पादनातून खात्रीशीर उत्पन्न मिळविण्यासाठी व शेतीचे कामे करण्यासाठी जनावरांची जोपासना आवश्यक असते.शेतकऱ्यांनी या पशुधनाच्या निगराणी कडे अधिका- अधिक गांभीर्याने लक्ष देण्याची आज गरज निर्माण झालेली आहे.आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या वर्तमान स्थितीत कृषी अवजारा बरोबरच कृषी क्षेत्रात अधिकचा आर्थिक हातभार लागण्यासाठी दुध उत्पादनाच्या माध्यमातून पशुधन यांचा विचार करणे गरजेचे आहे. अनेक शेतकऱ्यांना अत्यंत कमी शेती असल्यामुळे ते शेतकरी आर्थिक अडचणीत व नैसर्गिक आपत्ती मध्ये सापडतात. अतिवृष्टी तर कधी अति दुष्काळ या प्रचंड समस्येमुळे शेतकऱ्यांना पशुधनाकडे पुरेसे लक्ष देता येत नाही.

पशुधनाकडे दुर्लक्ष केल्याने जनावरांची प्रकृती बिघडते व त्यांच्यावरील उपचारासाठी वेळ व पैसा खर्च होतो.त्यामुळे गाय, म्हैस, बैल ,शेळया, मेंढ्या, कोंबड्या हे केवळ पशुधन नसून शेतकऱ्यांसाठी आर्थिक वरदानच आहे. म्हणून ते महत्त्वाचे आहे.शेतकऱ्यांच्या व पशुपालकांच्या सोयीसाठी सरकारने पंचायत स्तरावर जनावरावरील उपचारासाठी चिकित्सालय सुरू केली आहेत. प्रत्येक गावांमध्ये संकलित वासरांचे मेळावे घेण्यात येऊन त्यात या पशुधनाचे महत्व पटवून देण्याचे काम पशुधन विभागामार्फत केले जात असते. जनावरांच्या आरोग्याची काळजी घेण्याकरिता शेतकरी व पशुपालकांना शासनातर्फे विविध प्रकारच्या सेवा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. या सेवा खालीलप्रमाणे दिसून येतात.

लसीकरण, खच्चीकरण, शस्त्रक्रिया, औषधोपचार, बियाणे वाटप, ठोंबे वाटप, कुकुट पालन प्रशिक्षण, तलंगा गट वाटप, नर कोंबडी वाटप, एक दिवसाची पिल्लू वाटप, कृती शिबिरे, वासरांचे मेळावे, शेतकरी प्रशिक्षण, दुग्ध उत्पादन ,वैरण भूखंड वाटप, अंडी विक्री.इत्यादी प्रकारच्या शेतकरी व पशुपालकांना शासनातर्फे उपलब्ध सेवा आज दिसून येतात.कृत्रिम वेतनातून जनावरांची संख्या वाढ होणे या गोष्टींना आता प्राधान्य दिले जाते. जनावरांची संख्या वाढली की त्यांची उत्पादकताही वाढते.म्हणून मराठवाडा हा नियमित पावसाचा प्रदेश नसल्यामुळे शेतकरी व पशुपालक पशुधन याकडे अपेक्षित लक्ष देऊ शकत नाहीत. यामुळे जनावरांची संख्या कमी होते व जेव्हा जनावरांची गरज असते तेव्हा ते जनावर आपल्या उपयोगी पडत नाही म्हणून कृत्रिम रेतन हा त्यावरील हमखास उपाय आहे.दूध उत्पादनाबरोबरच दुधाकरिता जर्सी, होल्स्टिन या जातीचे तर म्हशीच्या सुरती, मुऱ्हा या जातीचे प्रामुख्याने कृत्रिम रेतन होते.

मराठवाड्यामध्ये औरंगाबाद विभागात दरवर्षी सरासरी दोन लाख कृत्रिम रेतन होते. यामुळे 60 हजार संकरित वासरे नर - मादी जन्माला येतात.भारत देश दुधाच्या उत्पादनात पहिल्या क्रमांकाचा देश असून या दृष्टीने विचार करता आपण पशुधनाकडे पुरेशा गांभीर्याने बघत नसतानाही आपण दुधाचे एवढे उत्पादन करू शकतो आणि त्यातून शेतकऱ्यांना चांगला आर्थिक हातभार लागलेला आहे.तरी पण भारतातील शेतकऱ्यांची पशुधना कडे बघण्याची दृष्टी आणखी सकारात्मक झाली तर दूध ,दुधाचे पदार्थ यांचे उत्पादन वाढून शेतकऱ्यास चांगला पैसाही मिळेल व शेती व्यवसाय आर्थिकदृष्ट्या समृद्ध होण्यास मदत होईल.

जालना जिल्हा – शेती क्षेत्र :

जालना जिल्ह्यातील शेतीवर अतिरिक्त लोकसंख्येचा ताण कमी करण्यासाठी शेती प्रक्रिया उद्योगामुळे याभागात बचत संस्था उभ्या राहतात त्यातून शेतकऱ्यांना बचतीची सवय लागते. नवीन साखर कारखान्यांना परवानगी देताना आर्थिक परिस्थिती, कच्च्या मालाची उपलब्धता आणि भविष्यात मिळणाऱ्या ऊसाची शक्यता या गोष्टीचा विचार करण्यात येतो.

**जालना जिल्हा :क्षेत्र ( हेक्टर मध्ये ) वर्ष: 2011**

| अ.क्र. | तालुका | एकुण भोगोलिक क्षेत्र | जंगलव्याप्त क्षेत्र | शेतीला उपलब्ध नसलेले क्षेत्र एकुण | पडीत जमीन व्यतिरिक्त लागवड न झालेली एकुण जमीन |
|---|---|---|---|---|---|
| 1 | भोकरदन | 117742 | 685.04 | 6669.41 | 3204.71 |
| 2 | जाफ्राबाद | 72450 | 373.28 | 5399.28 | 1742.47 |
| 3 | जालना | 116845 | 1432.61 | 8553.38 | 4408.19 |
| 4 | बदनापूर | 77809 | 2488.72 | 5066.49 | 2326.66 |
| 5 | अंबड | 115949 | 1381.53 | 4935.6 | 3142.24 |
| 6 | घनसावंगी | 111894 | 2094.79 | 5661.39 | 2398.83 |
| 7 | परतूर | 737660 | 14.6 | 4671.88 | 586.26 |
| 8 | मंठा | 82283 | 616.24 | 4635.71 | 636.57 |
| **एकुण** | | **768739** | **9086.81** | **45593.14** | **18445.93** |

स्त्रोत: जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन 2015-16.

कृषी उद्योगाचे ग्रामीण विकासातील योगदान :

जालना जिल्ह्यातील कृषी उद्योगाचे असणारे महत्त्व पुढीलप्रमाणे सांगता येईल.कृषी उद्योग हा शेती व उद्योगाच्या विकासाला प्रेरणा देणारा एक महत्त्वाचा स्त्रोत आहे. कृषी उद्योग शेती व उद्योग यांच्यातील दुवा मानला जातो. या उद्योगामुळे ग्रामीण भागात असणाऱ्या नैसर्गिक साधन संपत्तीचा, ग्रमशक्तीचा उपयोग करता येतो. कृषी उद्योग ग्रामीण भागातील आधुनिकीकरणाला प्रेरणा देणारे असतात.शेतीच्या विकासामुळे ग्रामीण भागाचा विकास होतोच असे नाही परंतु अर्थव्यवस्थेतील सर्व विभागाची प्रगती म्हणजेच विकास होय तेव्हाच कृषी उद्योग अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रांच्या विकासाला चालना देण्यास कारणीभूत ठरतात. जालना जिल्ह्यात कृषी उद्योग शेतीला पूरक व्यवसाय म्हणून करत आहेत. यामध्ये दुग्धव्यवसाय हा एक प्रमुख व्यवसाय समोर आला आहे. दुधापासून लोणी, दुधाची भुकटी, तूप, चक्का, पनीर यासारख्या वस्तू तयार करणे असे उद्योग ग्रामीण भागात सुरू करता येतात. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना रोजगार प्राप्त होईल परिणामी उत्पन्नातही वाढ होईल.जालना जिल्ह्यात कृषी उद्योग शेतीला पूरक असल्याने या उद्योगाने ग्रामीण भागात रोजगारात वाढ केली आहे त्यामुळे लोकांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे अशाप्रकारे आपणास शेतीमालावर प्रक्रिया करणारे नेमके कोणकोणते उद्योग आहेत व त्यांचे ग्रामीण विकास समाधी स्थान कसे आहे हे स्पष्ट करता येते.

जालना जिल्ह्यामध्ये ज्वारी गहू कापूस व इतर धान्य ही प्रमुख पिके असून या जिल्ह्यात खरीप व रब्बी या दोन्ही हंगामात पिके घेण्यात येतात.जालना जिल्ह्यात घेतल्या जाणाऱ्या पिकांमध्ये सर्वात जास्त क्षेत्र एकदल धान्याची त्याखालोखाल द्विदल धान्याचे क्षेत्र व त्यानंतर ते लवंगी पिकाचे क्षेत्र आहे.जालना जिल्ह्यामध्ये ज्वारी बाजरी गहू ही प्रमुख एकदल धान्य पिके व तूर मूग हरभरा ही प्रमुख द्विदलवर्गीय पिके घेण्यात येतात. नगदी पिकांमध्ये ऊस आणि कापूस ही महत्त्वाची पिके असून सिंचनाच्या सोयी मुळे जालना जिल्ह्यातील स्थापन झालेल्या **6** साखर कारखान्यामुळे उसाच्या पिकाखालील क्षेत्रात वाढ होताना दिसते.ऊसाच्या पिकाखालील क्षेत्र सन **2017-18** साली **13098** हेक्टर होते.सन **2017-18** साली कापसाच खालील क्षेत्र **297992** हेक्टर म्हणजेच **37.51%** होते.

जालना जिल्ह्यातील पशुधन व शेती व्यवसाय :

जालना जिल्ह्यातील हवामान परिस्थितीनुसार काही भागांमध्ये उत्तम प्रकारे बागायती शेती केली जाते तर काही भागांमध्ये जिरायती शेती करण्यास ही अडचण निर्माण झालेली दिसून येते.मराठवाड्यातील बाजारपेठेच्या दृष्टीने महत्त्वाचा असणारा हा जिल्हा शेती क्षेत्रात ही अग्रगण्य असायला हवा परंतु वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळे जालना जिल्ह्यातील शेतकरी व पशुधन अनेक प्रकारच्या समस्येने बंदिस्त झाल्याचे दिसून येते. शेतमालावर प्रक्रिया करणारे, शेतीसाठी लागणारे यंत्रे, अवजारे ,बी-बियाणे, खते यांची निर्मिती करणाऱ्या उद्योगांना कृषी प्रक्रिया उद्योग म्हटले जाते.भारता सारख्या कृषिप्रधान देशात कृषी उद्योग महत्त्वाचे आहेत ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी त्याचबरोबर शहरातील व ग्रामीण भागातील बेकारी दूर करण्यासाठी दारिद्र्य दूर करण्यासाठी कृषी प्रक्रिया उद्योगाची भूमिका महत्त्वाची असते या कृषी प्रक्रिया उद्योगांमध्ये शेतीमालावर प्रक्रिया करणारे उद्योग यांचा समावेश होतो.

कापड उद्योग:

या उद्योगांमध्ये कापसातून सरकी काढणे, कापसाची जिनिंग व प्रेसिंग करून त्यांच्या गाठी बांधणे, सूत काढणे, कापड तयार करणे यासारख्या उद्योगाचा समावेश केला जातो. सूतगिरणी आणि कापड गिरणी अस्तित्वात आल्यानंतर ग्रामीण कामगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. जालना जिल्ह्यामध्ये खाजगी क्षेत्रात आणि सहकारी क्षेत्रात अधिक प्रमाणात कापड उद्योगात कामगारांची संख्या दिसून येते . जालना जिल्ह्यामध्ये यशवंत सहकारी सूतगिरणी लिमिटेड अंबड तालुका अंबड जिल्हा जालना. मत्स्यदरी सहकारी सूतगिरणी विठ्ठल नगर बहिरेगाव तालुका घनसांगी जिल्हा जालना.या सुतगिरण्या आजच्या परिस्थितीत चांगल्या प्रकारे चालत आहेत परंतु जालना शहराजवळ असणारी जालना सहकारी सूतगिरणी कुंबेफळ ही पूर्णता बंद पडलेली आहे यामुळे अनेक कामगारांना रोजगारास मुकावे लागले.परंतु सामनगाव तालुका जालना जिल्हा जालना.या ठिकाणी लक्ष्मी कॉटस्पिन या कापड उद्योगांमध्ये अनेक महिलांना व पुरुषांना रोजगार प्राप्त झालेला दिसून येतो.

याबरोबरच शहरामध्ये फार मोठ्या प्रमाणात असणारे होलसेल व्यापारी, व्यापारी केंद्र, गुरुनानक कापड दुकान केंद्र, सागर कपडा सेंटर जिंदाल मार्केट, साजन सरिता, मुळचद भगवांनदास, कापड विक्रेता नथमल कापड केंद्र, बंजारा होलसेल, कपड्याचे दुकान, वरद होलसेल, कापड दुकान, मोर बंधू ,मोहिनी, श्यामकुमार द्वारकादास, वंदना,गुरुनानक, राजेश,अरिहंत,सागर विविध प्रकारचे कापड उद्योग व्यवसाय या जालना शहरांमध्ये चांगल्या प्रकारे रोजगाराच्या संधी प्राप्त करून देतात.

**तंबाखू -बीडी उद्योग.**

जालना शहर हे तंबाखू पासून तपकीर द बेस्ट इत्यादींची निर्मिती करण्याबरोबरच बीडी उद्योगात अग्रेसर असल्याचे शहर म्हणून ओळखले ओळखले जाते. बिड्या तयार करण्याचा कुटिरोद्योग जालना शहरांमध्ये चांगल्या प्रकारे विकसित झालेला असल्याकारणाने ग्रामीण भागातून आलेल्या बहुसंख्य स्त्रियांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध झाला आहे.

**दुग्ध व्यवसाय...**

जालना शहरा शेजारील सीमावर्ती पट्ट्यातील सभोवताली असणाऱ्या नागेवाडी, इंदेवाडी, सामनगाव,रोहनवाडी, घाणेवाडी, देवमूर्ती, राममूर्ती, शिंदे काळेगाव, दावरवाडी, दरेगाव, बेतलम,रेवगाव, लोंढेवाडी,कुंभेफळ,गोलापांगरी, सामानगाव, रांजणगाव, काजाळा, सायगाव, डोंगरगाव, निपाणी पिंपळगाव,दगडवाडी, राजपुतवाडी,निधोना,वाघरुळ,जामवाडी,नंदापुर, लोंढेवाडी इत्यादी भागातून फार मोठ्या प्रमाणात दुग्ध व्यवसायिक दूध विकण्याकरिता जालना शहरांमध्ये दैनंदिन रीत्या येत असतात. यामुळे जालना शहराच्या

सभोवताली ग्रामीण भागामध्ये आर्थिक दृष्ट्या दुग्ध व्यवसायाला फार महत्त्वाचे स्थान आहे.ग्रामीण भागात दुग्ध व्यवसायाला चांगल्या प्रकारे चालना मिळाली असल्यामुळे दुधापासून लोणी ,श्रीखंड ,पनीर, चक्का, दूध पावडर यासारख्या वस्तू तयार करणारे उद्योग खाजगी व सहकारी क्षेत्रात सुरू झाले आहेत.शहरांमध्येही दुग्ध व्यवसायावर अवलंबून असणाऱ्या धुंवाधार प्रक्रिया करणारे उद्योग प्रसिद्ध आहेत.जालना शहरा सभोवताली असणाऱ्या ग्रामीण भागातील लोकांना दुग्ध व्यवसायामुळे उत्पन्नाचे साधन प्राप्त झाले असून त्यांच्या राहणीमानात सुधारणा करण्याची संधी मिळाली आहे.

**मत्स्य व्यवसाय :**

जालना जिल्ह्यामध्ये असणाऱ्या प्रमुख नद्या, उपनद्या, मध्यम प्रकल्पाची धरणे यांच्या परिसरात मत्स्य व्यवसाय उद्योग केला जातो.ग्रामीण भागात खाण्यायोग्य माशांची निर्मिती करणे किंवा पैदास करणे,पैदास करणारे, मत्स्य व्यवसाय उद्योगावर लक्ष केंद्रित करण्यात येत आहे. या व्यवसायामुळे रोजगार निर्माण होऊन उत्पन्नही वाढते. जालना जिल्ह्यामध्ये घाणेवाडी जलाशय प्रकल्प, निम्न दुधना प्रकल्प, म.चिंचोली येथील मत्स्य , मांदळा प्रकल्प, जाब समर्थ येथील प्रकल्प, दुधना नदी वर असणारे बहुसंख्य प्रकल्प, खडकपूर्णा धरणावरील प्रकल्प, विविध प्रकारच्या ठिकाणी मत्स्य व्यवसाय सुरू करण्यात आलेला आहे.

**साखर उद्योग :**

जालना जिल्ह्यामध्ये सध्या परिस्थितीत पाच सहकारी साखर कारखाने असून 1 प्रायव्हेट लिमिटेड कारखाना आहे.रामनगर सहकारी साखर कारखाना फार प्राचीन काळापासून जालना शहराच्या पूर्वेस रामनगर या ठिकाणी अस्तित्वात आहे. परंतु सध्या परिस्थितीत तो कारखाना कायमस्वरूपी बंद झाल्याचा दिसून येतो. यानंतर अंबड तालुक्यातील महाकाळा या ठिकाणी श्री समर्थ सहकारी साखर कारखाना फार मोठ्या प्रमाणावर प्रगतशील असून या कारखान्यांमध्ये दैनंदिनी रीत्या शेतकऱ्यांना उपयोगी असणारी सर्व व्यवस्था उपलब्ध आहे. त्यामुळे हा कारखाना प्रत्येक हंगामामध्ये व्यवस्थित रित्या चालवल्या जातो.सदरील कारखान्यां मार्फत अनेक कृषी व्यवसायिकांना उसाच्या माध्यमातून फार मोठ्या प्रमाणात आर्थिक लाभ झाल्याचे दिसून येते.त्यामुळे अंबड, घनसावंगी तालुक्यातील बहुसंख्य लोकांना चांगल्या प्रकारे आर्थिक पाठबळ मिळाल्याचे जाणवते. श्री समर्थ सहकारी साखर कारखान्याचे मागील वर्षी नामकरण करण्यात येऊन या कारखान्याचे नाव सहकार महर्षी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखाना असे करण्यात आले आहे. याच कारखान्याचा उपविभाग म्हणून तिर्थपुरी तालुका घनसावंगी याठिकाणी समर्थ सहकारी साखर कारखान्याचा विभाग म्हणून सागर सहकारी साखर कारखाना निर्मित केलेला आहे. या कारखान्यामुळे ही तीर्थपुरी परिसरातील या बरोबरच घनसावंगी तालुक्यातील बहुसंख्य गावांना फार मोठ्या प्रमाणात आर्थिक लाभ प्राप्त झालेला आहे.याबरोबरच देवी देगाव तालुका घनसावंगी येथील रेणुका देवीच्या ठिकाणी समृद्धी सहकारी प्रायव्हेट लिमिटेड सहकारी साखर कारखाना सुरू झालेला असून यामुळे ह्या परिसरात फार मोठ्या प्रमाणावर उसाची शेती केली जात आहे. अंबड, घनसावंगी तालुक्यात शेती क्षेत्रावर आधारित ग्रामीण भागाचा विकास महत्त्वाचा आहे.आणि या ग्रामीण भागाच्या विकासाकरिता ऊसाचे कारखाने तथा गुळ प्रक्रिया उद्योग यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासास फार मोठी महत्त्वाची देणगी प्राप्त झालेली दिसून येते. बहुसंख्य शेतकऱ्यांना नगदी पीक म्हणून उसाची लागवड करणे पसंत आहे. या साखर कारखान्यात साखर उत्पादन होत असताना वाया जाणाऱ्या वस्तू पासून अल्कोहोल, कागद , शनि टायझर तयार केल्या जातात. कोरोना काळामध्ये समर्थ सहकारी साखर कारखाना महाकाळा याठिकाणी शनि टायझर निर्मिती करण्यात आलेली आहे.

तक्ता क्रमांक १ – जालना जिल्ह्यातील सागर उद्योग व त्यांची स्थापना

| अ.क्र. | स्थापना वर्षे | तालुका | साखर कारखान्याचे नाव |
|---|---|---|---|
| १ | ११९४ | भोकरदान | रामेश्वर सहकारी साखर कारखाना |
| २ | १९८२ | अंबड | समर्थ सहकारी साखर कारखाना |
| ३ | २००९ | घनसावंगी | सागर सहकारी साखर कारखाना |
| ४ | २०१० | घनसावंगी | समृध्दी साखर कारखाना |
| ५ | १९९५ | जालना | जालना सहकारी साखर कारखाना |
| ६ | २००६ | परतूर | बागेश्वर साखर कारखाना |

स्त्रोत :साखर संचालक विभागीय कार्यालय, औरंगाबाद.

**तेल बिया आणि तेल निर्मिती उद्योग :**

जालना शहराच्या परिसरात औद्योगिक वसाहतीत कापसापासून काढलेल्या सरकी पासून तेल काढण्याचा व्यवसाय केला जातो. याबरोबरच जालना शहरांमध्ये विविध प्रकारचे तेल काढण्याचे कारखाने असून यामध्ये भुईमूग, तीळ, जवस, करडई, एरंडी, अंबाडी इत्यादी तेलबियांचे उत्पादन फार मोठ्या प्रमाणात होत नसले तरी या ठिकाणी या तेलबिया वरती प्रक्रिया करण्याचे उद्योग मात्र जालना शहरांमधील दिसून येतात.तेलबियांपासून तेल काढण्याचे अनेक कारखाने खाजगी व सहकारी तत्त्वावर तसेच वैयक्तिक तत्त्वावर असल्याचे जालना औद्योगिक वसाहतीत दिसून येत असल्याचे जाणवते. याबरोबरच जालना शहरामध्ये तेल बियांपासून काढलेल्या तेलाचा वापर करून वनस्पती तूप औषधे इत्यादी वस्तूचे उत्पादन केले जाते.

सहकारी शेती को-ऑपरेटिव फार्मिंग (cooperative farming):

जालना जिल्ह्यामध्ये एकट्या शेतकऱ्या जवळील कृषी संसाधने भांडवल श्रम इत्यादी गोष्टी मर्यादीत असतात प्रत्येक शेतकरी साधनांच्या अभावी तो जास्त उत्पादन होऊ शकत नाही. हे लक्षात घेऊन सहकारी शेतीचा प्रयोग काही ठिकाणी करण्यात आला. आणि तो बरेच ठिकाणी अशी देखील झाला सहकारी शेती सर्व शेतकऱ्यांचे संमतीने केली जाते सहकारी संस्थेच्या द्वारे उत्तम बी-बियाणे खते शेतीचे अवजारे शास्त्रीय सल्ला शेतकऱ्यांना पुरविण्यात येतो. ग्रामपंचायती आणि ग्रामीण सहकारी संस्था यावरच ग्रामीण सहकारी संघटना आधारित असावी यामुळे ग्रामविकास कृषी विकास साध्य करता येतो सहकारी शेतीच्या माध्यमातून कृषी उत्पादन वाढीचा प्रयोग नंतरच्या काळात राबविण्यात येत होता. परंतु मागील काही वर्षात सतत पडणाऱ्या दुष्काळामुळे हा प्रयोग आता यशस्वी होत नाही.

कृषी आधारित उद्योगांचा विकास :

जालना जिल्ह्यामध्ये लोह पोलाद उद्योग, चहा उद्योग, महिको रिसर्च सेंटरचे बी बियाणे उद्योग,कापड उद्योग, साखर उद्योग, तंबाखू उद्योग, रबर उद्योग यामध्ये मागील वीस वर्षापासून सातत्याने थोड्याफार प्रमाणात वाढ होत आहे. परंतु बोटावर मोजण्याइतके हे उद्योग या जिल्ह्यात दिसून येतात. जालना जिल्ह्यामध्ये प्लास्टिक उद्योग, कापड उद्योग, सूतगिरणी उद्योग, साखर उद्योग, तेलगिरण्या उद्योग व इतर संसाधनांची निर्मिती फार मोठ्या प्रमाणात होत असताना कृषी च्या संबंधित असणारी आधुनिक महिको रिसर्च फाउंडेशन या कंपनीमुळे जालना जिल्ह्याला जगात ओळख प्राप्त झालेली आहे. म्हणून उद्योगाच्या वाढीबरोबर उद्योगाशी संबंधित कृषी उत्पादनात वाढ होणे स्वाभाविक प्रक्रिया आहे. कृषी आधारित उद्योगांचा विकास कृषी उत्पादन मागील प्रमुख प्रेरणा आहे.कृषी संबंधित उद्योग जसजसे वाढत जातील तसतसा कृषिक्षेत्रात संरचनात्मक बदल घडून येतो. यामुळे कृषी आधारित उद्योगांचा विकास कृषी व्यवसायाचे संरक्षणात्मक बदलाची वैशिष्ट्य ठरते.

शेतमालाच्या खरेदी-विक्रीच्या स्वरूपात बदल :

आज जालना जिल्ह्यातील काही शेतकरी द्राक्ष बागायतदार आहेत.यामुळे यांच्याकडे उपलब्ध असणारे उत्पादन आज भारताबाहेरही निर्यात केले जाते. आज कृषिमालाची स्थानिक बाजारपेठेतील खरेदी-विक्री जागतिक पातळीवर गेलेली दिसून येते. याकरिता रस्ते वाहतूक दळणवळण व संदेशवहन,बँका आणि विमा कंपनी यामुळे बाजारपेठेचे स्वरूप पूर्णपणे बदलून गेले आहे. संगणकाच्या साह्याने आज घर बसल्या कृषी मालाची खरेदी विक्री करता येते. कृषी व्यवसायातील संरचनात्मक बदलाचे हे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे..बाजारपेठेचे ज्ञान आज त्वरित प्राप्त होते.कृषी बाजारपेठेचा विस्तार, कृषी व्यवसायातील संरक्षणात्मक बदलाचे एक प्रमुख अंग म्हणून मानले जाते. यामुळे जालना जिल्ह्यातील बहुसंख्य शेतकऱ्यांना आपला शेतीतील परदेशात निर्यात करता येतो.

शहरी व ग्रामीण भागातील लोकांमध्ये असणारी गरीबी :

ग्रामीण भागातील गरीब लोकांमध्ये खालील वर्गातील लोक जास्त प्रमाणात आढळून येतात जसे की.

1. भूमिहीन शेतमजूर.

ग्रामीण भागातील ज्या मजुराच्या व स्वतःच्या मालकीची साधी एक एकर ही जमीन नाही ते उदरनिर्वाह करण्याकरिता दुसऱ्याच्या शेतावर काम करतात परिणामी सहा महिने ऊसतोड कामगार म्हणून जातात अशा भूमिहीन शेतमजुरांना वर्षातून पाच ते सहा महिनेच काम मिळते परिणामी ते अर्धे बेकारी जीवन जगत असल्याने मजुरांची परिस्थिती अत्यंत हालाखीची असते हा समाजातला सर्वात दुर्बल घटक समजला जातो.

2. सिमांत शेतकरी घटक.

ग्रामीण भागामध्ये 2.5 हेक्टरपेक्षा कमी क्षेत्र असणारे लोक सिमांत शेतकरी म्हणून गणले जातात .परंतु आजच्या परिस्थितीमध्ये हेक्टर 01.00 पेक्षाही कमी क्षेत्र असणारे शेतकरी दिसत आहेत.

**3.** लहान शेतकरी.

ज्या शेतकऱ्याकडे 2.5 ते 3 हेक्टर पर्यंत जमीन आहे अशा शेतकऱ्यांना लहान शेतकरी म्हणून समजले जाते यांची परिस्थिती आज वाईट आहे ते ही फार मोठ्या प्रमाणात कर्जबाजारी झाली दिसून येतात.

**4.**ग्रामीण भागातील कारागीर.

अत्याधुनिक युगामध्ये आज परंपरागत रोजगार कमावणारी ग्रामीण भागातील कारागीर हतबल झालेली दिसून येतात .त्यांच्याकडे वंशपरंपरेने आलेल्या व्यवसाय हाती राहिली दिसून येत नाहीत याचा परिणाम ते दारिद्र्य रेषेत जीवन जगतांना दिसत आहेत .यामुळे त्यांच्या हाताखाली करणारे इतर कुशल कारागीर होते .यांच्या हाताला आज काम न राहिल्यामुळे ते ग्रामीण भागातून शहरी भागाकडे मार्गक्रमण करत आहेत .परिणामी ग्रामीण भागातील लोक शहराकडे स्थलांतरित होताना दिसतात.

**5.** भटके मागासलेले आदिवासी व जंगलात राहणारे लोक यांची स्थिती.

आज जालना जिल्ह्यातील अनेक भागात विविध व्यक्ती गरीब परिस्थितीत आपले जीवन जगत आहेत . त्यांच्या दैनंदिन जीवन जगण्यासाठी ज्या किमान उत्पन्नाची गरज आहे ते उत्पन्न त्यांना मिळत नाही .स्वतःच्या मालकीची भूमी नसणे ,परंपरागत उद्योगांच्या झालेला ऱ्हास ,अज्ञान ,आळस ,ग्रामीण उद्योगांचा मागासलेपणा , प्रशासनाकडून होत असलेले दुर्लक्ष ,इत्यादी कारणांमुळे ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध नाहीत . गरिबातील गरीब लोकांनाही काम नाही त्यामुळे उत्पन्न नाही म्हणून गरिबीचे दुष्टचक्र सतत फिरत आहे .शहरी भागातील गरिबी पेक्षा ग्रामीण भागातील गरीबीचे प्रमाण जास्त आहे.

जिल्ह्यातील शेतकरी शेतमजूर प्रशासन यांच्यासमोरील चिंता वाढलेली दिसून येते जलव्यवस्थापन , जलसंधारण ,जलयुक्त शिवार या नावाखाली पाणी आडवा पाणी जिरवा या योजनेखाली आजपर्यंत जिल्ह्यात कोट्यावधी रुपये निधीचा वापर करून कामे करण्यात आली .परंतु ती वास्तविकरित्या व्यवस्थित न झाल्यामुळे शेतकऱ्यांना त्याचा फायदा होत आहे का .? ही कामे काही ठिकाणी उत्तम रित्या शेतकऱ्यांना फायदाशिर तर काही ठिकाणी या कामाचा शेतकऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे .प्राचीन काळापासून गावाच्या आजूबाजूला असणाऱ्या नद्या वाहत होत्या .परंतु 1996- 97 नंतर या गावाच्या बाजूने वाहणाऱ्या बारमाही नद्या अचानक बंद पडू लागल्या .या नद्या वरती धरणे केली गेली ,पाणी आडवा पाणी जिरवा या नावाखाली झाली परंतु पाण्याचा वापर शेतीसाठी झाला नाही .शेतकऱ्यासाठी झाला नाही ,जनावरासाठी झाला नाही ,तर याचा वापर केवळ शासकीय मालमत्तेचा वापर करण्यात झालेला दिसून येतो .

जालना जिल्ह्यातून जायकवाडी धरणातून जात असलेला डावा कालवा हा दरवर्षी दुरुस्त केला जातो परंतु या कालव्यातून जवळपास 10 ते 20 टक्के पाणी कोणत्याही कामाचे कोणत्याही वापरात न येणारे निघून जाते .या पाण्याचा उपयोग शेतीसाठी होत नाही ,जनावरासाठी होत नाही ,तर तो पुढच्या वर्षी दुरुस्तीचे टेंडर निविदा काढण्यासाठी केला जात आहे .या बारमाही वाहणाऱ्या नद्यावर कोल्हापुरी पद्धतीची धरणे करून ,छोट्या -छोट्या बंधाऱ्यामुळे त्या नद्यांमध्ये गाळ संचयन होऊन नदीचे पात्र अरुंद झाले .पात्रांमध्ये साचणारे पाणी थोड्या दिवसात निघून जाते .याचा परिणाम नदी परिसंस्थेमध्ये असणाऱ्या जीवनावरती, वृक्षा वरती ,वेलीवरती झालेला दिसून येतो .जलयुक्त शिवार योजनेच्या नावाखाली अथवा नदी रुंदीकरणाच्या नावाखाली नदीच्या बाजूला असणारी वृक्षतोड केली गेली .यामुळे नदीपात्राच्या जवळून येणारा वारा सुसाट वाहत असून त्या वाऱ्यामुळे ऊस ,ज्वारी ,केळी या पिकाचे भयानक नुकसान झाल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष व शिफारशी :**

जालना जिल्हा समुद्र किनारपट्टीपासून 524 मीटर उंचीवर असल्याकारणाने पर्जन्याचे प्रमाण अत्यल्प आहे. यामुळे जलसंधारणाची कामे होणे गरजेचे ठरते.गोदावरी नदी परिसरात ज्याप्रमाणे कोल्हापुरी टाइप विविध प्रकारचे बॅरेजचे काम करण्यात येऊन त्या ठिकाणी असणाऱ्या शेतकऱ्यांना बाराही महिने पाणी उपलब्ध करून दिले जाते त्याच पद्धतीने दुधना नदी वरती ही अशाच प्रकारची कोल्हापुरी टाइप बॅरेजेस उभारण्यात यावेत. घनसांवगी,परतूर, मंठा, अंबड या परिसरात अजून दोन सहकारी साखर कारखान्याची आवश्यकता आहे जेणेकरून शेतकऱ्यांना निसंकोचपणे उसाचे उत्पादन घेऊन आर्थिक दृष्ट्या सक्षम होता येईल.जालना शहराच्या परिसरात फार मोठ्या प्रमाणात दुधाचे उत्पादन होत असल्याकारणाने दुधावर प्रक्रिया करणारे उद्योग उभारले जावेत त्याचप्रमाणे

शेतकऱ्यांच्या माध्यमातून दूध प्रक्रिया उद्योगात आर्थिक दृष्ट्या शेतीला लाभ होईल या पद्धतीने प्रक्रिया करणे गरजेचे आहे.जालना शहराच्या परिसरात होत असलेल्या ड्रायपोर्ट प्रकल्पामुळे जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या कृषी मालाला फार मोठ्या प्रमाणात किंमत येईल अशी अशा शेतकऱ्यांच्या माध्यमातून वर्तविण्यात येते.जालना जिल्ह्यातील सर्वच राजकीय लोकप्रतिनिधीने शेतकऱ्यांच्या दृष्टीने विचार करून मागेल त्याला वीज जोडणी मागेल त्याला शेततळे व प्रत्येक गावाच्या आजूबाजूला असणाऱ्या सर्व नद्यांचे खोलीकरण व रुंदीकरण केल्यास जालना जिल्ह्यातील शेतकरी आर्थिक दृष्ट्या कृषी संसाधनाच्या बाबतीत समृद्ध होईल. ग्रामीण भागाच्या विकासाचा कणा ग्रामसेवक व तलाठी असतो याबरोबर त्या ठिकाणी असणारी प्राथमिक शाळा ही त्या विकासाला हातभार लावते यांच्यावरती ग्रामपंचायतीचे नियंत्रण असते सोसायटीचे नियंत्रण असते तसेच प्रशासन व गावातील प्रतिष्ठित व्यक्तींचा व्यक्तिशः नियंत्रण असायला हवे यामुळे ग्रामीण भागाचा विकास होण्यास हातभार लागेल. शेतकऱ्याच्या संबंधित विविध प्रकारचे योजना राबवताना त्यांना विनाकारण तंत्रज्ञानाच्या नावाखाली बँकेकडून, विविध प्रकारच्या सोसायटी कडून व प्रशासनातील अधिकाऱ्या कडून फार मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागतो. शेती व्यवसाय व शेती पूरक उद्योगधंदे यांची जालना जिल्ह्यात अत्यंत आवश्यकता आहे. कारण की, जिल्ह्यातील वाढती लोकसंख्या व उपलब्ध क्षेत्रफळ म्हणून शेतकऱ्यांना मोफत वीज द्यावी व रासायनिक खतावरील सर्व कर मुक्त असावा. शहरांमधील अनियोजित प्रकारच्या बाजारपेठेतील अडचणी, ग्रामीण भागातील अविकसित झालेले रस्ते, वीज वितरण कंपनीचा अनियमित कारभार यामुळे शेती प्रक्रिया उद्योगावर फार मोठा परिणाम झालेला दिसून येतो. जालना जिल्हा मानवी विकास निर्देशांक प्रमाणे भारत देशात 28 व्या क्रमांकाचा आहे.म्हणून जालना जिल्ह्यातील आर्थिक परिस्थिती, दरडोई उत्पादन, कृषी व्यवसाय उत्पादन, उभारण्यात आलेली उद्योगधंदे यांच्यामुळे जालना जिल्ह्यातील आर्थिक दृष्ट्या विकसित झालेली व्यापारी बाजारपेठ आज अत्यंत आर्थिक संकटात सापडलेली दिसून येते. कृषी व्यवसाय आणि कृषीच्या संबंधित पूरक व्यवसाय यांची संख्या जालना जिल्ह्यामध्ये अत्यल्प आहे. जालना जिल्ह्यामध्ये आज घडीला पाच सहकारी साखर कारखाने सुरु असून यामधून ज्या शेतकऱ्यांकडे जलसिंचनाची सुविधा आणि नैसर्गिक पाण्याचे स्रोत उपलब्ध आहे असेच शेतकरी आर्थिक दृष्ट्या ऊस या पिकाचे उत्पादन घेऊ शकतात. जालना जिल्ह्यामध्ये परतूर, भोकरदन, मंठा यासारख्या ठिकाणी जिनिंग व्यवसायाची फार मोठ्या प्रमाणात गरज आहे.जिल्ह्यातील मोजक्याच सूतगिरण्या सुरू असून बाकीच्या जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरी कायमस्वरूपी कापसाच्या हंगामामध्ये सुरू असलेल्या दिसतात. याउलट या स्थानिक सूतगिरण्या मध्ये व जिनिंग व प्रेसिंग मध्ये फार मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होत नाही. जागतिक दृष्टिकोनातून भारतातील शेतकरी आणि जालना जिल्ह्यातील शेतकरी यांचा तुलनात्मक अभ्यास केल्यास असे दिसते की, जालना जिल्हा अजूनही पंचवीस ते तीस वर्षे पाठीमागे आहे. ज्यामुळे जालना जिल्ह्यातील आर्थिक घडी बसविण्याकरिता शेतीपूरक व्यवसायाची फार मोठ्या प्रमाणात गरज आहे.जालना शहरांमध्ये असणाऱ्या जुन्या औद्योगिक वसाहतीत व नवीन औद्योगिक वसाहतीमध्ये फार मोठ्या प्रमाणात बदल झालेला दिसून येतो. नवीन अतिरिक्त औद्योगिक वसाहतीत महाराष्ट्र शासनाच्या वतीने फार मोठ्या प्रमाणात सुविधा प्राप्त करुन दिले आहेत. परंतु पर्यावरण नियंत्रण मंडळाचे याकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते . याचा परिणाम असा आहे की, जालना शहरातील मोती तलावापर्यंत असलेल्या औद्योगिक वसाहतीत तथा आधुनिक वसाहतीमध्ये हे फार मोठ्या प्रमाणात उत्पादन पोलाद उत्पादन, खते, प्लास्टिक उत्पादन, तेलबिया उत्पादन व इतर विविध प्रकारचे कारखाने उपलब्ध आहेत. हा परिसर पूर्णतः पर्यावरणीय दृष्ट्या प्रदूषण झाल्याचे दिसून येतो. जालना शहराच्या पश्चिमेकडे असणारी ही औद्योगिक वसाहत मुळातच चुकीच्या दिशेने रचली गेलेली दिसून येते. कारण की, पश्चिमेकडून पूर्वेकडे वर्षातून दहा महिने सरासरी हवा एक सारख्या गतीने वाहत असते. त्यामुळे शहरातील बहुसंख्य लोकसंख्येला या प्रदूषित हवेचा सामना करावा लागतो. परिणामी विविध प्रकारच्या पर्यावरणीय प्रदूषणास ही शहरातील लोकसंख्या बळी पडत आहे.

शेतीपूरक व्यवसायांमध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी व कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी फार मोठ्या प्रमाणात उद्योगधंद्याचा आधार असल्याचे दिसून येते या उलट सोयाबीन यांची विनामूल्य भावात खरेदी करून शेतकऱ्यांची फार मोठ्या प्रमाणात पिळवणूक केल्याचे दिसून येते. जालना जिल्ह्यांमधील विविध प्रकारच्या शेतकऱ्यांना जलसंसाधन संपत्तीने समृद्ध केलेली असून जसे की, शहराच्या अवतीभोवती असणाऱ्या विविध खेडेगावातून दुग्ध व्यवसाय फार मोठ्या प्रमाणात चालतो. त्याचबरोबर भाजीपाला व्यवसाय,फळबागायती व्यवसाय व पशुपालनाच्या संबंधित असणारे व्यवसाय विविध प्रकारे जालना शहराच्या आजूबाजूच्या परिसरातील शेतकऱ्यांना पशुपालकांना

फार मोठ्या प्रमाणात दिसून येतात. शेतमालावर आधारित इतर उद्योग ग्रामीण भागात सुरू करण्यात आलेली आहेत. जसे नारळाच्या झाडापासून काट्या तयार करने, वडाच्या झाडापासून चटया, पिशव्या तयार करणे, तुतीच्या झाडा पासून रेशीम किड्यांची पैदास करणे ,मधमाशा पालन करणे इत्यादी व्यवसायामुळे ग्रामीण भागात रोजगार वाढून लोकांच्या उत्पन्नात वाढ होत आहे. असे उद्योग ग्रामीण भागातील स्त्रियांना रोजगार मिळवून देणारे आहेत.

Reference:

*01. भूगोलशास्त्रातील संशोधन पद्धती (२००७)*

*02. श्रीकांत कार्लेकर, मोहन काळे, डायमंड पब्लिकेशन्स पुणे.*

*03. के. ए. खतीब .- महाराष्ट्राचा भूगोल ,मेहता पब्लिकेशन हाऊस.*

*04. डॉ. अरुण कुंभार - कृषी भूगोल ,पायल पब्लिकेशन ,986 सदाशिव पेठ ,पुणे 30 .*

*05. डॉ .पांडुरंग केचे - 1997 महाराष्ट्राचा भूगोल, कैलास पब्लिकेशन औरंगपुरा औरंगाबाद.*

*06. डॉ. सुरेश फुले - कृषी भूगोल, विद्याभारती प्रकाशन लातूर.*

*07. जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन 2015 16 , अर्थ व सांख्यिकी संचालनालय महाराष्ट्र शासन मुंबई .*

*08. प्रा. भगवान काळे 2006. आपला जालना जिल्हा ,संकेत प्रकाशन जालना.*

*09. डॉ. विठ्ठल घारापुरे ,2000 कृषी भूगोल पिंपळापुरे अँड कंपनी नागपूर .*

*10. All India Soil and Land Venues Survey Organization 1971 . (सोईल सर्वे वेनुस आयआय न्यू दिल्ली).*

*11. आपला जालना जिल्हा भूगोल - इयत्ता तिसरी .*

*12. महाराष्ट्राचा पर्यटन भूगोल. डॉ .पांडुरंग केचे - 1997*

*13. महाराष्ट्र आपल्यास अ‍ॅटलास श्रीसमर्थ प्रकाशन औरंगाबाद .*

*14. आर्थिक भूगोल - प्रा.डॉ.के.ए.खतीब.*

# सांगली जिल्ह्यातील महिला शेतमजूरांच्या समस्या

***राणी महादेव कांबळे***
*संशोधक विद्यार्थीनीए अर्थशास्त्र अधिविभागए शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर*

**प्रस्तावना :-**

*सांगली जिल्हा हा महाराष्ट्राच्या पश्चिम मध्यवर्ती क्षेत्रावर वसलेला असून जिल्ह्याने स्वतःची सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात स्वतंत्र अशी एक ओळख निर्माण केली आहे. जिल्ह्याचा मुख्य व्यवसाय कृषी असून ७० टक्के लोक कृषी व्यवसायात गुंतलेले आहेत. जिल्ह्याला वारणा आणि कृष्णा नदीचे सुपीक खोरे लाभलेले असून कृषी व्यवसायासाठी अतिशय योग्य असे वातावरण लाभले आहे. कृषी व्यवसायासाठी मजूर हा घटक अतिशय महत्तवपूर्ण असून त्यामध्ये महिला कृषी कामगारांचे योगदान अतिशय मोलाचे आहे.*

- **उद्दिष्ट्ये :-**

१. महिला कृषी कामगार होण्याची कारणे समजून घेणे.

२. महिला कृषी कामगारांच्या समस्या जाणून घेणे

- **संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत संशोधन लेख दुय्यम साधनसामग्रीवर आधारित आहे. यासाठी मासिके, अहवाल, वृत्तपत्रे, संशोधन लेख, संगणक इ. संदर्भ साधनांचा उपयोग करण्यात आला आहे.

- **सांगली जिल्ह्याची भौगौलिक परिस्थिती :-**

महाराष्ट्राच्या दक्षिण व अग्नेय दिशेला आहे. जिल्ह्याचे क्षेत्रफळ सुमारे ८,५७२ चौ.किमी असुन जिल्ह्याच्या उत्तरेला व वायव्येला सातारा उत्तर व ईशान्येला सोलापूर, पूर्वेला विजापूर (कर्नाटक), दक्षिणेला बेळगांव (कर्नाटक), नैॠत्येला कोल्हापूर व पश्चिमोल रत्नागिरी हे जिल्हे आहेत. पश्चिमेकडील शिराळा तालुका सह्याद्रीच्या मुख्यरांगेत येतो. जिल्ह्याचा पश्चिम भाग डोंगराळ आहे. कृष्णा खोऱ्याचा परिसर सपाट मैदानी स्वरुपाचा आहे. सांगली जिल्ह्यात शिराळा, वाळवा, तासगांव, खानापूर, विटा, आटपाडी, कवठेमहांकाळ, मिरज, पलूस, जत व कडेगांव इ. तालुके आहेत. जिल्ह्यात प्रत्येक ठिकाणी भिन्नभिन्न भौगोलिक आर्थिक व सामाजिक स्थिती आहे. जत, आटपाडी, कवठेमहांकाळ हे कायम दुष्काळी तालुके आहेत. पलूस मिरज, वाळवा या तालुक्यातील गावांना कायम पुराचा धोका असतो. तसेच एका टोकाच्या शिराळा तालुक्यात जंगल आहे. तर दुसरीकडे जत तालुक्यात ओसाड जमिन आहे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवर असलेल्या सांगलीचा निम्मा लोकव्यवहार हा कानडी भाषेत चालतो. जिल्ह्याची पूर्व-पश्चिम लांबी २०५ किमी व उत्तर-दक्षिण लांबी ६६ किमी आहे.

सांगली जिल्हा कृष्णा वारणा नदी व उत्तरेस महादेवाच्या डोंगराखालील पठार व माणगंगा नदीच्या पात्रात वसला आहे. कृष्णा नदीची जिल्ह्यातील लांबी १०५ किमी आहे. जिल्ह्याचे तापमान किमान १४ अंश सेंटिग्रेड व कमाल ४२ अंश सेंटिग्रेड या दरम्यान आहे.

जिल्ह्याचे सरासरी पर्जन्यमान ४००-४५० मिली लीटर आहे. जिल्ह्याची २००१ सालची लोकसंख्या २८, २०, ५७५ इतकी आहे.

कृष्णाकाठची अतिशय सुपीक जमिन सांगलीला लाभलेली आहे. त्यामुळे येथे भाजीपाला, ऊस, द्राक्षे, ज्वारी, बाजरी, भात (तांदूळ), गहू, मका, भुईमुग, हळद, सोयबीन, डाळिंब व कापूस इ. प्रमुख पिके घेतली जातात.

- **शेतमजूर म्हणजे काय?**

जे व्यक्ती दुसऱ्याच्या शेतावर रोजंदारीच्या अपेक्षेने काम करते, तिला शेतमजूर म्हणतात.

- **महिला शेतमजूर होण्याची कारणे :-**

महिला मोठ्या संख्येने कृषी कामगार होतात त्यास पुढील कारणे जबाबदार आहेत.

**१. पतीचे व्यसन :-**

अनेक महिला कृषी कामगारांचे पति व्यसनी असतात. त्यांचे घरात लक्ष नसते. अशावेळेस त्या महिलेला घरखर्च चालविण्यसाठी, कुटुंबाच्या जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी शेतात कामाला जावे लागते.

**२. सहजासहजी मिळणारा रोजगार :-**

शेती क्षेत्रात काम करण्यासाठी शिक्षण, प्रशिक्षण, अर्ज किंवा कोणाची शिफारस लागत नाही. तोंडी कोणीतरी सांगते आणि कामावर हजर व्हायचे, अशा रितीने सहजासहजी रोजगार मिळत असल्यामुळे महिला शेतमजूर होतात.

**३. कुटुंबाला हातभार :-**

आजच्या महागाईच्या काळात कौटुंबिक खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे स्त्रियांना असे वाटते की आपणही घरी बसण्यापेक्षा शेतात कामाला जाऊन पैसे मिळविले तर तेवढाच कुटुंबाला हातभार लागेल.

**४. घटस्फोटित किंवा विधवा स्त्री :-**

घटस्फोट झालेल्या किंवा विधवा स्त्रिला आपला व आपल्या मुलाबाळांचा खर्च भागविण्यासाठी, संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी पार पाडण्यासाठी तिला शेतात कामाला जावे लागते.

**५. एकत्र कुटुंब :-**

स्त्रियांना घराबाहेर पडताना महत्त्वाचा प्रश्न मुलांचा सांभाळ कसा होईल, हा असतो. एकत्र कुटुंबात ती राहत असेल तर मुलांचा सांभाळ घरातील इतर सदस्य करु शकतात आणि ती शेतात कामाला जाऊन कुटुंबाला हातभार लावू शकते.

- **महिला शेतमजूरांच्या समस्या**

महिला कृषी शेतमजूरांना पुढील समस्यांना सामोरे जावे लागते.

**१. कौटुंबिक आर्थिक परिस्थिती :-**

कौटुंबिक आर्थिक परिस्थिती हालाखीच्या असलेल्या अनेक महिला पतीच्या व्यसनामुळे शेतात कामाला जात असतात. दिवसभर शेतातली कष्टाची कामे करुन त्या घरी येतात आणि पती दारुसाठी तिला मारझोड करुन तिच्या मिळालेल्या कमाईतील हिस्सा ते हिसकावून घेतात. अशारीतीने दिवसभर कष्ट करुनही तिला घरी स्वास्थ, विश्रांती मिळत नाही आणि तिची आर्थिक परिस्थिती सुध्दा सुधारत नाही.

**२. हीन दर्जा :-**

शेतमजूर महिलेला समाजात हीन दर्जा मिळतो. आर्थिक दर्जावर सामाजिक दर्जा अवलंबून असतो. तिला मिळणारे वेतन कमी असल्यामुळे तिची दारिद्र्यातून सुटका नसते. ज्या शेमजूर महिलेच्या कष्टावर सर्व जग जीवन जगत असते. सर्वांना अन्नधान्य मिळत असते. त्या स्त्रीची समाजाकडून उपेक्षा केली जाते.

**३. अज्ञान व असंघटितपणा :-**

घटनेच्या बळावर श्रमिक वर्ग आपल्या मागण्या मान्य घेतात. पण स्त्री शेतमजूर या विखुरलेल्या असतात. त्यांच्या संघटना नसल्यामुळे त्यांना पुरेसे वेतन मिळावे म्हणून त्या चळवळी करीत नाहीत. त्यांची सौदाशक्ती कमी असल्यामुळे त्यांना वेतन कमी मिळते. तसेच त्यांच्या अशिक्षितपणामुळे, अज्ञानामुळे त्यांना कायद्यांबाबत आणि त्यांच्या अधिकारांबाबत जाण नसते.

**४. बालसंगोपनाच्या समस्या :-**

शेतमजूर महिलेला घरापासून बरेच लांबवर शेतात कामाला जावे लागते. मुलांचा सांभाळ करायला कुणी नाही पण दारिद्र्यामुळे कामाला जावे लागते. मुले दिवसभर कुठेतरी फिरत असतात आणि त्यातून काही कारणास्तव मुले दगावण्याची किंवा त्यांच्यावर योग्य संस्कार न होण्याची शक्यता असते.

**५. कष्टप्रद काम :-**

शेतातील काम कष्टाचे असते. प्रचंड उन्हात आणि पावसात तासनूतास थांबून काम करावे लागते. दारिद्र्यामुळे शेतमजूर महिला अनेकवेळा आपल्या तब्येतीकडे दुर्लक्ष करुन काम करीत असते. रोजची कमाई जाईल. म्हणून मी मासिक धर्मात, दिवस असताना किंवा बाळंतीण झाल्यावरही लगेच हे कष्टाचे काम करते. पण याचा तिच्या आरोग्यावर वाईट परिणाम होतो, अनेक आजारांना ती लवकर बळी पडते.

- **निष्कर्ष :-**

१. कुटुंबाचा आर्थिक दर्जा कमकुवत असल्यामुळे स्त्रीला शेतमजूर म्हणून काम करावे लागल्याचे दिसते.
२. स्त्रीयांची शैक्षणिक पात्रता कमी असल्यामुळे बौध्दिक कामाऐवजी त्यांना शेतमजूर म्हणून काम करावे लागल्याचे आढळते.
३. कष्टाचे काम असून देखील पुरुषांपेक्षा स्त्रीला कमी वेतन मिळते यावरुन तिची हीन दर्जेची पातळी समजते.
४. अशिक्षितपणामुळे आणि आर्थिक कमकुवतपणामुळे तिचे बालसंगोपनाकडे आणि स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसते.

- **सूचना :-**

१. शेतमजूर स्त्रीयांचा शैक्षणिक दर्जा सुधारला पाहिजे.
२. स्त्री-पुरुष समानता असूनदेखील तिला बरोबरीने वेतन मिळत नाही ते मिळाले पाहिजे.
३. शासनाने शेतमजूर स्त्रीयांच्या आरोग्यासाठी खास सोई-सुविधा उपलब्ध केल्या पाहिजेत.

- **संदर्भ सूची :-**

*१. पवार शरद-दुसरी हरित क्रांती - अमेय प्रकाषन- पृष्ठ क्र. २८*
*२. ॅपापचमकपंण्पदझंहतपबनसजनतम*
*३. वाणी निता सुधाकर - ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासातील स्त्री शेतमजूरांचे योगदान व त्यांच्या समस्या - अर्थसंवाद - २०१६ - त्रैमासिक - खंड-४२-अंक-४-पृ.क्र.-३८२*
*४. वाणी निता सुधाकर-ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासातील स्त्री शेतमजूरांचे योगदान व त्यांच्या समस्या - अर्थसंवाद - २०१६ - त्रैमासिक - खंड - ४२ - अंक - ४ - पृष्ठ क्र. - ३८३ व ३८४*

# रासायनिक खते व कीटकनाशकांचा शेतीवरील परिणाम – एक अभ्यास

**डॉ. बोबडे बबन बाबुराव**

*भूगोल विभाग, महिला कला महाविद्यालय, बीड, जि. बीड (महाराष्ट्र)*

**सारांश**

*भारतात 70% लोक शेतीवर अवलंबून आहेत. म्हणजेच 70 कोटी पेक्षा जास्त संख्या शेतकऱ्यांची आहे. त्यांना दरवर्षी होतात लाखो कोट्यावधी रुपयांचे विषारी किटकनाशके खते शेतात टाकावे लागतात. त्यानंतर मानवाच्या पोटात जातात. जर शेतकऱ्यांना सेंद्रीय खत व कीटकनाशकांचे महत्व समजले तर दर वर्षी होणारा खर्च आणि विषारी अन्नपदार्थ खाल्याने होणारे आजार आणि उपचारासाठी खर्च लागू शकतो.*

*रासायनिक खतांच्या वापरामुळे शेतीतील जीव व जीवाणू मरण पावतात, त्यामुळे शत्रुजीव पीकांवर तुटुन पडतात. त्यामुळे कीटकनाशकांचा जास्तीत जास्त वापर करावा जागतो. त्यामुळे कीटकराशकांचा खर्च वाढतो. त्याच बरोबर शेतात विषारी रासायनिक द्रव्यांची फवारणी होती. फवारणीद्वारे माती, पाणी, पीक, धान्य, फळे यामध्ये विषांचे अंश येत आहेत. अन्नपदार्थाद्वारे ते मानवाच्या पोटात जात आहेत. यासाठी विषमुक्त शेतीची आवश्यकता आहे. खते व कीटकनाशकाच्या किंमतीमध्ये शेकडो पटीने वाढ झालेली आहे. परंतु उत्पादीत मालाच्या किंमतीमध्ये वाढ झालेली नाही. त्यामुळे विषमुक्त शेती करूनच शेतकरी समृद्ध होऊ शकतो.*

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

1) रासायनिक खते व कीटकनाशकांच्या परिणामांचा अभ्यास करणे.
2) रासायनिक खते व कीटकनाशकांचा मानवी आरोग्यावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.
3) रासायनिक खते व कीटकनाशकांचा मृदेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :**

माहिती निरीक्षण व व्दितीय स्त्रोतांवर अवलंबून आहे. या शोध निबंधासाठी आवश्यक माहिती संकलनासाठी विविध प्रकाशने, वृत्तपत्रे, संदर्भग्रंथ, इंटरनेट दत्यादीद्वारे उपलब्ध माहितीद्वारे मिळविली आहे.

**प्रस्तावना :** प्राचीन काळापासून ते आजतागायत भारतीय संस्कृतीत कृषी क्षेत्र हे विकासाचे प्रमुख साधन बनले आहे. कारण बहुतांश लोकांचे शेती हेच उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन राहिले आहे. किंबहुना ते मानवी जीवनाचे अविभाज्य् अंग आहे. मानवी जीवनाचे अस्तित्व्, त्याचा विकास व विस्तार कृषी क्षेत्रामुळेच झालेला पहावयास मिळतो. मानवाच्या अस्तित्वास आवश्यक अशा अन्न्, वस्त्र, व निवारा यासारख्या वस्तु व सेवा यांचा पुरवठा शेतीतुनच झालेला आहे. मानवास काम करण्यास लागणारी दैनंदिन ऊर्जा शेती क्षेत्रातुन निर्माण झालेल्या अन्नपदार्थातुनच मिळते. म्हणजेच सकस, पौष्टिक व परिपूर्ण जीवनसत्वाची गरज शेतीतून निर्माण झालेल्या उत्पादनातून पूर्ण केली जाते. या बरोबरच भारतास प्राचीन काळापासून महान अशा कृषी संस्कृतीचा वारसा लाभला. विकासाच्या वेगवेगळया टप्प्यात शेती करण्याच्या विविध पद्धतीस शेती, नैसर्गिक शेती, पारंपारिक शेती, मिश्र शेती, जैविक शेती व रासायनिक शेती असे संबोधले जाते. आधुनिक काळात पारंपारिक ज्ञान व नैसर्गिक घटकावर आधारित शेती करण्याच्या पद्धतीस सेंद्रिय शेती म्हणून ओळखले जाते.

भारतात उदयास आलेली स्वयंपूर्ण खेडी जीवन पद्धती ही शेतीवरच आधारित होती. त्यानंतरच्या काळात म्हणजेच सन 1718 मध्ये इंग्लंड देशात औद्योगिक क्रांती घडून आली. याचा दूरगामी परिणाम जागतिक अर्थकारणावर व जीवनशैलीवर घडून आला. त्यातूनच मोठ्या प्रमाणावर उद्योगधंदे निर्माण झाले. यांत्रिकीकरणास चालना मिळाली. या प्रवाहातून निर्माण झालेल्या व्यवस्थेचे किंवा प्रणालीचे बरे-वाईट परिणाम शेती क्षेत्रावर घडून आले. विकसित केलेल्या यांत्रिकीकरणाच्या सहाय्याने कृषी क्षेत्रात अनेक प्रयोग करण्यात आले. त्यातून कृषी आधारित अद्योगाचा विकास झाला. ज्या ठिकाणी असे नवनविन उद्योग निर्माण झाले त्या ठिकाणी शहरी संस्कृतीचा उदय झाला. शहरी भागाचे आकर्षण व वाढत्या रोजगाराच्या संधीमुळे लोकांचे ग्रामीण भागातून शहरी भागात मोठ्या प्रमाणात स्थलांतर झालेले दिसून येते. संक्रमणाच्या काळात लोकसंख्येत मोठ्या प्रमाणात वाढ घडून आली. अन्नधान्याचा पुरवठा कमी व मागणी जास्त् अशी परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे कृषी क्षेत्रातील अन्नधान्य्, फळे

व भाजीपाला यांचे कमी कालावधीत जास्त् उत्पादन घेण्यासाठी रासायनिक खते, कीटकनाशके, सुधारीत व संकरीत बी-बियाणे यांचा वापर वाढला. परिणामी नैसर्गिक पद्धतीने केल्या लाणाऱ्या शेती क्षेत्रावर त्याचे अनिष्ट परिणाम दिसून आले.

भारतात 1950 – 60 पर्यंतच्या काळापर्यंत शेतीत पुर्णत: नैसर्गिक पध्दतीने म्हणजेच सेंद्रिय पद्धतीचा वापर करून उत्पादन घेतले जात असे. परंतु लोकसंख्या ज्या प्रमाणात वाढत होती. त्या प्रमाणात अन्नधान्याचे उत्पादन होत नव्हते. अन्नधान्याचा तुटवडा निर्माण झाला होता. त्यामुळे भारतात 1960 च्या दशकापासून उत्पादन वाढीसाठी रासायनिक खते, कीटकनाशके, तणनाशके, सुधारित व संकरीत बी-बीयाणे यांचा मोठ्या प्रमाणात वापर करण्यात आला. त्यानंतरच्या काळात अधिक उत्पादन मिळावे या हव्यासापोटी रासायनिक खतांचा, कीटकनाशकांचा, तणनाशकांचा अतिरेकी वापर झाला. उत्पादन वाढले, त्याचबरोबर उत्पादन खर्चही वाढला. त्याच्या फायद्याबरोबरच त्यांचे दुष्प् रिणाम समोर आले. रासायनिक शेतीचा अवलंब केल्यामुळे जमिनीचा पोत खालावला, उपयुक्त् सुक्ष्म् जीव-जीवाणू यांचा नाश झाला. विषयुक्त् अन्नधान्याच्या सेवनाने मानवी जीवन धोक्यात आले. त्यामुळे ग्राहकांचा विषय मुक्त अन्नधान्यास वाढता प्रतिसाद व मागणी, आरोग्य् विषयक जनजाग्रती, सेंद्रिय बाजारपेठांचा विस्तार व विकास यामुळे सेंद्रिय शेतीस पुन्हा एकदा चांगले दिवस प्रस्थापित झाले. पर्यावरणपूरक व आर्थिक दृष्ट्या किफायतशीर शेती पध्दती म्हणून शेतकरी जुनं ते सोनं या नात्याने पुन्हा एकदा सेंद्रिय शेतीकडे वळला आहे. सेंद्रिय शेती ही एक पद्धती आहे. केवळ पिकांचे उत्पन्न् वाढविण्यापूरती ही संकल्पना मर्यादित नाही. यामुळे शाश्वत विकासाबरोबरच संपूर्ण मानव जातीला त्याचा फायदा होणार आहे.

**सेंद्रिय शेती :** सेंद्रिय शेती म्हणजे नैसर्गिक साधनाचा वापर करून औषध, खते तयार करणे व पारंपारिक बियाणांचा वापर वापर करून केलेली विषमुक्त् म्हणजेच रसायनाचा वापर टाळून केलेली शेती, म्हणजे सेंद्रिय शेती होय.

**सेंद्रिय शेतीची तत्वे :-**

1) **आरोग्याचे तत्वे :-** हवा, माती, धान्याची रोपे, पशु, पक्षी, मनुष्य् प्राणी व निसर्गचक्र यांचे आरोग्य् वाढविणे हा सेंद्रिय शेतीचा उद्देश आहे. सेंद्रिय शेतीचा अवलंब केलयास रोगप्रतिकार शक्ती वाढून मानवाचे आरोग्य् वाढते.
2) **पर्यावरणीय तत्व् :-** सेंद्रिय शेती ही निसर्गाच्या जीवनचक्रावर अवलंबून व अनुरूप हवी. यामुळे कोणतेही प्रदूषण होत नाही.
3) **निष्पक्षतेचे तत्व् :-** सेंद्रिय शेती ही निसर्गचक्रातील परस्परांच्या संबंधात कोणत्याही एका बाजूस कलणारी नसावी, निष्पक्षतेची खात्री देणारी असावी.
4) **संगोपनाचे तत्व् :-** यात अंतर्भूत असलेल्या सर्व घटकांचे संगोपन सुयोग्यरीत्या व्हावयास हवे, परिणामी या व पुढच्या पिढीतील सर्वांचे आरोग्य् व कल्याण योग्य् रितीने रोखले जाईल.

**सेंद्रिय शेतीचे वैशिष्ट्ये :** या शेतीमुळे

1) सेंद्रिय शेतीमध्ये पारंपरिक पध्दतीचा उपयोग केला जातो.
2) सेंद्रिय शेंतीमध्ये पाळीव प्राण्यांचाही उपयोग केला जातो.
3) आर्थिक उत्पादनात वाढ व खर्चात घट याद्वारे उत्त्म आर्थिक नियोजन होते.
4) अन्न् सुरक्षेची खात्री व जीवनमान उंचावण्यास मदत होते.
5) शेतीवर अवलंबून असणाऱ्या जीवांना नैसर्गिक जीवन जगण्याचा हक्क देते. पर्यावरण संरक्षणात महत्वाची भूमिका बजावते.
6) मातीचा आरोग्य् स्तर कायम ठेवण्यास मदत.
7) पिके व आजुबाजूस असणाऱ्या वनस्पती यांच्यामधील पोषक तत्वांचा व सभोवतालच्याच सेंद्रिय पदार्थांचा पुनर्वापर.
8) निसर्गाचे संतुलन कायम राखण्यासाठी, अनैसर्गिक वस्तु, निसर्गाशी अनोळखी जीवांचा उपयोग न करणे.

**रसायनांचा परिणाम** :- शेतात फवारणी केल्यानंतर अगदी दुसऱ्या, तिसऱ्या दिवशी तो शेतमाल बाजारात येतो. फवारणी केल्यावर किती काळ असा शेतमाल वापरू नये. याबाबत शेतकरी आणि ग्राहक दोघेही अंधारात आहेत. त्याबाबतीतील निमय असतील तर ते केवळ पुस्तकातच आहेत. आज जनतेला जे अन्न् मिळत आहे, ते एका अर्थाने विषयुक्त् असून, नाईलाजाने ते विष दररोज जनतेच्या पोटात जात आहे. पण कीटकनाशकांच्या जोडीला आता तणनाशकांचा वाढता वापर अत्यंत धोकादायक परिस्थिती निर्माण होत आहे. सन 2000 ते 2009 दरम्यान तणनाशकांमुळे अर्जेंटिनात बालकांमध्ये कर्करोग तिपटीने वाढला असल्याचे निष्कर्ष अर्जेंटिना शासनाने केलेल्या पाहणीतून समोर आले आहेत. गेल्या काही वर्षात कर्करोगाचे रूग्ण् वाढत आहेत.

मोठ्या प्रमाणात रासायनिक खते आणि औषधांचा वापर होत असल्याने कर्करोगाचे रुग्ण् वाढत असल्याची चर्चा आहे. हे एक कारण असू शकते. मात्र ठोस त्याबाबत सांगता येणार नाही. रसायनशास्त्रातील तज्ञांनी अभ्यास करण्याची गरज आहे. असे डॉ. विशाल गोसावी कर्करोग तज्ञ म्हणतात.

भारतातील परिस्थिती पाहिली की लक्षात येते की, रासायनिक खते, तण नाशके आणि कीटकनाशकांच्या अवशेषामुळे पंजाबमधील भटिंडा, बटाला परिसरातील एकाही विहीरीचे पाणी पिण्यालायक उरलेले नाही. महाराष्ट्राची वाटचालसुध्दा पंजाबच्या मागोमाग होत आहे. अशा परिस्थितीत शेजारच्या सेंद्रिय / नैसर्गिक शेतांमधील भुजलसुध्दा दूषित होणारच म्हणून यापुढे एकट्या – दुकट्याने नव्हे, तर संपूर्ण गांव-शिवारात विषमुक्त् शेती होणे आवश्यक आहे. रोग प्रतिकारक शक्ती कमी झाल्यामुळे कीटकनाशक आणि बुरशी नाशकांच्या फवारण्या कराव्या लागतात. रासायनिक खतांचे अंश पाण्यात उतरल्याने आणि पिण्यायोग्य् राहीले नाही. अनेकांना अर. ओ सिस्टीम बसवण्या लागत आहेत. अन्न् आणि पाण्याद्वारे रासायनिक खताचे अंश मानवी आणि इतर प्राण्याच्या शरीरात जात असल्याने त्याचा आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे.

❖ **सेंद्रिय खतांचे प्रकार :-** वनस्पती व प्राणी यांच्या अवशेषापासून जे खत तयार होते त्याला सेंद्रिय खत म्हणतात. सेंद्रिय खतांमध्ये महत्वाची खते म्हणजे शेण खत, कंपोस्ट्, हिरवळीची खते, गांडूळ खते, माश्यांचे खत खाटिक खाण्याचे खत, हाडांचे खत, तेलबियांची पेंड इत्यादी.

1) **शेणखत :-** गाईम्हशींचे शेण, मूत्र, गोठ्यातील पालापाचोळा इत्यादी घटकांपासून तयार होणाऱ्या खताला शेणखत म्हणतात. त्यामध्ये नत्र, स्फुरद व पालाश असते. शेणाचा महत्वाचा उपयोग बायोगॅसमध्ये ऊर्जा निर्मितीसाठी होतो आणि शिल्ल्क राहिलेले पातळ शेण पिकांच्या वाढीसाठी पोषक अन्नद्रव्य् म्हणून वापरता येते.

2) **कंपोस्ट् खत :-** शेतातील गवत, पिकांचे कापणीनंतर कापसाची धसकटे इं. सेद्रिय पदार्थांचे सुक्ष्मजीव-जंतुंमुळे विघटन होऊन त्यातील कार्बन नभाचे प्रमाण कमी होते व चांगला कुजलेला पदार्थ तयार होतो त्याला कंपोस्ट् म्हणतात. यामध्ये नत्र, स्फुरद आणि पालाश असते.

3) **हिरवळीची खते :-** लवकर वाढणाऱ्या पिकांची निवड करून, त्यांची दाट पेरणी करून पीकं फुलोऱ्यावर येण्याच्या आधी ते नांगराच्या सहाय्याने जमिनीला नत्र मिळते. जमिनीचा पोत सुधारतो. व ती सुपीक बनते. अशा खतांना हिरवळीचे खत म्हणतात.

4) **गांडूळ खत :-** ह्या खतात गांडुळाची विष्ठा, नैसर्गिकरीत्या कुजलेले पदार्थ, गांडुळाची अंडीपुंज, बाल्यावस्था आणि अनेक उपयुक्त् जीवाणूंचा समावेश असलेल्या खताला गांडूळ खत म्हणतात.

5) **माशाचे खत :-** समुद्रकिनारी वाया गेलेल्या माशांपासून तसेच माशाचे तेल काढल्यानंतर उरलेल्या आवशेषापासून जे खत तयार होते ते ह्याने नत्र, सफुरद आणि पालाश यांचे प्रमाण भरपूर असते.

6) **खाटिकखान्याचे खत :-** खाटीक खान्यात जनावरांचे रक्त व अवशेषापासून जे खत बनवितात त्याला खाटीक खान्याचे खत म्हणतात. यात नत्र आणि स्फुरद चांगल्या प्रमाणात असते.

**सेंद्रिय पदार्थामुळे होणारे फायदे :**

1) जमिनीत सेंद्रिय खत टाकल्यास नत्राचा पुरवठा होतो.
2) जमिनीची पाणी धरून ठेवण्याची शक्ती वाढते.
3) सेंद्रिय खतांमुळे झाडांना विविध अवस्थेत स्फुरद व पालाश उपलब्ध् होऊन झाडांमध्ये मुळांक्षरे शोषले जातात.
4) सेंद्रिय पदार्थाने जमिनीचा सामू बदलण्यास अडथळा येऊन जमीन आम्ल्, विम्ल व क्षारयुक्त् होत नाही.
5) कर्ष किंवा कार्बन सेंद्रिय पदार्थात असल्याने जमिनीतील असंख्य् जिवाणूंना त्याचा उपयोग त्यांच्या वाढीसाठी होतो. हे जिवाणू झाडांना जमिनीतून अन्नद्रव्य् उपलब्ध् करून देतात.

**निष्कर्ष :**

1) कीटकांचा प्रतिबंध रोगमुक्त् बियाणांचा वापर करणे.
2) रासायनिक खतांच्या वाढत्या वापरामुळे शेतीचे आरोग्य् धोक्यात येत आहे. त्याशिवाय खताचा मानवासह इतर प्राण्यांवरही दुष्प्-रिणाम होत आहेत.

3) जनहितार्थ, तंबाखूजन्य उत्पादनावर सावधानतेचा इशारा दिला जातो. त्यातून व्यापक जनजागृती होते. अशीच व्यापक जनजागृती रासायनिक खते, तणनाशके, कीटकनाशके या तिन्ही कृषी रसायनांच्या घातक परिणामासंदर्भात होण्यासाठी कृषी रसायनांच्या वेष्टनावर सावधानतेचा इशारा ठळकपणे दिला गेला पाहिजे, तसेच पैशाच्या पावतीबरोबरच अन्न् सुरक्षितेचा दृष्टीकोणातून या रसायनांच्या दुष्परिणामा संदभात माहिती देणारे सविस्तर पत्रक स्थानिक भाषेत शेतकऱ्यांच्या हातात पडले पाहिजे.
4) सेंद्रिय शेतीच्या विकासासाठी पीकनिहाय तंत्रज्ञान प्रायोगिक तत्वावर विकसित करणे, शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती प्रशिक्षणाची सोय, सेंद्रिय, शेतीमाल विक्रीसाठी यंत्रणा, बाजारपेठ, हमीभाव, उपलब्ध् करून देणे आवश्यक आहे.

**संदर्भ सूची**

*1) कृषी भूगोल – डॉ. सुरेश फुले*
*2) कृषी भूगोल – प्रा. एस, व्ही, ढाके, प्रा. व्ही, जे, पाटील*
*3) कृषी भूगोल – डॉ. विठ्ठल घारपूरे*
*4) भारताचा कृषी भूगोल – प्रा. खतीब के. ए.*
*5) कृषी भूगोल – प्रा. वराट, डॉ. वाडवणकर*
*6) कृषी भूविज्ञान – सवदी व केचे*
*7) कृषी भूगोल – तिवारी आर, सी*
*8) कृषी विभाग – महाराष्ट्र शासन.*



**Prof. Dr. S. M. Mulani**

**Prof. Dr. S. M. Mulani**
**(M.A., Ph.D)**

- Head, Department of Geography, Deshbhakta Sambhajirao Mahavidyalaya College, Mohol (Solapur), Maharashtra
- BOS Member Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
- faculty members Science and Technology, Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
- CRC Member, Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
- Research Paper Publication International & National
    1.International - 39
    2.National – 15
- Paper Presentation
    1.International - 45
    2.National –27
- Book Publication- 2

Jyotikiran Publication, Pune
International Publication

ISBN 978-81-947698-8-0
9 788194 769880 >